# लक्ष्मीबाई टिळक

अनुपमा उजगरे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# लक्ष्मीबाई टिळक

प्रथमावृत्ती : २०१६

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

**© प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.

**किंमत : रु. २०५.००**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखिकेची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अध्यक्षांचे निवेदन

लक्ष्मीबाई टिळक यांचे नाव 'स्मृतिचित्रे' या मराठीतील साहित्यकृतीमुळे अजरामर झाले आहे. लक्ष्मीबाईंनी बालगीते आणि देशभक्तिपरही गीते लिहिली पण त्यांची ओळख झाली 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्राने. हे लिखाण केवळ आत्मप्रेरणेतून झाले नाही तर, जीवनात आलेल्या कडू-गोड प्रसंगांना त्या शब्दात पकडत गेल्या आणि त्यांच्या सहज लेखनातून सौंदर्याची विविध रूपे व्यक्त होत गेली. त्यांची भाषा अकृत्रिम आहे. प्रत्येक प्रसंगात त्यांच्या स्वभावातील निरागसतेचा प्रत्यय येतो. त्यांच्या जगण्यातून मानवतेवरील नितांत प्रेम आणि श्रद्धाच दृष्टीस पडते. सुखदु:खाच्या लपंडावात त्यांची मिस्कील विनोदबुद्धीही अधूनमधून डोकावत राहते. संपूर्ण कालखंड वाचकांसमोर जिवंत उभा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे. त्यामुळेच शालेय जीवनाच्या संस्कारांतून सुसंस्कृत बनलेल्या मनाने त्या विवाहपूर्व आणि विवाहोत्तर आठवणी 'स्मृतिचित्रे'मध्ये समर्थपणे लिहून गेल्या.

लक्ष्मीबाई टिळक 'स्मृतिचित्रे' या अक्षरवाङ्मयामुळे मराठी वाचकांना परिचित आहेत. त्यांचे चरित्र डॉ.अनुपमा उजगरे यांनी लिहिले असून ते साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशित करत आहे. लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलूंचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखिकेने या ग्रंथात केला आहे. 'स्मृतिचित्रे'मधून लक्ष्मीबाई वाचकांना जवळून भेटतात. तसेच लक्ष्मीबाईंच्या विविध पैलूंचे दर्शन या चरित्रग्रंथात तटस्थपणे घडते. त्यांच्या कविता, त्यांची वक्तृत्व शैली, त्यांची जातिधर्मापलीकडची समाजसेवा, त्यांच्याशी भावबंध असलेल्या काही व्यक्ती अशा वेगवेगळ्या विषयांवर या ग्रंथात प्रकाश टाकण्यात आलेला आहे. या साहित्यलक्ष्मीच्या निधनानंतरच्या जनप्रतिक्रियांतूनही लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. 'समग्र लक्ष्मीबाई टिळक' असा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाला उपयुक्त ठरेल असा हा ग्रंथ प्रकाशित करताना साहित्य संस्कृती मंडळाला आनंद होत आहे. मराठी वाचक या ललित शैलीतील ग्रंथाचे स्वागत करतील अशी खात्री आहे.

**बाबा भांड**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# अनुक्रमणिका

**लक्ष्मीची पावले १-९०**

माहेरच्या अंगणात १-३ कन्या सासुरासी जाये ४-७ माप ओलांडल्यावर ८-१४ कवीची भार्या १५-३३ टिळकांचे धर्मांतर ३४-३८ टिळकांच्या धर्मांतराचा लक्ष्मीबाईंवर परिणाम ३९-४३ शिक्षण ४४-४८ विरहाचा काळ ४९-५५ लक्ष्मीबाईंचे धर्मांतर ५६-६२ ख्रिस्ती सहजीवन ६३-७३ सेवाभाव ७४-७९ प्रसंगावधानता आणि उत्साह ८०-८६ लक्ष्मीबाईंचा फुलस्टॉप ८७-९०.

**भाग २ : साहित्यलक्ष्मीची पावले : पृ. ९१-१५५**

**कवयित्री लक्ष्मीबाई ९१-९३**

काव्यविषयक ९४-९५ भरली घागर ९५-९६ भक्तिविषयक कविता ९६ लक्ष्मीबाईंची अभंगांजली ९६-९९ लक्ष्मीबाई टिळकांचे 'ख्रिस्तायन'लेखन ९९-१०८ ख्रिस्तायनावर प्रतिक्रिया १०८-१०९ कीर्तनकार लक्ष्मीबाई टिळक १०९-१११ बालकविता १११-११६ पतिपत्नीविषयक कविता ११७-११८ राष्ट्रप्रेमविषयक कविता ११८-१२२ सामाजिक कविता १२२-१२६ प्रासंगिक कविता १२७-१३१ निसर्गकविता १३१-१३२ रूपकात्मक १३३-१३५.

**कादंबरीकार लक्ष्मीबाई पृ.१३६-१३७**

**'स्मृतिचित्रे'कार लक्ष्मीबाई पृ.१३८-१४९**

'स्मृतिचित्रे'चे लेखन १३८-१४९ 'स्मृतिचित्रे'ची वैशिष्ट्ये १४९-१५५.

**लक्ष्मीबाईंचे वक्तृत्व: पृ. १५६-१६६**
विचारपीठावर पाऊल ठेवण्यापूर्वी १५६-१५९ कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्ष १५९-१६२ मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण १६३-१६४ 'स्मृतिचित्रे' प्रकाशन समारंभातील भाषण १६५-१६६.

**भाग ३ :**
**लक्ष्मीबाईंशी भावबंध १६७-१७९**
बालकवी:मानसपुत्र १६७-१७४ महाराष्ट्राच्या दोन तेजस्विनी पं.रमाबाई व साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक १७५-१७७ अशोक देवदत्त टिळकांचे योगदान १७८-१७९.

**परिशिष्टे**

| | |
|---|---|
| १ जीवनपट | १८०-१८२ |
| २ लक्ष्मीबाईलिखित ग्रंथ | १८३ |
| ३ अनुवाद | १८४ |
| ४ संदर्भग्रंथ | १८५-१८७ |
| ५ जन उवाच | १८८-१९६ |
| ६ शोकसभा | १९७-१९८ |
| ७ लक्ष्मीबाई नारायण टिळक: एक की दोन? | १९९-२०० |
| ८ लक्ष्मीबाईंचे ऋण स्मरताना... | २०१-२०४ |
| ९ छायाचित्रे | |

■

# लक्ष्मीची पावले

## माहेरच्या अंगणात

अठराशे सत्तावन्नसालच्या बंडाचा काळ होता तो. त्र्यंबकेश्वर येथे राहणारे वासुदेव भगवंत जोगळेकर हे सावकार गावच्या प्रतिष्ठितांपैकी एक होते. गोरगरिबांच्या मनात त्यांच्याविषयी अपार श्रद्धा होती. परंतु त्यांच्या हितशत्रूंना हे पाहवले नाही आणि बंडाळीच्या धामधुमीचा फायदा घेऊन त्यांनी वासुदेवरावांविषयी सरकारी अधिकाऱ्यांचे कान भरले. वासुदेवरावांना अटक झाली आणि तडकाफडकी त्यांना त्र्यंबकेश्वरीच फाशी देण्यात आले. त्यांना पुत्रवत् असलेले त्यांचे जावई नारायण गोखले त्यावेळी नाशिक येथे होते. नारायण गोखले ह्यांच्या आईने आपले व्याही वासुदेवराव जोगळेकर ह्यांना फाशी दिले गेल्याची बातमी समजताच आपल्या सुनेला आणि दोन नातवंडांना लगेच सुनेच्या बहिणीकडे नाशिकला पाठवण्याची तयारी केली, पण गाडीघोडे मिळेना. शेवटी नातीला गड्याच्या कडेवर देऊन सुनेच्या पाठंगुळीस नातवाला बांधले आणि बैलाच्या पाठीवर दिले बसवून.

नारायण गोखले घरी आले ते भ्रमिष्टावस्थेतच. पितृवत् सासऱ्यांना फाशी दिल्याच्या बातमीने त्यांना जबर मानसिक धक्का बसला होता. बातमी ऐकताच ते तपोवनात गेले होते. तिथे महाराचा शिंतोडा उडाला म्हणून आंघोळ करून ओल्या वस्त्रांनिशी ते घरी आले होते. तेव्हापासून सतत 'आपण विटाळले गेलो आहोत, स्वच्छ झाले पाहिजे' अशी त्यांची भावना झाली होती. ह्या भावनेने त्यांना आयुष्यभर छळले. त्यांना 'सोवळे झाले' आहे असे म्हटले जाऊ लागले. घरात येणारे धान्य, गूळ, साखर, मीठ वगैरे वाणसामानदेखील धुऊन घ्यावे म्हणून ते बजावत. ते तसे धुतले गेले आहे की नाही ह्याची खातरजमा

पोरासोरांकरवी ते स्वत: करून घेत. घरच्या स्त्रियांनी चांगले पढवून ठेवले असताही एखादा मुलगा चुकून खरे बोलून गेलाच तर, नारायणराव बाकी मुले खोटे बोलली म्हणून त्यांना बेदम मारीत. नंतर नारायणराव घरातल्या स्त्रियांना आपल्या डोळ्यांसमोर त्या सर्व वस्तू धुऊन घ्यायला भाग पाडीत असत. त्यांच्या देवघराला दारासारखी भलीमोठी खिडकी होती. तिथे बसून ते सगळीकडे देखरेख करीत. घरी कोणी येऊन गेले की, त्याच्या जाण्याच्या मार्गावर ते पत्नीला पाणी शिंपायला सांगत. स्वत: शौचाहून आल्यानंतर चार चार नारळांएवढी माती त्यांना हातपाय धुण्यासाठी लागे. ही माती दूर आडरानातली, जिथे माणूस फिरकणार नाही, अशा ठिकाणची लागे. कोणावर विश्वास नसल्यामुळे ती माती ते स्वत:च आणीत. थोडीथोडकी नव्हे, तर वीस-पंचवीस वर्षे त्यांनी तीन-चार मैलांवरून ती माती आणली. तिथे म्हणे मोठ्ठा खड्डा पडला होता! पत्नीने स्वयंपाक ओलेत्यानेच करायचा, तोही फक्त उजव्या हातानेच. डावा हात असून नसल्यासारखा बाजूला ठेवायचा, असा त्यांचा दंडक असे. नारायणरावांच्या ह्या अतिसोवळ्याचा त्रास घरादाराला तर व्हायचाच, शिवाय गावालाही व्हायचा.

नारायणरावांना भिकूताई, केशव, भागीरथी, विष्णू आणि मनकर्णिका अशी एकूण पाच मुले झाली. पाच मुलांच्या पैकी कुणीही वडिलांच्या जवळपासदेखील फिरकत नसत. मनकर्णिका ही मुलगी त्यांना 'सोवळे झाल्या'नंतर दहाबारा वर्षांनी झालेली मुलगी. तिच्या जन्माआधी तिची आई राधाबाई आणि आत्या रखमाबाई खांबेटे ह्यांचे त्र्यंबकेश्वराच्या देवळात एकदा सुखदु:खाचे बोलणे चालू होते. अपत्य नसल्याचे आपल्या नणंदेचे दु:ख दूर करण्यासाठी राधाबाईंनी आपल्याला ह्यावेळी होणारे बाळ देण्याचे वचन नणंदेला दिले. दिलेल्या शब्दाला राधाबाई जागल्या. मनकर्णिका आपल्या आत्याच्या घरीच लहानची

मोठी झाली. तिची इतर भावंडेही स्वत:च्या घरापेक्षा आत्याकडेच जास्त वेळ असत.

आत्याच्या घराशेजारी असलेल्या एका कुटुंबातल्या सखू नावाच्या मुलीशी मनकर्णिकेची मैत्री झाली. भातुकलीसारख्या खेळात दोघी तासन्तास रमत. सखू मनकर्णिकेच्याच वयाची होती. पण त्याकाळच्या प्रथेनुसार तिचे लग्न लवकर झाले होते. सखू मैत्रिणीबरोबर खेळत बसते म्हणून स्वयंपाक वेळेवर होत नाही, भावंडांना उपाशी झोपावे लागते, तेव्हा तिच्या मैत्रिणीचे घरी येणे बंद करून आपणच तिच्याशी सगळे खेळ खेळावेत, म्हणजे स्वयंपाक वेळेत होईल आणि भावंडे उपाशी राहणार नाहीत असा विचार सखूच्या मोठ्या भावाने केला. मनकर्णिका सखूकडे नेहमीप्रमाणे खेळायला गेली, तेव्हा सखूच्या मोठ्या भावाने तिला काठीने अडवून 'आमच्या घरात पाऊल ठेवशील तर तंगडीच मोडीन' अशी धमकी दिली. वरून सखूच्या हाका येत होत्या म्हणून मनकर्णिका दुसऱ्या जिन्याने जाऊ लागली, तर त्याने पुन्हा धमकावले, 'पाहा बरं, लंगडी होऊन घरी जावं लागेल!'

सखूच्या घरी पुन्हा पाऊल न ठेवण्याचा आणि तिच्या त्या भावाचे तोंड कध्धीच न पाहण्याचा निश्चय करून मनकर्णिका तणतणतच आपल्या घरी परतली.

■

## कन्या सासुरासी जाये

अकरा वर्षांची उफाड्या अंगाची मनकर्णिका लौकिक अर्थाने उपवर झाल्यावर 'मनुला आपण मुलीप्रमाणे वाढवले असले तरी तिच्या लग्नाचा विचार तिच्या आईवडिलांनी करावा, त्यांनी वर पाहावा, आपण सर्व खर्च करू' असे मनकर्णिकेच्या आतोबांचे—गोविंदराव खांबेटे ह्यांचे म्हणणे होते. पण मनकर्णिकेच्या 'सोवळे झालेल्या' वडिलांना सोवळ्यातून बाहेर पडायला वेळ नव्हता आणि आईचा माजघरापलीकडे वावर नव्हता. त्यामुळे तिच्या विवाहाला त्याकाळाच्या मानाने विलंब झाला होता.

त्याच सुमारास नाशिकमध्ये नारायण वामन टिळक नावाचा एक विद्यार्थी चांगला कवी आणि फर्डा वक्ता म्हणून नावारूपाला येत होता. नानासाहेब पेंडसे ह्यांना आपल्या मेहुणीसाठी हा मुलगा योग्य वाटला. त्यानुसार गोविंदराव खांबेटे ह्यांनी टिळकांचे वडील वामनराव ह्यांच्याशी पत्रव्यवहार केला. वामनरावांनी पत्रोत्तर देताना 'मी हुंडा घेऊन मुलगा विकणार नाही. लग्नात तुम्हाला झेपेल तो खर्च तुम्ही करा, मला झेपेल तो मी करीन. टिपण मात्र जुळले पाहिजे. मुलगी मोठी होईपर्यंत तुम्हाला सांभाळावी लागेल, कारण माझ्या घरात कोणी बाईमाणूस नाही. मुलगी सर्वांना पसंत पडली तर मी बघण्याची गरज नाही.' अशी समजूतदार भूमिका घेतली.

एक दिवस मनकर्णिकेला पाहायला मुलाकडचे आले, तेव्हा ती तिच्याच वयाच्या असलेल्या आपल्या बहिणीच्या मुलीबरोबर झोक्यावर खेळत होती. पाहुणे कोण आहेत हे तिला माहीत नव्हते. 'नानासाहेब घरात आहेत का?' ह्या त्यांच्या प्रश्नाला 'हो, माडीवर आहेत' एवढेच उत्तर तिने दिले. त्यांना वर जाण्याचा रस्ता सापडत

नाही म्हणून तिला कमालीचे हसू आले. मनकर्णिकेला होता हसण्याचा रोग. एकदा हसू आले की, ते थांबता थांबायचे नाही. हसता हसता तिची पुरेवाट झाली. कसेबसे हसू आटोक्यात आणून तिने त्यांना वर जाण्याचा मार्ग दाखवला. थोड्या वेळाने तिला घरच्यांनी नटवून 'दाखवायला' म्हणून वर नेले तर, समोर तीच पाहुणेमंडळी ज्यांना वर जाण्याचा जिना सापडत नव्हता म्हणून त्रेधा उडाली होती आणि त्यामुळे तिला हसू आवरेनासे झाले होते. एवढेच नव्हे तर, तिला बघायला आलेला तो मुलगा दुसरातिसरा कोणी नसून 'आमच्या घरात पाऊल ठेवशील तर तंगडीच मोडीन' म्हणणारा सखूचा मोठा भाऊ होता! काहीच प्रश्न न विचारता तो निघून गेला. त्याच्या आजीने मात्र मनकर्णिकेच्या डाव्या कानाचा चापा जोरात दाबून पाहिला. त्यावर अतिशय वेदना होऊनदेखील तिने हूं की चूं केले नाही. त्यावरून 'मुलगी सहनशील आहे, वाकवू तशी वाकेल' असा कयास बांधून आजीने नातसून पसंत केली असावी, असे मनकर्णिकेला वाटले. मात्र तिला प्रश्न पडला की, 'टिळक दिसायला आपल्यापेक्षा उजवे असताना त्यांनी आपल्याला कसं काय बरं पसंत केलं असावं?' आपण दिसायला देखण्या नाही, हे तिला ठाऊक होते. आपले वडील जरी आपल्याला 'फिंदरी' म्हणत असले, तरी आपले नाक-डोळे जिथल्या तिथे आहेत, ह्याचीही तिला जाणीव होती.

लग्न ठरले. सगळी तयारी झाली. पण नवरा-नवरी दोघांचे गोत्र एकच असल्याने आता ठरलेले लग्न रहित होते की काय अशी वेळ आली. त्यावर  मुलीला आत्याच्या मांडीवर दत्तक द्यावे, असा तोडगा निघाला. पण त्यासाठी वडिलांची उपस्थिती आवश्यक होती. आणि वडील तर गेले होते आडरानात माती आणायला! संध्याकाळशिवाय ते कसले परत येणार होते! त्यांनी तर मृत्युशय्येवर त्यांच्या नावाचा घोषा चालवलेल्या खुद्द आपल्या आईला 'थांब, माझी स्नानसंध्या

होईपर्यंत मरू नको.' असा निरोप पाठवला होता! शेवटी त्यांची वाट न पाहता मुलीच्या आईलासुद्धा दत्तक देण्याचा अधिकार असल्याचा शास्त्राधार काढून वेळ मारून नेण्यात आली आणि लग्नप्रसंग साजरा झाला.

लग्नाच्या वेळी टिळकांचे वय होते सतरा-अठरा वर्षांचे. पण प्रथेप्रमाणे नवरदेवाने रुसावे, रुसून मुलीकडच्यांना अडचणीत आणता येईल असे काही अचाट मागावे, हे न पटण्याइतके टिळक विचारांनी परिपक्व होते. तरीही आपल्या वऱ्हाडापुढे त्यांचे काही चालले नाही आणि त्यांना रुसण्याचे नाटक करावे लागले. पोटात कावळे कोकलू लागल्यावर मात्र त्यांनी ते थांबवले.

वऱ्हाडाची गंमत करावी म्हणून भज्याच्या पिठात भांग घालण्याची संमती टिळकांनी आपल्या खाडिलकर नावाच्या मित्राला दिली पण नवरीची फजिती होऊ नये म्हणून तिच्या पानातली भजी काही न बोलता बाजूला खाली काढून ठेवली. 'तंगडी तोडीन', 'लंगडी होऊन घरी जावं लागेल' अशी धमकी देणाऱ्या टिळकांनी मनापासून मनकर्णिकेचा पत्नी म्हणून स्वीकार केला होता असे दिसते. त्याकाळातला हा एकतर्फी प्रेमविवाह होता असेही म्हटले जाते. लग्नात मनकर्णिकेचे नाव बदलण्यात आले. नारायणची पत्नी म्हणून 'लक्ष्मी'असे नाव ठेवण्यात आले.

लक्ष्मीबाईंची जन्मतारीख बरीच वर्षे निश्चित माहीत नव्हती. त्यांचे जन्मवर्ष मात्र १८६८ मानले जात होते. कारण '१८५७-५८साली नानांना सोवळे झाले. त्यानंतर बारा-तेरा वर्षांनी माझा जन्म झाला.' असे लक्ष्मीबाई सांगतात (स्मृ.१:पृ.३). त्या हिशेबाने साधारणपणे १८६९-७०हे त्यांचे जन्मसाल मानावयास हवे. नारायण वामन टिळकांचा जन्म १८६१ सालचा आणि 'टिळकांचे वय लग्नाच्या वेळी १७-१८ वर्षांचे होते आणि माझे अकरा' (स्मृ.१: पृ.१२)

लक्ष्मीबाईंच्या ह्या हिशेबाने त्यांचे लग्न वयाच्या नवव्या वर्षी १८७८-७९ च्या सुमारास झाले असे म्हणावे लागेल. पण लक्ष्मीबाई तर म्हणतात, त्यांचे लग्न वयाच्या अकराव्या वर्षी झाले. मग त्याप्रमाणे त्यांचे जन्मसाल १८६६ असायला हवे. टिळकदाम्पत्याचे चरित्र आणि साहित्य ह्या विषयाच्या संशोधनात आपली हयात खर्ची घातलेले त्यांचे नातू अशोक देवदत्त टिळक ह्यांनी अलीकडच्या काळात लक्ष्मीबाईंचे जन्मसाल १८६८ नसून १८६६ असल्याचे शिक्कामोर्तब केले आणि लक्ष्मीबाईंची जन्मतारीख १ जून हीदेखील निश्चित केली, त्यानुसार टिळकांचा विवाह १८७७ सालाच्या सुमारास झाला असावा असे म्हणता येईल.

■

सासरी लक्ष्मीबाईंना सासुरवास करण्यासाठी सासू नव्हती पण सासरे वामनराव टिळक ह्यांनी ती कसर पुरेपूर भरून काढली. आत्याच्या घरी लाडाकोडात वाढलेल्या मनुचे नाव लग्नानंतर बदलले होते आणि ह्या नवीन नावाने तिला घरात हाक मारणारे आणि जाच करणारे फक्त सासरे होते. ते रागावले की, सुनेला 'अहो-जाहो' म्हणत.

वामनरावांना पत्रिका बघण्याचे उत्तम ज्ञान होते. त्यांना पहिले पुत्ररत्न लाभले तेव्हा त्यांनी त्या मुलाची पत्रिका पाहिली आणि त्यांना समजले की, 'हा मुलगा घरादाराला आयुष्यभर त्रासदायक ठरणार आहे.' त्यामुळे पहिला मुलगा झाल्याचा आनंद तर बाजूलाच राहिला, उलट त्यांनी सावत्र मुलाला द्यावी तशी वागणूक नारायणला कायमच दिली. आता त्याच्या बायकोने घरात पाऊल ठेवले आणि आपली मुलगी गेली, त्यामुळे तिचाही पायगुण वाईटच, असे त्यांचे मत झाले होते. सुनेचा छळ करताना ते दरवेळी वेगळी युक्ती शोधून काढीत असत. मुलाचे लग्न ठरवताना सामंजस्याची भूमिका घेणारे वामनराव टिळक किती विरुद्ध टोकाचे वागू शकतात, ह्याचे इरसाल नमुने 'स्मृतिचित्रे'मध्ये लक्ष्मीबाईंनी तपशीलवार दिले आहेत.

लग्नापूर्वी मनुचा सगळा वेळ खेळण्यात जाई. स्वयंपाकाची तिला सवय नव्हती. घरच्या जबाबदाऱ्या, नीटनेटकेपणा हे शब्दच तिला ठाऊक नव्हते. सासरी आल्यावर मात्र पत्नीच्या माघारी घर सुव्यवस्थित ठेवणाऱ्या सासऱ्यांनी 'गबाळेपणा खपवून घेतला जाणार नाही, जिथली वस्तू तिथे ठेवली गेली पाहिजे' असा सज्जड दम नवी नवरी म्हणून नुकतेच माप ओलांडून घरात आलेल्या लक्ष्मीबाईंना देऊन ठेवला होता. पहिल्याच दिवशी सासऱ्यांनी तांदळाच्या भाकरी करायला सांगितले

तेव्हा आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, ह्याची कल्पना लक्ष्मीबाईंना आली असावी. आयुष्यात पहिल्यांदाच केलेल्या तांदळाच्या भाकरी जमिनीला उन्हाळ्यात भेगा पडाव्यात तशा झाल्याने त्यांना सासऱ्यांची बोलणी खावी लागली होती.

सासरे कोकणातले होते. स्वयंपाक करण्यात हातखंडा असलेले वामनराव 'पेजबुड्या भात', 'आयती', 'जिवंत फोडणी' अशी एकेक नावे घेऊन ते सुनेला करायला फर्मावत. ह्या पदार्थांची कधी नावेही लक्ष्मीबाईंनी ऐकलेली नसायची मग तो चाखणे-करणे तर दूरच. अशा वेळी पाण्याची घागर घेऊन लक्ष्मीबाई विहिरीवर जात. तिथे जोश्यांच्या गंगूबाईंना पटकन् त्या पदार्थाची कृती विचारत आणि घरी आल्यावर तो तयार करून अशा थाटात सासऱ्यांपुढे ठेवत की, जणू काही तो बनवण्यात त्यांचा चांगला हातखंडा आहे! सुनेच्या ह्या कर्तबगारीचा स्रोत कोणता ह्याचा छडा चाणाक्ष वामनरावांनी लवकरच लावला. तिला अडचणीत आणावे म्हणून त्यांनी जोशींच्या घरी जाऊन आपल्या सुनेला इथे येण्यास त्यांनी मज्जाव करावा अशी गळ घातली. पण 'आम्ही तसलं काही करणार नाही, सून तुमची आहे, तुम्हीच तिच्या पायाला दोरी बांधून ठेवा', असे उत्तर त्यांना मिळाले!

'बेशिस्त सुनेला' तिने न केलेल्या पण तिने करणे आवश्यक असलेल्या कामांची आठवण करून द्यायला वामनराव टपूनच बसलेले असत. आपल्या सुनेला भूक अजिबात धरवत नाही हे त्यांनी ओळखले होते. तेव्हा तीच वेळ तिला तिच्या कामांची आठवण करून द्यायला ते साधत असत. सून जेवायला बसली, एकदोन घास खाऊन तिचे तोंड खवळले, खाण्याची जिभेची वासना जागृत झाली की, ते तिला तिच्या ताटाजवळचा शेणगोळा आधी उचलायला सांगायचे. ते काम करून ती पुन्हा घास घेणार तोच, तुळशीला अजून पाणी घातले नसल्याची

तिला आठवण करून द्यायचे. वर 'स्वत:च्या खाण्यापिण्याची आठवण कशी राहते?' म्हणून तिचा उद्धार करायचे. 'नाही जेवलीस तर काही मरणार नाहीस आणि मेलीस तर तुझ्यावाचून जग काही ओसाड पडायचं नाही' असेही सुनवायला कमी करायचे नाहीत. रात्रीच्या जेवणापूर्वी सासऱ्यांचे अंथरुण घालायला लक्ष्मीबाई कधी विसरायच्या तर कधी भुकेमुळे टाळाटाळ करायच्या. आपला जन्म खाण्यासाठीच झालेला आहे, अशी त्यांची समजूत होती. अंथरूण घालायचे म्हणजे सोवळ्यातून ओवळ्यात यावे लागायचे. जेवायचे म्हटले म्हणजे सोवळे नेसावे लागे. हा सगळा आटापिटा करण्यापेक्षा त्यांना वाटायचे, सोवळ्यात आहोत, तर जेवूनच घ्यावे, नंतर मामंजींचे अंथरूण घालावे. पण वामनराव त्यांना सोवळ्यातून ओवळ्यात आणि परत ओवळ्यातून सोवळ्यात असा द्राविडीप्राणायाम करायला दररोज भाग पाडायचेच.

सुनेने देवपूजेची तांब्याची उपकरणे चकचकीत घासली नाहीत म्हणून तिचा आणि प्रत्यक्ष आपल्या मुलाचाही 'बारावा-तेरावा दिवस घालून' त्यांना तिलांजली देणारे वामनराव म्हणजे एक अजब रसायन होते. एकदा त्यांनी नारायणरावांना जवळ बोलावून महत्त्वाचे काही सांगण्याच्या आविर्भावात सांगितले, 'तू बायकोला सोडून दे. मी तुला कोकणातल्या दहा मुली आणून देतो.' 'एकीचेच पोट भरताना मारामार होते, आणखी कशाला?' असा रोकडा सवाल मुलाने करताच 'मग तिला माहेरी टाकून दे' अशी भाषा त्यांनी वापरली.

मुलाच्या गैरहजेरीत सुनेला सांभाळायला नको म्हणून 'ती वाईट चालीची' असल्याचा आरोप करायलाही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.'तुझी बायको रात्री घराबाहेर असते, पहाटे घरी येते. तू तिला घेऊन जा. आजच तिला तिलांजली दे.' असे पत्र मुलाला पाठवायचे आणि 'तुमचा जावई फार बिघडला आहे. नाही नाही ती व्यसने त्याला

जडलेली आहेत. तेव्हा तुमच्या मुलीला तुम्ही घेऊन जा नाहीतर मी तिला कुठेही सोडून देईन' अशा आशयाचे पत्र सुनेच्या माहेरच्यांना ते खुशाल लिहीत.

केसांना लावायचे तेल, शिकेकाई, बांगड्या अशा तिच्या साध्या साध्या गरजा त्यांनी पुरवाव्यात, ह्या सुनेच्या अपेक्षा 'लोकांच्या घरी दळण दळून आपल्या गरजा भागव' असे बोलून त्यांनी धुडकावून लावल्या होत्या. 'नेसायला लुगडी नाहीत' असे तिने म्हटल्यावर गोडीत 'अगदी हवीतच का? किती पाहिजेत? एक का दोन? एक हवे तर चार रुपयांचे घेतो; दोन हवी असतील तर दोन दोन रुपयांची दोन घेतो' असे म्हणून कबूल केल्याप्रमाणे दोन लुगडी त्यांनी तिला आणून दिली. तिच्या 'तीन दिवसांच्या काळात' स्वत:पुरतेच अन्न ते शिजवून घेत आणि तिला मात्र रिकाम्या पोटी ठेवत. एकदा आपली पिकदाणी घासताना किळस येऊन ती थुंकल्याचे पाहून मोठ्या गोडीत तिचा पाणी प्यायचा तांब्या आपल्याला फार आवडतो असे म्हणून तो मागून घेतला आणि त्याचा पिकदाणीसारखा उपयोग त्यांनी केला! ती न्हायला बसल्यावर तिच्या पुढचे न्हायचे गरम पाणी ते उचलून न्यायचे आणि तिला थंड पाण्याने न्हायला भाग पाडायचे.

एकदा सुनेला 'तू माझी दुसरी मुलगीच आहेस' म्हणत हरताळका करायला भाग पाडले; तिच्याकडून बेसनाचे लाडू करवून घेतले; पण तीन सवाष्णींना तीन लाडू देऊन बाकी सगळे कुलपात बंद केले आणि वर 'ती चोरून खाते' म्हणून तिची त्यांच्यासमोर बदनामी करण्याचा प्रयत्न केला; टिळकांनी गहाण टाकलेली पैठणी आपणच गुपचूप सोडवून आणल्यावर सुनेकडे पैठणीसाठी त्यांनी साळसूदपणे लकडा लावला; असे नाना प्रकार वामनरावांनी केले.

देशस्थ सून आणि कोकणी सासरा ह्यांची एकमेकांवर कुरघोडी

करण्याची जुगलबंदी मुळातून ‘स्मृतिचित्रे’मधून वाचण्यासारखी आहे. लक्ष्मीबाईंचे सासरे स्वभावाने कटकटे होते, विक्षिप्त होते, त्यांच्याशी जुळवून घेणे प्रत्यक्ष त्यांच्या पत्नी जानकीबाई ह्यांनाही खूप कष्टप्रद ठरले. लक्ष्मीबाई तर काय, सून असल्या तरी पोरसवदाच होत्या. मात्र सासऱ्यांच्या दोषांविषयी लिहिणाऱ्या लक्ष्मीबाई सासऱ्यांनी आपल्यावर कधीच हात उचलला नसल्याचे तसेच पत्नीच्या माघारी त्यांचे चरित्र शुद्ध राहिल्याचे अभिमानाने सांगतात.

सासऱ्यांचा असा छळवाद असला तरी लक्ष्मीबाईंचा दीर मात्र त्यांच्याशी खूप ममतेने वागत असे. पैठणीसाठी आपले वडील आपल्या वहिनीला छळतात हे त्याला सहन झाले नाही आणि नानाने गहाण टाकलेली ती पैठणी वडिलांनी सोडवून आणल्याचे जाहीरपणे तो सांगूही शकला नाही. पण वहिनीला होणारा त्रास अगदीच सहन न होऊन शेवटी त्याने गुपचूप ते गुपित तिच्या कानी घातले. तिची बांगड्या भरण्याची साधी हौसही वडील पुरवत नाहीत ही गोष्टदेखील त्याच्या मनाला फार लागली. त्यांनी तिला माहेरी पाठवून दिले तेव्हा गाडी सुटताना तिच्या हातावर रुपया ठेवून त्याने तिला ‘बांगड्या भरून घे’ म्हटले. टिळकांनी धर्मांतर केल्यानंतर हाच सखाराम आपल्या भावाला दरमहा शंभर रुपये पाठवतो असे कळल्यावरून लक्ष्मीबाईंची बहीण भिकुताई हिने ‘आपल्या वहिनीचे फाटके लुगडे तुला दिसत नाही का?’ अशी त्याची कानउघाडणी केली तेव्हा त्याने लगेच वहिनीसाठी लुगडे आणि दत्तूसाठी कपडे आणले. वहिनीच्या आजारपणात तिच्या माहेरचे अख्खे घर तिच्या दिमतीला आहे पण आपला भाऊ तिकडे एकटाच आहे, त्याची काळजी घेणारे कोणी नाही, तेव्हा वहिनीने त्याला सूटपत्र देऊन मोकळे करावे असा प्रस्ताव त्याने केवळ भावाच्या प्रेमापोटी तिच्याकडे मांडला, तेव्हा प्रकृतीने जीर्णशीर्ण झालेल्या आणि मनाने खचलेल्या लक्ष्मीबाईंनी चवताळून

त्याच्याशी केलेला मुद्देसूद युक्तिवाद एखाद्या सुशिक्षित, तडफदार बाण्याच्या आधुनिक काळातल्या बाईने केल्यासारखा वाटतो. त्या म्हणतात-

''आता कुठे बांधलेले आहेत ते? सूटपत्र कशाचे देऊ? मी का पळून गेले? का निघून गेले? जसे त्यांचे कोणी नाही, तसे माझे कोणी नाही. मला पैसा नाही, विद्या नाही. मूल लहान. मी काय करणार? तुमची सगळ्यांची भांडीच घासणार की नाही? तुमची ही शिष्टाई पुरे. त्यांना पत्र पाठवा. म्हणावे आधी येऊन बायकोचे नीटनेटके लग्न लावून द्या आणि मग स्वत:चे लग्न करा.''

लक्ष्मीबाईंचे म्हणणे पटल्यामुळे सखारामने आपल्या भावाने वहिनीकडे परत यावे, त्यासाठी त्याचे शुद्धीकरण आवश्यक असेल तर ते व्हावे म्हणून प्रयत्न केले. नवऱ्याने धर्मांतर केल्याच्या काळात जवळची माणसे माया करणारी असूनही त्यांचा सहवास लक्ष्मीबाईंना अगदी नकोसा झाला, अशा वेळी जवळचे माणूस तर आधारासाठी हवे पण नेहमीची सतत चौकशा करणारी माणसे नसतील अशा ठिकाणी लक्ष्मीबाईंना जेव्हा जावेसे वाटले, तेव्हा त्या आपल्या मुलासह ह्याच दिराकडे पंढरपूरला जाऊन काही दिवस तिथे राहिल्या. पाठराख्या भावाची भूमिका ह्या दिराने वेळोवेळी बजावली. सखू तर नणंद होण्यापूर्वी मैत्रीणच होती, त्यामुळे तेही नाते लक्ष्मीबाईंना जाचक ठरले नाही. लहानथोर सगळ्यांच्या पुढे मान झुकवत मानपान देण्याच्या आणि जाच सोसण्याच्या, एवढेच काय, पण 'सासरच्या कुत्र्यालादेखील हाड म्हणू नये' अशी शिकवण मुलींना दिली जात असण्याच्या त्या काळात लक्ष्मीबाईंना दीरनणंदेचा जाच सहन करावा लागला नाही, हे त्यांचे सुदैवच म्हणायचे.

लक्ष्मीबाईंना आणखी एक दीर होता. त्याचे नाव माधव. त्याचा उल्लेख त्या 'महादेव' असा करतात. हा माधव वृत्तीने अतिशय दयाळू

आणि परोपकारी होता. घरातला तांब्या, धाबळ ह्यांसारख्या वस्तूच काय पण स्वत:च्या अंगावरचे धोतरही एखाद्या गरिबाची कणव येऊन तो त्याला देऊन टाकत असे. एखाद्या वस्तूसाठीचे त्याचे मागणे हे स्वत:साठी नसायचेच, ते दुसऱ्याला देण्यासाठीच असायचे. अशा मागण्या तो वडिलांकडे करू शकत नसायचा. त्याचा हट्ट पुरवला जायचा तो त्याच्या वहिनीकडून. आपण कोणासाठी मागतो आहोत हे मात्र वहिनीला घाबरत असल्याने तो तिला कळू द्यायचा नाही. टिळकांसारखाच ह्या माधवचा स्वभाव उदार होता.

एकदा लक्ष्मीबाईंनी त्याला काही वाणसामान आणायला सांगितले तर, तो दोन रुपयांची तूपसाखर घेऊन आला. शिवाय हजामत करायला म्हणून सोबत न्हाव्यालाही घेऊन आला. ह्याचा संताप येऊन लक्ष्मीबाईंनी विहिरीत जीव देण्याची धमकी त्याला दिली आणि त्या माडीवर जाऊन बसल्या. बराच वेळ वहिनी दिसली नाही, तेव्हा वहिनीने आपला शब्द खरा केला की काय, ह्या भीतीने तो मोठमोठ्याने गळा काढून रडू लागला. लक्ष्मीबाईंनी आपल्या ह्या दिरावर पोटच्या मुलासारखी माया केली. घरातल्या पोपटाला टिळकांनी संस्कृत शिकवले होते पण तो फक्त 'भो भो महादेव' एवढेच म्हणायचा. पुढे तो पोपट उडून गेला. पण कधीतरी यायचा आणि उंच झाडावर बसून 'भो भो महादेव' अशा हाका मारून उडून जायचा. काही दिवसांतच माधवने विषमज्वराच्या आजारात हे जग सोडले. पुत्रवियोगानंतर लक्ष्मीबाईंचे दु:ख कमी व्हावे म्हणून टिळकांनी हा पोपट आणून पाळला होता. पण तो उडून गेला आणि पुत्रासमान असलेला हा दीरही आता जग सोडून गेला. अशा तिहेरी आघाताला लक्ष्मीबाईंना सामोरे जावे लागले.

■

लक्ष्मीबाईंचे संपूर्ण आयुष्य त्याकाळच्या चारचौघींपेक्षा वेगळ्या वाटेने गेले. त्या वाटेवर पतीची साथ त्यांना मिळत गेली. त्यांना वामनरावांकडून सासुरवास होत असताना टिळक नेहमीच त्यांच्या पाठीशी राहिले. आपल्या आईला वडील त्रास देतात म्हणून टिळक नेहमी आपल्या आईच्या भोवती भोवती असत. तिला हरएक कामात मदत करीत. रात्री अंधारात आपल्या पत्नीला पाणी भरण्याचे काम वडील का सांगतात म्हणून वडिलांशी हुज्जत घालत न बसता ते रात्री फिरायला म्हणून समोरच्या दाराने बाहेर पडत आणि विहिरीवरून पाणी आणून मागच्या दारात ठेवत; मग लक्ष्मीबाई ते घरात आणत. लक्ष्मीबाईंच्या पाळीच्या तीन दिवसांत वडील स्वत:पुरते शिजवून खातात आणि तिला उपाशी ठेवतात; हे लक्षात आल्यावर घरी असले तर टिळक स्वत: अन्न शिजवून पत्नीला वाढायचे.

'बायको म्हणजे पायातली वहाण ती पायातच ठेवायची, तिला चुकूनही डोक्यावर घ्यायचे नाही' अशी शिकवण त्याकाळी लहानपणापासूनच पुरुषांच्या मनावर घराघरातून बिंबवली जायची. त्यामुळे पत्नीला तिच्या कामात मदत करून तिची ह्याप्रकारे काळजी घेणारे टिळकांसारखे सहृदयी पुरुष समाजात क्वचितच आढळत.

आपल्या वडिलांचा स्वभाव किती टोकाचा खोटारडा आहे, ह्याचा अनुभव टिळकांना लहानपणापासूनच होता. एकदा वामनरावांनी जानकीबाईंना मुद्दाम त्रास देण्यासाठी आपल्या आजाराची खोटी बातमी पत्राने कळवून बोलावून घेतले होते, तो बालवयातला प्रसंग तर त्यांच्या काळजात कोरला गेला होता.

धाकटे मूल पाठीवर बांधलेल्या जानकीबाईंना मोखाड्याहून

मुरबाडला जाताना डोंगर चढत-उतरत चालावे लागले होते. त्या श्रमाने त्यांना प्रचंड थकवा आला होता. पण घरी पोहचल्यावर आपला धडधाकट असलेला नवरा ओटीवर मांडी ठोकून गप्पा करत बसलेला त्यांना दिसला तेव्हा त्याने आपल्या आजाराची खोटी बातमी कळवून आपल्याला त्रास दिला, याबाबत जानकीबाईंनी चकार शब्दानेही तक्रार केली नाही. नवरा सुखरूप आहे एवढेच त्यांना पुरेसे झाले. उलट नव्या उत्साहाने त्या घरकामाला लागल्या. विहिरीवर कपडे धुऊन, आंघोळ करून, येताना डोक्यावर पाण्याचा भरलेला हंडा घेऊन त्या अंगणात आल्या. हंडा उतरवायला त्यांनी ओटीवर रिकाम्या बसलेल्या वामनरावांना मदत काय मागितली, त्यांना तो घोर अपमान वाटला. त्यांनी संतापाने जानकीबाईंच्या कंबरेत अशी जोरात लाथ घातली की, खाली कोसळलेल्या जानकीबाईंनी तोंडात पाणीसुद्धा घेतले नाही. सहा-सात दिवसांनी त्यांनी ह्या जगाचा निरोपच घेतला. आईवर नितांत प्रेम आणि श्रद्धा असलेले टिळक हा प्रसंग विसरूच शकत नव्हते.

जानकीबाईंचे कविता करणे, मिशनरी स्त्रियांकडून शिवण-टिपण शिकणे एवढेच नाही तर, बायबलमधील नीतिशास्त्राच्या पुस्तकाचा अभ्यास करणे ह्यागोष्टी वामनरावांना अजिबात खपत नसत. त्यामुळे जानकीबाईंची हाताला लागेल ती वस्तू ते जाळून टाकीत. वडिलांचा आततताईपणा आणि खोटेपणा माहीत असल्यानेच वडिलांनी त्यांना लिहिलेल्या पत्रातून लक्ष्मीबाईंवर जे आरोप केले होते त्यावर टिळकांनी अजिबात विश्वास ठेवला नाही. एवढेच नाही तर, बायकोला सोडून देण्याविषयीचे फर्मानही त्यांनी जुमानले नाही. परंतु वडिलांनी लक्ष्मीबाई आजारी असल्याचे पत्र पाठवल्यावर बातमी खरी का खोटी ह्याची शहानिशा न करता तिच्या काळजीपोटी टिळक पंधरा मैल चालत गेले. पुढे नदीला आलेला पूरही त्यांना अडवू शकला नाही. पोहत

पोहत ते किनाऱ्यावर आले.

'पहिल्या बायकोची चिता शमण्याआधीच बाशिंग बांधून बोहल्यावर चढण्याची तयारी करण्यात काही गैर नाही' अशी प्रवृत्ती असणारे पुरुष त्याकाळी अवतीभवती होते. त्या पार्श्वभूमीवर टिळकांचे बायकोवरचे प्रेम विलक्षण प्रगाढ होते, आजारात आपले माणूस जवळ असण्याची भावनिक निकड टिळक जाणून होते. म्हणूनच लोक काय म्हणतील, ह्याची त्यांनी अशावेळी पर्वा केली नाही. लक्ष्मीबाईंच्या आजारपणात त्यांच्यासाठी एकदा शिरा करण्याचाही प्रयत्न टिळकांनी केला होता.

लक्ष्मीबाई भाचीच्या लग्नासाठी गेलेल्या असताना सर्दीसारख्या झालेल्या मामुली आजारात चार चार तारा करून त्यांना बोलावून घेणाऱ्या टिळकांचे लक्ष्मीबाईंवर प्रेम होते हे निश्चित. पण टिळकांचा स्वभाव असा होता की, समोर असलेल्या माणसासाठी ते जिवाचे रान करायला तयार व्हायचे पण एकदा का तो दृष्टिआड झाला की, मग त्यांच्या प्रेमाचा सारा भर ओसरायचा. वडिलांचा विक्षिप्तपणा त्यांच्यात काही प्रमाणात उतरलेला होताच. घरातून निघाले की, टिळक किती तासांनी, किती दिवसांनी किंवा किती महिन्यांनी परत येतील, हे कोणीच सांगू शकत नसे.

एकदा ऐन जेवणाच्या वेळी 'मी शौचास जाऊन येतो' म्हणून सांगून गेलेले टिळक बराच वेळ झाला तरी आले नाहीत म्हणून त्यांचा भाऊ सखाराम सोवळे सोडून ओवळे नेसला आणि गावभर भावाचा शोध घेण्याचा प्रयत्न करून हात हलवत घरी आला. थोड्या वेळाने टिळकांच्या काव्यगायनाचा आवाज कानी आला म्हणून परत तो खाली गेला तर त्याला पाहून टिळक म्हणाले, 'जेवायचं सोडून उगाच माझा तपास करत बसलास. चांगला बहारीचा विषय चालला आहे अन्

यात तू आलास, थांब जरा आता.'

आपले काही चुकले आहे, आपल्यामुळे कोणाला त्रास झाला आहे, ही भावना टिळकांच्या मनात कधी आलीच नाही. आपण पत्नीला आपल्या बाहेर जाण्या-येण्याच्या वेळेविषयी सांगितले पाहिजे, ती काळजी करीत बसेल, तिला एकटीलाच आपण सोडून आलो आहोत, तिच्याकडे पैसे असतील-नसतील, असे विचार त्यांच्या मनाला शिवतदेखील नसत. त्यामुळे, एकत्र कुटुंबपद्धती असतानाच्या त्या काळात आणि नवऱ्याच्या हयातीत आयुष्याच्या वळणा-वळणावर एकटेपणाचे भोग लक्ष्मीबाईंच्या नशिबी आले.

'पाखरा येशील का परतून?
महत्प्रेमाने दिल्या खुणांतून एक तरी आठवून...
हवेसवे मिसळल्या माझिया निःश्वासा वळखून...
पाखरा येशील का परतून? '

टिळकांनी पुढच्या काळात बालकवींसाठी लिहिलेली ही कविता रडत रडत म्हणत बसावी असे प्रसंग अनेकदा लक्ष्मीबाईंच्या लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात आले. घरातल्या मोठ्या माणसांनी टिळक कुठे असतील हा विचार करून काळजी करीत बसावे आणि तरुण मंडळीने टिळकांचा शोध घेत फिरावे हा घरच्यांना एक उद्योगच होऊन बसला होता!

लग्न झाले तेव्हा टिळक विद्यार्थिदशेत होते. वडिलांकडून पैसे येणे बंद झाल्यानंतर सासुरवाडीच्या मदतीखेरीज पायांवर उभे राहणे त्यांना शक्य नव्हते. गोविंदराव खांबेटे मनुला आणि टिळकांना आपले वारसदार मानत असले तरी मनुच्या आत्याबाईंना जावयाने आयते बसून खाऊ नये, त्यांच्या संसाराची जबाबदारी त्यांनी उचलावी असे वाटत असे. टिळक मात्र ही गोष्ट लक्षात न घेता 'दोन वेळचे व्यवस्थित

जेवून हातावर पाणी पडले, की टोळभैरवांबरोबर भटकायला जातात.' असे आत्याबाईंचे म्हणणे होते.

टिळक विद्वान होते, नाट्यकलावंत होते, कवी होते, उत्तम वक्ता होते. त्यामुळे त्यांचे चाहते अनेक होते. जावयाने रात्री बाहेर जाऊ नये म्हणून त्याच्या दाराला आत्याबाई कुलूप घालत पण स्वारी खिडकीतून पसार व्हायची. खाली त्यांचा झेल घ्यायला त्यांचे साथीदार तयारीत उभेच असायचे. दशावतारी नाटकांत ते घरच्यांना कळू न देता काम करीत. पण बातमी फुटायला वेळ लागत नसे. कोणी तरी कौतुकाने खांबेटेमामांसमोर बोलून जाई. गणपतीच्या दिवसांत टिळकांनी लिहिलेली भक्तिगीते सामान्य माणसांच्या ओठांवर असायची. 'लोक आपल्या जावयात आणि आपल्यात फूट पाडण्यासाठी खोटेनाटे सांगतात' असे खांबेटेंना वाटायचे. म्हणून एकदा खातरजमा करण्यासाठी ते प्रत्यक्ष जागेवर गेले. काव्यगायनाची तोवर प्रथा पडलेली नव्हती. टिळक स्वत:च्या कविता स्वत: गात होते. कवितेचा विषय होता राम वनवासाला निघाला आहे आणि पुत्रासाठी दशरथ शोक करतो आहे. दशरथाचे शोकगीत ऐकून आणि तो प्रसंग पाहून प्रेक्षक रडत होते. खांबेटेंना जावयाच्या कलागुणांची ताकद समजली आणि ते भारावून गेले.

आत्याबाई मात्र टिळकांविषयी 'ते संध्याच करीत नाहीत, संध्येचे करून ठेवले म्हणजे ताम्हनात पाणी ओतून ठेवतात आणि भस्म खातात' असा बोभाटा करीत. टिळक सासऱ्याचे गुण गात. 'सासरा पांघरूण घालतो तर, सासू आपल्या बायकोकडून ते काढवून घेते' अशा तक्रारी जगजाहीर करीत. 'सासू फार कटकट करते' म्हणून एकदा टिळक तिथून बायकोला घेऊन निघाले खरे पण जाणार कुठे ? त्यामुळे पावले परत फिरवली आणि मग त्यांना सासूच्या थंड स्वागताला सामोरे जावे लागले !

टिळकांच्या पायात जणू काही भोवरा होता. त्यांचा पाय एकसारखा घराबाहेर असायचा. त्यांचे आस्तिक मन त्यांना मन:शांतीच्या शोधार्थ भटकायला भाग पाडत असे. ते कधी रानात जाऊन ध्यान करीत. कधी साधुंबरोबर एखाद्या गुहेत राहत. कधी त्यांच्या सांगण्यावरून सहा-सहा महिने कडूलिंबाचा पाला वाटून त्याचे गोळे खाऊन राहत. कधी नदीच्या पाण्यात तासन्तास एका पायावर उभे राहण्याचे व्रत घेत. असे कित्येक अघोरी प्रयोग त्यांनी करून पाहिले पण मन:शांती काही लाभत नव्हती. दरम्यान शिक्षकाची नोकरी मिळाली तरी ते तिथे टिकून राहत नसत. शिकवणे हा त्यांचा आवडता विषय होता. शाळा काढणे हादेखील त्यांचा छंद असल्यासारखा प्रिय विषय होता. टिळक उत्साहाने शाळा सुरू करीत. पण काही कारणाने ते गाव सोडले की, फिरून त्या शाळेचे काय झाले ह्याकडे ते ढुंकूनही पाहत नसत. असे अनेक वेळा घडले आहे.

दरमहा एका ठरावीक रकमेची आवक कौटुंबिक खर्चासाठी आवश्यक असते ह्याचे महत्त्व टिळकांना कधी वाटलेच नाही. त्यामुळे लक्ष्मीबाईंची किती कुचंबणा होत असेल ह्याची कल्पना करता येते. बांगड्या हा स्त्रीचा सौभाग्यालंकार. पण साध्या काचेच्या बांगड्या भरण्याची लहानशी हौसदेखील त्यांना पूर्ण करणे शक्य नव्हते. मग सोन्या-चांदीचे दागिने तर कल्पनेतच राहिले. नाही म्हणायला घरातले खरे सोळा मोती देऊन ते सोन्याच्या तारेत गुंफून आणण्याचे काम एकदा टिळकांनी केले. लक्ष्मीबाईंनी त्या सोनारावर अविश्वास दाखवलेला त्यांना अजिबात खपला नाही. सोनाराने तार आणावी आणि आपल्यासमोर ते गुंफून द्यावेत हे त्यांचे म्हणणे टिळकांनी ऐकले नाही. सोनाराने दोन मोती अधिकच तारेत गुंफल्याचे लक्षात आल्यावर त्याच्या चांगुलपणाचे आणि विश्वासार्हतेचे टिळकांनी कितीतरी गोडवे गायिले.

पण त्यातले सगळे मोती खोटे निघाल्याचे नंतर त्यांच्या लक्षात आले!

गृहिणीला तिच्या गृहकार्याबद्दल योग्य मानधन दिले जावे ही कल्पना शंकरराव किर्लोस्कर ह्यांनी १९३०-४०च्या सुमारास मांडली. त्याआधी टिळकांनी ही कल्पना प्रत्यक्षात आणली होती. १८९४साली राजनांदगावला असताना ते आपल्या पगारातून लक्ष्मीबाईंना दरमहा वीस रुपये देत. त्या पैशातून लक्ष्मीबाईंनी कामासाठी नोकर ठेवावा अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु पैशाचा हिशेब ठेवणे, सातत्याने नोकरी करणे आणि पगार घरी आणणे हे टिळकांच्या स्वभावातच नसल्याने गृहिणीला मानधन देण्याचा टिळकांचा विचार कितीही उदात्त असला तरीही त्यांच्या स्वत:च्या बाबतीत तो टिकू शकला नाही. टिळकांनी लक्ष्मीबाईंकडे उसने मागितलेले पैसे लक्ष्मीबाईंना परत कधीच मिळत नसत. त्यामुळे नोकर ठेवण्याची टिळकांची इच्छा त्या कधी पूर्ण करू शकल्या नाहीत.

टिळक विद्वान होते पण त्यांच्या अंगी धोरणीपणा नव्हता. लक्ष्मीबाई शिकलेल्या नव्हत्या पण त्यांना व्यवहार कळत होता. दोन अगदी भिन्न स्वभावाच्या माणसांची गाठ देवाने बांधून ठेवली होती. त्यांचा जोडा लक्ष्मी-नारायणाचा होता पण तो नावापुरताच. प्रत्यक्षात लक्ष्मीबाई होत्या लंकेची पार्वती आणि टिळक होते कफल्लक शंकर. लक्ष्मीबाईंनी आवश्यक घरगुती वस्तूंचा संग्रह करावा आणि टिळकांनी राजा हरिश्चंद्राच्या थाटात मुक्तहस्ते तो लोकांना अर्पण करीत सुटावा, असेही अनेकदा त्यांच्या ख्रिस्ती सहजीवनकाळात घडले. एक गाव सोडून दुसऱ्या गावी जाताना दूरदर्शीपणाने सोबत घेतलेले खाण्या-पिण्याचे आवश्यक जिन्नस, तिथे गेल्याबरोबर कोणाकडे मागाव्या लागू नयेत अशा काही वस्तू लक्ष्मीबाईंनी बैलगाडीत भराव्यात आणि रेव्ह. टिळकांनी निरोप द्यायला आलेल्या लोकांना त्या प्रेमाने भेट म्हणून

द्याव्यात! वर म्हणावे, 'हे कशाला लागणार आहे आपल्याला?'

लक्ष्मीबाई सांगतात, 'एका ठिकाणाहून दुसरीकडे जायचे म्हणजे फक्त माणसे हलत. सामानसुमान तिथल्या तिथे शेजाऱ्यापाजाऱ्यांना अर्पण करण्यात येत असे.' (स्मृ.१ : पृ.६८)

त्यामुळे दरवेळी लक्ष्मीबाईंना नव्याने सुरुवात करावी लागे. लक्ष्मीबाईंच्या गैरहजेरीत तर टिळकांनी त्यांच्या म्हशीसुद्धा कुणाला तरी फुकट देऊन टाकल्या.

विद्वत्तेजोवलयामुळे टिळकांच्याभोवती माणसांचा कायम गराडा असेच. शिवाय टिळक हे असे उदार. त्यामुळे गुळाला मुंगळे चिकटावेत त्याप्रमाणे काही माणसे त्यांच्या अवतीभवती असत. लक्ष्मीबाईंच्या नजरेतून ते सुटायचे नाही. त्यामुळे अशा वस्तू वाचवण्याची त्या खबरदारी घेत. पण अनेकदा टिळकांसमोर त्यांचे काही चालत नसे. कधी आपले सामान लक्ष्मीबाईंनी 'सीलबंद' करून ठेवावे तर त्या सामानाची आणि त्यांची गाठ पुढे कधीच पडली नसल्याचेही त्या सांगतात. जलालपूरहून नाशिकला जाताना आता तिसऱ्यांदा तरी गाडी चुकू नये म्हणून लक्ष्मीबाईंचा जीव खालीवर होत होता आणि टिळक मात्र लक्ष्मीबाईंना साफ विसरून मित्रांबरोबरच्या गप्पांमध्ये गुंग झाले होते. आठवण झाल्यावर हमाल करून निघाले तर लक्ष्मीबाईंना सोबत घेतलेल्या भाज्यापाल्याची आणि फळफळावळाच्या सुरक्षिततेची काळजी वाटू लागली. अशी काळजी दूर करण्यात टिळक पटाईत असल्याने त्यांनी तिथल्या तिथे त्यांचे वाटप सुरू केले. त्यातूनही अर्धी भाजी वाचवण्याची बहादुरी लक्ष्मीबाईंनी केलीच!

टिळकांचा राग भडकेल असे लक्ष्मीबाईंच्या हातून आणखी एका गोष्टीमुळे नकळत का होईना पण घडे. त्यांना कुंभकर्णासारखी अतिशय गाढ झोप लागे. मग कशानेही त्यांना आपणहून जाग येणे

किंवा कुणी त्यांना जागे करणे शक्य नसे. पंचवटीतल्या फडणिसांच्या वाड्यात टिळकांनी बिऱ्हाड केले होते. शेजारी 'ज्ञानचक्षु' व 'हिंदु पंच'पत्राचे संपादक वामनराव रानडे राहत होते. ते लक्ष्मीबाईंच्या नात्यातले होते. एक दिवस टिळकांना घरी परतायला उशीर झाला. जेवणासाठी त्यांची वाट पाहता पाहता लक्ष्मीबाईंचा डोळा लागला. रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते. टिळक घरी आल्यावर त्यांनी दारावर धक्के मारले पण लक्ष्मीबाईंना कुठली जाग यायला? 'त्यांना नुकतीच झोप लागलीय; एक चांगली झोप झाल्याशिवाय त्या उठणार नाहीत; तेव्हा तुम्ही आमच्याकडे जेवायला चला' असे शेजाऱ्यांनी खूप सांगून पाहिले. पण टिळक काही ऐकेनात. त्यांना बराच राग आला होता. शेवटी टिळकांच्या भावाने शिडी लावून एका मोठ्या खिडकीतून त्यांना काठीने डिवचले तेव्हा कुठे त्या खडबडून जाग्या झाल्या. टिळकांनी संतापाच्या भरात त्यांना 'आता ही सर्व हकिकत रानडेंच्या पत्रात छापून आणतो!' अशी धमकी दिली. तेव्हापासून बिचाऱ्या लक्ष्मीबाई टिळकांची वाट बघताना झोप येऊ लागली की, उभ्याच राहत आणि वारंवार डोळ्याला पाणी लावत झोप उडवून लावण्याचा प्रयत्न करीत!

सुखवस्तू कुटुंबात वाढलेल्या मनुला टिळकांची पत्नी म्हणून संसार करताना कोंड्याचा मांडा करावा लागे. काटकसर करून किडुकमिडूक जमवून ठेवावे लागे. कधीतरी टिळकांना कनवटीचे पैसे देऊन सामान मागवण्याची वेळ यायची, तेव्हा 'हे सामान मागवले आहे खरे, पण ते येईल ना, का दानधर्म करून टिळक हात हलवत घरी येतील, का आणखी भलतीच एखादी बिनगरजेची वस्तू घरात येऊन पडेल?' अशी धास्ती लक्ष्मीबाईंना वाटणे साहजिक होते. कारण टिळकांचा काहीच नेम नसे.

एकदा लक्ष्मीबाईंनी त्यांना तीन रुपये दिले होते. बायकोने

आणायला सांगितलेले सामान आणण्याऐवजी टिळकमहाशय घड्याळ घेऊन आले! लक्ष्मीबाई चिडल्या तर, त्यांच्या रागावण्याकडे साफ दुर्लक्ष करून ते घड्याळ समोर ठेवून 'घड्याळ काय म्हणते?' ही कविता लिहीत बसले! नंतर ते घड्याळ (आणि कविताही?) विकून आलेले वीस रुपये त्यांनी बायकोच्या हातावर ठेवले.

एकदा असेच कनवटीचे पैसे टिळकांच्या हवाली करून लक्ष्मीबाई सामानाची वाट बघत बसल्या तर, टिळक शाईची काचेची दौत विकत घेऊन आले. लक्ष्मीबाईंनी साहजिकच भांडण केले. तेव्हा इतकी सुंदर दौत वाखाणायचे सोडून कुरकुर करणाऱ्या आपल्या बायकोचा 'तुला कदर नाही, तुला मानसशास्त्र कळत नाही' म्हणत टिळकांनी धिक्कार केला आणि माडीवरच्या खिडकीतून खाली ती दौत रस्त्यावर फेकून दिली!

टिळक हे असे वागत. त्यामुळे लक्ष्मीबाईंना संसाराचा गाडा हाकणे खरोखर कठीण होई. नोकरी करून स्थिर आयुष्य ते जगू शकले असते, इतकी विद्वत्ता त्यांच्या अंगी होती. नोकरी नाही तर, धंदा करून पाहावा ह्या सद्हेतूने टिळकांनी दुकानदारी करून पाहिली. ऐन दिवाळीत हमखास खपेल असा फटाक्यांचा माल त्यांनी विकायला घेतला. 'पण फुलामुलांचे मित्र असलेला दुकानदार असल्यावर मुलांनी फटाके उडवून मौज केली!' असे लक्ष्मीबाई लिहितात (स्मृ.१ : पृ.७९).

आपल्या बायकोला दुसऱ्यांच्या कृपेवर राहावे लागते, ह्याचे टिळकांना कधी वैषम्य वाटल्याचे दिसत नाही. कर्णाचे औदार्य आणि शंकराच्या फकिरी वृत्तीने जगणारे टिळक आपल्या मनुच्या नशिबी आले ह्याचे दु:ख होऊन लक्ष्मीबाईंच्या आत्या काहीशा उद्वेगाने म्हणत, 'काय खुंटावरचा कावळा* पाहून दिला!' लक्ष्मीबाई मात्र कधी हसत, तर कधी रडत आपले आयुष्य कधी टिळकांबरोबर तर कधी टिळकांच्या

गैरहजेरीत एकट्या किंवा माहेरच्यांबरोबर जगत होत्या.

अशातच लक्ष्मीबाईंना आपल्या संसार वेलीवर एक फूल उमलणार असल्याची चाहूल लागली. टिळकांनी बाळंतपणासाठी प्रथेप्रमाणे बायकोला माहेरी जलालपुरास पोहचवून दिले आणि आपण स्वत: आपल्या महिनोन्महिने गायब होण्याच्या प्रथेनुसार अज्ञातवासात गेले! माहेरी सगळे लाड, डोहाळे पुरवले जात असताना सहा महिने झाले, तरी टिळकांची काहीच खबरबात नसल्यामुळे लक्ष्मीबाई काळजीत होत्या. त्यांना मुलगा झाला. टिळक तेव्हा कोकणात होते.

आपल्या आईचे नाव सखुबाई होते म्हणून गोविंदरावमामांना मनुच्या बाळाचे नाव 'सखाराम' ठेवावे असे वाटले. पण टिळकांच्या भावाचेही नाव सखारामच असल्याने ते बदलून टिळकांच्या इच्छेनुसार त्याचे नाव 'विद्यानंद' ठेवण्यात आले. कोकणातून ते परत येत असल्याचे त्यांचे पत्र आले. विद्यानंदाची प्रकृती बिघडली म्हणून त्याला घेऊन ते नाशकास नानासाहेब पेंडसे ह्यांच्या घरी गेले. तिथे योग्य उपचार मिळाल्यावर बाळाला बरे वाटले.

तिथून टिळक एका कार्यक्रमासाठी म्हणून गेले. परतण्यापूर्वी मिळालेल्या मानधनाचा नेहमीप्रमाणे त्यांनी दानधर्म केला. येताना चांगले घसघशीत मानधन टिळक आणतील ही लक्ष्मीबाईंची अपेक्षा फोल ठरली. त्यांना आता तरी कुटुंबाची जबाबदारी वाटावी म्हणून गोविंदरावमामा रागावून म्हणाले, 'तुम्ही तिला वडी ठेवा नाही तर पिंपळी, आम्ही आता जबाबदारी घेणार नाही.' ह्या उप्पर स्वाभिमानी टिळकांनी फुटका तांब्याही जवळ नसताना लगेच वेगळे बिऱ्हाड करण्याची भाषा केली. दरवेळी टिळकांनी हे असेच वागावे. त्यांनी कधी एका ठिकाणी बिऱ्हाड केले नाही. ख्रिस्ती सहजीवनातही हेच घडले.

एकदा लक्ष्मीबाईंची पैठणी टिळकांनी गहाण ठेवून आपल्या

गरजेपुरते पैसे उभे केले होते. पुन्हा अशी गरज पडली तेव्हा टिळकांनी आपल्यासाठी खरेदी केलेले नवेकोरे लुगडे दुकानदाराला परत करून पैसे परत मागण्याचा सल्ला लक्ष्मीबाईंनी टिळकांना दिला होता. टिळक खरे तर चांगले शिक्षक होते, वैद्यकी उत्तम जाणत होते, पण आपल्या पांडित्याचा किंवा वैद्यकीचा उपयोग त्यांनी आपल्या आणि कुटुंबाच्या उपजीविकेसाठी फारसा केला नाही त्यामुळे त्यांची स्थिती कायम हलाखीची राहिली.

लक्ष्मीबाई व्यवहारी होत्या. अंथरूण पाहून पाय पसरावेत अर्थात् आपल्या गरजा ओळखून खर्च करावा; असे त्यांना वाटत असे, हे खरे; परंतु पदरात एक मूल असतानाही लक्ष्मीबाईंची भातुकली खेळण्याची, बाहुल्यांशी खेळण्याची हौस भागलेली नव्हती. भिकूताईची मुलगी घारूमाई हिच्याबरोबर त्यांचा खेळ चाले. बाहुल्यांच्या लग्नात बाहुल्यांसाठी सोनाराकडून पितळेचे दागिने घडवणे, कामट्यांचे मखर तयार करवणे, चार दिवस वाजंत्र्यांना बोलावणे, घरातली चांदीची भांडी काढणे, पानसुपारी-खोबऱ्याची खिरापत तयार करणे, लग्नात शाल पांघरून वरमाईसारखे मिरवणे ह्या सगळ्यात त्या इतक्या रमून जात की, आपण जन्माला घातलेले आपले खरेखुरे मूल रडते आहे, ह्याचेही भान त्यांना राहत नसे. त्यांच्या विद्यानंदचा सांभाळ त्यांची मोठी बहीण भिकुताई किंवा तिची सासू ह्यांना करावा लागे. 'सोळा वर्षांच्या आपल्या मनुला कधी शहाणपण येणार?' म्हणून त्या दोघी चिंतेत असायच्या.

अशा ह्या गृहलक्ष्मीवर टिळकांनी 'माझी भार्या' नावाचे एक काव्य केले. त्यात लक्ष्मीबाईंचे सगळे वर्णन यथास्थित असलेले पाहून नानासाहेबांनी मनुचे कौतुक केले. त्यावर टिळकांनी अशी भूमिका घेतली–

'केले काव्य परंतु ह्यात मम हो संबंध काही नसे
मित्रांनो जरि वाचितांच अपुल्या वाटेल चित्ता तसे
येथे नायक कल्पिला करितसे भार्यागुणांची स्तुती
तेणे ती नकळे मदीय अथवा माझ्या प्रियेची स्थिती!'

टिळकदाम्पत्याला झालेला पहिला मुलगा विद्यानंद हा अल्पायुषी ठरला. विद्यानंदच्या नंतर त्यांना एक देखणी मुलगी झाली. तिचे नाव नर्मदा. टिळकांची ही अतिशय लाडकी होती. डॉ.आनंदीबाईसारखी ही पुढे खूप शिकेल अशी त्यांची अपेक्षा होती. तिचा आवाज फार गोड होता. नव्या तांदळाचे मोदक खाल्ल्याचे निमित्त झाले आणि ताप येऊन टिळकांची ही लाडकी 'माई' आणि सर्वांची आवडती दीड वर्षांची 'नबूताई' देवाघरी गेली. आधल्या दिवशी टिळक नाशिकला काही कामासाठी जात होते तर, वाटेत एका फकिराने त्यांना अडवून माघारी जायला सांगितले. ते घरी आल्यावर त्यांच्या माईने त्यांना 'देवीचा प्रसाद' ह्या त्यांच्या काव्यातील गाणी म्हणण्यासाठी गळ घातली.

'नानासाहेब टिळक बाटग्या वर्तनाचे, जातिबहिष्कृत, सबब आम्ही मुलीचा प्रेतविधी करणार नाही' असा पवित्रा टिळकांकडून वारंवार दक्षिणा उकळणाऱ्यांनी घेतला होता. शंकर बळवंत कुलकर्णी हे टिळकांना वडिलांसमान मानत. त्यांनी नबूताईचे प्रेत हातावर उचलून गंगेवर नेले आणि तिचा दहनविधी उरकला (स्मृ.१ : पृ.१११).

टिळकांना मुलीच्या अकाली मृत्यूचे दु:ख असह्य झाले. त्या दु:खातिरेकाच्या भरात त्यांनी नाना संत ह्यांच्याशी बोलताना 'माझी बायको राक्षसीण आहे, तिने माझी दोन मुले, बाप, भाऊ, बहीण अशी कितीतरी जिवलग माणसे खाल्ली' असे उद्गार काढले. लक्ष्मीबाईंनी ते योगायोगाने ऐकले. त्यावर टिळकांनी केलेला आरोप त्यांच्यावरच

उलटवत ‘आपला मुलगा, मुलगी, आई, बाप, दत्तक बाप, आत्या, सासरा, दीर, नणंद अशी कितीतरी माणसे ज्या माणसाशी लग्न झाल्यानंतर गेली त्या माणसाला काय म्हणायचे?’ असा प्रतिप्रश्न लक्ष्मीबाईंनी नाना संतांना केला आणि टिळकांना आत्मपरीक्षण करायला भाग पाडले. त्याप्रसंगानंतर टिळकांनी असे अभद्र भाष्य कधीच केले नाही. पतीपुढे ब्र काढण्याची प्राज्ञा त्याकाळच्या स्त्रियांमध्ये नव्हती. लक्ष्मीबाईंच्या स्वभावात हजरजबाबीपणा तर होताच पण पतीची चूक जिथल्या तिथे लक्षात आणून देण्याचे धैर्यही त्यांनी पुढे काय परिणाम होतील ह्याची तमा न बाळगता असे प्रसंगी दाखवून दिलेले आहे.

टिळक नाडीपरीक्षा करून भविष्य सांगू शकत. बायकोची नाडी पाहून त्यांनी ‘उद्या दुपारी दोन वाजता ही प्रसूत होईल आणि मुलगा होईल’ असे म्हटले होते. त्याप्रमाणे १६ जुलै १८९१च्या दुपारी बरोबर दोन वाजता दत्तूचा जन्म झाला आणि पुन्हा एकदा टिळकदाम्पत्याच्या आयुष्यात आनंदाचे क्षण आले.

दत्तूच्या जन्माच्या वेळी मुसळधार पावसात डॉक्टरला आणायला म्हणून टिळक नाशिकला गेले होते. त्यांची फी इतर डॉक्टरांपेक्षा जास्त होती. शिवाय त्यांना टांग्यातून आणावे लागले होते. हा सगळा खर्च टिळकांनी केला. आधीच्या दोन मुलांच्या वेळी टिळक लक्ष्मीबाईंजवळ नव्हते, त्याची भरपाई त्यांनी ह्यावेळेस मनापासून केलेली दिसते.

पहिली दोन मुले गेल्यामुळे त्यावेळच्या समजुतीनुसार लक्ष्मीबाईंनी हे तरी मूल जगावे म्हणून दत्तूला आपल्या वहिनीच्या ओटीत घातले. टिळकांनी दहा दिवस वाजंत्री लावून, दहा रुपयांचे पेढे वाटून उत्सवच साजरा केला! तेराव्या दिवशी त्याचे नाव ‘दत्तात्रेय’ ठेवले. तिकडे आत्याबाईंनी गोविंदरावमामा मनुच्या पोटी आलेत ह्या समजुतीने

पुन्हा वाजंत्री वाजवण्याचा, पेढे वाटण्याचा घाट घातला आणि दत्तूचे नाव 'गोविंद' ठेवले. वणीच्या काकाजींच्या आईने लक्ष्मीबाईंसाठी नवस केला होता म्हणून त्यांनी दत्तू उर्फ गोविंद ह्याचे नाव 'अंबादास' ठेवले. राजनांदगावला एका बंगाली डॉक्टरशी टिळकांची मैत्री झाली होती. त्यांच्या आग्रहावरून मग ते दत्तूला 'शरच्चंद्र' म्हणू लागले. पाचव्यांदा ह्या मुलाचे नामकरण झाले ते राहुरीच्या चर्चमध्ये लक्ष्मीबाईंनी त्याच्यासह बाप्तिस्मा घेतला तेव्हा. त्यावेळी त्याचे नाव 'देवदत्त' असे ठेवण्यात आले आणि तेच पुढे कायम झाले! घरात मात्र त्याला 'दत्तू' असेच म्हणत.

टिळकांनी लक्ष्मीबाईंना आणण्यासाठी गाडी पाठवली होती पण त्यादिवशी कोजागिरी असल्याने बाळ-बाळंतिणीला पाठवण्याची आत्याबाईंची तयारी नव्हती. 'बाळ पाच महिन्यांचे झाल्यावर घेऊन जा' असा निरोप देऊन आत्याबाईंनी गाडी परत पाठवून दिली, ह्याचा संताप येऊन टिळकांनी लक्ष्मीबाईंना 'पत्र पाहताच निघून ये, न आलीस तर मी आपले तोंड तुला दाखवणार नाही' असे पत्र पाठवले. टिळकांच्या रागाला घाबरून लक्ष्मीबाई लगोलग गेल्या. मात्र टिळक आपल्यासाठी आणि आपल्या बाळासाठी आतुर झालेले असतील, असे त्यांना वाटले होते. पण त्यांचा अपेक्षाभंग झाला. तिथे टिळकांचा पत्ताच नव्हता. आपले तोंड न दाखवण्याची पत्रातून धमकी देऊन आपल्या भावाकडे गेलेल्या टिळकांनी नंतर पंधरा दिवसांनी येऊन पत्नीला आपले तोंड दाखवले!

लक्ष्मीबाईंनी लिहिलेल्या आपल्या स्मृतिचित्रांत टिळकांचे आपल्या पत्नीवर प्रेम असल्याच्या पुराव्यांपेक्षा त्यांनी पत्नीला मन:स्ताप दिल्याच्याच घटना अधिक आढळतात. बायबलविषयी चर्चा करायला टिळक रोज रात्री घराबाहेर पडत आणि मिल्टनसाहेबाकडे जात. पण

खरे कारण न सांगता ‘खरे ह्यांच्याकडे जात असल्याचे’ ते लक्ष्मीबाईंना सांगत. संशय येऊन एकदा लक्ष्मीबाईंनी त्यांचा पाठलाग केला. खरे ह्यांच्या घराच्या विरुद्ध दिशेला टिळक वळताच लक्ष्मीबाईंनी ‘खऱ्यांचे घर मागेच राहिल्याचे’ म्हटले आणि पुढे काही आक्रीत घडायच्या आत त्यांनी घराकडे धाव घेतली. स्वयंपाकघरात जाऊन आतून कडी लावून त्या दडी मारून बसल्या. पाठीमागून आलेल्या टिळकांनी दार मोडायला येईपर्यंत दारावर धक्के मारल्यामुळे अखेरीस लक्ष्मीबाईंना दार उघडावे लागले. टिळकांनी संतापाच्या भरात बायकोला चांगलाच चोप दिला. दुसऱ्या दिवशी तिची सुजलेली पाठ पाहून त्यांचे मन अतिशय दु:खी झाले हा भाग निराळा.

काकाजींच्या आईने केलेला नवस फेडण्यासाठी गडावर गेल्यानंतर लक्ष्मीबाईंना आलेले आजारपण त्यांच्या जिवावर बेतते की काय, अशी स्थिती असताना टिळक एकसारखे त्यांच्या उशाशी बसून होते. नाना संतांनी लक्ष्मीबाईंच्या जगण्याची आशा सोडली तेव्हा सगळे गावकरी रात्री जमा झाले. टिळकांचे विद्यार्थीही मदतीला आले. ‘ही आज रात्री खात्रीने मरणार ना?’असा प्रश्न नाना संतांना विचारून ‘तिला इच्छाभेदी देऊ का?’ असेही टिळकांनी विचारले, तेव्हा नाना संतांनी ‘त्यामुळे तिचे मरण तुम्ही दोन तास अलीकडे आणाल’ असे सांगून नकार दिला. ‘मरणार हे खरे ना? मग दोन तास अगोदर आले तर काही हरकत नाही’ असे पुटपुटत त्यांनी इच्छाभेदीची गोळी बायकोला दिलीच. आपल्यावर बालंट नको म्हणून नाना संतांनी तिथून काढता पाय घेतला! टिळक मात्र लक्ष्मीबाईंची नाडी धरून पुढे काय घडते ह्याची वाट पाहत बसले. पहाटे संत येऊन पाहतात तर, लक्ष्मीबाईंच्या प्रकृतीला उतार पडलेला! त्यांनी टिळकांच्या धैर्याचे कौतुक केले. त्यानंतर लक्ष्मीबाईंना आणि दत्तूला घेऊन टिळक पुण्याला गेले. तिथे

देशपांडे ह्यांच्या घरी कुटुंबाला ठेवले आणि ते स्वत: जे पसार झाले ते महिना दीडमहिना झाला तरी परतायचे नावच नाही! लक्ष्मीबाईंच्या भावाला जेव्हा हे कळले तेव्हा तो लक्ष्मीबाईंना जलालपुरला घेऊन गेला. माहेरचा भरभक्कम आधार होता, तरीही लक्ष्मीबाईंनी आपले हाल होतात हे कधी माहेरी कळवले नाही. पण त्यांची माहेरची माणसे दुरून त्यांच्यावर लक्ष ठेवून होती, असे दिसते.

बुटींच्याकडे असताना एक दुर्धर प्रसंग ओढवला होता. तेव्हा लक्ष्मीबाई श्रीमंत बुटींची मदत मागून तो निभावून नेऊ शकल्या असत्या. पण त्यांनी तसे केलेले दिसत नाही. नागपूरच्या श्रीमंत अप्पासाहेब बुटी ह्यांनी वेदांचे भाषांतर करण्याच्या कामी टिळकांना मदतीसाठी बोलावून सहकुटुंब राहण्याची सोय केली होती. त्याप्रमाणे टिळककुटुंब तिथे राहू लागले. तिथे अभ्यास, वाचन, वादविवाद अशा आपल्या आवडत्या विषयांत टिळकांचे आयुष्य सुखासमाधानात चालले होते. तशात बुटींच्या घरी आलेल्या साधूच्या सहवासात संसारात आधीच लक्ष नसलेल्या टिळकांचा बराच वेळ जाऊ लागला. लक्ष्मीबाईंच्या 'अडचणीच्या दिवसात' टिळकांवर स्वयंपाक करण्याची पाळी आली असता दत्तूसाठी वरण-भात करायचा म्हणून चुलीवर डाळ शिजायला ठेवून टिळक 'आलोच' म्हणत बाहेर गेले. 'जेवण झाल्यावर जा' हे बायकोचे सांगणे अर्थातच त्यांनी ऐकले नाही. डाळीचा कोळसा झाला तरी परतले नाहीत. मग लक्ष्मीबाईंनी दत्तूला सांभाळणाऱ्या तेल्याच्या मुलाकरवी चूल मांडून भात करवून घेतला आणि भुकेने व्याकूळ होऊन रडणाऱ्या दत्तूला जेवू घातले. रात्रीही पुन्हा सकाळचीच आवृत्ती घडली. तरी टिळकांचा पत्ता नाही. खूप उशिरा मुलगा आणि बायको भुकेले असतील ह्याची आठवण होऊन टिळकांनी चिवडा आणि बेसनाचा लाडू दुसऱ्याच्या हाती पाठवले. बायकोसमोर यायला टिळक घाबरले होते.

असे अनेक प्रसंग लक्ष्मीबाईंवर आलेले दिसतात. त्यावेळी जवळ पैसा तर नसायचाच, पण एक नोकर, एक माकड, स्वत:चा मुलगा आणि त्या स्वत:, अशा चारेक जणांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्यावरच येऊन पडायची. कधी जवळपास शेजारही नसायचा. बागेतल्या काड्याकुड्या गोळा करून चूल पेटवायची, नोकराने गावात मोलमजुरी करून आणलेल्या पैशावर पोटापाण्याची सोय करायची. कधी ज्वारीच्या कण्या भरडून त्या ताकाबरोबर खायच्या. कधी बागेतल्या मिरच्यांची भाजी तोंडी लावायला व्हायची.

दत्तूसाठी दोन शेर दुधाचा रतीब चालू होता. पण वाढत्या वयाच्या त्या मुलाला खायला काय घालायचे तर, एका पैशाच्या साळीच्या लाह्या घरात आणून ठेवायच्या आणि त्या थोड्याशा दुधात भिजवून खाऊ घालायच्या. मूलच ते, कधीतरी हट्ट करणारच. तसा त्याने एकदा भातासाठी हट्ट केला. घरात तांदळाचा दाणा नसताना त्याचा हट्ट पुरवणार तरी कसा? योगायोगाने त्यादिवशी वनभोजनासाठी बागेत आलेल्या मंडळीकडे तुपाच्या लहानशा वाटीभर भाताची याचना लक्ष्मीबाईंनी मुलासाठी केली. पण खरी परिस्थिती उघड न करता त्यांनी आपल्याला स्वयंपाक करण्याचा कंटाळा आल्याचे कारण पुढे केले. त्यावर 'अजून जेवणीसुद्धा झाली नाहीत, भलत्यावेळी काय मागता?' असे म्हणत तिथल्या आजीबाई वसकन् लक्ष्मीबाईंच्या अंगावर धावून गेल्या. तेव्हा आपल्या माहेरी भात पिकतो, बहिणीकडे रोज दोनतीन शेर भात शिजतो, पण आपल्याला आज घासभर भातासाठी इतके अपमानित व्हावे लागले ह्याची तीव्र बोच लक्ष्मीबाईंच्या मनाला लागली.

रात्री तीच बाई आपल्या वागण्याचा पश्चात्ताप होऊन जेवण आणि तांदूळ घेऊन आली तेव्हा लक्ष्मीबाईंचे मानी मन ते घ्यायला तयार होईना. 'घरात तांदूळ होते पण स्वयंपाक करण्याचा कंटाळा

आला होता' ह्या गोष्टीचा त्यांनी पुनरुच्चार केला. त्या बाईच्या आग्रहामुळे आणि 'अन्नाला पाठ दाखवू नये' ह्या संस्कारामुळे लक्ष्मीबाईंनी ते अन्न शिध्यासह स्वीकारले.

सकाळी दूधवालीने पैसे मागितले तेव्हा मात्र त्यांच्या दु:खाचा बांध फुटला आणि त्यांनी तिला खरी परिस्थिती सांगितली. दूधवालीमधली माता जागी झाली. तिने दत्तूला सांभाळण्याची तयारी दाखवली. शेवटी 'पैसे मिळोत न मिळोत दत्तूला दूध देत राहीन' असे म्हणाली. एवढेच नाही तर, दुधाचे मिळालेले दोन रुपये लक्ष्मीबाईंना देऊन तिने त्यांची सध्याची नड भागवली. त्यातला एक रुपया भिकाजीपंतांना आपण फार आजारी असल्याने दत्तूला सांभाळायला कोणी नाही अशी टिळकांना तार करण्यासाठी म्हणून लक्ष्मीबाईंनी दिला. तार मिळताच काळजी वाटून टिळक हजर झाले पण अंगणात बायकोला सडा घालताना पाहून संतापून 'ह्यापुढे कोण तुझ्यावर विश्वास ठेवील?' असा उलट प्रश्न केला! दुपारच्या जेवणासाठी ताटात ताक, कण्या, मीठ आणि बागेतल्या मिरच्या एवढेच ठेवून लक्ष्मीबाई त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली. तेव्हा टिळकांना वाईट वाटले, पण तेवढ्यापुरतेच. आपल्या बेजबाबदार वागण्याचे कुठलेही स्पष्टीकरण त्यांनी दिले नाही. त्यावर पश्चात्ताप व्यक्त केला नाही. पुन्हा असे घडणार नाही असे वचन तर देणे दूरच राहिले (टिळकांनी आपल्या ह्या अशा वागण्याबद्दल लक्ष्मीबाईंकडे क्षमा मागितली पण ती त्यांच्या अखेरच्या दिवसात!). वर 'माझ्याबरोबर चल राजनांदगावला, नाहीतर जा माहेरी' असे बजावले. त्यावेळी लक्ष्मीबाई गरोदर होत्या. इकडे आड तिकडे विहीर अशी त्यांची परिस्थिती झाली. तरीही माहेरी न जाता त्या टिळकांबरोबर गेल्या.

■

## टिळकांचे धर्मांतर

लक्ष्मीबाईंचे एवढे हाल पुरेसे नव्हते म्हणून की काय त्यांच्यापुढे आणखी एक संकट नियतीने वाढून ठेवले होते. राजनांदगावला टिळक दोन वर्षे राहिले. ही दोन वर्षे फक्त त्यांच्या एकट्याच्याच नव्हे, तर अख्ख्या टिळककुटुंबाच्या आयुष्याला महत्त्वाची कलाटणी देणारी ठरली. मनाने अत्यंत आस्तिक असलेल्या टिळकांचा मन:शांतीचा शोध चालू होता. वेगवेगळ्या धर्मांच्या ग्रंथांचा अभ्यास चालू होता. त्यातून बायबलही सुटले नव्हते. टिळकांनी बायबल वाचायला घेतले पण त्यातली मराठी भाषा त्यांना अतिशय सोपी वाटली. संस्कृत धर्मग्रंथ वाचण्याची सवय असलेल्या टिळकांना धर्मग्रंथाची भाषा इतकी सोपी असू शकते हे न रुचल्याने पुढे त्यांनी ते वाचलेच नाही. त्यांना हवे ते कुठल्याच धर्मग्रंथातून लाभत नव्हते. शेवटी आपल्याला हवा तसा धर्म आता आपणच स्थापन करावा ह्या निर्णयाप्रत टिळक येऊन पोहचले. आपल्याला मान्य असलेली धर्मतत्त्वे त्यांनी लिहून काढायला सुरुवात केली.

राजनांदगावच्या प्रवासात असताना त्यांची गाठ एका युरोपियन मिशनरीशी पडली. दोघांच्या गप्पांची गाडी धर्माच्या रुळावर आली. टिळकांचे धर्मविषयक विचार ऐकून त्या परदेशी ख्रिस्ती धर्मगुरुने त्यांना बायबलच्या दोन भागांपैकी एक असलेला 'नवा करार' देऊन 'दोन वर्षांत तुम्ही ख्रिस्ती व्हाल.' असे भाकीत केले. टिळकांना वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास करताना बायबल वाचवले नव्हते, तरी त्या गृहस्थाच्या एकूण आचारा-विचाराच्या प्रभावामुळे त्यांनी नवा करार वाचण्याचे त्याच्याकडे कबूल केले. त्याप्रमाणे त्यांनी तो सवडीनुसार वाचायला घेतला आणि त्यांच्या असे लक्षात आले की, आपण जी धर्मतत्त्वे लिहून काढलेली आहेत, त्यांच्याशी हा धर्म बराच मिळताजुळता दिसतो

आहे. मग नवा धर्म स्थापन करण्याची गरज त्यांना वाटेनाशी झाली आणि आणखी हुरूप येऊन त्यांनी बायबलचा अभ्यास चालू ठेवला. रेव्ह. डॉ.जस्टिन ॲबट, रेव्ह. डॉ.रॉबर्ट ए.ह्यूम, जन्माने भारतीय असलेले, मराठी मातृभाषा असलेले आणि ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेले रेव्ह. बाबा पद्मनजी ह्यांसारख्या जाणकारांकरवी मनात आलेल्या शंकांचे निरसन त्यांनी करून घेतले.

टिळकांचा कल ख्रिस्ती धर्माकडे झुकतो आहे हे आता घरच्या-दारच्या सर्वांच्या लक्षात येऊ लागले होते. टिळक ख्रिस्ती होणार आहेत, ख्रिस्ती झाले आहेत, अशा बातम्या लक्ष्मीबाईंच्या कानावर येऊ लागल्या होत्या. आपला नवरा न सांगता-सवरता महिनोन्महिने परगावी जाऊन दृष्टिआड होतो हे सहन करणाऱ्या लक्ष्मीबाईंना आपला नवरा आता परधर्मात जाणार ही कल्पनाच असह्य झाली! एके दिवशी खोलीचे दार बंद करून त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. आयुष्यातली पहिली कविता त्या दिवशी लक्ष्मीबाई लिहून गेल्या:

म्हणे जातो सोडून नाथ माझा
आता कवणाला बाहू देवराजा?
सर्वव्यापी, सर्वज्ञ तूच पाहे
सांग कोणाचे धरू अता पाये ?

एका नामवंत कवीच्या अडाणी भार्येने कविता लिहायला नुकतीच कुठे सुरुवात केली होती तोच, दारावर धक्के बसू लागले. टिळकांची स्वारी आली ह्या धसक्याने लक्ष्मीबाईंनी कवितेच्या कागदाचा चोळामोळा केला आणि दिला केराच्या टोपलीत टाकून. 'दार उघडायला एवढा उशीर का?' म्हणून टिळकांनी रागाने जाब विचारला. आपली गाढ झोप टिळकांना माहीत असल्यामुळे तेच कारण लक्ष्मीबाईंनी पुढे दडपून दिले. टिळकांना मात्र ते पटले नाही. दार बंद करून ही आपल्याविषयी

कागाळ्या करणारे पत्र माहेरी लिहीत असावी ह्या संशयाने त्यांनी कागदाचा शोध घेतला, तेव्हा त्यांना केराच्या टोपलीतला तो चुरगळलेला कागद सापडला. त्यांनी तो नीट उलगडून पाहिला. बायकोने कविता लिहिली आहे म्हटल्यावर त्यांना तिचे कौतुक वाटले. तिच्या भावना त्यांच्या मनापर्यंत पोहचल्या. तिला ते म्हणाले,

''मी ख्रिस्ती वगैरे काही होत नाही.''

लक्ष्मीबाईंना त्यांच्या बोलण्यामुळे अर्थातच दिलासा मिळाला. पण तो किती काळ टिकेल अशी पुसटशीही शंका त्यांच्या निरागस मनाला शिवली नाही. त्यांच्या दृष्टीने पतीचे सांगणे-बोलणे म्हणजे ब्रह्मवाक्य होते! 'तिच्या मायेने आणि धाकाने मी अडलो आहे' असे त्यांनी डायरीत लिहून ठेवले होते. ह्यावरून आपण धर्मांतर केल्यावर आपल्या लक्ष्मीवर त्याचा काय परिणाम होईल ह्या काळजीने टिळकांनी धर्मांतराला उशीर केला असावा, असे वाटते.

टिळकांचा ख्रिस्ती धर्माचा अभ्यास जोरात चाललेला होता. दिवसेंदिवस ख्रिस्ती धर्माकडे त्यांचा कल वाढत चालला आहे हे लक्षात येताच लक्ष्मीबाईंच्या घरच्यांनी टिळकांचे मन अन्य कामांत गुंतवण्याचे प्रयत्न सुरू केले. पेंडसेंनी टिळककुटुंबाची संपूर्ण जबाबदारी घेण्याचे, एवढेच नाहीतर, दरमहा टिळकांना खर्च करण्यासाठी वर पंचवीस रुपयेदेखील देण्याचे आश्वासन देऊन पाहिले.

टिळक कीर्तने रचून त्यांचे सादरीकरणही उत्तम करीत. सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या ह्याच गुणाचा फायदा घेत त्यांना गुंतवण्याचा एक रामबाण उपाय घरच्यांना सापडला. देवनामाच्या कार्यात गुंतवले तर, टिळकांचे मन भटकणार नाही असाही विचार त्यांनी केला असावा. टिळकांना ते उत्तम कीर्तनकार असल्याची आठवण करून देत घारूमाईने त्यांना त्यांनी लक्ष्मीबाईंना आणि दत्तूला पेंडसेंकडे ठेवून कीर्तने करीत

फिरावे, येऊनजाऊन राहावे, असे सुचवले.

टिळकांनीही तयारी दर्शवली. पण कीर्तने करायची तर वाद्ये असावी लागतात, ती नसल्याची अडचण त्यांनी पुढे केली. त्यावर 'मुंबईला एक पत्र टाकले तर घरबसल्या सर्व सामान येईल', असे म्हणत ती अडचण चुटकीसरशी सोडवण्याची तयारी दाखवून घरच्यांनी टिळकांवर कडी केली! टिळक आणखी हुशार निघाले. म्हणाले,

'वाद्ये ज्याने वाजवायची त्याच्या पसंतीची असणे आवश्यक असल्याने ती मीच मुंबईला जाऊन घेऊन येतो'. मग त्यावर मात्र 'होऊ द्या ह्यांच्या मनासारखे' म्हणत घरच्यांनी काही विरोध केला नाही.

मुंबईला जाताना टिळकांनी दत्तूला मांडीवर घेऊन त्याचा लाड केला तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. त्यावरून सर्वांना वाटले, टिळकांना आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला असावा, आता ते संसारात नीट लक्ष घालतील. पण आपली ही समजूत भाबडी आहे, येत्या काही दिवसांतच ती खोटी ठरणार आहे हे कुणाच्या स्वप्नातही आले नाही. वाद्ये आणायला म्हणून टिळक एकटेच मुंबईला गेले. टिळक आणि वाद्ये दोन्ही आली नाहीत पण एक स्फोटक बातमी मात्र आली –

**'मुंबईत १० फेब्रुवारी १८९५ रोजी टिळक ख्रिस्ती झाले!'**

हिंदभूमीच्या मातीतल्या धर्मगुरुकडूनच बाप्तिस्मा घेण्याचा टिळकांचा आग्रह होता. त्यामुळे रेव्ह.तुकाराम नत्थूजी धेंडे ह्यांच्या हातून त्यांचा बाप्तिस्मा झाला. राजनांदगावच्या प्रवासात आगगाडीत भेटलेल्या त्या युरोपियन धर्मगुरुने केलेले भाकीत असे खरे ठरले होते! दोघांनीही एकमेकांना नावगाव विचारले नव्हते. त्यामुळे टिळकांना भेटलेले धर्मगुरू कोण असावेत हे आजही गूढच आहे. ते युरोपियन

मिशनरी रेव्ह. जे.आर.हिल् आणि रेव्ह.वॉर्ड ह्यांपैकी एक असावेत असे म्हटले जाते. ते रेव्ह. वॉर्ड असावेत असे बहुतेकांचे मत आहे.

आपण ख्रिस्ती झाल्याची बातमी खुद्द टिळकांनीच पेंडसे ह्यांचे पुतणे बाळासाहेब ह्यांच्या घरी जाऊन दिली. बाळासाहेबांनी ती तारेने नाशिकला कळवली. नानासाहेब पेंडसे ह्यांनी घरात वातावरण असे ठेवले होते की, ह्या निमित्ताने सांत्वन करायला घरी आलेल्या कोणीही काही बोलू नये.

एक दिवस पेंडसे ह्यांनी पांडवलेण्यांच्या सहलीसाठी म्हणून घरातील सर्वांना पाठवून दिले आणि भिकुताई व केशवराव ह्या लक्ष्मीबाईंच्या भावंडांबरोबर विचारविनिमय करून टिळकांची भेट घेण्यासाठी केशवरावांनी जावे असे ठरवले. टिळकांनी धर्मांतर केलेले नसेल तर त्यांना येन केन प्रकारेण परत आणण्यासाठी एक कुटिल डावही रचला गेला. सोन्याची अंगठी टिळकांकडे सापडेल अशा ठिकाणी ठेवायला सांगून पोलिसात वर्दी द्यायला पेंडसे ह्यांनी केशवरावांना सुचवले. खटला नाशिकमध्येच चालू होईल, म्हणजे टिळक आपसूकच नाशिकला येतील मग त्यांना कसे सोडवायचे ते पाहता येईल, असा त्यांचा होरा होता. त्यासाठी त्यांनी केशवरावांकडे पंचवीस रुपये देऊन तजवीजसुद्धा केली होती.

■

## टिळकांच्या धर्मांतराचा लक्ष्मीबाईंवर परिणाम

मुंबईत बाप्तिस्मा झाल्यानंतर टिळक वसईत रेव्ह. सुमंत करमरकर ह्यांच्याकडे राहायला गेले होते. लक्ष्मीबाईंचे बंधू केशवराव त्यांना भेटायला तिथे गेले. त्यावेळी टिळकांनी त्यांच्याजवळ लक्ष्मीबाई जलालपुरच्या गंगेत जीव देईल की काय अशी भीती बोलून दाखवली, हे टिळकांचे लक्ष्मीबाईंवरील प्रेमाचे द्योतकच आहे. केशवरावांनी 'आता ती जगो अथवा मरो, तुमचा तिच्याशी काहीही संबंध नाही' असे कठोरपणे टिळकांना ऐकवले तरी मनातून ते फार दु:खी झाले होते. केशवराव घरी परतल्यानंतर शोककळा पसरल्यासारखे वातावरण घरात होते, त्यामुळे टिळकांच्या बाबतीत काही अशुभ तर घडले नाही ना, अशी कुशंका लक्ष्मीबाईंच्या मनात डोकावल्याशिवाय राहिली नाही.

'आम्ही तुला आणि दत्तूला अंतर देणार नाही' असे अभिवचन माहेरच्या माणसांनी दिले तेव्हा आपल्याला टिळक ख्रिस्ती झाल्याचे दु:ख अजिबात झाले नसल्याचे लक्ष्मीबाई लिहितात. जाईना का आपला नवरा ख्रिस्ती धर्मात, कुठेही असला तरी सुखरूप असावा असेच त्यांना मनापासून वाटले.

आपली बायको अशा परिस्थितीत जीव देण्याचा प्रयत्न करील ही भीती जशी टिळकांना वाटत होती तशी लक्ष्मीबाईंच्या माहेरच्या माणसांनाही वाटत होती. लक्ष्मीबाईंचे भाऊ-बहीण त्यांना आपल्यामध्ये घेऊन त्यांच्या अंगावर आपला हात ठेवून झोपत. एका रात्री लक्ष्मीबाई दत्तूसह सुंदरनारायणाच्या डोहात जीव देण्याच्या विचाराने उठल्या. दत्तू कुठे झोपला आहे, हे त्यांना कळले नाही. त्यामुळे त्या एकट्याच दाराकडे निघाल्या. गस्त घालणाऱ्याची 'आलबेल'*ची आरोळी ऐकली आणि त्या भानावर आल्या. आपल्या अशा कृत्यामुळे आपले मेहुणे

नानासाहेब ह्यांना किती नाचक्की सहन करावी लागेल हा विचार मनात येताच त्या मागे फिरल्या. तशाही स्थितीत आणखी एक अतिशय वास्तव आणि व्यवहारी विचार त्यांच्या मनात आला, तो असा की, आपण घरच्या ह्या अरुंद तोंडाच्या आडात जीव दिला तर, आपल्याला बाहेर काढताना लोकांना त्रास होण्याची शक्यता अधिक आहे. म्हणजे पुन्हा मेहुण्यांच्या इभ्रतीचा प्रश्न आला! ह्या विचारासरशी त्यांनी जीव देण्याचा आपला बेत बदलला.

नारायणाशिवाय लक्ष्मीच्या जीवनाला अर्थ नाही अशी अवस्था टिळकांनी परधर्मात प्रवेश केल्यावर लक्ष्मीबाईंची झाली. हातापायातली शक्ती जाणे, दातखीळ बसणे, डोके भणभणणे, सगळे शरीर लाकडासारखे कडक होणे, जिभेवर काटे येणे असे काहीबाही त्यांना होऊ लागले. कोणाला वाटले, हिला संतापवायू झाला आहे; कोणाला वाटले, हिने काचा कुटून खाल्ल्या की काय; कोणाला वाटले, हिने विष घेतले असावे. भिकुताईने आपले आजारपण विसरून आपल्या धाकट्या बहिणीची सेवा आपल्या पोटच्या बाळाप्रमाणे केली– अगदी दात घासण्यापासून तर थेट दूध-ताक पाजण्यापर्यंत.

लक्ष्मीबाईंचे नुसते माहेरच नाहीतर, जवळचे सगळे आपापल्या परीने लक्ष्मीबाईंचे दु:ख हलके करू पाहत होते. वसईत टिळकांना भेटून आलेल्या बापूसाहेब बुटी ह्यांनी आपल्याला लक्ष्मीबाईंनी थोरला मुलगा मानावे आणि दरमहा आपण दहा रुपये पाठवू ते स्वीकारावेत अशी विनंती केली तसेच टिळक महाबळेश्वरला गेल्याचे कळल्यावर तिथे बंगला भाड्याने घेऊन लक्ष्मीबाईंना दत्तूसह तिथे राहता येईल अशीही व्यवस्था करण्याची तयारी दर्शवली.

परंतु पहिली गोष्ट माहेरच्यांना पसंत पडली नाही आणि दुसरी कोणत्या कारणामुळे तडीस जाऊ शकली नाही ते लक्ष्मीबाईंना आठवत

नसल्याचे त्यांनी प्रामाणिकपणे नमूद केले आहे. टिळक ख्रिस्ती झाले म्हटल्यावर समाजात, नातेवाइकांत खळबळ माजणे अपेक्षित होते. टिळकांनी हिंदुधर्मात परत यावे म्हणून कोणी त्यांना नोकरी देऊ केली; कोणी त्यांना जन्मभर पोसण्याची आणि दत्तूची विद्यासुद्धा करण्याची हमी दिली; पण टिळक काही बधले नाहीत. त्यामुळे टिळकांवर मारेकरी घालण्याचा प्रयत्न झाला. एवढेच काय, पण त्यांना जिवे मारण्यासाठी त्यांच्यावर विषप्रयोग करण्याचा कटदेखील रचण्यात आला.

टिळक वाचत असलेले बायबल जाळून टाकायला काही लोकांनी लक्ष्मीबाईंना सांगितले तेव्हा लक्ष्मीबाईंनी त्यांना विचारले–

'बायबलची ही प्रत जाळली तर साऱ्या जगातल्या प्रती नाहीशा होतील का?'

टिळकांची कागदपत्रे त्या लोकांनी बघायला मागितली तेव्हा 'ह्या लोकांनी त्या कागदपत्रांचा गैरवापर केला तर– ?', 'ध चा मा करून टिळकांना गोत्यात आणले तर– ?' अशी शंका त्यांच्या मनात येते आणि त्यालाही त्या ठामपणे विरोध करतात.

ह्या साऱ्या गोष्टींना विरोध करण्याइतके धैर्य त्या अशिक्षित स्त्रीमध्ये कुठून आले, ह्याचे नवल वाटल्याशिवाय राहत नाही.

टिळकांनी धर्म बदलला म्हणून त्यांचे बायको-मुलावरचे प्रेम कमी झाले असे मुळीच नव्हते. त्यांनी लक्ष्मीबाईंना पत्रे पाठवली. बाईंनीही पत्रातून उत्स्फूर्तपणे केलेल्या कविता पाठवल्या. पण हे सगळे घरच्यांना चोरून. टिळकांची त्यांना कधी एका दिवशी तीन तीन पत्रे येत. एक दिवस तारेने टिळकांनी आपण बायकोला भेटायला येत असल्याचे पेंडसेंना कळवले. उत्तरादाखल पेंडसेंनी घरी येऊन भेटण्यास मज्जाव केला. त्यावर टिळकांनी 'कोर्टात भेटू' अशी भाषा केली. टिळकांनी बायकोला बाहेर भेटण्यास पेंडसे ह्यांची हरकत नव्हती. फक्त

'टिळकांसोबत जाणार नाही' अशी शपथ मनुकडून वदवून घेतल्यानंतरच त्यांनी तिला जाऊ दिले. 'लक्ष्मीला बरे वाटेपर्यंत आपण धर्मशाळेत राहू' असे टिळकांनी म्हटल्याचे कळल्यावर त्यांना नोकरमाणसाच्या करवी जेवण पोचवण्याची व्यवस्था पेंडसे यांनी केली. आपल्याला मुसलमान शिपाई चालतो मग टिळकांना घरी जेवायला येऊ देण्यास आपली हरकत कां, असेही पेंडसेंना वाटू लागले. ज्याला आपण प्रेमाने खाऊपिऊ घातले त्याला असे उपऱ्यासारखे वागवतो आहोत ह्याचे भिकुताईलादेखील दु:ख झाले होते. मोठ्या मनाने त्या दोघांनीही टिळकांना घरात घेतले खरे, मात्र जेवायला बाकी मंडळी आत असत तर टिळक बाहेर. भिकुताईंनी 'टिळकांना परत जातीत घेता येईल कां?' असा प्रश्न टिळकांच्या बंधूंना–सखाराम ह्यांना विचारला तेव्हा प्रयत्नाच्या आणि पैशाच्या बळावर हे सहज शक्य असल्याचे पेंडसे म्हणाले. त्या खर्चासाठी भिकुताई आपले सगळे दागिने द्यायला तयार झाली. सखारामांनीही भावासाठी हजार रुपये देऊ केले. लागणारी बाकी रक्कम देण्याचे पेंडसेंनी कबूल केले.

टिळकांच्या नकळत धर्मांतरावर सभा भरवणे, सह्या गोळा करणे ह्या गोष्टी सुरू झाल्या. टिळकांना ते कळल्यावर 'हा उगाच खर्च का करता? मी परत गेलो तर?' असे ते म्हणाले. त्यावर झालेला खर्च भरून घेण्याची भाषा करण्यात आली. बायकोची तोळामासा प्रकृती लक्षात घेऊन टिळकांनी वाद वाढवला नाही. पुढे टिळकांना जातीत घेण्यासाठी शास्त्राधार सापडेना, तेव्हा पेंडशांनी टिळकांच्याच मागे योग्य शास्त्राधार काढून देण्याचा लकडा लावला आणि आपल्या शुद्धीकरणासाठीचा शास्त्राधार टिळकांनीच काढून देण्याचा अजब प्रकार घडलासुद्धा! पण ब्रह्मवृंदाने 'टिळकांनी आपल्या पाया पडावे' असा फतवा काढला. तो मात्र टिळकांना अजिबात मान्य न झाल्याने

'हेडमास्तरांनी साष्टांग नमस्कार घालून टिळकांच्या वतीने माफी मागितली.' हे हेडमास्तर कोण होते, त्यांचा नामोल्लेख नसल्यामुळे स्पष्ट होत नाही. आता आणखी दोन क्षेत्री जाऊन जगत्गुरू शंकराचार्यांकडे कागद जाणार आणि टिळकांच्या शुद्धीकरणाचा मार्ग मोकळा होणार एवढेच बाकी होते. टिळकांच्या शुद्धीकरणाच्या प्रयत्नाला लोकमान्यांचा पाठिंबा होता. त्यांनीच काशीच्या ब्रह्मवृंदाकडून ह्या प्रयत्नास मान्यता मिळवून दिल्याचे कवी टिळकांचे पहिले चरित्रकार फादर विन्स्लो ह्यांनी म्हटले आहे (स्मृ.२: पृ.१८).

कॉलऱ्याच्या साथीत एका तरुणाचा मृत्यू झालेला पाहून चाललेल्या स्वच्छता मोहिमेकडे बोट दाखवून 'माझे असेच काही झाले तर लोक तुम्हाला त्रास देतील, कॉलरा कमी होऊ द्या, तोवर शंकराचार्यांचे उत्तर येईल, मग काय ते पाहू' असे टिळकांनी म्हटले. त्यावर पेंडसे काय ते समजले आणि त्यांनी गाडीभाडे देऊन टिळकांची मुंबईला जाण्याची व्यवस्था केली.

■

---

* आलबेल-ऑल इज वेल

## शिक्षण

टिळकांसारख्या अति विद्वान आणि तितक्याच लहरी स्वभावाच्या माणसाबरोबर संसार करणे ही काही सोपी आणि सुखकर गोष्ट नव्हती. पण अशाही परिस्थितीत लक्ष्मीबाईंनी त्यांच्याशी हसत हसत संसार केला. त्यांचा स्वभाव मुळातच आनंदी होता. त्यांना हसू फार होते. त्यांच्या हसण्याचा पूर एकदा का सुरू झाला की, त्याला आवर घालणे कठीणकर्म असे. टिळकांना त्याचा प्रत्यय ते 'मुलगी पाहायला' म्हणून गेले होते, तेव्हाच आला असणार. कदाचित ते निखळ खळाळते निरागस हसू पाहूनच कविमनाचे टिळक लक्ष्मीबाईंच्या प्रेमात पडले असावेत. टिळकांच्या आईसारखाच लक्ष्मीबाईंचाही स्वभाव माणसांचा गोतावळा जमवणारा आणि बोलघेवडा असल्यामुळेही त्या तरून गेल्या असतील. पण हसू न रोखू शकणारा हाच त्यांचा स्वभाव टिळकांच्या संतापाचा पारा चढवायला पुष्कळदा कारणीभूत ठरत असे.

'खरेंच्या लक्ष्मीबाईंना लिहिता-वाचता येते तर टिळकांच्या लक्ष्मीला का येऊ नये?' हा विचार मनात आल्याबरोबर टिळकांनी खिशात होते नव्हते ते सगळे पैसे खर्चून पहिली ते सहावीची पुस्तके खरेदी करून आणली आणि शिकण्यासाठी समोर बसण्याची आज्ञा त्यांनी बायकोला केली. लक्ष्मीबाईंना व्याकरणापासून शिकवायला सुरुवात केल्याचा किस्सा सर्वश्रुत आहे.

शिक्षणाचे वातावरण माहेरी-सासरी कधीच न पाहिलेल्या लक्ष्मीबाईंना त्याची गंमत वाटली आणि हसूच येऊ लागले. त्यात नवरा म्हणजे अत्यंत विद्वान शिक्षक आणि बायको म्हणजे शाळेची पायरीही कधीच न चढलेली, पदरात मूल असूनही अजून भातुकलीतच रमणारी अशी विद्यार्थिनी. आपण चांगले शिक्षक आहोत, 'आठ दिवसांच्या

आत आपल्या बायकोने आपल्यासारखे व्हावे' असा वाटणाऱ्या टिळकांनी आपल्यासमोर दामटून शिकायला बसवलेल्या, व्याकरण कशाशी खातात ह्याची सुतराम कल्पना नसलेल्या, आपल्या विद्यार्थिनीला पहिलाच प्रश्न केला–

'शब्द म्हणजे काय ?'

त्यासरशी लक्ष्मीबाईंना आणखी गंमत वाटून हास्याचे बांधावर बांध फुटत राहिले. तसतसा टिळकांचा पाराही चढू लागला. शेवटी त्यांचा संतापाग्नी असा भडकला की, त्यांनी ती सगळी पुस्तके फाडून बंबात टाकली! नंतर काही वेळाने आपण बायकोकडून विद्यार्थिनी म्हणून फारच जास्तीची अपेक्षा केल्याचे त्यांच्या लक्षात आले असावे. बाराखडीपासून मग त्यांनी तिला शिकवायला सुरुवात केली. पण त्यात त्यांना स्वत:लाच काही रस वाटेना. अनेक शाळा सुरू करून त्या अर्ध्यावर सोडल्या तशीच ही गोष्टही त्यांनी अर्ध्यावर सोडून दिली. त्यानंतर लक्ष्मीबाईंनाच वाचनाची गोडी लागली. त्यामुळे बाराखडी आणि जोडाक्षरे ह्यांची ओळख आपोआप होत गेली. क्ष, ज्ञ, कै, खै ही अक्षरे त्यांचा गोंधळ उडवून देत. मग बोटे मोजून त्यांचा क्रम त्यांना ठरवावा लागे. टिळकांच्या सहवासाने माणसे सुसंस्कृत होत, असे लक्ष्मीबाई म्हणत. त्या अर्थाने लक्ष्मीबाई सुसंस्कृत तर झाल्याच पण अक्षरओळख नसलेली ही बाई पुढे मराठी सारस्वताला 'स्मृतिचित्रे' सारखा ग्रंथ देऊ शकली ते कोणाच्याही मदती-मार्गदर्शनाशिवाय घेतलेल्या 'स्वयंशिक्षणा' मुळे; हे विशेष म्हणावे लागेल.

लक्ष्मीबाईंना टिळकांची सर्व प्रकारची योग्यता ठाऊक होती. त्यांनी त्यांची बरोबरी करण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. सावळे रूप, नऊवारी लुगड्याचा बोंगा (ख्रिस्ती झाल्यानंतर काही काळाने लक्ष्मीबाईंनी पाचवारी नेसायला सुरुवात केली.) अशा लक्ष्मीबाईंपुढे

टिळकांचे व्यक्तिमत्त्व खूपच उजवे होते. अशा बायकोला कवी टिळकांनी 'अरे माझ्या मित्रा, चतुर सचिवा, हे गुरुवरा, प्रिय शिष्ये, भार्ये' अशी संबोधने योजली ती उगाच नव्हे. लक्ष्मीबाईंना आपल्या मर्यादांची आणि आपल्यातल्या शक्यतांची पुरेपूर जाण होती. आपण आणखी काही शिकावे असे लक्ष्मीबाईंना मनापासून वाटत होते. टिळकांनाही आपल्या बायकोमधल्या शक्यतांची उमेद होती. म्हणूनच त्यांनी खिशात होते नव्हते ते सगळे पैसे पुस्तकांसाठी खर्च केले होते.

तेव्हा टिळकांपुढे बसून लक्ष्मीबाई निमूटपणे शिकल्या असत्या तर मराठी, इंग्रजी, संस्कृत ह्या भाषांमधील उच्च साहित्याचा त्यांचा अभ्यास झाला असता. लक्ष्मीबाईंना शिकवण्याची हातोटी होती. त्यांनी ते साहित्य रंजकपणे आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले असते आणि कदाचित 'स्मृतिचित्रे' संस्कृत किंवा इंग्रजीत आपल्यापुढे आले असते. पण तसे झाले नाही, ते बरेच झाले. त्यामुळे आपले मराठी गद्य वाङ्मय समृद्ध झाले. नाहीतर, एका सहजसुंदर शैलीला आपण मुकलो असतो.

लक्ष्मीबाई रूढ अर्थाने शिकल्या नाहीत. आपल्या मुलांच्या लहानपणी त्या त्यांच्या शिक्षिका झाल्या होत्या. नंतर नातवंडांच्या त्या विद्यार्थिनी झाल्या. ह्या मार्गाने प्रगतीचा बराच मोठा पल्ला गाठल्यावर शिकवण्याची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देईना. मग मांगवाड्यात जाऊन तिथल्या मुलांना त्या शिकवू लागल्या. एखाद्या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून गेल्या तर दुर्बळ घटकातल्या कुणाला तरी उत्तेजन देण्याच्या हेतूने निवडीत प्राधान्य देत.

टिळकांनी लक्ष्मीबाईंच्या शिक्षणाला जसे उत्तेजन दिले तसे पुढे नर्सिंगच्या प्रशिक्षणालाही दिले (१९०३). लक्ष्मीबाईंना टिळकांकडून काही औषधोपचारांची माहिती झाली होती पण तेवढे त्यांना पुरेसे वाटत

नव्हते. त्याविषयीचे आणखी ज्ञान मिळाले तर अडीअडचणीत आपल्याला त्याचा उपयोग होईल, दुसऱ्यांनादेखील उपयोगी पडेल, म्हणून नर्सिंगचे शिक्षण आपण घ्यावे असे त्यांना वाटले. त्या आपले नाव नोंदवायला म्हणून गेल्या तेव्हा टिळकांची बायको त्यांच्यासारखीच हुशार असेल अशी डॉक्टरांची समजूत झाली. डॉक्टरांचा सांगण्याचा वेग आणि लक्ष्मीबाईंचा लिहिण्याचा वेग ह्याचा काही ताळमेळ बसेना. लक्ष्मीबाईंना तर मराठी बाराखडी लिहिताना बोटे मोजून त्यांचा क्रम आठवावा लागे. त्यात त्यांचा फार वेळ जात असे. बाकीच्या मुलींचे दोन परिच्छेद लिहून झाले तरी बाईंच्या मोठ्या मुश्किलीने दोन ओळी लिहून व्हायच्या. तोवर बाकी विद्यार्थी पुढे निघून जात. लक्ष्मीबाईंची गाडी मात्र मागेच रेंगाळत राही. डॉ.ज्युलिया बिसेल ह्यांच्याकडे काही दिवस त्या शिकल्या. त्या अमेरिकेला गेल्यानंतर त्यांच्या जागी आलेल्या दोन डॉक्टरांनी सुरू केलेल्या वर्गांना लक्ष्मीबाई जाऊ लागल्या पण वर्ग चालत इंग्रजीतून.

तीन महिन्यांनी झालेल्या परीक्षेत आपण पास कशा झालो ह्याचे नवल वाटून आपल्याला पास करण्यामागे डॉक्टरांचा हात असावा अशी शंका त्यांनी व्यक्त केली. देशी औषधांचा साठा लक्ष्मीबाईंजवळ आधीपासून होताच, 'कोणी असा औषधांचा शोकी भेटला', की ते दोघे एकमेकांना आपली औषधे सांगत, 'असे माझे वैदूज्ञान बरेच वाढले होते. वैद्यज्ञान मात्र बेताचेच होते.' अशी प्रामाणिक कबुलीही त्या देऊन जातात (स्मृ.२:पृ.११०). पडेल ते काम करायचे ह्या प्रॅक्टिकल वर्कच्या पद्धतीने चाललेल्या त्यांच्या शिक्षणात विद्याधर गायकवाड ह्या डॉक्टरकी शिकणाऱ्या मुलाकडून त्या औषधांची इंग्रजीतील लेबले वाचायला शिकल्या.

टिळकांच्या निधनानंतर मुंबईत मुलींच्या वसतिगृहावर मेट्रनचे काम करताना वसतिगृहासाठी मागवलेल्या सामानावर सही करण्यापूर्वी माल बरोबर आणला आहे की नाही हे पाहावे लागे. ते पाहण्याची युक्ती

लहान मुलांनीच त्यांना शिकवली होती. इंग्रजी S हे अक्षर साखरेसाठी तर, T हे अक्षर Tea (चहा)साठी, C म्हणजे कोकोनट (खोबरे), P म्हणजे पोटॅटो (बटाटे) वगैरे अक्षरे इंग्रजी आकड्यांबरोबरच सोयीसाठी म्हणून लक्ष्मीबाईंना शिकवण्यात आली होती.

■

## विरहाचा काळ

टिळकांच्या आताच्या जाण्याचे लक्ष्मीबाईंना फारसे दु:ख झाले नाही. कारण ते परत येतील अशी खात्री त्यांना वाटत होती. पण टिळक आले नाहीत. 'दत्तूला घेऊन ये, तुला यायचे नसेल तर त्याला पाठवून दे.' अशी त्यांची पत्रे येऊ लागली.

बाबा पद्मनजींनी धर्मांतर केल्यानंतर त्यांच्या पत्नीला तिच्या माहेरच्या माणसांनी न पाठवल्यामुळे तिचे कसे हाल हाल झाले त्याची इथे आठवण होते. नंतर तिने स्वत: जेव्हा पतीकडे जाण्याची तयारी दर्शवली तेव्हा तिला जाता आले नाही. कारण तेव्हा तिच्यापासून रीतसर घटस्फोट घेतलेल्या बाबांचे ख्रिस्ती लग्न झाले होते आणि ख्रिस्ती धर्मातल्या विवाहित पुरुषाला दुसरे लग्न करता येत नाही असे बाबा पद्मनजींनी सांगितल्यामुळे तिची बिचारीची फारच कुचंबणा झाली.

लक्ष्मीबाईंनाही असाच विरोध झाला. नातेवाईक म्हणत, 'तू गेलीस तर तुझे दुसऱ्याबरोबर लग्न लावून देतील', मिशनरींना कुणाचीही सेवा किंवा कुठलेही काम करण्याचे वावडे नव्हते त्यावरून 'तुला ते भंग्याचे काम करायला लावतील', 'मांसाचा स्वयंपाक करायला सांगतील' एक ना अनेक. लक्ष्मीबाईंच्या भित्र्या मनाने मात्र ह्यापुढे जाऊन विचार केला की, समजा, आपण टिळकांकडे गेलो, आज त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे पण उद्या ते मुसलमान झाले तर ?–आज नातेवाईक तरी विचारतात, मग तर कोणीच विचारणार नाही !

अशांत मनाने लक्ष्मीबाई विठोबाच्या देवळात जाऊन तासन्‌तास बसत. तिथे 'रडतभेकत बसण्यापेक्षा चांगले खाऊनपिऊन मजेत राहा' असे काही बाया त्यांना सांगत. कोणी 'भावंडांच्या जिवावर जगण्यापेक्षा

खाणावळ काढून स्वावलंबी जीवन जगण्याचा' मौलिक सल्ला देत. लक्ष्मीबाई अशिक्षित होत्या तरी त्यांच्या विचारांची धाव सामान्य स्त्रियांपेक्षा वेगवान होती त्यामुळेच त्यांनी 'बाहेरच्यांची मोलाची दळणी दळण्यापेक्षा प्रेमाच्या माहेरच्या माणसांच्या घरी कष्टाची कामे करीन, आपले भाऊ, बहीण, दीर ह्या तिघांना मालक मानून त्यांचीच हांजी हांजी करणे पत्करीन, त्यांपैकी कुणाशी नाहीच पटले तर, माझ्या चौथ्या मालकाकडे निघून जाईन' असे बाणेदार उत्तर देऊन लक्ष्मीबाईंनी त्या बायांना गप्प केले.

भावाचा पुळका आलेल्या सखाराम ह्या आपल्या दिराला त्याने टिळकांना आपल्या बायकोचे दुसरे लग्न लावून द्या आधी, तिची काय ती व्यवस्था करा असे सांगायला त्राग्याने सांगतात तेव्हाही लक्ष्मीबाईंचा हा बाणेदारपणा दिसून येतो.

त्यानंतर टिळक बायकोला भेटायला आले तर घरी उतरत नसत. भावाकडे उतरणे त्यांना शक्य नसे. कारण तो राममंदिरात राहत होता. तिथे टिळकांना मज्जाव होता. डॉ.काशीबाई झणकर ह्यांच्या घराचे दार टिळकांसाठी उघडे होते. तिथे ते उतरत.

एका रात्री काशीबाईंच्या आई 'काशीला विंचू चावला आहे, उतरवायला ताबडतोब चला' असे खोटेच सांगून लक्ष्मीबाईंना घरी घेऊन गेल्या. विंचू उतरवण्याची कला लक्ष्मीबाई टिळकांकडून शिकल्या होत्या. काशीबाईंच्या घरी टिळक उतरल्याचे माहीत नसल्यामुळे आणि डॉ.काशीबाई झणकर ह्यांच्याशी घरगुती संबंध चांगले असल्यामुळे भिकुताईने दत्तूला बरे नसतानाही लक्ष्मीबाईंना जाऊ दिले. तिथे लक्ष्मीबाईंची टिळकांशी भेट झाली. दत्तूला बरे नसल्याचे कळल्यावर टिळकांनी त्यांना लवकर घरी जाण्यास सांगितले.

दुसऱ्या दिवशी डॉक्टरबाईंना बोलावून नानासाहेब पेंडसे ह्यांनी

सगळी हकिकत ऐकून लक्ष्मीबाईंचा टिळकांसोबत जाण्यासंबंधी काय विचार आहे ह्याची चौकशी केली. डॉक्टरबाईंनी 'तिने आपल्याकडे एकदा झिजून झिजून मरण येईल असे विष मागितले होते, त्यासाठी पैसे नाहीत म्हणून आपली जोडवी द्यायला ती तयार झाली होती, त्यावरून तिला इथे राहायचे नाही, नवऱ्याकडे जाण्याची तिची इच्छा दिसते' असे सांगितले.

हे सगळे टिळकांच्या सांगण्यावरून झाले असावे. लक्ष्मीबाईंना ह्याची काहीच कल्पना नव्हती. सकाळी उठून त्या बघतात तर, उशाशी दोन लुगडी, दोन चोळ्या, दत्तूची बाळलेणी-कुंची असे सामान ठेवलेले दिसले. 'टिळकांकडे जायचे तर जा' असा त्याचा अर्थ होता. गोंधळलेल्या लक्ष्मीबाईंनी 'जा म्हणतात, तर जावे' असा विचार करून एक लुगडे आणि कुंकवाचा करंडा घेतला आणि वणीच्या डोंगरात योगिनी बनून राहावे असा विचार केला. आपल्या अंगात चालण्याइतकेही बळ नाही हे त्यांच्या स्वत:च्या आणि घरच्या मंडळीच्याही लक्षात आले. त्यामुळे अर्थातच घरच्यांनी अडवले आणि योगिनी बनण्याच्या लक्ष्मीबाईंच्या विचारालाही खीळ बसली.

दरम्यान लक्ष्मीबाईंना टिळकांची पत्रे रोजच येत. त्यात कधी येण्यासंबंधी आर्जवे असत, कधी धमकी असे, कधी 'तुला माझी पर्वा नाही, मी दुसरे लग्न करीन, मला सूटपत्र दे' अशा प्रकारचा मजकूर लिहिलेला असे. रेव्ह. डॉ.ॲबट ह्यांनी 'अशी रागाने पत्रे लिहिण्यापेक्षा प्रेमाने त्यांचे मन इकडे येण्यासाठी वळवा आणि परमेश्वराकडे प्रार्थना करा' असा वडीलकीचा प्रेमळ सल्ला टिळकांना दिला. टिळकांनीही तो मानला. डॉ.काशीबाईंकडून आल्यानंतर टिळकांना रेव्ह.डॉ.ॲबट ह्यांनी भेटीचा वृत्तान्त विचारला तेव्हा टिळकांनी लक्ष्मीचे आपल्यावरचे प्रेम कायम असल्याचे सांगितले. ॲबट ह्यांनी बायबलमधून पती-

पत्नीचे संबंध कसे असावेत ह्याविषयी टिळकांचे प्रबोधन केले. नंतर प्रार्थना केली. त्यावेळी टिळकांनी 'बायको परत येईपर्यंत मी तिची वाट पाहीन' असे वचन त्यांना दिले. लक्ष्मीबाईंना 'प्रकृतीची काळजी घे, मी ह्यापुढे तुला त्रास होईल असे कधीच वागणार नाही, एकपत्नीव्रताने राहीन, त्याची मुळीच काळजी करू नकोस' अशा मजकुराचे पत्रदेखील लिहिले.

टिळकांची बायको त्यांच्याकडे परत येत नाही म्हटल्यावर त्यांचे ख्रिस्ती हितचिंतक टिळकांनी दुसरे लग्न करावे म्हणून त्यांच्या मागे लागले. टिळकांची मानलेली ख्रिस्ती आई आशम्माबाई हिने आपली थोरली मुलगी टिळकांना देऊ केली. दुर्दैवाने तिचा कशाने तरी मृत्यू झाला. तिची दुसरी मुलगीही पहिलीच्या पाठोपाठ चारपाच दिवसांच्या अंतराने देवाघरी गेली. (१८९८) अशा रीतीने टिळकांच्या नशिबातला पुनर्विवाहाचा योग टळला होता.

टिळक परत यावेत म्हणून आपल्या बुद्धिनुसार, भावनेनुसार सुचतील ते उपाय लक्ष्मीबाईंनी केलेले होते. त्यासाठी त्यांनी जलालपुरच्या मारुतीला वेठीला धरले होते. एकदा रात्री एकटीने तिथे जाऊन त्याच्या डोक्यावर एक धोंडा ठेवला आणि त्याला धमकी दिली– 'टिळकांना परत आणलंस तरच काढीन!' एक दिवस रामनामाच्या चिठ्ठ्या त्याच्या डोक्यापासून पायापर्यंत लावायच्या असे त्यांनी ठरवले. हेतू हा की, हा रामभक्त रामनामाची चिठ्ठी पायाला कशी लागू देईल? त्याच्या आतच तो टिळकांना आणण्याचे आपले काम फत्ते करील! त्याने टिळकांच्या मागे लागून त्यांना आपल्यापर्यंत आणावे म्हणून एकदा त्यांनी त्याच्या हातात काठीच दिली. एकीकडे त्यांचे उपासतापासही चालूच होते. त्यांची अन्नावरची वासना उडाली होती. कोणाशी बोलावेसे वाटत नव्हते. कोणी ओळखीचे समोर नको असेच वाटत होते.

दत्तूला घेऊन दूर कुठेतरी निघून जावे असे मनापासून वाटत होते. ज्या दत्तूकडे बघून आयुष्य काढायचे, त्याचीच प्रकृती नीट राहत नाही, त्याला हवापालट व्हावा म्हणून मग सखाराम भाऊजींकडे जावे तर हातात पैसा नाही. जो होता तो मुंजीचा. तो धंद्यात लावायचा विचार भावांनी त्यांच्या मनातून काढून टाकला होता. व्याजावर पैसे लावले तर पैसे वाढतील ह्या हिशेबाने मग त्यांनी भावांनाच ते व्याजाने हळूहळू देऊन टाकले होते.

आता कुठे जायचे म्हटले तर लक्ष्मीबाईंकडे पैसे नव्हते. परक्या कुणाला मागावेत तर माहेरच्यांची बदनामी होण्याचे भय वाटत होते. म्हणून त्यांनी टिळकांनाच पत्र लिहिले. पण त्यात सरळ सरळ पैसे मागण्याऐवजी 'तुम्हाला एक गुप्त गोष्ट सांगायची आहे.' एवढीच प्रस्तावना त्यांनी संकोचामुळे केली. त्यावर टिळकांनी अतिशय समजुतीने 'माणूस चुकणारा प्राणी आहे. मोठमोठ्या ऋषिमुनींच्या हातून चुका घडल्यात. तू वाईट वाटून घेऊ नकोस. साऱ्या जगाने तुला सोडले तरी मी तुला सोडणार नाही.' असा विश्वास आपल्या पत्नीला पत्रातून दिला.

मग मात्र लक्ष्मीबाईंना सारा संकोच सोडून खरी अडचण कळवणे भाग पडले. त्यावर टिळकांनी ताबडतोब पैसे पाठवून दिले आणि मग लक्ष्मीबाई दत्तूला घेऊन सखाराम भाऊजींकडे घरच्यांचा विरोध पत्करून गेल्या. तिथे रोज कुठल्या ना कुठल्या मंदिरात जाऊन मन रमवण्याचा प्रयत्न करू लागल्या. तिथे झालेल्या ओळखीतून एका वृद्ध जोडप्याबरोबर दत्तूला घेऊन गाणगापूरसारख्या अनोळखी ठिकाणी जायचे त्यांनी ठरवले. तेवढ्यात सखारामला तार आली–

'गोसावीज फादर कमिंग.'

हा कोण गोसाव्याचा बाप येतो आहे ह्याचे कुतूहल वाटून सारे वाट बघत होते तर, टिळकच हजर! तार त्यांनीच केली होती. पण त्यातला

खरा मजकूर असा होता–

'गो, सेज फादर, कमिंग.'

रेव्ह.डॉ.ॲबट ह्यांच्या उपदेशानुसार टिळक लक्ष्मीबाईंचे मन वळवण्यासाठी प्रार्थनापूर्वक प्रयत्न करीत असताना त्यांना त्यांच्या 'देवबापाने आदेश दिल्याप्रमाणे' ते लक्ष्मीबाईंकडे आले होते. टिळकांना पाहून लक्ष्मीबाईंचा आनंद गगनात मावेना. गाणगापूरला जायला निघालेल्या लक्ष्मीबाई टिळकांकडे –त्यांच्या हक्काच्या घरी खुशीत जायला निघाल्या पण घरातील वातावरणात तो आनंद नव्हता. त्यामुळे काय निर्णय घ्यावा हे त्यांना कळेनासे झाले. अशा परिस्थितीत त्यांना पाठिंबा देऊन योग्य सल्ला देणारी एकच व्यक्ती निघाली. ती फार शिकलेली वगैरे नव्हती पण त्यांचे दु:ख समजून घेईल अशी एक सामान्य स्त्री होती. ती म्हणजे त्यांची धाकटी जाऊ –सखारामची बायको रखमा.

'लोक नाही नाही ती भीती घालतात, पण योग्य सल्ला कोणीच देत नाहीत. टिळक काही तुम्हाला 'ख्रिस्ती हो' म्हणत नाहीत. म्हणालेच तर सरळ मला पत्र पाठवा. मी इकडे येण्यासाठी तुम्हाला पैसे पाठवण्याची सोय करीन. मी तुमचा सांभाळ करीन', असा दिलासा देऊन तिने त्यांची पाठवणीची तयारी केली आणि तिने एकटीनेच त्यांना निरोप दिला.

एरवी वहिनीवर जीव टाकणारा सखारामसुद्धा पुढे आला नाही. स्वयंनिर्णय घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना नसतानाच्या काळात आपल्या थोरल्या जावेविषयीची रखमेची आत्मीयता, स्त्री म्हणून तिला समजून घेत तिच्या भल्याचा सल्ला देण्याचा आणि आपल्या विचाराला आपल्या नवऱ्याचा पाठिंबा नसतानाही त्याच्याच भावजयीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा रखमाने दाखवलेला धीटपणा कौतुकास्पद वाटतो. रखमाने

पाठिंबा दिला नसता तर लक्ष्मीबाईंचे पाऊल कदाचित उचलले गेले नसते आणि त्यांची गत बाबा पद्मनजींच्या पहिल्या पत्नीसारखी झाल्याशिवाय राहिली नसती, असे वाटते.

टिळकांबरोबर नगरला पोहचल्यावर सखारामनेच तार करून कळवले म्हणून आलेल्या पेंडशांना समोर पाहून लक्ष्मीबाई गडबडल्या. नाइलाजाने त्यांच्याबरोबर त्यांच्या घरी गेल्या. तिथे त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. दत्तूच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण हे पाऊल उचलले असल्याचे त्यांचे बोलणे कोणालाच पटले नाही. एकेकाळी ज्यांच्या घरात मऊ अंथरुणावर आपण लोळलो, त्यांच्याच घरात आता झोपण्यासाठी नोकराकरवी घोड्याचे खोगीर आपल्याला दिले गेले, हे थोड्या क्षणांपुरते त्यांना क्लेशकारक वाटले तरी आश्चर्य म्हणजे त्यावर त्यांना गाढ झोप लागली. अखेर टिळकांनी सोय केलेल्या 'आपल्या' घरी जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

पाच वर्षांच्या विरहानंतर टिळक दाम्पत्याचा संसार पुनश्च सुरू झाला! टिळकांचे आयुष्य वेगळ्या वाटा धुंडाळत स्थिर झाले होते. आता ह्यापुढे टिळकांसोबत राहण्याचा निर्णय घेतल्याने लक्ष्मीबाईंच्याही आयुष्याला एक वेगळी कलाटणी मिळणार होती आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत जाणार होते, ह्याची कल्पना प्रत्यक्षात कुणालाच नव्हती.

■

## लक्ष्मीबाईंचे धर्मांतर

लग्नानंतर लक्ष्मीबाई सासरी गेल्या तेव्हा त्यांना त्या घरचे रीतीरिवाज शिकवायला कुणीही नव्हते. जी शिस्त गृहिणीला हवी, ती लावण्याचे काम त्यांच्या सासऱ्यांनी केले होते. आता पाच वर्षांच्या विरहानंतर त्या नवऱ्याबरोबर नांदायला आल्या त्या संपूर्ण वेगळ्या वातावरणात. नवऱ्याने धर्म बदलला होता. त्याच्या अवतीभोवती वावरणारी माणसे अठरापगड जातीतून आता 'ख्रिस्ती' नावाच्या एका वेगळ्याच धर्माच्या झेंड्याखाली आलेली होती. प्रत्येकाच्या भाषेची धाटणी वेगळी होती. प्रत्येकाचे आचार-विचार वेगळे होते. एकमेकांना हस्तांदोलन करून भेटण्याची पद्धत तर त्या प्रथमच पाहत होत्या. जातपात न मानता प्रत्येकाला समान वागणूक मिळत होती हेसुद्धा त्यांच्या आकलनापलीकडचे होते. ह्या सर्वांबरोबर आपल्या नवऱ्याचे सहजपणे वावरणे ही गोष्ट त्यांच्यासाठी फारशी नवलाची नसली तरी त्यांना स्वत:ला मात्र तसे वागणे जमणे शक्य नव्हते.

लक्ष्मीबाईंचे सोवळे त्यांच्या वडिलांइतके कडक नव्हते पण तत्कालीन रीतरवेसाप्रमाणे काही प्रमाणात ते होतेच. त्यांनी आपल्या बाळंतपणाच्या वेळी भंगी सुईण चालणार नसल्याचे स्पष्ट सांगितले होते म्हणून त्यांचे बाळंतपण त्यांच्या काकूंनी केले होते. अगदी उपासमारीच्या काळातही त्यांनी उपाशी राहणे पसंत केले होते पण कुणाच्याही हातचे खाणे मान्य केले नव्हते. टिळकांनी तर ख्रिस्ती झाल्यापासून अशा विचारांना थाराच दिला नव्हता. पण बायकोच्या भावना लक्षात घेऊन त्यांनी तिला तिचा स्वयंपाक वेगळा रांधण्याची व्यवस्था करून दिली होती.

रेव्ह.डॉ.ह्यूम साहेबांनी लक्ष्मीबाईंसाठी ब्राह्मण वस्तीत भाड्याचे

घर पाहून ठेवले होते. पण तिथे त्यांच्या ख्रिस्ती नवऱ्याला येण्यासाठी घरमालकाने आडकाठी केली होती. म्हणून दुसरीकडे घर बघावे लागले. तिथे ठेवलेल्या गुजराथी ब्राह्मण पाणक्याने 'आपली मालकीण सोवळे -पूजापाठ करणारी आहे' हे सांगूनही त्याला लक्ष्मीबाईंच्या घरचे पाणी भरायला मनाई करण्यात आली. पायखानासुद्धा वापरू देईनात. अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईंना काय करावे सुचत नव्हते. लक्ष्मीबाईंना आपले मानून घेऊ इच्छिणाऱ्या ख्रिस्ती लोकांच्या शेजारी राहायला लक्ष्मीबाईंची तयारी नव्हती. शेवटी फर्ग्युसन गेट (नगर)ला राहत असलेल्या काही कुटुंबांनी आपले बस्तान दुसरीकडे हलवले आणि त्यांच्यासाठी काही खोल्या रिकाम्या करून दिल्या. तोवर लक्ष्मीबाईंनी मालतीबाई कुकडे ह्या ख्रिस्ती बाईंकडे मुक्काम केला होता.

पाणी भरणाऱ्या माणसाची जात, त्याची स्वच्छता ह्याविषयीच्या कुशंकेने घशात पाण्याचा घोट जाताच उलट्या करणाऱ्या लक्ष्मीबाईंचे सोवळे 'महाबळेश्वरीच हवा खात' पाडण्याला कारणीभूत झाली ती त्यांच्याकडे मुलांचे कपडे धुवायला येणारी भंगीण. तिची टापटीप राहणी पाहून त्यांना फारच आश्चर्य वाटले. त्यामानाने त्यांची स्वत:ची राहणी फारच गबाळी होती. ही एवढी स्वच्छ, नीटनेटकी, पण हिचे घर कसे असेल हा त्यांचा प्रश्न तिने हातातले काम तसेच ठेवून 'आत्ता घरी येऊन बघा' म्हणत सोडवला आणि लक्ष्मीबाईदेखील 'हा सूर्य, हा जयद्रथ' करण्याच्या तयारीने तिच्यासोबत तिच्या घरी गेल्या. तिचे आरशासारखे लख्ख घर पाहून त्यांना नवल वाटले. स्वच्छतेचा मक्ता आपल्या लोकांतच असतो हा त्यांचा गैरसमज दूर झाला आणि त्यांनी तिच्या हातचा फराळ खाल्ला. त्या दिवशी त्यांना एकही उलटी झाली नाही. उलटीच काय पण उलटीची भावनासुद्धा झाली नाही. त्यांच्या ह्या वैचारिक सीमोल्लंघनाचे कौतुक मनापासून करत टिळक उद्गारले–

“तू तर माझ्याही पुढे गेलीस!”

राहुरीला लक्ष्मीबाईंना त्यांचे ‘हक्काचे घर’ प्रथमच मिळाले होते. नवऱ्याच्या सोबतीचे सुख आता त्यांना लाभले. दत्तूला पित्याचे छत्र आणि माया लाभली. आपल्यामागचा वनवास संपुष्टात आल्याचे त्यांना आता जाणवत होते. स्वत:चे हक्काचे घर मिळाल्यावर तिथे लक्ष्मीबाईंनी छानसा बगिचा तयार केला होता. एरंड्याच्या झाडाच्या बिया निघाल्या की, त्या मडक्यात भरून ठेवत असत. प्रत्येक वस्तूचा उपयोग झालाच पाहिजे असा लक्ष्मीबाईंचा खाक्या. मडके भरले, तसे त्यांनी हाताशी असलेल्या, सतरा ठिकाणी वाकड्या असलेल्या चिमबाबाकडून कपभर बिया वाटून घेतल्या. त्यांची साजूक तुपात बर्फी केली. तोवर घरातील सर्व झोपी गेले होते. दत्तू तेवढा जागा होता. मायलेकांनी बर्फीचा आस्वाद घेतला आणि पुढच्या दोन दिवसांत त्यांची अवस्था कॉलरा झालेल्या माणसांसारखी झाली. डॉ.बॅलेंटाईननी त्यांना औषधोपचार करून वाचवले. हा आपला पुनर्जन्मच असल्याचे त्या मानतात. एरवी बायकोच्या काळजीने चिंतित होणाऱ्या टिळकांनी त्यांना हा प्रकार कळल्यावर ‘तू अघोरी आहेस’ म्हणत ह्या साऱ्या प्रकाराचे खापर लक्ष्मीबाईंच्या माथी मारले.

ख्रिस्ती झालेल्या आपल्या नवऱ्याच्या घरात राहताना लक्ष्मीबाईंना धर्मपालनाबाबत पूर्ण स्वातंत्र्य होते. टिळकांच्या घरात रोज चालणाऱ्या सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थनासभांना जाऊन बसण्याची त्यांच्यावर सक्ती नव्हती पण त्या जाऊन बसत. तिथे वाचला जाणारा पवित्रशास्त्रातील (बायबल) भाग, गायली जाणारी गाणी, भजने त्यांच्या कानावर पडत. उपासनेच्या वेळी प्रथेप्रमाणे फिरणारे दानार्पणाचे ताट त्या स्वत:ही कधी फिरवत.

ह्या सभेत प्रत्येक जण बायबलमधील एखादे वचन म्हणत

असे. एकदा लक्ष्मीबाईंनी 'हे देवा, मज पाप्यावर दया कर' हे वचन म्हटले. त्यावर टिळक म्हणाले, ''देव तुझ्यावर कधीच दया करणार नाही. कारण तू मला वचनबद्ध असून दूर राहू लागलीस तर मला तुझ्याबद्दल काय वाटेल? तसेच तुझी जर ख्रिस्ताचे ठायी भक्ती असेल आणि ती असून तू त्याच्यापासून दूर राहू लागलीस तर ती प्रतारणा देवाला कशी आवडेल? तो तुजवर कधी दया करणार नाही!''

टिळकांनी असे उद्गार काढण्याचे प्रयोजन त्यांच्या 'माझी अडचण' ह्या कवितेत स्पष्ट दिसते, ते असे की —

रम्य मुक्तिचे मंदिर म्हणुनि काय एकला जाऊ?
स्वार्थपरायण होउनि याला काय टाकुनि देउ?

(ज्ञानोदय २५ -१०-१८९४)

ऐहिक सुखाचाच नव्हे तर, ईश्वरीसान्निध्याचा आनंद आपण एकट्यानेच न घेता तो आपल्या पत्नीलाही लाभावा, ही त्यांची उत्कट प्रामाणिक इच्छा त्यांनी स्वत: बाप्तिस्मा घेण्याआधीपासूनची होती.

एव्हाना ख्रिस्ती लोकांमध्ये राहून लक्ष्मीबाईंच्या पूजापाठाचे आणि सोवळ्याचे प्रस्थ जवळजवळ संपुष्टात आले होते. ख्रिस्ती धर्माबाबत, ख्रिस्ताबाबत आता त्यांना बरेच कळले होते. प्रार्थनेला बसण्याची, बायबल वाचण्याची ओढही त्यांना वाटू लागली होती. टिळकांनी वरील उद्गार ऐकून लक्ष्मीबाईंना 'दोन धन्यांची चाकरी कोण करू शकेल?'* हे बायबलमधले वचन आठवले. खरेच, आपण सध्या दोन धन्यांची चाकरी करतो आहोत, असे लक्ष्मीबाईंना वाटले.

टिळकांचे शब्द लक्ष्मीबाईंच्या मनात खोलवर जाऊन बसले. ख्रिस्ताला आपला देव म्हणून स्वीकारण्याचा निश्चय त्यांच्या मनाने केला आणि सायंप्रार्थना संपल्यावर घरातल्या कुणालाही न सांगतासवरता लक्ष्मीबाई रेव्ह. डॉ.बॅलेंटाईन ह्यांच्या बंगल्यावर पोहचल्या आणि त्यांना

'मला आत्ताच्या आत्ता बाप्तिस्मा द्या' म्हणू लागल्या.

'बाप्तिस्मा घेणे म्हणजे सोपी गोष्ट नव्हे की, कुणी घे म्हटला की घेतला आणि दे म्हटला की दिला. त्यामुळे आधी बायबलचा नीट अभ्यास करावा लागेल' वगैरे सांगून बॅलेंटाईनसाहेबांनी त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण 'मला सगळे काही ठाऊक आहे, तेव्हा मला बाप्तिस्मा द्याच' असा हट्ट लक्ष्मीबाई धरून बसल्या. बाप्तिस्मा घेण्याचे उद्यावर ढकलून बॅलेंटाईनसाहेबांनी गुडघे टेकून त्यांच्यासाठी प्रार्थना केली आणि कंदिलासह सोबतीला नोकर देऊन लक्ष्मीबाईंची बोळवण केली.

यथावकाश लक्ष्मीबाईंच्या बायबलविषयक ज्ञानाची परीक्षा घेण्यात आली. त्यावेळी जमेल तशी उत्तरे त्यांनी प्रॉम्टिंगच्या साह्याने दिल्याचे लक्ष्मीबाईंनी निरागसपणे सांगितले आहे. लक्ष्मीबाई परीक्षेत पास झाल्या. टिळकांनी भारतीय धर्मगुरुच्या हातून बाप्तिस्मा घेतला तसा आपलाही बाप्तिस्मा भारतीय धर्मगुरुच्याच हातून व्हावा असा त्यांचा आग्रह होता. ८ जुलै १९०० रोजी राहुरीच्या देवालयात (मराठी ख्रिस्ती लोक देऊळ, देवालय, मंदिर हे शब्द चर्चसाठी आजही वापरतात) रेव्ह. वणीराम बापूजी ओहोळ ह्यांच्या हातून लक्ष्मीबाईंबरोबर दत्तू आणि 'नकुशी' ह्या त्यांच्या मानलेल्या मुलीचाही बाप्तिस्मा झाला. लक्ष्मीबाईंनी पतीच्या पावलावर ठेवलेले हे आणखी एक पाऊल होते, असे म्हणता येईल.

लक्ष्मीबाईंच्या धर्मकल्पनांचा विकास कसकसा होत गेला, ह्याविषयी त्यांनी 'स्टेप बाय स्टेप' अशा सात स्टेप्सचे 'स्मृतिचित्रे'मध्ये वर्णन केले आहे. परंतु 'सगळे धर्म सारखेच मग आपल्या माणसांना कशाला दुखवायचे म्हणून मी ख्रिस्ती झाले' असले बाष्फळ विधान मुंबई दूरदर्शनच्या 'स्मृतिचित्रे'मध्ये घालण्यात आले होते (१२-२-

१९८३). ह्यावर लक्ष्मीबाईंचे नातू अशोक टिळक ह्यांनी तीव्र आक्षेप घेतला होता. आपल्याला 'ख्रिस्ती होण्याचे वेध लागल्याचे' खुद्द लक्ष्मीबाईंनी नमूद केले आहे (स्मृ.चि.२:८९). असे असताना हे विधान लक्ष्मीबाईंच्या स्वयंनिर्णय क्षमतेचा अवमान करणारे वाटते.

धर्मांतराचा निर्णय घेण्यासाठी लक्ष्मीबाई टिळकांच्या संमतीची वाट बघत बसल्या नाहीत. टिळकांनी त्यांना फक्त दिशा दाखवली, त्या दिशेला जाण्याचा निर्णय मात्र लक्ष्मीबाईंचा स्वत:चाच होता.

लक्ष्मीबाईंनी ख्रिस्ती झालेल्या टिळकांकडे नांदायला जाऊ नये असे त्यांच्या माहेरच्यांना वाटत होते पण त्या गेल्या. त्यानंतर त्यांनी स्वत:हून ख्रिस्ती धर्माचा स्वीकारही केला. ह्या गोष्टीचा त्यांच्या मोठ्या बहिणीला फार धक्का बसला. त्यांनी आणि त्यांचे पती नानासाहेब पेंडसे ह्यांनी लक्ष्मीबाईंचे नाव टाकून दिले हे जरी खरे असले तरी काळ सर्व प्रकारच्या दु:खांवर औषध असते म्हणतात त्यानुसार घडले. मनु खूप आजारी असल्याचे कळताच तिच्यावरचा सर्व राग विसरून पेंडसे तिला भेटायला गेले. हळूहळू भिकुताईंचेही मन निवळले आणि आपल्या धाकट्या बहिणीवर त्या पूर्वीसारखाच जीव टाकू लागल्या. आपली थोरली बहीण आजारी असल्याचे कळल्यावर तिची विचारपूस करायला गेलेल्या ख्रिस्ती लक्ष्मीबाईंना 'तिला खोगीर द्या झोपायला' असे फर्मावणाऱ्या आणि 'त्या महारणीच्या ओटीत फराळाचे घाला' असे अत्यंत तिरस्काराने भिंतीकडेच तोंड करून बोलणाऱ्या भिकुताई नंतरच्या काळात बहिणीला कोणी हीन लेखले तर खपवून घेईनाशा झाल्या. एवढेच नव्हे तर, 'तू नवऱ्याकडे गेलीस हे बरे झाले' असेही त्या लक्ष्मीबाईंना म्हणाल्या.

काळ जखमा भरून काढतो म्हणतात, ते हे असे. मातृवत् माया करणाऱ्या आपल्या ह्या थोरल्या बहिणीच्या मृत्यूची बातमी मात्र

लक्ष्मीबाईंना शिवाशिवीच्या भानगडीमुळे कळवण्यात आली नाही, हे शल्य लक्ष्मीबाईंच्या मनात कायम राहिले असेल, ह्यात शंका नाही.

■

---

* नवा करार: मत्तय ६:२४

लक्ष्मीबाई आणि टिळक ह्यांची लग्नगाठ बांधली गेली खरी पण दोघे परस्परविरोधी स्वभावाचे होते. लक्ष्मीबाईंना हसू फार तर, टिळक संतापी आणि गंभीर प्रकृतीचे. लक्ष्मीबाईंना संसाराची स्त्रीसुलभ हौस तर, टिळक संन्यासी वृत्तीचे. काहीशा धोरणीपणामुळे लक्ष्मीबाई अंथरूण पाहून पाय पसरणे पसंत करणाऱ्या तर, व्यवहारशून्य असल्याने टिळकांचा हात कायम सढळ. ह्या विरोधी स्वभावगुणांमुळे त्या दोघांमध्ये कायम भांडणे होत. त्यांची ही भांडणे म्हणजे लोकांच्या करमणुकीचा विषय असे. झालेली भांडणे दोघेही लवकर विसरून जात आणि गाडी मूळपदावर यायला वेळ लागत नसे, हे चक्र सतत चालू असायचे. वादविवादात प्रवीण असलेल्या टिळकांच्या पुढे लक्ष्मीबाई पुष्कळदा टिकाव धरू शकत नसत. टिळकांशी वाद घालणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे आहे हे त्या जाणून होत्या म्हणून अनेकदा त्यांना पडते घ्यावे लागे.

तारीख ९ डिसेंबर १८१८ रोजी दत्तूला लिहिलेल्या पत्रात टिळक म्हणतात–

A little frettering, a little quarreling, not so much as we have between husband and wife is like चमचमीत चटणी in dinner. But the strange thing is that Mama who will make life unbearable to me by her being extremely naughty, hopes that you both should be all the while and your life sweet and unruffled to each other.

अ.दे.टिळक म्हणतात, टिळकांना आपली चूक समजून आली की ते दत्तूसारख्या लेकराचीही क्षमा मागत हे लक्ष्मीबाई स्वतःच कबूल करतात पण स्वतःच्या चुकांबद्दल त्यांनी कधी क्षमा मागितल्याचे 'स्मृतिचित्रा'त कुठे आढळायचे नाही (स्मृ.प्रस्ता.पृ.७-८).

ह्याचे उत्तर लक्ष्मीबाईंनीच एका ठिकाणी लिहून ठेवले आहे, असे वाटते. आपल्याला ख्रिस्ती लोकांप्रमाणे कुणाच्या घरात प्रवेश करण्यापूर्वी दारावर टकटक करणे, शेक हँड करून भेटणे, आभार मानणे, असे औपचारिकपणाने वागणे जमत नसल्याचे त्यांनी म्हटले, त्यात सापडते. त्यांनी शब्दांनी क्षमा मागितली नसेल पण ते चारचौघांसमोर सांगण्यासाठी जे घडले त्यात आपली चूक होती हे अख्खा प्रसंग वाचकाच्या डोळ्यांपुढे उभा करून मान्य केले आहे. आपल्या चुका कबूल करायला भलेही क्षमायाचनेचे शब्द त्यांनी नसतील वापरले पण त्यासाठी जे धाडस लागते आणि मोठे मनही लागते, ते लक्ष्मीबाईंजवळ निश्चितपणे होते.

आपलेच घोडे दामटण्याचा लक्ष्मीबाईंचा स्वभाव होता, हे सांगण्यासाठी त्यांचे नातू अ.दे.टिळक ह्यांनी दोन आठवणी उदाहरणादाखल सांगितल्या आहेत:

१.टिळकांच्या अनुपस्थितीत नकुशीला मुलगी म्हणून सोबत घेण्याचा निर्णय.

२.म्हशीच्या दुधाचा धंदा करत असताना 'वर धार मिळणार नाही, हवं तर तेवढं पाणी घालून घे' असे लक्ष्मीबाईंनी ठासून सांगणे.

–पहिल्या गोष्टीबद्दल बोलायचे तर कनवाळूपणा टिळकदाम्पत्यात होताच. परोपकाराबाबत दोघांचेही एकमत होत असे, त्यामुळे नकुशीचा स्वीकार टिळक करतीलच अशी तिला सोबत घेण्याच्या निर्णयामागे लक्ष्मीबाईंना ठाम खात्री होती. आणि —

'मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खाण्यास दिले, तान्हेला होतो तेव्हा मला पिण्यास पाणी दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले,...ज्याअर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले त्याअर्थी ते मला केले आहे.'[१]

हे टिळकांसारखेच लक्ष्मीबाईंनीही बायबलमधून नुसते वाचले नव्हते तर, आचरणातही आणले होते.

दुसऱ्या मुद्यावर असे म्हणता येईल की, लक्ष्मीबाईंना जे हालअपेष्टांमध्ये दिवस काढावे लागले, त्यावरून त्या स्वभावाने फटकळ, रोखठोक आणि व्यवहारी बनल्या असाव्यात. इथे चोख दूध गिऱ्हाइकाला देण्याच्या लक्ष्मीबाईंच्या प्रामाणिकपणाकडे अ.दे.नी कानाडोळा केला आहे, असे वाटते.

टिळक म्हणत, 'देवा, मला दरिद्री ठेव.' आणि लक्ष्मीबाई म्हणत, 'देवा, मला कर्जमुक्त ठेव.' देवाने दोघांच्याही प्रार्थना ऐकल्या– टिळकांच्या प्रार्थनेचे उत्तर म्हणून कर्ज करण्याचा विचार टिळकांच्या मनात येईनासा झाला आणि लक्ष्मीबाईंना पैशाचा मोह वाटेनासा झाला असे लक्ष्मीबाई समाधानाने लिहितात (स्मृ.३: १३७).

दोघांमध्ये एक गुण मात्र समान आणि वाखाणण्यासारखा होता, तो म्हणजे परोपकाराचा. तिथे वादाला किंवा मतभेदाला अजिबात थारा नसे. त्यामुळे प्रवासात असताना भीक मागणाऱ्या एका मुलीला सावत्र आई भीक मागायला लावते, वडीलही लक्ष देत नाहीत असे तिने म्हटल्यावर लक्ष्मीबाईंनी तिला जवळ केले तेव्हा चकार शब्दाने विचारपूस न करता किंवा विरोधात अवाक्षरही न काढता टिळकांनीही तिला आपली मुलगीच मानले. त्या दोघांच्या अशा परोपकारी स्वभावामुळे आईबापांनी तिचे ठेवलेले 'नकुशी' हे नाव बदलून तिला 'हौशी' हे नाव तर मिळालेच शिवाय एक नवे जीवन जगण्याची सोन्यासारखी संधीही लाभली.

ह्या प्रसंगात एक महत्त्वाची गोष्ट अशी की, हिंदुधर्मात महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी जसा देवाला कौल लावतात, तसा कौल लक्ष्मीबाईंनी नकुशीला स्वीकारण्यापूर्वी लावला होता. टिळक जवळ नव्हते. त्या एकट्या बसल्या होत्या. देव म्हणून आता ख्रिस्त त्यांच्यासमोर होता.

ख्रिस्ती समाजातील अनेक जण बायबलमधून पवित्र वचनाचा कौल प्रार्थनापूर्वक मागतात. तसा तो लक्ष्मीबाईंनीही मागायचा ठरवले. ''हे देवा, मी करतेय ते बरोबर आहे का, हे तू मला सांग'' अशी मनातल्या मनात प्रार्थना करून त्यांनी बायबल उघडले आणि समोर ज्या वाक्यांवर त्यांची नजर पडली ते वाक्य असे होते–

'जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते, ते सुकाळी फळ देते, त्याचे पान कधी कोमत नाही.'[२]

लक्ष्मीबाईंनी देवाने दिलेला हा कौल मानला आणि देवच हे आपल्याला करायला सांगत आहे अशी त्यांची खात्री पटली. मुलीच्या जातीसंबंधाने अजिबात चौकशी न करता त्यांनी नकुशीचा मुलगी म्हणून स्वीकार केला. आणखी एका भिकारी मांग मुलीलाही त्यांनी आपल्या मायेच्या पदराखाली घेतले, त्यावेळी तर प्रत्यक्ष मुळात ख्रिस्ती असलेल्या स्त्रियांनीच नाके मुरडली होती. पण नवख्रिस्ती लक्ष्मीबाईंनी त्यांना 'आम्हाला मांग, महार, ब्राह्मण वगैरे सगळे सारखेच आहेत' असे ठणकावून सांगितले होते. त्यावर त्या बायांनी लक्ष्मीबाईंचे घर वर्ज्य करून टाकले होते! आता त्यांना खात्री होती, ह्या मुलीचा सांभाळ आपण करावा ह्या हेतूने देवानेच हिला आपल्याकडे पाठवली आहे. 'परमेश्वराने दया केली म्हणून त्यांनी तिचे नाव दया' ठेवले.

कारण लक्ष्मीबाईंचा जातिभेद व सोवळेओवळे महाबळेश्वरीच हवा खात पडले होते. लक्ष्मीबाई ख्रिस्ती झाल्या होत्या, त्यांनी सोवळे पाळणे पूर्णपणे सोडून दिले होते, त्या जातिभेदाच्या पुढे गेल्याचे दिसल्यावर टिळकांनी त्यांचे कौतुकही केले होते परंतु मुलाच्या लग्नाच्या वेळी 'चैत्रात लग्न नको' म्हणून त्या अडून बसल्या होत्या. पूर्वधर्मातल्या अशा काही अंधश्रद्धांचे संस्कार अजून पुरते पुसले गेले नव्हते, असे टिळकांनी दत्तूला इंग्रजीतून लिहिलेल्या पत्रावरून दिसते (३-३-

१९१८). त्यानंतरच्या वीसबावीस महिन्यांच्या काळात जवळ जवळ तेवढीच माणसे काळाने हिरावून नेली. एक मृत्यू घडल्याचे कानी आले की, त्या चैत्रातल्या लग्नाचा उद्धार करीत.

त्याकाळी मुलगी पाहण्याच्या केवढ्या तरी तऱ्हा असत. पेत्रस हिवाळे नावाच्या एका तरुणाला एक स्थळ सुचवण्यात आले होते. पण तो बहाद्दर म्हणाला, 'मी मुलगी पाहीन पण एका अटीवर. तिला ते कळू देता कामा नये. दुसरे असे की, ती मला भाकरी करताना दिसली पाहिजे. मी तिला पाठमोरीच पाहीन.' त्याच्या सांगण्यानुसार मुलगी पाहण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. मुलीने केलेली भाकर चांगली टम्म फुगलेली पाहून त्याने त्या मुलीचे रंग-रूप न पाहताच तिला होकार दिला. ती मुलगी होती हौशी![३] दया, कृपा, तारा, चिकी ह्या मुलीही अशाच लक्ष्मीबाईंच्या आश्रयाने घरगुती वळणात वाढल्या, गुणवंत झाल्या.

स्वत:ची पुरेशी ऐपत नसतानाही हौशीसारख्या कितीतरी मुलांना लक्ष्मीबाईंनी छत्र दिले. दुष्काळाच्या दिवसांत मिशनरींनी बावीस मुलांना घरी पाठवून देण्याचे सांगूनदेखील लक्ष्मीबाईंनी तिथेही ती उपाशीच राहतील, तेव्हा आपणच त्यांना सांभाळण्याची तयारी दर्शवली. त्यावेळी त्यांनी दत्तूलादेखील त्यांच्यातलाच एक असल्यासारखे वागवले.ती मुले डॉ.ह्यूम ह्यांनी व्यवस्था केलेल्या बोर्डिंगमध्ये जायला निघाली तेव्हा एका अमेरिकन माणसाने चेक पाठवून ह्या मुलांसाठी टिळकांना झालेले पाचशे रुपयांचे कर्ज फेडले होते.

लक्ष्मीबाई मिरजेला नर्सिंग शिकत होत्या तेव्हाची गोष्ट. एक दिवस घरच्या ओढीने त्या येऊन परत जात असताना बॅलेंटाईन साहेबांनी त्यांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन दहा रुपयांची नोट 'फूल नाही पण फुलाची पाकळी' म्हणून त्यांना देऊ केली असता ती घेण्याचे

त्यांनी नाकारले ह्यावरून कितीही हलाखीची परिस्थिती असली तरी आवश्यकतेपेक्षा अधिक मिळण्याची अपेक्षा त्यांनी कधी ठेवली नाही, असे दिसते.

माणसांखेरीज कुत्री, मांजरे, म्हशी, पोपट ह्यांसारख्या पाहुणेमंडळीचीदेखील सरबराई करण्यात लक्ष्मीबाईंना आनंद मिळायचा. सेवाभाव हा तर त्यांच्यामध्ये होताच. टिळकांच्या सहवासात त्यांना काही घरगुती औषधे माहीत झाली होती. त्यामुळे ज्या आजारी घरात गरज असेल तिथे कुणाच्याही आमंत्रणाची वाट न पाहता त्या जाऊन थडकत आणि सेवाशुश्रूषा करीत. त्यावेळी घरी आपण सांगून आलेलो नाही, ह्याचेही भान त्यांना राहत नसे. जातिपातीचा विचार तर त्यांना आता शिवतदेखील नसायचा.

लक्ष्मीबाईंच्या अशा उदात्त आणि उदार धोरणात एक आश्वासक सहजता होती. कुठेही कसला आव नव्हता किंवा बडेजावही नव्हता, हे जाणवल्याशिवाय राहत नाही. ह्याचे कारण टिळकांच्या पाठोपाठ त्यांनी फक्त धर्मांतर केले नव्हते तर, त्यांचे स्वभावांतरही त्यामुळे झाले होते. पूजापाठाच्या अवडंबरात गुंतून न राहता प्रत्यक्ष कृतिपाठच त्यांनी अगदी सहजपणे वेळोवेळी गिरवून दाखवला.

धर्मांतरानंतर टिळकांच्यासह आयुष्य जगताना लक्ष्मीबाईंसमोर पैशाअडक्याच्या अडचणी नव्हत्या असे नाही किंवा लक्ष्मीबाईंना तापदायक ठरणारा टिळकांचा संतापी स्वभाव आणि कळस गाठणारी परोपकारी वृत्ती लोप पावली होती असेही नाही. परंतु त्यांच्या संसाराचा गाडा आता पुष्कळसा सुरळीत चाललेला होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. टिळक ख्रिस्ती झाले होते तरी त्यांचा काही अन्यधर्मिय मित्रांशी स्नेह कायम होता. त्यातील एका मित्राला–केशवसुतांना त्यांनी नगरच्या मिशनच्या युनियन ट्रेनिंग कॉलेजमध्ये नोकरीला लावले होते.

पुढे बालकवीही तिथे शिकवायला होते. ख्रिस्ती समाजाच्या 'ज्ञानोदय'मध्ये केशवसुतादींच्या कविता प्रसिद्धही झाल्या आहेत. बालकवी तर टिळकदाम्पत्याचे मानसपुत्रच होते.

ख्रिस्ती झाल्यानंतर आणि पाच वर्षांनी लक्ष्मीबाई परत आल्यानंतर टिळकांच्या कामाचा व्याप अधिक वाढला. आयुष्यात अधिक स्थैर्य आले म्हणून वेगवेगळ्या प्रकारची कामे ते करू शकले. दुष्काळात धंदे बुडालेल्या लोकांना तगाई मिळवून देणे, कोणाला माग घेऊन देणे, कोणाला कपड्यांचे वाटप करणे अशी समाजोपयोगी कामे करताना टिळकांसोबत लक्ष्मीबाईंचाही सहभाग असे.

टिळकांचे व्यावहारिक ज्ञान शून्य असल्याची खात्री असल्यामुळे लक्ष्मीबाईंनी त्यांच्या खजिनदाराची भूमिका स्वत:कडे घेतली होती. टिळकांकडे स्वत:चा असा पैसा नव्हता. त्यांनी तो दारोदार जाऊन गोळा केलेला होता. नवऱ्याने अशा तऱ्हेने दुसऱ्यांसाठी पैसे गोळा करणे लक्ष्मीबाईंना मुळीच कमीपणाचे वाटले नाही. उलट त्याचे मोल त्यांना वाटल्यामुळे त्यांनी तो सांभाळण्याची जबाबदारी स्वत:हून स्वीकारली. टिळकांच्या हाती पैसा आला की, तो जाईल कसा ह्याची त्यांना काळजी असायची हा त्यांचा आतापर्यंतचा अनुभव त्याला कारणीभूत होता. 'लुगडी वाटपाच्या कामात काही बाया लुगडी बदलून परत परत लुगडे मागायला येतात' असे लक्षात आल्यावर टिळकांनी लक्ष्मीबाईंची नेमणूक त्याकामी केली. लक्ष्मीबाई त्या बाईचे जुने लुगडे ताब्यात घेऊन मग तिला नवे देत.

पहिल्या हिंदी वक्तृत्व समारंभासाठी वर्गणी गोळा करताना लक्ष्मीबाईंकडूनही वर्गणीची अपेक्षा टिळकांनी केली. लक्ष्मीबाईंनी पतीच्या वर्गणीतच आपली सामावली आहे असे म्हटल्यावर 'असे कसे? मी जेवल्यावर तुला जेवायला लागत नाही कां?' असे म्हणून टिळकांनी

त्यांना वेगळी वर्गणी देण्यास भाग पाडले. तेव्हा लक्ष्मीबाईंजवळ पैसे नव्हते म्हणून त्यांनी आचाऱ्याचे काम अंगावर घेऊन आपला सहभाग नोंदवला. अशा रीतीने टिळकांच्या बरोबरीने लक्ष्मीबाई परोपकाराच्या कामात त्यांना साथ देऊ लागल्या होत्या.

टिळकांनी १९००-०१ ह्या वर्षात 'ख्रिस्ती' नावाचे मासिक चालवले होते. त्याकामी त्यांना अंकांच्या घड्या घालणे, ते पोस्टात नेऊन टाकणे अशा सगळ्या कामांत लक्ष्मीबाईंनी बरोबरीने साथ दिली होती.

टिळकदाम्पत्याचे एकमेकांशी नाते पतिपत्नी एवढेच मर्यादित राहिले नाही. मित्राचे, गुरु-शिष्याचेही हे नाते होते. टिळकांनी लक्ष्मीबाईंना अक्षरओळख शिकवली. टिळकांनी कविता रचाव्यात आणि लक्ष्मीबाईंनी त्या गाव्यात इतके छान सूर त्यांचे जुळले होते. टिळकांनी लक्ष्मीबाईंना कविता कशी असावी-नसावी ह्याची अशी जाण दिली की, अध्यक्षपदावरून लक्ष्मीबाईंनी कवितेसंबंधी आपले विचार पुढे मुद्देसूदपणे मांडले. कीर्तनकलेत त्यांनी लक्ष्मीबाईंना असे तरबेज केले की, त्यातून लक्ष्मीबाईंना नावलौकिकासोबत मानधन मिळण्याचीही सोय झाली. वक्तृत्वासाठी आवश्यक आत्मविश्वास टिळकांनी त्यांच्यात असा निर्माण केला की, सभा अचंबित व्हावी. एवढेच काय पण टिळकांनी त्यांना पोहणेदेखील शिकवले होते. पती-पत्नीचे इतके वेगळ्या प्रकारचे नाते त्याकाळी शोधूनही सापडणे अशक्यप्राय होते. टिळक आणि आपल्या दोन विद्यार्थिनींबरोबर काढलेल्या फोटोखाली लक्ष्मीबाई लिहितात–'माझ्या शिष्यिणी व माझे गुरु.' (स्मृ.प्रस्ता.पृ.११)

पंडिता रमाबाई ह्यांनी १९०६मध्ये टिळकांचा 'भजनसंग्रह' प्रसिद्ध केला होता, त्यात एक भारूडवजा भजन आहे–

भूत जबर मोठे बाई ग । झालि झडपण करुं गत काइ ग

ह्या भारुडवजा भजनातील एक ओळ टिळकांनी तर दुसरी लक्ष्मीबाईंनी अशी समस्यापूर्ती करीत रचलेली आहे. कविवृत्तीच्या टिळक पती-पत्नीने केलेला हा एकत्र लेखनाचा प्रयोग भविष्यकाळी लक्ष्मीबाईंना टिळकांची ख्रिस्तायनपूर्ती करायला लावील ह्याची जणू नांदीच होता.

लक्ष्मीबाईंना आजारपण आले की, टिळकांच्या तोंडचे पाणी पळे. एका आजारपणात लक्ष्मीबाईंचे मनोरंजन करण्यासाठी म्हणून टिळकांनी ख्रिस्ती पार्श्वभूमी असलेली एक कथा उत्स्फूर्तपणे रचून सांगितली. पुढे 'सुशीला' हे शीर्षक असलेले त्यांचे जे कथाकाव्य गाजले, ते हेच.

अमेरिकन मिशनरी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मातृदिन/मायवार (मदर्स डे) साजरा करतात ही कल्पना मातृभक्त टिळकांना फारच आवडली. मराठी ख्रिस्ती समाजात हा विचार रूढ करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १४ मे १९१४साली टिळकांनी आपल्या पत्नीचा माता म्हणून पत्रातून गौरव करून मायवार साजरा केला होता:

...मातृपदावर विराजमान झालेल्या दिव्य विभूतीला–माझ्या भाग्यशालिनी पत्नीला मी हे पत्र लिहीत आहे... ह्या पदाचा माझ्या हातून चुकूनही अपमान होऊ नये म्हणून मला जपले पाहिजे, नाही तर ज्या परमेश्वराने परम प्रेमाने जगात ह्या पदाची स्थापना केली, त्याचा मजवर रोष होईल.[४]

'टिळक देवाला घाबरत आणि त्याखालोखाल मला घाबरत' हे लक्ष्मीबाईंनी लिहून ठेवलेच आहे. टिळक विक्षिप्त होते, संतापी होते, पण लक्ष्मीबाईंवर त्यांचे प्रेम होते, आणि ही गोष्ट लक्ष्मीबाई पूर्णपणे जाणून होत्या.

''वयाच्या ११व्या वर्षी मनीचं लग्न नारायण वामन टिळक नावाच्या विद्यार्थिवृत्तीच्या माणसाशी झालं. तो 'माणूस' होता, हाच

त्याचा आयुष्यभरातील सर्वांत मोठा विशेष.'[५] असे डॉ.सरोजिनी वैद्य ह्यांनी म्हटले ते किती सार्थ होते, ह्याचा प्रत्यय लक्ष्मीबाईंच्या ह्या आठवणी देतात.

टिळक तसे स्वभावाने गंभीर होते. काही वेळा त्यांचा मिस्कील स्वभाव डोके वर काढी पण लक्ष्मीबाई ह्या कायमच हसऱ्या आणि विनोद करणाऱ्या. आपल्या ह्या स्वभावाविषयी त्या लिहितात:

'ते विद्वान, मी विनोदी पण त्यांची विद्वत्ता माझ्या विनोदाच्या आड कधीच येत नसे. व माझा विनोद त्यांना कधी त्रास देत नसे.' (परिशिष्ट ५:पृ.५३)

'डेक्कन क्वीनच्या मागे एखादा खटारा बांधावा व ती आपल्या वेगात निघाली म्हणजे त्या खटाऱ्याची जी आदळआपट होईल, ती माझी होत असे. त्यांचा वेग मला मानवेल इतपत असला व मला त्यांची ध्येये पटवून घेण्यास अवसर मिळाला, की मग मात्र आमचे गाडे सुरळीत चाले.' असे कबूल करून 'इंजिनाच्या अंगी असलेली स्वयंशक्ती, ती टिळकांच्या अंगी होती तर, त्या इंजिनाने दिलेला वेग, तो माझ्या अंगी असे. एकदा रुळावर माझी गाडी लागली की, मग मात्र ती कोणाला थांबवता यायची नाही.' (स्मृ. परिशिष्टे ४: पृ.४५) इतक्या नेमक्या शब्दांत लक्ष्मीबाईंनी आपले संसारचित्र वाचकांच्यापुढे उभे केलेले आहे.

The last letter says that Mrs. Tilak is asking, ``When may I be baptised? ``To me to live is my husband and to die before him is glory."  This was the religion of a faithful Brahmin wife-Mrs.Tilak. - May 1900[५]

मिस.हॅर्टा ब्रूस ह्यांनी लिहिलेल्या लक्ष्मीबाईंच्या अप्रकाशित

हस्तलिखित चरित्रामधील वरील मजकूर लक्ष्मीबाईंच्या भारतीय पतिव्रतेच्या मानसिकतेचे प्रतिनिधित्व करतो.

■

---

१. नवा करार: मत्तय २५: ३५-४०

२. जुना करार: स्तोत्रसंहिता : १:३

३. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृती कोश, पृ.२३३

४. जरा वेगळा अँगल-अ.दे.टिळक, पृ.१४

५. स्मृ.परिशिष्ट ५:पृ.८३९

## सेवाभाव

लक्ष्मीबाईंचा स्वभाव मुळातच दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचा होता. स्वत:हून कोणालाही मदत करण्याची त्यांची आवड उपजत होती. ख्रिस्ती धर्मातील सेवा ह्या प्रधान तत्त्वाने त्यांना आणखी सेवादक्ष केले. टिळकांच्या बरोबरीने प्लेगच्या साथीत रोग्यांची सेवा करताना लक्ष्मीबाईंना आपल्या नर्सिंगच्या ज्ञानाचा उपयोग समाजसेवेसाठी करता आला. ह्या ज्ञानाच्या जोडीला भक्तीचीही जोड त्यांनी दिलेली दिसते. प्लेग झालेल्या ताराला पंधराव्या दिवशी मांडीवरून खाली उतरवून शेवटचा उपाय म्हणून जवसाच्या पिठाचे पोटीस बांधण्याचा उपचार त्यांनी केला, तिला ब्लँकेटमध्ये गुंडाळले आणि त्या म्हणाल्या, 'आता खुशाल मर. तुझ्यासाठी काही केलं नाही असं मला वाटायला नको.' नंतर रानात जाऊन टाहो फोडून तिच्या आरोग्यासाठी येशूला विनवले आणि म्हटले, 'ती जगली तर इथेच राहून रोग्यांची सेवा करीन.'

नाशिकच्या 'हरिजन सेवा संघा'तील कामात लक्ष्मीबाईंनी स्वत:ला झोकून दिले होते. त्यांची वस्ती साफ करणे, मुला-मुलींना न्हाऊ घालणे, त्यांना शिकवणे ह्या गोष्टी एकेकाळी कडक सोवळे पाळणाऱ्या लक्ष्मीबाईंनी मनापासून केल्या. तेथील मुले आपल्याला त्यांच्याविषयी वाटणारा आदर 'आजाबाया' ह्या संबोधनातून व्यक्त करीत. नाशिकमध्ये लक्ष्मीबाईंना 'आई', 'मावशी', 'आजीबाई' म्हणणारी बरीच मंडळी होती. मुलांनी 'आजीबाई' ह्या शब्दाचे 'आजाबाया' हे आदरार्थी रूप केले होते.

कठीण प्रसंगाला खंबीरपणे सामोऱ्या जाणाऱ्या लक्ष्मीबाईंमध्ये देवाला नवस करणारी, तो इमानेइतबारे फेडणारी भारतीय स्त्री धर्मांतरानंतरही पुन्हा एकदा दिसून येते. पण आता तिचे देवाकडे मागणे स्वत:साठी नसून दुसऱ्यासाठी असलेले दिसते.

आपल्या राहत्या घराच्या मागे असलेल्या मांग वस्तीत संडासाची सोय आवश्यक असल्याचे लक्षात आल्यावर लक्ष्मीबाईंनी ह्या प्रश्नी स्वत: लक्ष घालायचे ठरवले. नाशिक म्युनिसिपालिटीत कौन्सिलर असलेले दलित नेते आणि आपले मानसपुत्र भाऊराव गायकवाड ह्यांच्याकडे त्यांनी लकडा लावला. ते भेटतील तिथे 'मांग लोकांच्या संडासाचे काय केलेस?' म्हणून विचारून त्यांनी त्यांना इतके भंडावून सोडले की, भाऊराव लक्ष्मीबाईंच्या घरी जाण्याचे टाळू लागले. पायखान्याचा प्रश्न सुटला तेव्हा कुठे लक्ष्मीबाई स्वस्थ बसल्या. 'वर्षभर हरिजनांकडे बघायचे नाही, फक्त वर्षातून एक दिवस हरिजनदिनानिमित्त त्यांची दखल घ्यायची म्हणजे दिव्यांची अवस साजरी करण्यासारखे[१] असते', असे लक्ष्मीबाईंचे मत होते.

भाऊराव गायकवाड म्हणजे दलित सुधारकांचे पहिल्या फळीतील डॉ. आंबेडकरांचे महत्त्वाचे अनुयायी आणि अतिशय निकटचे सहकारी. पुढे दादासाहेब म्हणून ते लोकांना अधिक परिचित झाले. लक्ष्मीबाईंच्या मुलाचे–देवदत्तांचे ते मित्र. मित्रदेखील असे की, देवदत्तांपेक्षा ते तब्बल अकरा वर्षांनी लहान. त्यातही ते टिळककुटुंबाच्या पूर्व जाती-धर्माचेही नव्हते. उच्च वर्णीयांकडून दिली जाणारी पराकोटीची हीन, तुच्छ वागणूक गुमान सहन करणाऱ्या दलितांपैकी ते एक होते. अशा समाजातल्या एका तरुणाला 'आपल्या मुलासारखे मानणे' नव्हे तर, 'आपला मुलगाच मानणे' ही फार मोठी गोष्ट होती. सुधारक मते असलेल्या आपल्या पतीच्या सहवासात त्यांचे अनुकरण करत वैवाहिक जीवनाची वाटचाल करणाऱ्या लक्ष्मीबाईंना भंगिणीच्या हातचा फराळ खाणाऱ्या टिळकांनी 'तू तर माझ्याही पुढे गेलीस' असे म्हटले होते. इथे तर लक्ष्मीबाई तत्कालीन समाजसुधारकांच्याही एक पाऊल पुढे गेलेल्या दिसतात.

त्याकाळी दलितांच्या बाजूने उभे राहणे, त्यांच्या न्याय्य मागण्यांना

जाहीर पाठिंबा 'एकट्या बाईमाणसा'ने देणे म्हणजे केवढे धैर्याचे पाऊल होते! इथे एक मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे की, कुणीही लक्ष्मीबाईंवर आपले विचार लादले नव्हते–लादू शकतही नव्हते. त्यांच्या त्या स्वतंत्र आणि मुख्यत्यार होत्या. सोवळ्याच्या सनातनी जोखडाखाली वावरलेल्या लक्ष्मीबाई टिळकांसारख्या अशिक्षित बाई धर्मांतर केलेल्या नवऱ्याच्या पश्चात्‌देखील असे पाऊल स्वत:हून उचलत गेल्या ते केवळ ख्रिस्ताच्या शिकवणुकीतील 'माणुसकी, बंधुता, समता, शेजाऱ्यावर प्रेम करा' ह्या संदेशाच्या बळामुळेच! येवल्याचे डॉ.विष्णू भट ह्यांच्या पत्नी आणि पेंडसे ह्यांची नात येसूबाई भट सांगतात:

मावशींचे सोवळे ओवळे फार कडक असे. एकदा वाईस का महाबळेश्वरला त्यांना मुसलमानाच्या हातचे पाणी प्यावे लागले होते. त्या पाणी प्याल्या आणि मग ओकल्या. फार ओकल्या. नंतर त्या टिळकांना म्हणाल्या, ''आज माझ्या पोटातलं सारं ब्राह्मण्य ओकून पडलं!'' (स्मृ.पृ.२९३)

दत्तूच्या जन्मानंतर लक्ष्मीबाईंना असह्य पोटदुखीची सुरुवात झाली होती, ती पुढे आयुष्यभर त्यांना छळत राहिली. दुसऱ्याकडून सेवा करवून घेण्याइतपत स्वत:च्या आजारपणाचे स्तोम लक्ष्मीबाईंनी कधी माजवले नाही. हरिजन वस्तीत शिकवत असताना पोटदुखीचा त्रास उद्‌भवला तर मुले त्यांना तिथेच खाट टाकून त्यावर झोपवत. खाटेखाली निखाऱ्यांचा तवा ठेवत. लहान-मोठे विद्यार्थिगण खाटेभोवती बसून धडे गिरवत.

'हरिजनांना समान हक्क प्राप्त होतील तो दिवस हिंदुस्थानच्या भाग्याचा दिवस असेल, तो सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा असेल' असे लक्ष्मीबाईंचे मत असल्याचे नांदूरच्या दगडू गंगाराम रोकडे नावाच्या शीघ्रकवीने लिहून ठेवले आहे. (स्मृ.४: पृ.१००) एकेकाळी कडक सोवळे पाळणाऱ्या लक्ष्मीबाईंमध्ये हा केवढा मोठा बदल झालेला होता!

नाशिकच्या राममंदिर सत्याग्रहास पुढे अतिशय उग्र स्वरूप येऊन मंदिर आतून कुलुपबंद झाले तेव्हा 'पतितपावन'च्या अंकात लक्ष्मीबाईंनी आपल्या कवितेने निषेध नोंदवला होता (७ मार्च १९३१)

डॉ. आंबेडकरांच्या हिंदूधर्मत्यागाच्या घोषणेनंतर काही हरिजन मंडळींनी लक्ष्मीबाईंकडे येऊन ते आता ख्रिस्ती होणार असल्याचे सांगितले. लक्ष्मीबाईंनी त्यांना कारण विचारले असता 'हिंदूंची खोड मोडायला' असे उत्तर त्यांनी दिले. त्यावर लक्ष्मीबाई त्यांना म्हणाल्या, 'अस्सं, मग माझं ऐका. तुम्ही ख्रिस्ती होऊ नका. कारण ख्रिस्ती झाल्यावर तुम्हाला सूड, द्वेष असलं काही करता येणार नाही. ख्रिस्ताची ती शिकवण नाही. दया, प्रेम व त्याग ही ख्रिस्ताची शिकवण आहे.(स्मृ.४:पृ. १३६)

बहुसंख्य हरिजन ख्रिस्ती होत आहेत म्हटल्यावर त्यांना प्रोत्साहन देऊन लक्ष्मीबाई ख्रिस्ती जनसंख्या वाढवण्याचे श्रेय घेऊ शकल्या असत्या. पण त्यांनी तसे केले नाही. दलितसमाजाबद्दल कितीही आत्मीयता असली तरी लक्ष्मीबाईंनी त्यांना नामधारी ख्रिस्ती होण्यास विरोध केला. कारण लक्ष्मीबाईंना ख्रिस्ती धर्म मनातून आणि मनापासून पटला होता आणि तो त्यांनी विचारपूर्वक स्वीकारला होता, हेच ह्यावरून सिद्ध होते.

परिचिताच्या आजारपणाची बातमी मिळताच लक्ष्मीबाई मदतीसाठी धावून जाताना वेळ, काळ, अंतर किंवा स्वत:च्या प्रकृतीचीही तमा बाळगत नसत. रोगी रोगमुक्त होईपर्यंत जणू सर्व जबाबदारी त्यांच्या शिरावर होती. एखाद्या औषधाचा शेकडा एक गुण आला तर त्याला ९० गुणांचे श्रेय देण्याची लक्ष्मीबाईंची सवय तिथेच थांबत नव्हती तर पुढे त्या औषधाचे प्रयोग घरी-दारी एखादा गोड खाऊ वाटावा तसा अत्यंत आग्रहपूर्वक व्हायचा.

आईची प्रकृती लक्षात घेऊन एखाद्या अडलेल्या व्यक्तीच्या मदतीसाठी देवदत्तांनी परस्पर नकार दिला तर स्वत:हून निर्णय घेऊन

त्यांच्या नकळत सेवेसाठी त्या निघत आणि देवदत्तांचा रोष ओढवून घेत. लक्ष्मीबाईंची समाजसेवा ही फक्त सुधारणांपुरती नव्हती किंवा रोग्यापुरती मर्यादित नव्हती. 'वर्तमानपत्रात आलेले सिनेमाच्या जाहिरातीचे कात्रण त्या अमुक व्यक्तीकडे पेपरवाल्याला टाक म्हटले तर टाकत नाही' म्हणून ते कात्रण द्यायला लक्ष्मीबाई भरदुपारी रणरणत्या उन्हात अधूनमधून रस्त्यावरच्या झाडाच्या सावलीचा आधार घेत 'त्या अमुक' व्यक्तीच्या घरी जायच्या. लक्ष्मीबाईंची ही विनामोबदला सेवा फक्त परिचितांसाठी होती असे नाही. ओळखीचा असो-नसो, त्यांचा हात मदतीसाठी कायम पुढे असे. तो गरजू आहे, एवढीच त्याची ओळख त्यांना पुरेशी असे. मग त्याची गरज कसलीही असो.

आपल्या परिचितांकडून लक्ष्मीबाई जुने कपडे गोळा करून भंगीवस्तीत नेत. तिथल्यांची अंगे झाकण्याचे काम करून त्यांनी एक वेगळी समाजसेवा केली.

लक्ष्मीबाई टिळक हे असे व्यक्तिमत्त्व होते की, त्यांनी चार-पाच पद्धतीच्या संस्कृती फार जवळून पाहिल्या आणि अनुभवल्याही होत्या.

एक: कडक सोवळे पाळणारी ब्राह्मणी संस्कृती, दोन: ब्राह्मणांतून ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या लोकांची संस्कृती, तीन: नव्याने धर्मांतरित झालेल्या मागासवर्गीय समाजाची संस्कृती, चार: अठरापगड जातींतून ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या समाजाची संस्कृती आणि पाच: उच्चवर्णीयांनी वर्षानुवर्षे वेठीस धरलेल्या हरिजन समाजाची संस्कृती.

ह्या सर्व संस्कृतींमधील अधिक-उणे अनुभवून योग्यायोग्यतेचा विचार करण्याइतकी प्रगल्भता लक्ष्मीबाईंनी स्वबळावर प्राप्त तर केली होतीच शिवाय लोकापवादाची तमा न बाळगता आपल्याला हवी तशी, शक्य होईल तशी सेवा त्यांनी गरजूंसाठी स्वत:हून कृतीतून आणि लेखनातून दिली, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

टिळकांशी लग्न झाल्यानंतरच्या दिवसांतली एक आठवण सांगताना येसूबाई भट सांगतात, टिळकांनी दोन माकड्या[२] घरात पाळल्या होत्या. त्या दोघींना ते रोज आंघोळ घालत. त्यांच्या हातात बांगड्या, कपाळाला कुंकू, खणाचे परकर-चोळ्या अशा थाटात त्यांना ठेवत. त्या दोघींना आणि लक्ष्मीबाईंना घरात ठेवून घराला बाहेरून कुलूप लावून ते चावी आत टाकायचे आणि खुशाल बाहेर निघून जायचे.[३]

आपल्याला त्रास देणाऱ्या त्या माकड्यांचा लक्ष्मीबाईंनी कसा बंदोबस्त केला किंवा त्यांना आपल्या बाजूने वळवले की काय हे, समजायला मार्ग नाही. टिळकांच्या जगावेगळ्या ह्या अत्यंत विक्षिप्त कृतीसंबंधी 'स्मृतिचित्रे'मध्ये लक्ष्मीबाईंनी मौन पाळले आहे. लक्ष्मीबाईंना एकूणच प्राणिमात्रांविषयी उदंड कळवळा होता, हे त्यांच्या पुढच्या आयुष्यातल्या घटनांवरून कळते.

लक्ष्मीबाईंनी धोरणीपणाने म्हशी दूधविक्रीच्या धंद्यासाठी आणि कोंबड्या अंड्यांसाठी उपयुक्त म्हणून पाळल्या होत्या तरी पोपट, चंपी-ब्लॅकी हे श्वानदाम्पत्य आणि त्यांची चार पिल्ले अशीही काही मंडळी त्यांच्या घरी होती. ब्लॅकीची सेवा तर त्यांनी कुटुंबातल्या एखाद्या सदस्याची करावी तशी केली–अगदी त्याच्या डोळ्यात औषध घालणे, त्याला शेक देणे, त्याच्या अंगाला औषध चोळणे वगैरे त्यांनी मोठ्या प्रेमाने केले. स्वभावाने फटकळ आणि भांडखोरात गणना केल्या गेलेल्या लक्ष्मीबाईंच्या दयाळू स्वभावाचे आणि सेवाभावाचे दर्शन 'स्मृतिचित्रे' घडवतात.

■

—

१. अवसेला दिवे लख्ख करण्यासारखे

२. माकड्या-माकडिणी

३. स्मृ.परिशिष्ट ५:५३

## प्रसंगावधानता आणि उत्साह

लक्ष्मीबाई मुळातच काहीशा धीट, बंडखोर प्रवृत्तीच्या आणि प्रसंगावधान राखून वागणाऱ्या होत्या. टिळकांनी श्राद्धाला आंधळे–पांगळे–गरीब भुकेले ह्यांनाच जेवू घालण्याचा घाट घातला होता, त्याला लक्ष्मीबाईंचा सुरुवातीला विरोध होता. शेवटी त्यांनीच सुवर्णमध्य काढला. टिळकांची मंडळी बाहेर आपली आत असा तोडगा काढून हुशारीने परिस्थिती हाताळली होती.

आपल्या चौथ्या अपत्याच्यावेळी त्या राजनांदगावला होत्या. नवजात बाळाच्या पोटावर शंभर टोचे मारण्याच्या तिथल्या प्रथेला त्यांनी ठाम विरोध केला होता.

राजनांदगावला असताना लक्ष्मीबाईंना मुलगा झाला. दिसायला तो टिळकांच्या धाकट्या भावासारख्या–माधव (लक्ष्मीबाईंच्या सांगण्यानुसार महादेव)सारखा होता म्हणून त्याचे नावही माधवच ठेवण्यात आले होते. आकडीचा रोग होऊन तो मरण पावला. त्याचा मृत्यू लक्ष्मीबाईंच्या मांडीवरच झाला. प्रत्यक्ष आपल्या पोटचा गोळा आपल्या मांडीवर गेला हे कळूनसुद्धा लक्ष्मीबाईंनी टाहो न फोडता त्याला आधी खाली उतरवले आणि नंतर 'तो कसे तरी करतो आहे' हे आत्याबाईंच्या कानावर घातले, ते एवढ्याचसाठी की, 'आत्याबाईंनी विटाळचंडाळाच्या भानगडी उपस्थित करू नयेत, केल्या तर तशा परिस्थितीत टिळकांशी आत्याबाईंचे भांडण होण्याची शक्यता होती.' दुसऱ्यांदा झालेले पुत्रवियोगाचे दु:ख बाजूला सारून वर्तमानाचे आणि भविष्यकाळाचे भान राखून परिस्थिती हाताळण्याचे लक्ष्मीबाईंचे कौशल्य इथे आपल्याला दिसते.

वैधव्य आल्यानंतर मुंबईत मेट्रन म्हणून मुलींच्या वसतिगृहावर

काम करत असताना मुली गोत्यात येऊ नयेत म्हणून त्यांना येणारी पत्रे न देणे किंवा त्याविषयी वरिष्ठांकडे वाच्यता न करणे, मुलींच्या कागाळ्या वरिष्ठांपर्यंत जाऊ न देणे अशा किती तरी गोष्टी नुसत्या वडीलकीच्या नात्याने असे नव्हे तर, मुली आपल्याशी कितीही वाईट वागल्या तरी त्यांच्या वर्तमान-भविष्याचा विचार धोरणीपणाने करून मायेने त्यांचे अपराध पोटात घालून त्यांना सांभाळणारी लक्ष्मीबाईंमधली आई-आजी आपल्याला दिसते.

ऑपरेशनसाठी निघालेल्या लक्ष्मीबाई मुळीच विचलित होत नाहीत. आपल्या तोंडावर पांढरी चादर घातली जात असताना आपल्या खेळकर आणि खोडकर स्वभावानुसार हसत हसत म्हणतात, ''पांघरुण भित्र्या माणसासाठी असते, मी तर खंबीर मनाची आहे.'' अशा प्रकारे आपल्यासाठी काळजीत असणाऱ्यांची काळजी दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो.

इन्फ्लुएन्झा झालेल्या लक्ष्मीबाईंना नाशिकला घेऊन येण्यासाठी देवदत्तांनी आपल्या मुलाला–नानाला जळगावला पाठवले. घरी आल्याबरोबर लक्ष्मीबाई शक्य तितक्या सगळ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना भेटून आल्या. ''तू तापातून उठलीस, दमलीस, काही दिवस आराम कर, 'ख्रिस्तायना'चे लेखन थांबव थोडे दिवस.'' असे देवदत्तांनी काळजीपोटी आईला परोपरीने सांगितले. पण त्यांचे न ऐकता सोपानदेव चौधरी मुंबईला रेकॉर्डिंगसाठी गेले म्हटल्यावर त्यांच्या कुटुंबाच्या सोबतीला लक्ष्मीबाई तिकडे वस्तीला जाऊन राहिल्या. त्यांच्यासोबत मुलेही गप्पा मारायला म्हणून गेली. ती परत येऊन सांगू लागली, ''आजीबाई धर्मात्मा पाहायला गेल्या.'' त्यांना थांबवण्यासाठी देवदत्तांनी मुलाला पिटाळले पण त्याची आणि लक्ष्मीबाईंची काही भेट झाली नाही. देवदत्तांनी दोन दिवसांच्या अबोल्यानंतर बोलणे सुरू केले तेव्हा

## 'सौभाग्य लयाला गेले...'

'ख्रिस्तायन' हे महाकाव्य लिहिण्याचे टिळकांचे स्वप्न पूर्णत्वाला जावे म्हणून त्यांची सोय ह्यूमसाहेबांनी साताऱ्यास केली. तिथे राहायला आल्यावर टिळकांनी प्रामाणिकपणे 'ख्रिस्तायना'च्या लेखनाला प्रारंभदेखील केला. साडेदहा अध्याय लिहून होतात न होतात तोच त्यांचे मूळव्याधीचे दुखणे जास्तच त्रासदायक ठरू लागले. डॉक्टरांचे म्हणणे होते, टिळकांनी ऑपरेशन करवून घेऊ नये, टिळकांना वाटत होते, आपल्याला खूप कामे अजून करायची आहेत, त्यासाठी लवकर ह्यातून बरे व्हायला ऑपरेशन हाच मार्ग आहे, म्हणून जे.जे.हॉस्पिटलमध्ये ऑपरेशनसाठी ते मुंबईत आले. भायखळा स्टेशनवर उतरलेल्या टिळकांना न्यायला जे.जे.हॉस्पिटलमधून स्ट्रेचरची सोय करण्यात आली होती. पण टिळक हट्टाने पायीच गेले. ९ मे १९१९ रोजी हॉस्पिटलमधून बाहेर पडताना मात्र चौघांच्या खांद्यावरून बाहेर पडले. टिळकांनी लक्ष्मीबाईंना म्हटले होते, ''१९१९ साल हे लक्षात ठेवण्यासारखे होणार आहे''. टिळकांचे हेही भाकीत खरे ठरले.

पतीच्या मृत्युनंतर पत्नीने घराबाहेर पडायचे ते सरणावर चढून मरण्यासाठी नाहीतर केशवपन करून, अलवाण नेसून, अळणी जेवण खाऊन, घरात आश्रितासारखे राहून, मरमरेस्तोवर कष्ट करीत दिवसागणिक मरायचे. अशा काळात आपल्या पतीच्या अंत्ययात्रेत लक्ष्मीबाई सर्वात पुढे चालतात, पतीचे आवडते गीत गातात, हा प्रसंगच लोकदृष्टीने फार विरळा होता. वैधव्य आल्यानंतर स्त्रीला अनुभवावी लागलेली शापितासारखी वागणूक, मानहानी, अवहेलना लक्ष्मीबाईंनी आसपासच्या स्त्रियांबाबत पूर्वधर्मात पाहिली होती. ख्रिस्ती धर्माच्या स्वीकारामुळे लक्ष्मीबाईंच्या वाट्याला ते भोग आले नाहीत. वैधव्य हा

शाप नाही, विधवांना विशेष आत्मीयतेने, आदराने वागवले जाण्याचा संस्कार त्यांना येशू ख्रिस्ताच्या आणि संत पॉलच्या शिकवणीतून कळलाच होता. मृत्यू हा प्रत्येकाच्या वाट्याला येतो, 'देवाने दिले, देवानेच नेले' त्यामुळे मृत्यूचे भय ते कशाला बाळगायचे? दु:ख देणाराच दु:खनिवारण्यास समर्थ आहे, ह्याची खात्री त्यांच्या मनाला होती.

'अविनाशी सुख ते मज पामराला,
प्रभु देइ तर शोक करू मी कशाला?'[१] कृष्ण रत्न सांगळे ह्यांच्या गीतातील ही वरील भावना लक्ष्मीबाई स्वत: अनुभवत होत्या म्हणूनच टिळकांची अंत्ययात्रा निघाली तेव्हा लक्ष्मीबाई सर्वात पुढे हातात टाळ घेऊन देवाच्या भक्ताची निर्भयता व्यक्त करणारे टिळकांचे आवडते भजन गात चालल्या होत्या.

भय काय तया प्रभू ज्याचा रे।। ध्रु.।।
सर्व विसरली प्रभुमय झाली पूर्ण जयाची वाचा रे ।।
जगात विचरे उपकारास्तव परि नच तो जगताचा रे ।।
येथे निर्धन परत्र ज्याचा सर्व धनांचा साचा रे ।।
देह तयाचा परंतु आत्मा त्यात वसे ख्रिस्ताचा रे।।
आधिव्याधी मरणावरती पाय अशा पुरुषाचा रे ।।[२]

'ज्ञानोदय'चे व्यवस्थापक आणि 'टिळकांची कविता भाग एक व दोन' चे संपादक रेव्ह. भास्करराव उजगरे ह्यांचे थोरले बंधू मनोहरराव ह्यांनी पुढच्या सगळ्या सोपस्काराचा भार उचलला. टिळकांच्या इच्छेनुसार त्यांचे दहन झाल्यावर त्यांच्या अस्थींचे दफन नगरला अमेरिकन मिशनच्या कबरस्तानात करण्यात आले. नगरच्या ईश्वरविद्येच्या वर्गात आपले व डॉ.ह्यूम ह्यांचे छायाचित्र लावून डॉ. ह्यूम ह्यांच्या छायाचित्राखाली 'ह्याने' व आपल्या छायाचित्राखाली 'ह्याला सांभाळले' असे लिहावे अशी इच्छा टिळकांनी लिहून ठेवली होती.

टिळकांच्या मृत्युनंतर पंडिता रमाबाईंनी लक्ष्मीबाईंना आपल्याकडे महिनाभर राहण्यास बोलावले होते. त्याप्रमाणे लक्ष्मीबाई तिथे जाऊन राहिल्या होत्या. तिथून त्यांना अचानक साताऱ्याला जावे लागले तेव्हा पंडिता रमाबाईंनी त्यांची प्रथेनुसार रीतसर पाठवणी केली होती.

टिळकांचा मृत्यू हा संपूर्ण ख्रिस्ती समाजासाठी एक फार मोठा आघात होता. मग प्रत्यक्ष लक्ष्मीबाईंची मन:स्थिती कशी झाली असेल त्याची कल्पना येऊ शकते. टिळकांच्या धर्मांतराची बातमी ऐकल्यावर त्यांनी टिळकांविषयीची आपली भावना कवितेतून व्यक्त केली होती, तशी आताही आपली मन:स्थिती व्यक्त केलेली दिसते–

श्रीमती नाव मज आले सौभाग्य लयाला गेले
हा टिळक तिलक राष्ट्राचा
तो नव्हता तुज अबलेचा बोलतां पूर अश्रूंचा
अश्रूंनी त्यास न्हाणीले सौभाग्य लयाला गेले...

काव्यवृक्ष हा फुललेला। कितिकांनी हालविलेला
तरी बहर कमी नच झाला। अधिकाधिक देइ फळाला
मी वेचिता ताजी सुमनें। ती गुंफित आनंदाने
तों कसले वादळ सुटले ग्रीष्माचे काळिज फुटले
हा। हाय। काय हे झाले। सौभाग्य लयाला गेले...
तो प्रेमळ मित्रचि माझा कवि उद्यानांतील राजा
सांभाळ करुनिया माझा जगती मज उंचावीले
सौभाग्य लयाला गेले...
ते अश्रु काय प्रेमाचे। बापाचे काय कवीचे
हे कळले नाही लोका। ते अश्रु खरे कोणाचे

वात्सल्य खरे बापाचे। कविहृदयी येऊन साचे
प्रेमाचे फोडुनि पाट वत्सलता काढी वाट
रसिकांते सावध केले, सौभाग्य लयाला गेले...

टिळकांच्या निधनानंतर लक्ष्मीबाईंनी नोंदलेली एक प्रतिक्रिया अशी:
'ते रोज सकाळी म्हणत ती भूपाळी मला आठवली–

उठ उठ माझ्या जिवा वंदुनि
दिनरजनीच्या धवां
आयुर्मार्गी आक्रम नवा
कर, गौरव देवाच्या नावा'[३]

टिळकांचे जाणे हे सर्वांसाठी अकल्पितच होते. टिळक गेल्यानंतर लक्ष्मीबाईंच्या आयुष्याने पुन्हा एकदा वेगळे वळण घेतले. लक्ष्मीबाईंनी अनेक निर्णय टिळकांच्या हयातीत, त्यांच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या गैरहजेरीत स्वत:हून एकटीने घेतले होते आता तर टिळकांची अनुपस्थिती कायमची असणार होती, ह्याचे भान त्यांना आले होते.

टिळकांच्या हयातीत दत्तूचा विवाह झाला होता. टिळक एकदा म्हणाले होते, 'मी जाईन तेव्हा तुम्हाला कुणाचे देणे द्यावे लागेल अशी परिस्थिती निश्चितच नसेल. एक महिनाभर तुम्हांला दु:खात बसून खायला तो देईल. पुढे मात्र तुमचे तुम्ही पाहून घेतले पाहिजे. एक महिना दु:खाला पुरे झाला.'

टिळक म्हणाले होते, तसेच घडले. त्यांनी केलेली बेगमी एक महिना पुरली. शिक्षणाचा किंवा प्रशिक्षणाचा दाखला नसल्यामुळे लक्ष्मीबाईंनी कोंबड्या पाळणे, म्हशी पाळून त्यांच्या दुधाच्या विक्रीचा व्यवसाय करणे अशा गोष्टी पूर्वी केल्या होत्या. कीर्तनाचे दौरे करून त्यातही त्यांनी मानधन कमावले होते परंतु ते कितीसे पुरणार होते, शिवाय तो काही व्यवसाय म्हणून नेमाने करता येण्यासारखा नव्हता.

पतिनिधनानंतर भायखळ्यात मिशनचे असलेल्या मुलींच्या वसतिगृहाच्या अधिक्षिका म्हणून पंचेचाळीस रुपये पगारावर लक्ष्मीबाईंची नेमणूक मिसेस एमिली बिसेल ह्यांनी केली.

इथे त्यांना सहकुटुंब राहता येण्याची सोय होती. १९२० सालच्या ऑगस्टमध्ये घडलेल्या सागरकिनारीच्या सहलीत वसतिगृहातील अकरा मुली आणि एक लहान मुलगा असे बारा जण बुडाले होते. लक्ष्मीबाईंनी केलेली ती पहिली आणि शेवटची नोकरी.

नंतर कराचीला काही काळ राहून लक्ष्मीबाई नाशिकला आल्या. एकदा नातवंडांना घेऊन रस्त्याने जात असता नाना पडला, रडू लागला म्हणून त्याला घेऊन त्या एका झाडाखाली बसल्या. तिथे बसून त्यांनी आता देवाने इथेच आपल्याला घरदार देऊन स्थिर करावे म्हणून त्याला विनवले. बसल्या जागेवरच आपले घर असल्याचे स्वप्न त्या पाहू लागल्या. ज्या जागेवर त्यांनी प्रार्थना केली, ती जागा होती गोल्फ क्लबची. तिथे घर उभे राहणे कदापि शक्य नव्हते.

लक्ष्मीबाईंची प्रार्थना देवाने ऐकली आणि दत्तूने घर बांधण्यासाठी जी जागा घेतली होती, ती तीच निघाली! घराचा पाया रचताना त्यांनी टिळकांच्या ‘ख्रिस्तायन’ची प्रत तिथे बायबलसह ठेवली आणि त्यांचे ‘शांतिसदन’ उभे राहिले. त्या घरात पुढे त्यांची नातवंडे, पणतवंडे नांदली. आग्रा रोडवर बसस्टँडजवळ असलेल्या त्यांच्या ह्या घराच्या जागी आता अपार्टमेंट उभे आहे.

■

---

१. उपासनासंगीत गीत क्र.६३५

२. उपासनासंगीत गीत क्र.३०४

३.‘माझ्या ओळखीच्या लक्ष्मीबाई’ ,शांता शेळके, महाराष्ट्र टाइम्स रविवार पुरवणी ७-७-१९६८, पृ.३

सूर्योदय झाला की, लक्ष्मीबाईंच्या कामांना सुरुवात होई. दिवसाचे बाराचे बारा तास कामासाठी उपयोगात आलेच पाहिजेत असा त्यांनी स्वत:पुरता दंडक घालून घेतला होता. त्यांनी एकेकाळी म्हटल्याप्रमाणे 'माझ्या मागे काम धावत होते आणि पुढे पोट धावत होते' अशी स्थिती उतारवयात नव्हती तरी कामात गुंतून राहणे त्यांच्या अंगवळणी पडले होते. आपल्या आयुष्यातला अखेरचा सूर्यास्त पाहण्यापूर्वी 'ख्रिस्तायन' पूर्णत्वाला नेण्याची त्यांची जिद्द होती. त्यासाठीही त्यांची घाई चालली होती.

त्यांचे हार्ट वीक झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. इन्टेस्टाईनल ऑबस्ट्रक्शन असल्यामुळे ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले होते. त्यावेळी त्यांच्या कानावर ही गोष्ट कशी घालावी असा प्रश्न सगळ्यांच्यापुढे उभा होता. पण देवदत्तांनी त्यांना हे सांगितल्यावर हार्ट वीक असलेल्या धीराच्या लक्ष्मीबाईंनी ताबडतोब त्याला संमती देऊन त्यांच्यासाठी चिंतित असणाऱ्यांची काळजी दूर केली होती.

'स्मृतिचित्रे'च्या प्रकाशनावेळी त्यांचे नातू अशोक टिळक ह्यांनी त्यावेळच्या आपल्या बालसुलभ बुद्धीने विचारले होते, ''आजी, तुम्ही आता (इतक्या मोठ्या समारंभप्रसंगी) मेलात तर मजा होईल!'' ह्यावर आजीसकट सगळी मंडळी दिलखुलास हसली होती. संपूर्ण समारंभात लग्न आणि मरण अशा समारंभाचे उल्लेख अनेकवार झालेले पाहून देवदत्त आणि पाटणकर दोघेही चमकले होते. कधी कधी काळ अशा चाहुली देत असतो पण आपल्यालाच त्याचा नीटसा बोध होत नसतो.

'आत्मा आणि कुडी ह्यांचा झगडा' चालू असल्याचे लक्ष्मीबाई

बोलून दाखवत होत्या. सांसारिक मोहजाळात आता त्यांचे मन रमेनासे झाले होते.  संन्यास घेण्याची ओढ तुकारामांच्या घरात थोरल्या बंधूला आणि त्यांच्या पाठोपाठ तुकारामांना लागली होती. तशीच ओढ टिळक घराण्यातील पुरुषांना लागलेली दिसते. टिळकांचे आजोबा सखाराम पांडुरंग हे वामनरावांच्या जन्मानंतर दुसऱ्याच वर्षी संन्यास घेऊन गेले ते कायमचेच. टिळकांनीही मन:शांतीच्या शोधार्थ अनेकवार गृहत्याग केला होता. आयुष्याच्या अखेरीस तर कुटुंबात राहूनच त्यांनी संन्यास घेतला होता. टिळक घराण्यातल्या स्त्रियांपैकी लक्ष्मीबाईंना अशी विरक्ती आयुष्याच्या समाप्तीवेळी आली होती.

तरीही आपले आयुष्य निष्क्रियतेत न घालवता लोकोपयोगी कामे करण्यात त्यांनी व्यतीत केली. गावात तापाची साथ त्यावेळी चालू होती. स्वत:ची प्रकृती ठीक नसताना लक्ष्मीबाई सकाळी सकाळी सोपानदेव चौधरींच्या घरी जाऊन सगळ्यांना जबरदस्तीने उठवून काढा आणि नंतर चहा पाजून मग घरी येत. एखाद्या अडलेल्या बाईला सोडवण्यासाठी जिवाचा आटापिटा करून त्या आडवळणी जागी पोहचत. असे लक्ष्मीबाईंचे स्वत:च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करून  समाजसेवा करणे अखंड चालूच होते.

आनंदीबाई शिर्के, श्री.कृ.कोल्हटकरांच्या पत्नी अशा अनेक जिवलगांच्या भेटीची आस त्यांना लागली होती. भेटी घेण्याचा सपाटाही एकीकडे त्यांनी लावलेला पाहून देवदत्तांना आईची काळजी वाटत होती. 'आपल्याला बरे नाही, इतके लोक भेटायला येतात पण ज्याला भेटायची इच्छा आपण धरून आहोत, तो मृत्यू मात्र येत नाही', असे लक्ष्मीबाईंचे म्हणणे होते.

'माझी भाकर तव्यावर भाजून झालीय. आता फक्त विस्तवावर शेकायची राहिली आहे. याकरिता ती शेकावीशी वाटते. माझ्या लेकरांना

ती बघायला नको' असे त्यांनी एका नर्सजवळ म्हटले होते. त्याचा अर्थ 'स्मृतिचित्रे'चा चौथा भाग आणि 'ख्रिस्तायन'चे शेवटचे अध्याय जवळजवळ संपत आले आहेत, ते लवकर पूर्ण होवोत, ते पूर्ण करण्याची वेळ आपल्या मुलांवर न येवो असा लावण्यात आला. तव्यावर भाजलेली भाकर ही पूर्णपणे खाण्यास तयार नसते. ती विस्तवावर भाजावी लागते. आयुष्य सगळे जगून पूर्ण झाले आहे. थोडेसेच शिल्लक आहे. जिवात धग असेपर्यंत उरलेली कामे लवकर पूर्ण करण्यासाठी तग धरला पाहिजे असे त्यांना वाटणे साहजिक होते.

'ख्रिस्तायन' आणि 'स्मृतिचित्रे' ही दोन्ही पूर्ण झाली आहेत, आता काही काम शिल्लक नाही, तेव्हा जगण्याची इच्छा उरली नव्हती असे म्हणण्यापेक्षा मृत्यूची गळाभेट घेण्याची ओढ त्यांना अस्वस्थ करत होती असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. 'स्मृतिचित्रे'चा तिसरा भाग आचार्य अत्रे ह्यांच्या हस्ते १५ डिसेंबर १९३५ रोजी प्रकाशित झाला होता. तेव्हा ह्या साहित्यलक्ष्मीची पावले अखेरच्या प्रवासाच्या दिशेने निघाली आहेत, ह्याची पुसटशी शंकाही कुणाला आली नव्हती. त्यानंतर उजाडलेल्या नव्या वर्षातली २३ फेब्रुवारीची रात्र संपून २४ तारीख उजाडली आणि बारा वाजून पन्नास मिनिटांनी लक्ष्मीबाई शांतपणे मृत्यूला सामोऱ्या गेल्या!

उतारवयातल्या लक्ष्मीबाईंचे वर्णन करताना भ.श्री.पंडित 'भरली घागर'च्या प्रस्तावनेत (पृ.२६) म्हणतात: आजीबाईंचे पिस्कारलेले बाल तागाप्रमाणे पिकले होते व सुरकुतलेले गाल जर्दाळूप्रमाणे सुकले होते. वयाला साठीचा सुमार असूनसुद्धा आजीबाईंचा उत्साह ताजा होता. त्यांच्या डोळ्यांत दीर्घ अनुभवाची धमक होती.

निधन झाल्यानंतर तब्बल अठरा तासांनी त्यांची अंत्यक्रिया झाली. त्यावेळीही लक्ष्मीबाईंचा चेहरा ताजातवाना वाटत होता. त्यांच्या

चेहऱ्यावर स्मित आणि समाधान विलसत होते. कबरस्थानाच्या फाटकापासून नियोजित कबरीकडे शवपेटी नेताना भक्तिगीते किंवा मृत्युसंबंधीची सांत्वनपर गीते समूहाने एकसुरात, गंभीरपणे म्हणण्याची प्रथा खिस्ती समाजामध्ये आहे. बहुधा मृत व्यक्तीचे आवडते गीतदेखील अशावेळी आवर्जून गायिले जाते. देवदत्त टिळकांकडे लोकांनी 'कोणते गीत गायचे?' ह्यासंबंधी विचारणा केली तेव्हा आपल्या मृत आईकडे बघून त्यांना आपल्या आईचा 'आत्मा आणि कुडी ह्यांचा झगडा' आता संपल्याचे जाणवले आणि वडिलांनी लिहिलेले गीत आठवले, तेच त्यांनी सुचवले* –

जिंकुन मरणाला मरणाला
जीव कुडीतुन गेला ।।ध्रु.।।
अक्षयतेचा अधिकारी हा इकडून तिकडे झाला ।।१।।
विश्वासाचा जिना चढोनी दिव्य मंदिरी शिरला ।।२।।
मेला नाही निजला क्षणभर पुन्हा सुखाने उठला ।।३।।
प्रभुने ह्याला किती दयेने अजरामर हो केला ।।४।।

■■■

—

* उपासनासंगीत गीत क्र.६२८

# साहित्यलक्ष्मीची पावले

## कवयित्री लक्ष्मीबाई

टिळकांना आपल्या आईकडून कवितेचा वारसा लाभला होता त्याचप्रमाणे लक्ष्मीबाईंनाही कवितेचा वारसा त्यांच्या आईकडून लाभला होता. त्यांची आई गाणी रचायची आणि शेजारपाजारच्या लेकीसुनांना ती पाठ करायला लावायची. हा काव्यगुण लक्ष्मीबाईंच्या मोठ्या बहिणीत–भिकुताईमध्येही दिसतो. ती लक्ष्मीबाईंना म्हणायची, 'मैना, तुझा गं पिंजरा मायेचा'. (अर्थ: तुला कोंडून ठेवले तरी ते मायेने. नाहीतर तू कधीच भुर्रकन् उडून गेली असतीस...)

लक्ष्मीबाई टिळकांनी कविता, पदे, अभंग अशी मुशाफिरी काव्यप्रांतात केली आहे. अगदी पहिली कविता त्यांनी लिहिली ती टिळक धर्मांतर करणार ही खबर ऐकून ते आता आपल्याला सोडून देणार की काय, ह्या विचाराने त्यांचा जीव कासावीस झाला, तेव्हा (सप्टेंबर १८९४च्या सुमारास)!

Our sweetest songs are those, that tell of saddest thought, असे आंग्ल कवी पी.बी.शेलीने म्हटले आहे. हरिणीच्या काळजात बाण घुसल्यावर तिला झालेल्या वेदनेने जो तीव्र स्वर तिच्या कंठातून निघाला, त्याला 'गजल' म्हटले गेले असे म्हणतात, त्याप्रमाणेच लक्ष्मीबाईंच्या कवितेची सुरुवात काळजाला घरे पडल्यानंतर झाली. 'म्हणे जातो सोडून नाथ माझा...'अशा आर्ततेने लक्ष्मीबाईंच्या काव्यलेखनाला प्रारंभ झाला होता. टिळकांच्या धर्मांतराच्या वेळी जिने मला साहाय्य केले व पुढे मला सुखात सोडून जी अज्ञातवासी झाली ती आता टिळकांच्या निधनानंतर माझे समाधान करण्यास पुढे येऊन उभी राहिली असे कवितेविषयी त्या म्हणतात. ज्या कासाविशीने त्यांना

कविता लिहायाला प्रवृत्त केले त्याच कासाविशीने टिळक गेल्यानंतर त्या पुन्हा लिहित्या झाल्या होत्या. असे असले तरी फक्त एकाच विषयाभोवती त्यांची कविता रुंजी घालत राहिली, असे मात्र झाले नाही.

लक्ष्मीबाईंच्या कवितालेखनाच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्या कवितेवर टिळक एक नजर टाकून मग ती प्रसिद्धीला पाठवत. बाईंची कविता मुळात चांगली होती, इतकी की 'करंजीतला मोदक' ही कविता टिळकांनीच त्यांना लिहून दिली असावी असा संशय पंढरपूरच्या अंबूताई पटवर्धन ह्यांनी लक्ष्मीबाईंना पत्र लिहून व्यक्त केला होता. तेव्हा लक्ष्मीबाईंनी मोठ्या विनयाने कवितेतूनच त्यांना उत्तर दिले होते–

सतार जड मी खरोखरी गे परंतु कुशलकराचा
स्पर्श कवीचा होता फुटते परि मलाहि मधु वाचा

टिळक हे फक्त पती आणि मित्र नव्हते, तर त्यांचे सर्वार्थाने गुरूही होते. म्हणूनच अशा टिळकांच्या निधनानंतरची कविता लक्ष्मीबाईंच्या मन:स्थितीचे दर्शन घडवते–

सेवा संपतांना नावाड्या तो गेला
सोडुनी नावेला भवार्णवीं
नावेचें तें शीड सदा फडफडे
नाव कोणीकडे हेलकावे
भवार्णवीं नौका डळमळताहे
वारें किती वाहे सोसाट्याचें
तियेचे सुकाणूं कोणत्या दिशेला
फिरेल दयाळा तूला ठावें
कठीण अवस्था डोळीयाचे पुढें
शीड फडफडे हृदयीचें (ज्ञानोदय ४-११-१९२०)

मन असे आर्त टाहो फोडत असताना एकाकी अवस्थेत ख्रिस्तमाऊली आपल्या आर्त किंकाळीला उत्तर देईल असा विश्वास लक्ष्मीबाईंनी व्यक्त केला आहे.

टिळकांनी सुरुवातीला लक्ष्मीबाईंना मार्गदर्शन केले असले किंवा टिळकांकडून बाई रचनाचातुर्य शिकल्या असल्या तरी त्या स्वत: प्रतिभावान होत्या. ह्या संदर्भात र.श्री.जोगळेकर म्हणतात–

'वस्त्र स्वत:चे असल्यावर ते आटपशीर व आकर्षक रीतीने परिधान करण्यास दुसऱ्याचा हातभार लागला म्हणून ते वस्त्रच दुसऱ्याचे होत नाही.'...'दोघांच्या काव्यांत न्यूनाधिक्य दाखवायचे झाल्यास रे. टिळकांच्या काव्यात प्रतिष्ठा व परिष्क्रिया ( polish) आहे. हे दोनही गुण लक्ष्मीबाईंच्या काव्यात कमी प्रमाणात आहेत म्हणून त्यांच्या काव्याचे सौंदर्य कमी झाले असे नाही.'...'दोघांचे काव्य हे वैयक्तिक स्वरूपाचे नसून विश्वात्मक स्वरूपाचे आहे.' [१]

'महाराष्ट्र शारदेच्या प्रांगणात सर्वांत प्रथम लक्ष्मीबाईंनी पदार्पण केले. त्यांच्या पूर्वीची स्त्रियांची पिढी कविता रचीत नव्हती, असे नाही. परंतु ती कविता म्हणजे गाणे रामाचे, धावा द्रौपदीचा, डोहळे सीतेचे, ओव्या झोपाळ्यावरल्या या प्रकारची होती. लक्ष्मीबाईंनी तिला नव्यानव्या तऱ्हा, नव्यानव्या चाली शिकवल्या. त्यांच्या धडाडीमुळे इतर भगिनींना धीर आला. त्यांच्या मुकेपणास वाचा फुटली. लक्ष्मीतनया, लक्ष्मीबाई बेहरे, शारदाबाई परांजपे, हिराबाई पेडणेकर, शांताबाई फणसे, मनोरमाबाई रानडे इत्यादी कवयित्री त्यांच्या अनुगामी होत. अर्वाचीन कवयित्रींच्या परंपरेचा आरंभ लक्ष्मीबाई टिळकांपासून होतो. त्या आधुनिकांच्या आद्य कवयित्री होत.' असे अभिप्राय व्यक्त करून, त्यामुळेच 'लक्ष्मीबाईंच्या कवितांची संख्या फार नाही. त्या तोलात कमी पण मोलात भारी आहेत' असे भ.श्री.पंडित ह्यांनी म्हटले आहे.[२]

**काव्यविषयक भूमिका**

प्रत्येक कवीची कवितालेखनाची एक भूमिका असते आणि ती तो काव्यात उतरवल्याशिवाय राहत नाही. लक्ष्मीबाईंच्या बाबतीत कवितालेखनाचे प्रयोजन पतिविरह हे होते. 'पतिविरहानळ जाळी मजला' अशावेळी कवितेने दूतिका म्हणून आपली भूमिका चोख बजावली म्हणून पतिविरह सुसह्य होऊ शकला आणि –

तिने शेवटी हजार विघ्नें असताही उभयाला
कसें जोडिलें, हे सांगाया आज न अवधी मजला!

नावाने आपण लक्ष्मी असलो तरी प्रत्यक्षात लंकेच्या पार्वतीच आयुष्यभर राहिलो परंतु कवितेच्या बाबतीत आपण खऱ्या अर्थाने लक्ष्मी नाव सार्थ केले असल्याचे भान त्यांना आहे. 'देवाने आम्हांला एकत्र आणल्यावर कविता काही काळ रुसल्यासारखी दूर गेली तेव्हा –

सखी ही कविता सोडुनिया जातां
खेद माझे चित्ता फार वाटे'

असे कवितेविषयीचे आपले प्रेम त्यांनी व्यक्त केले आहे.

माझे गाणे, माझी कविता लोप कशी पावली
मला समजली! लक्ष्मी लागे नारायणपावली!

(लक्ष्मीनारायण संगम)

वाग्देवी मोदकाची पाती तयार करून आपल्या हाती देते आणि आपण त्यात स्वयंस्फूर्तीने प्रेमरसाचे पुरण घालतो, कवितारूपी मोदकाचा घाट सुबकसा नाही साधला गेला तर आपण रडकुंडीला आल्यावर आपला पती आपल्याला मार्गदर्शन करतो आणि चांगल्या प्रतीचा काव्यमोदक आपल्या हातून घडतो अशी आपल्या कवितालेखनाची कहाणी रंजकतेने त्यांनी 'पतिपत्नी' या कवितेत सांगितली आहे.

काव्याची लतिका किती बहरते माझी, मती आगळी

'त्यांच्या' संन्निध मात्र काव्यलतिके ना फूल ना पाकळी

( ना फूल ना पाकळी)

आपली कविता परिपक्व नाही, ती अजून 'दोन दिवसांची पोर' आहे, 'इतुक्यांतचि ही पुढें पुढें ये काय म्हणू चटोर', असे कुणाला वाटत असेल तर ते लक्ष्मीबाई साफ नाकारतात. आपली कविता 'ही पुरी वय वर्षे सोळा अधिक मासद्वय झाली' असून तिला कोंडून ठेवणे आपल्याला मंजूर नसल्याचेही त्या ठणकावून सांगतात. तिचा जन्म पतिविरहाच्या काळात झाल्याचाही पुनरुच्चार करतात (पतिपत्नी).

**भरली घागर**

टिळकांच्या निधनानंतर लक्ष्मीबाई पुन्हा कविता लिहू लागल्या. कवितेने त्यांना सोबत केली आणि त्यांची काव्यघागर भरत राहिली.

१९०४ सालापासून लक्ष्मीबाईंच्या कविता नियमित प्रकाशित होऊ लागल्या होत्या. त्यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह त्यांच्या निधनानंतर प्रकाशित झाला. कवी आणि काव्यविषयक, आत्मपर, स्त्रीपुरुष, सामाजिक, प्रासंगिक, रूपकात्मक, भक्तिपर अशा बारा भागात असलेल्या ५४ कवितांचा 'भरली घागर' हा काव्यसंग्रह सांगतो. तेराव्या भागात 'ख्रिस्तायना'तील निवडक वेचे आहेत. लक्ष्मीबाईंच्या मृत्युनंतर देवदत्त टिळकांनी सोपानदेव चौधरींच्या आग्रहाखातर देवदत्तांनी हा संग्रह संपादित केला आणि पॉप्युलर प्रकाशनने प्रसिद्ध केला (१९५१).

लक्ष्मीबाईंच्या सगळ्या कविता ह्या संग्रहात नाहीत. काही काळाच्या उदरात गहाळ झाल्याचे अ.दे.टिळक सांगतात (स्मृ.चि.पृ.८१८). टिळकांनी १९००-०१साली चालवलेल्या 'ख्रिस्ती' नावाच्या मासिकात लक्ष्मीबाईंच्या कविता प्रसिद्ध होत परंतु

त्या आज उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे त्यांचे 'राष्ट्रीयगीत' नावाचे एक पुस्तक प्रकाशित झाले होते परंतु तेही दुर्दैवाने अनुपलब्ध आहे.

बालकवींच्या जन्मशताब्दी वर्षात पॉप्युलर प्रकाशनाने ह्या संग्रहाची दुसरी आवृत्ती १९९०साली प्रकाशित करताना लक्ष्मीबाईंच्या काही अप्रकाशित कवितांचाही त्यात समावेश केला. एकूण ८७ कवितांचा हा संग्रह आहे. त्यात लक्ष्मीबाईंनी लिहिलेल्या अभंगांपैकी २५ अभंगांची आणि 'ख्रिस्तायन'मधील काही निवडक भागाची भर घालण्यात आली आहे.

## भक्तिविषयक कविता

मराठी प्रोटेस्टंट समाजात उपासनेच्या प्रसंगी प्रामुख्याने 'उपासनासंगीत' किंवा 'एक्लेसिएची गीते' नामक भक्तिगीते ह्या दोन पुस्तकांतील गीते गायिली जातात. त्यात हिंदी चालीवर (हिंदी चाली म्हणजे हिंदुस्थानी–भारतीय चाली.) गायल्या जाणाऱ्या गीतांच्या विभागात लक्ष्मीबाईंच्या गीतांचा समावेश आहे. 'मी दीन जाहले लीन' हे देवापुढे शरणागती पत्करणारे सहा ओळींचे गीत (गीत क्रमांक ३९३), ख्रिस्तजयंतीनिमित्त लिहिलेला 'हलवी मना प्रभूपाळणा हा, त्यजुनी सुखातें वरी यातनांना हा पाळणा (गीत क्रमांक ७२७. ही त्यांची कविता ऑगस्ट १९३३च्या 'स्त्री' मासिकात प्रसिद्ध झाली होती). आणि 'ऐका ख्रिस्त सांगतसे ...' (गीत क्रमांक ७३४) हे वधस्तंभावरचे येशूचे दु:खसहन स्मरण करून देणारे गीत, अशी लक्ष्मीबाईंची तीन गीते उपासनासंगीतात समाविष्ट आहेत.

## लक्ष्मीबाईंची अभंगांजली

'लक्ष्मीबाईंची अभंगांजली' हे शीर्षक इथे देण्याचे कारण असे की,

‘ज्ञानोदय’चे संपादक असताना टिळकांनी ‘अभंगांजली’ हे सदर सुरू केले होते. त्यांच्या निधनानंतर ‘ज्ञानोदय’चे संपादन देवदत्तांकडे आल्यावर देवदत्तांचे अभंग ह्या सदरात प्रसिद्ध होऊ लागले. त्यांचे अभंग तयार नसतील तेव्हा त्यांना लक्ष्मीबाई अभंगांचा पुरवठा करीत.

टिळककुटुंबाच्या ह्या अभंगांची रचना तुलनात्मकदृष्ट्या पाहिली तर स्त्रीजीवनविषयक काही संदर्भ आलेले अभंग वगळल्यास कोणता अभंग कोणाचा हे सांगणे कठीण व्हावे. पाखडणे, हातातून तेल-तूप जाणे, चिंतेचे छुपापाणी खेळणे, जीव पाखडणे, घोळून घोळून खडे वेचणे, ह्या प्रतिमा स्त्रीस्वभावानुसार सहजपणे लक्ष्मीबाईंच्या अभंगात येतात.

संसारी एकली आजवरी होते
परी रिते पोते सदा माझे
थकले भागले देत कष्टवीले
ना परी भरले पुरे कधी
भरले ते नाही, नाही कधी भरणार
रिते राहणार सदा ऐसे
...
आता संवसार एक तुझा माझा
नको आता दूजा कोणी मध्ये
आलुतेबलुते मधेच येऊनी
पोते रीचवोनी जाती माझे
म्हणून सांगते हात माझा धर
भरी भरपूर भांडाराते

हृदयाचे भांडार अशा रीतीने परमेश्वराने भरून टाकावे आणि आपल्याला ह्या संसारात तृप्त करावे असे वेध लक्ष्मीबाईंना लागलेले दिसतात.

चंदनाची किंमत सरपण म्हणून जाळून त्यावर पोटोबाची तजवीज करायची, एवढेच भिल्लांना ठाऊक. तसे माझ्या प्रभूला लोकांनी आपल्या स्वार्थासाठी खांबी खिळले आहे, माझ्या प्रभूला झालेला त्रास मी लक्षात घेत नाही. 'म्या' 'म्या' ('मी' 'मी') करत माझ्या आयुष्याची संध्याकाळ होत आली पण 'मीपणाची रात्र' संपून तुझा दिवस कधी उगवणार, असे भाव लक्ष्मीबाई आपल्या अभंगांतून व्यक्त करतात.

आलीया गेल्याची नको चिंता मला,
पुरवीता झाला आजवरी

हा त्यांचा विश्वास कायम राहला.

हासते रडते तुला गाणी गाते नवल कोणते झालें सांग
दासाने दासीला काय शिकवीलें नाही यश आलें रडक्यांना

(ज्ञानोदय १८ मार्च १९२०)

अभंगाच्या शेवटी टिळक 'दास म्हणे' असा उल्लख करीत, तो संदर्भ घेऊन लक्ष्मीबाई 'दासाची दासी' असा स्वनामोल्लेख करतात. लक्ष्मीबाईंचे अभंग हे साध्या, सरळ शब्दांतील आहेत. त्यात आर्तता आहे, ओढ आहे. आर्जव आहे आणि आसही आहे.

टिळकांनी धर्मांतर केल्यानंतर खंडित झालेले टिळकदाम्पत्याचे वैवाहिक आयुष्य पाच वर्षांनी सुरू झाले. त्यानंतर ख्रिस्तीजीवनाचा अनुभव घेऊन लक्ष्मीबाईंनी धर्मांतर केले. कट्टर सोवळ्यात वाढलेल्या लक्ष्मीबाईंसारख्या बाईने जातिभेदाला कायमचा फाटा दिला आणि सगळे जग सुखाने नांदण्यासाठी, ख्रिस्ताच्या शांतीचा आणि प्रेमाचा संदेश देण्यासाठी आपला उपयोग व्हावा अशी मनीषा बाळगली. ख्रिस्तावरचा आपला दृढ भाव व्यक्त करून शेतीचा संदर्भ देत त्या विनवतात-

माझ्या पेरणीला येवोत कणसे,
पाहोत माणसे जगातील

सांभाळ पाखरे, नसो तया कीड
वाढीव तू पेड माझे बापा

हृदयकासारी तुडुंब जळ असणे, बांधारा फोडणे, पाट सोडणे ह्या शेतकऱ्याच्या दैनंदिन व्यवहारातील गोष्टींचा अध्यात्माच्या संदर्भात बोलताना शेतकीविषयक संदर्भ लक्ष्मीबाईंच्या कवितेत येतात कारण त्या स्वत:ला 'शेतकऱ्याची मुलगी' म्हणवतात. इथे आपल्या कामातच देवदर्शन घेणाऱ्या सावता माळ्यासारख्या संताची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

धरीन मी दार लावते सारणी
करिते पेरणी पुढे तुझ्या

म्हणत आपल्या कामातून, शब्दांतून देवाचे नामस्मरण झाले पाहिजे असा विचार त्या मांडतात.

तुला भेटावया नको नाव गाव हवें तेव्हा यावे तुझ्याकडे
तुझ्या दारावरी नसो ठोकणे हवे तेव्हा येणे तुझ्याकडे

देवाशी बोलायला कोणत्याही औपचारिक वागण्याची गरज लक्ष्मीबाईंना भासत नाही. इतके त्यांचे देवाशी नाते अनौपचारिकपणातले होत गेले आहे.

### लक्ष्मीबाई टिळकांचे 'ख्रिस्तायन'लेखन

'ख्रिस्तायन' हे महाकाव्य लिहिण्याचे कविवर्य नारायण वामन टिळकांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचा ध्यास डॉ.ह्यूम ह्यांना लागला होता. टिळक अनेक व्यापात गुंतलेले असल्यामुळे आणि कायम माणसांच्या गराड्यात असल्यामुळे 'ख्रिस्तायना'च्या लेखनासाठी त्यांना वेळ मिळेनासा झाला होता. म्हणून डॉ.ह्यूम ह्यांनी साताऱ्यात असलेली आपली मुलगी मिसेस ली हिला सांगून गावाबाहेरच्या बंगल्यात 'ख्रिस्तायन'लेखनासाठी

टिळककुटुंबाच्या राहण्याची सोय केली, सोबत एक लेखनिकही दिला.

स्वत:ला मराठीपासून दूर ठेवणाऱ्या मराठी ख्रिस्ती लोकांची मने मराठी भाषेकडे वळवून हिंदू समाजाशी व संस्कृतीशी स्नेहबंध ठेवण्याचा टिळकांचा आग्रह होता. धर्मशिक्षण, धर्मसंजीवन आणि धर्मोपासना ह्यासाठी भजन, कीर्तन, पुराण ही तीन साधने अत्यंत प्रभावशाली असल्याचे टिळकांचे मत होते. ह्यादृष्टीने 'ख्रिस्तायन' लिहावे असे तर त्यांच्या मनात होतेच शिवाय ख्रिस्तचरित्र हे आपल्या हातून काव्यात—नव्हे, अत्युत्तम अशा सरस महाकाव्यात लिहून व्हावे ही उदंड इच्छा त्यांच्या मनात साधारणपणे १९०२सालापासून मूळ धरून होती. १९१७च्या सुमारास ती परत उफाळून आली. ती मार्गी लावण्यासाठी पुढे ह्यूमसाहेबांनी केलेल्या प्रयत्नांना फळ आले.

टिळकांनी साताऱ्यात गेल्यागेल्या बंगल्याला पाटी लावली होती–'ख्रिस्तायनाश्रम'[३] त्यानंतर टिळकांनी १९१७सालापासून मनात घोळत असलेल्या 'ख्रिस्तायना'च्या लेखनाचा शुभारंभ केलादेखील.

पहिले दहा अध्याय लिहून झाल्यावर अकराव्या अध्यायाच्या एकशे पाचव्या ओवीपर्यंत येऊन टिळकांची लेखणी थांबली. 'ख्रिस्तायना'ची आता कुठे सुरुवात झाली होती. मनासारखे लेखन जमूही लागले होते. परंतु अजून कितीतरी मोठा पल्ला गाठणे बाकी होते. मूळव्याधीचे दुखणे, मुंबईत जे. जे. हॉस्पिटलमध्ये त्यासाठी झालेले ऑपरेशन आणि त्यानंतर त्यांचे झालेले निधन ह्यामुळे ख्रिस्तचरित्र महाकाव्यात लिहिण्याचे टिळकांचे महास्वप्न दुर्दैवाने पूर्ण होऊ शकले नव्हते.

टिळक गेल्यानंतर मोठी पोकळी लक्ष्मीबाईंच्या जीवनात निर्माण झाली, ह्यात शंका नाही. परंतु 'ख्रिस्तायना'चे लेखन करण्यास लक्ष्मीबाईंनी लगेच सुरुवात केली असे मात्र झाले नाही. टिळकांच्या

मृत्युनंतर जवळजवळ दहाबारा वर्षांनी त्यांनी 'ख्रिस्तायन' लिहायला घेतले. त्याला कारण असे घडले की, त्यांची मुलगी तारा हिने हेमचंद्र जोशी ह्या आधीच विवाहित असलेल्या गृहस्थाशी हिंदू धर्म स्वीकारून विवाह केला होता. १९३६ सालच्या मे महिन्याच्या 'स्त्री'च्या अंकात 'बाप पूर्वीचा ब्रह्मकुलोत्पन्न पण आता ख्रिस्ती पाद्री झालेला होता'.. 'बापाच्या नोकरीवर गदा येईल असा बोलवा झाला होता' असा टिळकांचा सरळ नामोल्लेख न करता (स्मृ. पृ.५९४) प्रो. लोंढे यांचा 'वैवाहिक प्रश्नाच्या सोडवणुकीकडे प्रवृत्ती' ह्या शीर्षकाचा एक लेख प्रसिद्ध झाला होता, त्यावरून त्या लग्नाविषयी ख्रिस्ती आणि ख्रिस्तीतर समाजात बरीच खळबळ माजली असावी, असे वाटते.

त्या लेखात 'बापाच्या नोकरीवर गदा येण्याचा बोलवा' झाल्याचा उल्लेख चुकीचा वाटतो. टिळकांचे निधन १९१९साली झालेले होते आणि त्यानंतर बारा वर्षांनी म्हणजे १९३१साली ताराचा विवाह झाला होता. लक्ष्मीबाई 'स्मृतिचित्रे'त लिहितात, 'ख्रिस्ती धर्मात ज्याची बायको किंवा जिचा पहिला नवरा जिवंत असेल तर त्याचे किंवा तिचे पुन्हा लग्न लावण्यास कोणी तयार होत नाही. लग्न लावण्यास व ते लावणारास शिक्षा होते, म्हणून दुसऱ्या समाजात जाऊन (हिंदी पत्रकार हेमचंद्र जोशी) ह्या गृहस्थाने आपला कार्यभाग उरकून घेतला.'

ताराने लग्नाखातर धर्मांतर केले त्याविषयी लक्ष्मीबाई म्हणतात: धर्मांतराचा आमच्या (लक्ष्मीबाई आणि दत्तू) मनाला काही बाऊ वाटत नव्हता. आमचे दोघांचेही असे स्पष्ट मत होते की, धर्माच्या बाबतीत प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य असावे व धर्मांतरामुळे कोणी कोणाला परके बनण्याचे कारण नाही.

तरीही ताराच्या लग्नाची खबर वर्तमानपत्रातून समजल्यावर लक्ष्मीबाईंना जबर धक्का बसला (स्मृ.४:पृ.९३). मुलीने आपल्याला

विश्वासात घेतले नाही, पत्नी जिवंत असलेल्या एका विवाहित पुरुषाशी लग्न केले आणि तिच्या लग्नाची बातमी वर्तमानपत्रातून आपल्याला कळावी ही गोष्ट त्यांच्यासाठी अत्यंत धक्कादायक ठरली.

तशातच रेव्ह. सु.ना.थोरात ह्यांचे त्यांना पत्र आले. त्यात 'आपली मुलगी आपले 'ख्रिस्तायन' पुरे करील' अशी टिळकांना अपेक्षा होती असे म्हटले होते.

टिळकांनी जरी ताराला आपली मुलगी म्हटले होते तरी ती त्यांची वा त्यांच्या नात्यातल्या कुणाचीही मुलगी नव्हती. पंधरा दिवसांचा मुलगा, दोन महिन्यांचा मुलगा, दीड वर्षांचा मुलगा, हौशी, दया, चिकी, चंपा अशी काही परक्यांची मुले टिळककुटुंबात वाढली. तारा हीदेखील अशीच दहाबारा दिवसांची मुलगी टिळकांकडे कोणीतरी आणून दिलेली होती. ती कोणाची मुलगी होती हे टिळकदाम्पत्याला ठाऊक असूनही त्यांनी ते कधी कुणास सांगितले नव्हते.

टिळकांच्या कवित्वाचा वारसा आनुवंशिकतेने येण्यासाठी तारा ही काही त्यांची मुलगी नव्हती तरी टिळकांना तिच्याविषयी अशी खात्री वाटत होती, ह्याचे कारण ताराने वयाच्या आठव्यानवव्या वर्षी कविता लिहायला सुरुवात केली होती. 'बालबोधमेव्या'त तिच्या कविता 'रोहिणी' या नावाने प्रसिद्ध होत. टिळकांच्या त्याच अपेक्षेचे स्मरण रेव्ह. थोरातांनी करून दिले होते आणि ज्या शब्दांत निराशा प्रकट केली होती त्यामुळे लक्ष्मीबाईनी ठरवले की, 'आता जीव जावो अथवा राहो, 'ख्रिस्तायन' पूर्ण करायचेच.' बाकी सगळ्या गोष्टी, लेखन बंद करायचे देवाकडे कबूल केले आणि 'देवा, हा बघ टाक हाती घेत आहे, तुला हवं तर तू आपल्या गौरवाकरता वापर करून घे नाही तर माझा अंत ह्यातच होऊ दे' म्हणत त्यांनी 'ख्रिस्तायन' लिहायला घेतले (स्मृ.४.पृ.९४).

बायबलचे मूळ भाषांतून भाषांतर करण्याचे काम तडीस नेईपर्यंत

आपल्याला आयुष्य लाभावे अशी पं.रमाबाईंची देवाकडे प्रार्थना होती. तशीच 'ख्रिस्तायन' पूर्ण झाल्यानंतरच आपल्या आयुष्याला फुलस्टॉप मिळावा अशी लक्ष्मीबाईंचीही मनोमन इच्छा होती.

टिळकांचा आणि लक्ष्मीबाईंचा 'ख्रिस्तायन' लेखनाचा उद्देश भिन्न होता, तरी लक्ष्मीबाईंनी काव्यगड राखण्यात किंचितही कसूर केली नाही, असे जाणवते. उलट आपल्या सहजसुंदर शैलीने बाजीच मारली असा म्हणण्याचा मोह होतो. लक्ष्मीबाईंनी 'ख्रिस्तायन' लिहायला घेतले तेव्हा मिसेस ह्यूम आपल्या मुलाकडे वाई येथे होत्या. त्यांनी लक्ष्मीबाईंना आपल्याकडे बोलावून घेतले होते. त्यांना स्वतंत्र खोली देऊन सर्व सुखसोयी पुरवल्या होत्या. लक्ष्मीबाईंनीही स्वत:ला त्याकामी तासचे तास गुंतवून घेतले होते. मिसेस ह्यूम ह्यांनी 'तुम्ही प्रकाशनाच्या पैशाची चिंता करू नका, परमेश्वर ती सारी व्यवस्था करील' असे म्हणून लक्ष्मीबाईंना लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले होते.

शेवटच्या दिवसांत लक्ष्मीबाई आनंदीबाई शिर्के ह्यांच्याकडे जाऊन राहिल्या होत्या, त्यासंबंधी आनंदीबाई लिहितात (स्मृ.४:१२८):

'ख्रिस्ती होऊन आपण विशेष काय कार्य केले? स्वत:च्या आध्यात्मिक उन्नतीपलीकडे मी काय साध्य केले?' असा प्रश्न त्यांनी स्वत:लाच विचारला तेव्हा त्यांना टिळकांचे अपूर्ण 'ख्रिस्तायन' पूर्ण करण्याची प्रेरणा आतून झाली. त्यासरशी, 'ते पूर्ण झाल्याशिवाय लेखणी खाली ठेवणार नाही' अशा प्रतिज्ञेने त्यांनी लेखणी हाती घेतली. 'ख्रिस्तायन' पूर्ण होत आले तेव्हा 'माझं ख्रिस्ती होणं सार्थकी लागलं' असे उद्‌गार त्यांनी काढले.

टिळकांची लेखणी हन्ना ह्या विधवा स्त्रीच्या कहाणीपर्यंत येऊन थांबली होती. पतीच्या निधनाच्या दु:खाची तीव्रता तोवर कमी झालेली असली तरी समदु:खी लक्ष्मीबाईंनी हन्नेची मनोवस्था शब्दबद्ध करताना

टिळकांच्या ‘महाशब्दप्रवाहा’त स्वत:ला झोकून दिलेले दिसते–

पतिसमवेत तिचे तेही देहभान लुप्त होई
स्नेहाविना प्रकाश तोही भानुविरही प्रसून ते
स्तब्ध झाल्या दिशा दाही स्तब्ध झाली तशी देही
विस्मृतीच्या पडे डोही निर्जन गेही ती बसली
गृहात नसता गृहस्वामी गृह कसले ती रुक्ष भूमि
किती भूषवा सुंदर नामी होय निकामी पतीविना
तिचा तुटता तो आधार रिते झाले हृदयमंदिर
दृष्टि लावोनिया वर जोडुनि कर लय लागे
प्रभूच्या चरणी लीन झाली जणू मातेसन्निद्ध ठेली
हृदयसागरा भरती आली वाही अंजली अश्रूंच्या
सतत विनवी करुणागारा विश्वपति तू विश्वाधारा
तूचि तूचि हो माझा थारा नको उबारा इतरांचा
तुझ्यापायी लागो मन तुझ्या पायी शांतिधन
त्वदितर दिसती सारे जन तृणासमान खरोखरी
पतिवियोगाचे तर्पण देवापुढे संतर्पण
विवेकाशी हो संलग्न भाव पूर्ण होत तिचे
अल्पवयी, अल्पमति नसे विद्या तीते पुरती
विवेक सांगे ‘ऐक सुमति उभा हा पति देवरूपे
राही त्याच्या मंदिरात सोडी अवगे आप्तगोत’
प्रार्थनारत झाली सतत रमले चित्त हन्नेचे

(ख्रिस्तायन: ११: १०६-११६)

वरील दहा ओळींमध्ये हन्नेच्या निमित्ताने लक्ष्मीबाईंनी आपल्याही मनोवस्थेचे वर्णन केले आहे, असे जाणवते. टिळकांच्या भरजरी शेल्याच्या धाग्यात ते बेमालूम मिसळून गेले आहे. त्यांची लेखणी त्यापुढचे लेखन

करायला सरसावली आणि कुठेही न अडखळता थोडेथोडके नव्हेत तर, चौसष्ट अध्याय लिहून मोकळी झाली. 'अल्पमति, नसे तीते विद्या पुरती' हे हन्नेचे वर्णन लक्ष्मीबाईंनाही लागू पडते.

लक्ष्मीबाईंना भरभर लिहिता येत नव्हते. पण त्यांना सुचलेल्या ओळी लिहून घेताना लिहिणाऱ्यांची त्रेधा उडे. 'ख्रिस्तायन' लिहिताना शेवटी वारंवार येणाऱ्या येशू, शास्त्री, परोशी अशा काही शब्दांना मधुसूदन गोखले ह्यांनी विशिष्ट खुणा करून ठेवल्या होत्या. एखादा शब्द नाही लागला तर रेव्ह. गद्रे ह्यांना लक्ष्मीबाई तो दुरुस्त करायला सांगत पण त्यांनी त्यात काही दुरुस्ती करण्यापूर्वी स्वत:च ती ओळ त्या दुरुस्त करीत.

टिळकांचे 'ख्रिस्तायन'चे लेखन संस्कृतप्रचुर असणे साहजिक होते. कारण त्यांना ते महाकाव्य म्हणूनच लिहायचे होते आणि तसे ते लिहू शकण्याइतकी प्रतिभाही त्यांच्यापाशी होती. लक्ष्मीबाईंचे तसे नव्हते. लक्ष्मीबाईंसमोर असे कुठलेच ध्येय नव्हते शिवाय महाकाव्य लिहावे इतकी टिळकांसारखी प्रतिभादेखील त्यांच्यापाशी नव्हती. पतीच्या पावलावर पाऊल ठेवून चालत राहिलेल्या लक्ष्मीबाईंच्यापुढे ध्यास असलाच तर तो आपल्या पतीचे अपूर्ण स्वप्न पुरे करण्याचाच काय तो असावा. लक्ष्मीबाईंकडे लौकिक अर्थाने संपत्ती कधीच नव्हती. टिळकांसारखे शब्दधनही त्यांच्या गाठीशी नव्हते. संस्कृत शब्दांच्या वापराने श्लेष अलंकारांची बहार उडवून देण्याचे टिळकांचे कसबदेखील लक्ष्मीबाईंकडे नव्हते. पण टिळकांकडे नव्हती अशी एक मौल्यवान गोष्ट त्यांच्याजवळ होती, ती म्हणजे साधेसोपे शब्द आणि अभिव्यक्तीमधली पारदर्शक सहजता! ह्या जोरावरच त्यांनी 'ख्रिस्तायन' वाचनीय केले.

'ज्युष्टी (आनंद)', 'दर्दुर (बेडूक)', 'पर्णवरंड (पानांचा साठा)',

'दुकूल (वस्त्र)', 'क्रव्याद (मांसभक्षक)', 'टिट्टिभ (टिटवी)', 'गल्लचातुरी (गादीखालची गिर्दी)', 'वलिनआनन (सुरकुत्या पडलेला चेहरा)', 'प्रागोकुलेश्वर (कृष्ण)', 'जातोद्वाह (ज्याचा विवाह झाला आहे असा)' असे जड शब्द किंवा वाचकांची दमछाक करणारे टिळकांचे लांबलचक सामासिक शब्द लक्ष्मीबाईंच्या लेखनात फिरकतच नाहीत. 'अल्पमती, नसे तीते विद्या पुरती' हे लक्ष्मीबाईंच्या लेखनाचे बलस्थानच म्हणावे लागेल. लौकिक अर्थाने त्या शिक्षित नव्हत्या हे त्यांच्या आणि वाचकांच्या पथ्यावरच पडले, ते असे.

स्त्रीसुलभ भावनांच्या अभिव्यक्तीतली त्यांची कमालीची सहजता अनेक ठिकाणी प्रशंसनीय ठरून वाखाणण्याजोगी झाली आहे. टिळकांनी आखलेल्या आलेखाप्रमाणे अध्यायाचे शीर्षक, लेखनाचा पद्य साचा वगैरेंचा अवलंब लक्ष्मीबाईंनी केला, पण लेखन केले ते आपल्याच खास शैलीत केले. टिळकांच्या पांडित्याचे त्यांना दडपण वाटले आहे, असे अजिबात कुठेही जाणवत नाही. टिळकांच्या संस्कृतप्रचुर लेखनाची अपेक्षा वाचकही त्यांच्याकडून करत नाही. तसे करणे हे सर्वथा चूक ठरेल. टिळकांनी सुरू केलेल्या 'ख्रिस्तायना'ला लक्ष्मीबाईंनी उणेपण येऊ दिलेले नाही, उलट आपल्या सहजसुंदर शैलीने त्याची शोभा वाढवली आहे, एवढे निश्चित! सामान्य वाचक त्यात रमून जातो. आख्यानकाव्याच्या अंगाने जाणारे लेखन करून संपूर्ण बायबल पद्यमय रचनेत वाचनीय करण्याचे श्रेय कुणाला जात असेल तर ते लक्ष्मीबाई टिळकांनाच!

'ख्रिस्तायन' हे एकूण ७६ अध्यायांचे आहे. टिळकांच्या अकराव्या अध्यायाच्या एकशेपाचव्या ओवीनंतर (एक हजार चारशे एकोणसाठ ओव्या) चाळीस ओव्यांची भर घालून लक्ष्मीबाईंनी टिळकांचा अकरावा अध्याय पूर्ण केला. लक्ष्मीबाई अखंड लिहीत गेल्या आणि

पाच वर्षांत ६४अध्याय (आठ हजार बत्तीस ओव्या) त्यांनी लिहून पूर्ण केले. त्यांचे पुत्र देवदत्त ह्यांनी समारोपाचा अध्याय (एकशे सोळा ओव्यां) लिहिला. ना.वा.टिळकांचे हे एकट्या टिळकांचे लेखन नसून संपूर्ण टिळक कुटुंबाचे, त्यांच्या दोन पिढ्यांतील तीन व्यक्तींचे हे एकूण नऊ हजार सहाशे सात (९,६०७) ओव्यांचे लेखन आहे.

एकाच कुटुंबातील तिघांनी एकाच विषयाला धरून केलेल्या सलग पद्यलेखनाचे उदाहरण क्वचितच आढळेल. त्या दृष्टीने हे दीर्घपद्यलेखन वैशिष्ट्यपूर्ण आहेच. असे असले तरी त्यांची एकमेकांच्या लेखनाशी तुलना करणे उचित होणार नाही. शीघ्रकवी, संतकवी, कादंबरीकार, नाटककार, कीर्तनकार, संपादक, धर्मोपदेशक म्हणून टिळकांचा लौकिक होता. त्यांचे चिरंजीव देवदत्त हेही उच्चविद्याविभूषित होते. साहित्याचे ते चांगले जाणकार होते. स्वत: चांगले लेखक आणि कवीही होते. आपल्या आईवडिलांसारख्या अभंगरचना त्यांनीही केल्या होत्या आणि 'ज्ञानोदय'मध्ये त्या प्रसिद्धही झाल्या होत्या. 'ज्ञानोदय'च्या संपादनाचाही त्यांना अनुभव होता. अशा ह्या व्यासंगी आणि साहित्यिक पितापुत्रांच्या तुलनेत कुठल्याही वाङ्मयीन ग्रंथांचा संस्कार न झालेल्या अशिक्षित लक्ष्मीबाईंची साहित्यिक गुणवत्ता कुठेही कमी होत नाही.

लक्ष्मीबाई हिंदूच राहिल्या असत्या तर इतर स्त्रियांचे आयुष्य जसे व्यतीत झाले तसे 'केरपोतेरं नि सोवळंओवळं करण्यात जन्म गेला असता' असे एका बाईंनी लक्ष्मीबाईंना सत्काराच्या वेळी म्हटले असता त्यांनी असे उत्तर दिले की,

''खरं आहे. ख्रिस्ती समाजाच्या कमालीच्या दाक्षिण्यामुळं आणि शान्तवृत्तीमुळं माझ्या अंगी सभाधीटपणा बरीक आला.''

'ख्रिस्तायन'चे प्रकाशन लक्ष्मीबाईंच्या हयातीत होऊ शकले नाही. डॉ.केटीबाई रॉबर्ट ह्यूम ह्यांनी आपल्या प्रिय पतीच्या प्रिय

मित्राचा–टिळकांचा हा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी काही रक्कम ठेवली होती. दुर्दैवाने त्यादेखील प्रकाशनाच्या आधीच निवर्तल्या. पण टिळकदाम्पत्याचे पुत्र देवदत्त आणि ह्यूमदाम्पत्याचे पुत्र डॉ.वॉल्टर ह्यांनी मात्र आपल्या मातापित्यांचे स्वप्न पूर्ण केले (१९३६).

**लक्ष्मीबाईंच्या 'ख्रिस्तायन'लेखनाविषयीच्या काही प्रतिक्रिया :**

डॉ.स.ग.यादव ह्यांच्या मते 'वाङ्मयाचा अभ्यास हा स्वच्छ व निरागस भूमिकेतून व्हावयास हवा, 'ख्रिस्तायना'चा विचार स्वतंत्रपणे अजूनही कुणी केलेला नाही. त्यामुळे एक उपेक्षाच या ग्रंथाच्या व पर्यायाने कवयित्रीच्या वाट्याला आली आहे'[४]

भ.श्री.पंडित म्हणतातः लक्ष्मीबाई टिळकांच्या वाणीत भावनांचा ओलावा आहे. ख्रिस्तवासी पतीच्या अपूर्ण राहिलेल्या 'ख्रिस्तायन' काव्याला शेवटास नेऊन त्यांनी आपल्या भावनांचे आर्द्रत्व लोकांच्या निदर्शनास आणले.[५]

'ख्रिस्तायना'चा प्रत्येक अध्याय वाचायला एका तासाहून अधिक वेळ लागतो हे लक्षात आल्यावर लक्ष्मीबाईंनी त्याचे पुनर्लेखन केले. त्यामुळे अध्याय लहान आणि संख्येने जास्त झाले.

डॉ. पद्मा शिंदे लिहितातः गेल्या साली (१९३५) स्वलिखित 'ख्रिस्तायन'च्या पहिल्या भागाचे निरूपण करताना वार्धक्याने खंगलेल्या देहात तरुणांना लाजवील इतका आवेश व उत्साह पाहून श्रोते थक्क झाले होते (ज्ञानोदय २ एप्रिल १९३६).

'ख्रिस्तायन'वाचन चालू असताना थट्टेने माधव मनोहर त्यांना 'महाकवयित्री' म्हणत असत, त्यावर ''ही काय आणखी नवी शिवी काढली आहेस म्हातारीसाठी?'' असे लक्ष्मीबाईंचे विचारणे असे.[६]

मराठी वाङ्मयात गतशतकातील महत्त्वाचा ग्रंथ म्हणून अढळ

स्थान मिळालेले लक्ष्मीबाई टिळकलिखित 'स्मृतिचित्रे' १५ डिसेंबर २०१५ रोजी ऐंशी वर्षांचे झाले आहे. टिळककुटुंबलिखित 'ख्रिस्तायना'च्या लेखनप्रारंभाला २०१७ साली १०० वर्षे पूर्ण होतील आणि प्रकाशनाला २०१६साली ७९ वर्षे पूर्ण होत आहेत. आणि २०१६ ह्या वर्षी लक्ष्मीबाईंच्या जन्माला १५१वर्षे पूर्ण झाली आहेत हा एक सुवर्णयोगच म्हणावा लागेल.

**कीर्तनकार लक्ष्मीबाई टिळक**

टिळक उत्तम कीर्तनकार होते. त्यांच्या तालमीत कीर्तनाचे धडे अहमदनगर येथे असताना १९१३ सालापासून लक्ष्मीबाईंनी गिरवले होते. लक्ष्मीबाई मुळात अत्यंत गप्पीष्ट. एखादी गोष्ट बोलायला-सांगायला अतिशय उत्सुक. सांगायचे तेही अशा रसाळ पद्धतीने की, ऐकणारा त्यात पूर्णपणे रममाण झालाच पाहिजे. ह्याखेरीज त्या प्रतिभावंत कवयित्रीही होत्या. कीर्तनाचे तंत्र आत्मसात केल्यानंतर कीर्तनकार म्हणून त्या उभ्या राहिल्यावर त्यांचे कीर्तन न रंगते तर नवलच. 'कविता म्हणा' असे म्हणण्याचा अवकाश की, लक्ष्मीबाई सुरू होत. तसाच उत्साह कीर्तन करायचे म्हटल्यावर त्यांच्या अंगी असे. म्हणूनच एकदा अंगात ताप भरल्यावर तो लवकर जावा म्हणून त्यांनी लगेच डॉक्टरांकडे धाव घेतली होती... फ्रिच्लेसाहेबांनी लोणावळ्यात नववर्षाच्या पूर्वसंध्येला लक्ष्मीबाईंचे कीर्तन ठेवले होते. कीर्तनाचे मानधन म्हणून त्यांनी पाचशे रुपयांचा चेकही दिला होता. दोनशे रुपयांचे कर्ज त्यांनी कीर्तनाच्या मानधनातूनच फेडले होते. पुण्यातही लक्ष्मीबाईंची कीर्तने झाली होती. कीर्तनकाराला 'बोवा' म्हटले जाते. टिळक कौतुकाने लक्ष्मीबाईंचा उल्लेख 'बोवा' म्हणून करीत आणि म्हणत, 'गुरु तो गुड ही रहे, चेला शक्कर भये.'

टिळकांची दोन कीर्तने 'कीर्तनकलाप'च्या रूपाने उपलब्ध आहेत. परंतु लक्ष्मीबाईंनी केलेली कीर्तने मात्र आज लिखित स्वरूपात उपलब्ध नाहीत. त्या स्वत:ची कीर्तने लिहून करायच्या, की उत्स्फूर्त करायच्या, की टिळकांनी लिहून दिलेली कीर्तने करायच्या, याबाबत निश्चितपणे सांगणे कठीण आहे. ख्रिस्ती समाजातील त्या पहिल्या महिला कीर्तनकार असाव्यात. लक्ष्मीबाईंनंतर कीर्तन करणाऱ्या म्हणून भंडारा येथील कमल वसंत जोब (रेव्ह.दिनकर मेघश्याम धिवर ह्यांच्या कन्या) हे नाव समोर येते. नागपूर येथे ॲग्नेस हेंडरसन मेमोरियल चर्चमध्ये १९५१ साली त्यांनी कीर्तन केले होते. त्या परिसरात एका स्त्रीने कीर्तन करणे हा कुतूहलाचा विषय ठरला होता. त्यानंतर सरला वाघमारे ह्यांनी कीर्तनकार आचार्य सूर्यवंशीनी लिहिलेली काही कीर्तने सादर केली.

टिळकांनी हिंदु धर्मात असताना आपल्या आवडत्या दैवतांवर खूप कवने केली होती. ख्रिस्ती झाल्यानंतर मात्र ते –

ख्रिस्ता ख्रिस्ता प्राण कुडीचा हो माझा तू नित्य तसा।
विरह आपला क्षणार्ध होतां होवो माझा जीव पिसा।।
(उपासनासंगीत क्र.२८९)

असे म्हणत ख्रिस्ताशी एकनिष्ठ राहिले. हिंदुधर्मात असताना लक्ष्मीबाईंनी हिंदू देवतांची भक्ती केली परंतु त्यांचा पिंड मुळात कवयित्रीचा असूनही हिंदूभक्तिपर कवितालेखन मात्र त्यांनी केलेले दिसत नाही. जे भक्तिपर लेखन त्यांनी केले ते ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर. ख्रिस्ताचा त्यांनी अंत:करणपूर्वक स्वीकार केला होता, ह्याची साक्ष —

मी दीन। जाहले लीन। तुझ्या चरणी रे!
तू आश्रय माझा, समाधान सारे।।
तव छंद खरा सुखकंद! तूच मम माय।

तू बाप! सखा तू! तूच बंधुराय! (उपासनासंगीत क्र. ३९३)

हे त्यांचे लेखन देते. तरीही 'दर नाताळात ख्रिस्ताविषयी कविता लिहिणाऱ्या लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांपुढे श्रीराम असल्याचे' विधान स.ग.यादवांनी केले आहे.[७] त्यात तथ्य नाही, असे लक्ष्मीबाईंच्या भक्तिपर कवितांवरून नुसती नजर टाकली तरी लक्षात येते किंवा उपासनासंगीतातील गीत क्रमांक ७३४ हे एकच गीत पाहिले तरीही हे लक्षात येईल. ख्रिस्ताविषयीच्या आपल्या भावना आपल्या अभंगांतून, कीर्तनांतून आणि नंतर केलेल्या ख्रिस्तायनलेखनातून लक्ष्मीबाई टिळकांनी अत्यंत निष्ठेने व्यक्त केल्या. ह्यावरून ख्रिस्ताशी त्यांनी किती घट्ट नाते जोडले होते, ह्याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

**बालकविता**

लक्ष्मीबाईंच्या बालकविता हा विषय स्वतंत्र लेखनाचा विषय होऊ शकेल असा आहे. सगळी लहान मुले त्यांना फार प्रिय होती. परमेश्वराने आपल्याला नातवंडे देऊन उपकृत केले ही भावना त्यांच्या मनात आहे. आपल्या तीन नातवंडांकडे त्या मोठ्या कुतूहलाने आणि कौतुकाने पाहताना दिसतात—

हीं मुलें वेलिवर फुलें हंसति किति डुलतीं
ही वेल लाविली प्रभु तूझ्या हातीं
साजिरीं किती गोजिरीं दिसति इवलालीं
तव दया थोर किति मजवरती झाली
किति किती बोलतो एक, बोबडा दुसरा
ही बाळ टकमका पाहि, गाल हसरा
हीं पुरी नाहिं तिजवरी अजुन खुललेली
तरि मला तयांनी कितीक भुलवीली

तइं गंध लावि मज छंद सुचूं नच देई
तो माझ्या ह्रदयीं भरुन पुरा राही (बालबोधमेवा, फेब्रु. १९३३)

कराचीला असताना शिक्षिका असलेली आपली सून रूथ ही शाळेत गेल्यानंतर लक्ष्मीबाई आपल्या तीन नातवंडांना त्यांची फर्माईश असेल त्याप्रमाणे गाय, पोपट, कावळा, चिमणी, उंदिरमामा-माऊमावशी, कुत्रा, मांजर, घार, गाढव, घोडा, उंट अशा विषयांवर झटपट मजेदार गाणे तयार करून रमवीत असत. हत्तीवरची त्यांची कविता मुलांच्या नजरेतून किती चपखल लिहिली गेली आहे ह्याचा प्रत्यय देते—

काय गडे–डोंगर चालत येत पुढें
त्यावरतीं–ना झाडी परि लव नुसती
पाय कसे–इमारतीचे खांब जसे
कानाचा–अकार माझ्या सुपलीचा[८]
इवलाले–डोळे जणुं झोंपीं गेले
दांत कसे–शेतकऱ्याचा फाळ जसे
किति लांब–अबब नाक हें कीं खांब[९]
मानेचा–घाट असे तो तुळईचा
शेपुट तें –शरीरा नच शोभा देतें
कां देवें–रुपडें ऐसें घडवावें?
खाद्य तरी–तोडून झाडें उदरिं भरी
सांग खरें–ह्या प्राण्याचें नांव बरें?

लक्ष्मीबाईंनी आपल्या लाडक्या नातवंडांसाठी अक्षरपाठ मनाने तयार केले होते. त्याच काळात लहान मुलांसाठी त्यांनी बऱ्याच कविताही लिहिल्या. एकीकडे आजीने रचलेले आकड्यांचे गाणे म्हणत म्हणत लक्ष्मीबाईंची नातवंडे आकडे लिहायला शिकली–

चला गडे घेऊन पाट्या लिहुं अकडे

१ बघ इकडे। एकाचें मुख डाविकडे
२ दोन कसे। अर्धा विंचू असाच दिसे
३ तीन तरि। डाव्या बाजुस हात पसरी
४ चार कसे। मांडी घालून शांत बसे
५ पांचानें। आ पसरुन वरती बघणें
६ सहा कसे। तीनाच्या तो उलट असें[१०]
७ साताचा। तुकडा पडला जिलबीचा
८ आठाची। अकडी प्रभुजी माळ्याची
९ नऊ कसे। एकाच्याही[११] उलट दिसे
१० अतां दहा[१२]। एकावरती शून्य लिहा.

लहान मुलांना समजेल, रुचेल, पटेल आणि भावेल अशा शब्दांत कविता रचण्याची हातोटी लक्ष्मीबाईंपाशी होती, हे ह्या कविता वाचून लक्षात येते. लक्ष्मीबाई एक उत्कृष्ट शिक्षिका होत्या, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

सिंहगड पाहून आल्यानंतर नातवंडांच्या चाललेल्या गप्पांमधून स्फुरलेल्या 'सिंहगड' ह्या कवितेच्या अखेरीस ही आपली लहानगी नातवंडे पुढे थोर देशभक्त होवोत म्हणून लक्ष्मीबाई भरल्या डोळ्यांनी त्यांना 'प्रभुजिच्या चरणांवरि' घालतात.

एका बडबडगीतात–

खडबड उठुनी लगबग जाशी सांग मला कोठें
धडपड करिति उंदिरमामा बडबडती तेथें
चटचट जाउनि पटपट धरितें खटपट करुनी पुरी
झरझर धरुनी चेंडू भरभर झेलिन वरचे वरी
बाळासम तो खेळ खेळुनी करमणूक ती करी

चटकन् मटकन् गटकन् करुनी उदरी त्याला भरी
(उंदिरमामा-माऊमावशी)

‘घनश्याम सुंदरा’च्या चालीवरची ही कविता मुलांना गायला किंवा बडबडायला न आवडली तर नवलच.

हिरव्या हिरव्या तरू वरी
हिरवा राघू नाच करी
पिवळा अंबा खात बसे
चोंच तांबडी वक्र दिसे
आंब्याला तो वदत पुढें
‘‘गंध माधुरी तुझी गडे
मोही म्हणुनी चाखीतों
भुरकन उडुनी मग जातों’’ (पोपट)

किंवा

आपल्याला दूध, दही, लोणी, तूप देणाऱ्या, संध्याकाळी घरी परतल्यावर आपल्या वासराला पाहताच आनंदाचे भरते येऊन ‘रसनेचे घालुन पाणी प्रेमाने त्याला न्हाणी’ अशा आपल्या कपिलेची ओळख ‘आनंदी आनंद’च्या चालीवरच्या ‘गाय’ ह्या कवितेतून लक्ष्मीबाई आपल्या नातवंडांना करून देतात. कावळ्याची भल्या सकाळची कावकाव ही देवाला भजण्यासाठी आणि मुलांना उठवण्यासाठी असते, त्याचा काळाकुळकुळीत रंग हा कोळशात खेळल्यामुळे किंवा कुणी त्याच्या अंगावर शाई ओतल्यामुळे त्याला प्राप्त झालेला नसून ‘देवाच्या इच्छेचा’ असल्याने त्याची टिंगलटवाळी न करण्याची सुप्त शिकवण ‘कावळा’ ह्या कवितेतून लक्ष्मीबाई देतात आणि–

घडवंचीवर काय ठेविली गादीची वळकटी
दो बाजूंना शेप शिंग ही आणण्यास बळकटी

कसा पाहतो बारिक डोळे कानहि उंचावले
नाकावरचे शिंग दिसे की इंजिन घाटातले

असे गेंडा ह्या प्राण्याचे गमतीदार वर्णन करून मुलांना त्या रिझवतातदेखील.

लक्ष्मीबाईंना स्वत:ला खेळाची खूप आवड होती. एक मूल झाल्यानंतरही त्यांचे पोरपण सरले नव्हते. पुढे कविता लिहू लागल्यानंतर त्यात खेळाचे संदर्भ त्या सहजपणे लिहून गेलेल्या दिसतात. नऊखऊच्या खेळात खडे वर फेकून अलगद झेलणे, झेलता झेलता खालचे खडे सफाईदारपणे सगळेच्या सगळे सर्रकन उचलणे असे खेळ खेळणाऱ्या लक्ष्मीबाईंच्या उल्हसित, उत्स्फूर्त आनंदी वृत्तीचे दर्शन खेळाच्या संदर्भातील त्यांच्या कवितेतून होते.

हा टिपऱ्यांचा खेळ पहा मजेचा खेळ खेळुं या सर्वजणी
तालावरती फिरूं रंगणी आनंदे गाऊं गाणीं
बोले टिपरी बोल माधुरी भारी अपणां अंतरीं
पाय नाचती, मनें नाचती, आनंदाच्या गिरीवरी

(टिपऱ्यांचा खेळ)

आपल्या खेळाच्या आवडीचे संदर्भ लक्ष्मीबाईंनी भक्तिकाव्यातही वापरलेले दिसतात–

वेळोंवेळीं चिंता खेळे छुपापाणी
तिने नेत्रे दोन्ही झाकियेली
भाव, प्रेम, आशा बंधू ह्या भगिनी
बसती लपोनी कोठे तरी
आनंद, उल्लास शेजारची पोरे
जाती चार घरें लपण्याला
फिरुनी डाव मजवर

भाबडी ही पोर पुन्हा फसे
दासाची ही दासी खेळुनी दमली
विसांवा पावली तुझ्या पायी

(ज्ञानोदय ११-११-१९२०)

किंवा

कन्या मी लाडकी देशी भातकूली । जीवीत बापुडे झुगारू दे
झुगारिता त्याला पुढे निरंतर। ख्रिस्ताच्या समोर राहो दासी

( ज्ञानोदय ३०-१०-१९३०)

आणि माहेराला तुझ्या घरी आले तर, माझा कोण बडेजाव असतो, असे संदर्भ लक्ष्मीबाईंच्या भक्तिकाव्यात येतात तेव्हा संत कवयित्रींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कधीतरी त्या देवापाशी आपली तक्रार मांडून म्हणतात–

तुझे सर्व हीरे सर्व हिरकण्या
मला कांचकण्या कां दिसाव्या?
रात्र मीपणाची कधीं संपणार
दिन तो येणार कधीं तूझा? (ज्ञानोदय १-४-१९२०)

'लक्ष्मीबाईंनी ख्रिस्ती लहान मुलांसाठी संत रामदासांच्या वळणावर मनाचे श्लोक लिहिले आहेत. सुलभ अर्थबोध, भाषेचा अस्खलित ओघ व अधिकारी वाणीची परिणामकारकता हे या श्लोकांचे विशेष' असल्याचे भ.श्री.पंडित ह्यांनी 'भरली घागर'च्या प्रस्तावनेत (पृ.२२) म्हटले आहे. परंतु दुर्दैवाने ते श्लोक उपलब्ध होऊ शकले नाहीत.

'ज्ञानोदय'च्या 'बालबोधमेव्या'च्या संपादिका सुटीसाठी स्वदेशी जायला निघाल्या तेव्हा त्यांचा प्रवास सुखरूप व्हावा आणि त्या 'खुशाल येउन परत लौकरीं भेटो अपणाला' म्हणून 'मुलांनो, प्रार्थना करा' हे त्यांनी लिहिलेले लहानसे पद प्रासंगिक असले तरी प्रार्थनेची शिकवण देणारे आहे.

## पतिपत्नीविषयक कविता

लक्ष्मीबाईंच्या काव्यलेखनाची सुरुवातच मुळी पतिविरहाच्या कल्पनेतून झाली. लक्ष्मीबाई स्वत:ला जड सतार आणि पतीला 'कुशल कराचा कवी' मानतात. त्याचा स्पर्श झाल्यावर आपल्याला मधु मृदु वाचा फुटते असेही सांगतात.

मी वेणू, मज नसे स्वतांचा ध्वनी, परंतू त्याचा
श्वास पुरे मजठायिं भराया प्रवाह गानरसाचा!

आपल्या काव्यप्रतिभेचे सारे श्रेय पतिचरणी अर्पण करतात.

यास्तव कोणी म्हणो हवें तें, स्वयंसिद्ध मी नाहीं,
निजपतिसंगे, मागुनि त्याच्या नव काव्यें मी गाई!

कवी असलेल्या पतीचे अनुकरण आपण करतो, त्याच्या मानाने आपण कवितेच्या विश्वात नगण्य आहोत, हे सांगताना त्या म्हणतात–

तशांत मी तर लोहच केवळ, तुला सांगतें स्पष्ट!
त्या परिसाच्या संगें झालें सोनें गे उत्कृष्ट!
त्या परिसाचा, कविरायाचा, पतिरायाचा मान
पाहुनि माझी कृती करावा, हेंच पुरें मज दान!

('पतिपत्नी', मनोगत दिवाळी, १९१०)

'करंज्यामध्ये मोदक कशाला?' ही कविता वाचून पंढरपूरच्या अंबूताई ऊर्फ लक्ष्मीतनया (सत्यभामाबाई जिवाजीराव पटवर्धन) ह्या कवयित्री भगिनीने लक्ष्मीबाईंना पत्रातून प्रश्न केला होता–

मोदक बहु गोड असे आकारहि सुबक साधला बाई
तव भर्त्याचें त्याला साह्य नसे का कथी मला ताई?

खरे तर ही आर्या अंबूताईंच्या पतीने लिहून दिली होती. अंबूताई आणि लक्ष्मीबाई ह्यांची भेट सखाराम टिळकांच्या घरी झाली होती आणि नंतर

त्यांची चांगली मैत्रीही झाली होती.

ह्यावर लक्ष्मीबाईंनी पतिपत्नी दोन असूनही एक कशी ह्याची उदाहरणे सूर्य-प्रभा, चंद्र-चंद्रिका, नदी-सागर ही निसर्गातील प्रतीके घेतली आणि स्त्रीसुलभ स्वभावा-अनुभवानुसार स्वयंपाकघरातील एक उदाहरण घेतले. करंज्या केल्या की एक लहानसा मोदक केला जातो, पुरणाच्या पोळ्या केल्या की एक कानवला करतात, ही जोडीची पारंपरिक रीत आहे. तद्वतच नर-नारीची जोडी अभंग आणि आवश्यक आहे, ही हिंदकन्यकांची संस्कृती आहे, असे लक्ष्मीबाईंचे मत होते.

टिळकांच्या निधनानंतर दोन महिन्यांनी वसंतराव कुकडे ह्यांनी लक्ष्मीबाईंना कविता करण्याचा आग्रह केला तेव्हा–

गा गा गाणे म्हणतां मजला गाउं कोणत्यापरी
नाद ना गाण्याचा ये जरी
वसंत गेला, कोकिल गेला, लुप्त जाहला ध्वनी
गान मग मजला ये कोठुनी

अशी त्यांची अवस्था होणे साहजिक होते. कारण –

मम गाणें ना, तें गाणारा मम धनी
पडसाद मी, तया देइं सुराला झणीं
हे सत्य राहुं द्या ठेवा अपुल्या मनीं,
कोकिल गेला, गान हरपलें, गाऊं मी मग कसे
शून्य मी अंकावांचुन असें. (गाउं कोणत्यापरी)

लक्ष्मीबाईंच्या पतिपत्नीविषयक कवितांतून कवी असलेल्या त्यांच्या पतीशी–टिळकांशी त्यांचे नाते किती हृदयंगम होते ह्याची कल्पना येते.

**राष्ट्रप्रेमविषयक कविता**

लक्ष्मीबाईंचा काळ हा इंग्रज राज्यकर्त्यांचा काळ होता. देशाविषयी

आत्यंतिक प्रेम असूनही राणीप्रत निष्ठा अनेकांच्या मनात होती. 'परलोकवासिनी महाराणी सार्वभौमिनी व्हिक्टोरिया' असे लांबलचक शीर्षक असलेली ही कविता तिचे प्रतीक म्हणता येईल. (बालबोधमेवा मार्च १९०१), 'बालबोधमेवा'च्या संपादिका स्वदेशी जायला निघाल्या तेव्हा लक्ष्मीबाई त्यांना शुभेच्छा देतात. प्रासंगिक कवितांना जशी फारशी खोली नसते, तशीच ही कविता आहे.

जिकडे तिकडे खिन्नता। खिन्नता। नाही कोठे भिन्नता।।
तुम्ही जनांत पहा। तुम्ही मनांत पहा।।
राणी गेली परलोका। परलोका। राव रंक करिती शोका।।
तुम्ही जनांत पहा। तुम्ही मनांत पहा।।

ह्यांतील दुसऱ्या ओळीची पुनरावृत्ती प्रत्येक कडव्यात करत मुळात आठच ओळी असलेली ही कविता लक्ष्मीबाईंनी वाढवत नेली आहे.

त्याकाळी स्वातंत्र्याचे वारे वाहत असताना इतर धर्मीय स्त्रियांच्या प्रभातफेऱ्या निघत. मराठी प्रोटेस्टंट स्त्रियांच्याही प्रभातफेऱ्या निघत. त्यात लक्ष्मीबाईंची गीते गायली जात. राष्ट्रप्रेमासोबतच व्यसनमुक्तीचे संदेशही त्या आपल्या गाण्यांतून देत असत.

सोडू व्यसने तोडू बंधन मातृभूमिला करुनी वंदन
शपथ वाहुनी सांगू तिजला तुजवर सारा जीव

(बालबोधमेवा, सप्टेंबर १९३०)

स्वातंत्र्यचळवळीत सहभाग दिल्यामुळे नेतेमंडळी जेरबंद झाली होती. कारागृह हे समतेचा, नम्रतेचा आणि सेवाधर्माचा धडा शिकवणारे गृह असल्याचे सांगून लक्ष्मीबाई म्हणतात–

शंभरजण राहती ज्या स्थळीं मुंगिस नच शिरकाव
काय वानुं त्या स्थळ महत्तीला देऊं काय तया नाव
अहा हेंच स्थल पाजी पाणी एकच मडक्यांतून

जाती गोती कुठल्या येथें जातिल मृत होऊन
गृहदारांचा त्याग करोनी कारागृहिं जे गेले
धन्य महात्मा धन्य नेहरू शिष्य तयांचे झाले (कारागृह)

व्यसनापायी आपला देश बुडाला आहे, दारिद्र्याचा धनी झाला आहे, तेव्हा –

हिंदमाय ही गाय अभागी फोडी हंबरडा।
ख्रिस्ती जन हो चला पुढे व्हा हे बिरडे सोडा
दडपशाहिचा फांस लागला, सुरा असूरीचा।
तिच्या कारणें नाश जहाला अपुल्या राष्ट्राचा
...
तोडा बंधन करा मोकळी हंबरते गाय।
व्यसने सोडा पदर पसरुनी विनवीते माय

(ज्ञानोदय १४-८-१९३०)

बायबलमधल्या मोझेसने जसे मिसर देशात दास्यत्वात असलेल्या आपल्या बांधवांना एकत्र करून परत पॅलेस्टाईनमध्ये आणले, तसे आपणही एकत्र येऊन स्वातंत्र्य मिळवण्यासाठी झटले पाहिजे अशा आशयाची त्यांची कविता 'ज्ञानोदय'मध्ये प्रकाशित झालेली दिसते (४-९-१९३०).'स्वदेशी मालाचा पुरस्कार' आणि 'विदेशीमालावर बहिष्कार' हा मंत्रघोष सर्वत्र असताना

जागा रे जागल्यांनो। हुशियार रे मागल्यांनो, अशी हाळी देत –

...वस्त्र हे परदेशी। मउ लागे म्हणुनी घेशी
देह हा सजवीशी। परक्याला धनि बनवीशी
...नाश रे नाश झाला। आतां तरी उघडी डोळा (जागा रे)

असे आग्रहाचे प्रतिपादन देशप्रेमापोटी लक्ष्मीबाई करतात. कव्वालीतून लक्ष्मीबाई 'वंदे मातरम्'चा नारा देतात. इथे त्यांचा देशाप्रत असलेला

भक्तिभाव येशूभक्तीसकट प्रकट होतो परंतु तो बेगडी मात्र वाटत नाही.

नच हिंदपुत्र डरणार। पुढें सरणार
...राष्ट्राच्या चौफेरांत वणवा हा भडके आंत ।
विझविण्या जीव देणार । पुढें सरणार

असे प्रोत्साहन देत -

कुणि देउं वित्त चित्ताला। कुणि देउं देह देशाला
कुणि देवा आळविणार। पुढे सरणार

(पुढे सरणार, ज्ञानोदय, २१-८-१९३०)

असे आवाहन भारतीय वीराला करताना जगाच्या नाथाला तूच आता आमचा नेता होण्याचेही आवाहन करतात जेणेकरून विजय निश्चितपणे आपल्या पारड्यात पडेल, असा विश्वास लक्ष्मीबाईंना वाटतो. स्वदेशासाठी जसा येशू रडला, मनात आत्यंतिक दु:खाने कळवळला ते ध्यानात घेऊन 'स्मरा आपुल्या गुरुवरा' (ज्ञानोदय ४-९-१९३०) आपल्या देशासाठी लढा, मदिरापानाने धुंद होऊन नाचू नका असे लक्ष्मीबाईंचे आपल्या देशबांधवांना विशेषत: ख्रिस्ती बांधवांना कळकळीचे सांगणे होते.

'वंदे मातरम्' हे त्यांचे गीत 'कव्वाली' म्हटले गेले असले तरी ते एखादे उत्तम मार्चिंग साँग असावे तसे आहे. देवभावना आणि देशभावना ह्यांचा सुरेख संगम त्यात दिसतो.

ऊठ जीवा, प्रार्थि देवा, बोल वंदे मातरम्
चालतांना हाच चालो मंत्र वंदे मातरम्
येशु पायिं ठेवि डोई बोल वंदे मातरम्
घट्ट त्याचा हात धरुनी बोल वंदे मातरम्
कार्य करितां जन्मभूचें घोष वंदे मातरम्
शुद्ध भावें शुद्ध गावें मंत्र वंदे मातरम्

मातृभूचा मंत्र सोपा बोल वंदे मातरम्

(ज्ञानोदय २३-४-१९३१)

ही कविता टिळकांच्या 'धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे', ह्या विचाराला फक्त पुष्टी देणारी कविता नसून लक्ष्मीबाईंचे देशप्रेम व्यक्त करणारीही कविता आहे, शिवाय धर्म कोणताही असो, देशाला आदरभावनेने वंदन करण्यात काहीच गैर नाही, असे सांगणारी ही महत्त्वाची कविता आहे.

**सामाजिक कविता**

समाजातील काही अयोग्य वाटणाऱ्या गोष्टींवर लक्ष्मीबाईंनी आपल्या कवितेतून कोरडे ओढले आहेत. त्यापाठी फक्त सामाजिक जाणीव नव्हती तर राष्ट्रीय भावनासुद्धा होती, हे सांगणारी 'बाटली' ही कविता पाहा-

चला चला हो बंधु भगिनींनो फोडा फोडा बाटली
...
पहा नाश हो हिंदभूमिचा ह्या मदिरेच्या पावली
एकामागें असंख्य जाती यमसदनाच्या साउली

(बाटली, बालबोधमेवा, ऑगस्ट १९३०)

जो दारूच्या नादी लागून धनसुतदारेला मेला, ज्याने नशेपायी अब्रूचा खुर्दा केला, तो आज इतका हतबल झाला आहे की, त्याला गटारगंगेत स्नान करण्यावाचून दुसरे काहीच जमत नाही, अशा आशयाची त्यांची 'स्नानासाठीं' ही कविता आहे.

त्याकाळी तीव्र असलेला जात-वर्णभेद लक्ष्मीबाईंना अमान्य होता. 'वाल्ह्या कोळ्याला रामाचे नाव घेता येते, माता न ही वैरिणी म्हणावी अशा कैकयीला सारे राज्य घेऊन टाक म्हणणाऱ्या रामाने तिला दूर सारले नाही, शबरीच्या उष्ट्याचा बाट ज्याने मानला नाही,

त्या रामाचे दर्शन घेण्यास कुणालाही मनाई असू नये, ते सगळ्यांना खुले असावे' हे सांगताना लक्ष्मीबाई उद्गारतात–

जो जाहला जगाचा। त्या कासया छळीता?
कां टाकता तयाला । बंदीत भक्त बोला।।
बाटास वाट द्या रे। एकत्र होउं सारे।।
स्वातंत्र्य भारतात। द्या घ्या हातात हात।। ('रामास बाट नाहीं)'

राम मंदिर-सत्याग्रहास उग्र स्वरूप येऊ लागले तेव्हा लक्ष्मीबाईंनी 'पतित पावन' पत्रास ही 'रामासि बाट नाहीं' ही कविता प्रसिद्धीसाठी पाठवली. ती प्रसिद्ध झाली (७-३-१९३१) पण —

***'खाली दिलेली कविता एका अस्पृश्य भगिनीने प्रसिद्धीसाठी पाठवलेली आहे. तिला आम्ही मोठ्या आनंदाने प्रसिद्धि देतो.'***

संपादकाने तीवर दिलेल्या वरील टिपेसह! एक ब्राह्मण स्त्री ख्रिस्ती धर्म स्वीकारते म्हणून तिला अपमानित करण्यासाठी आपल्या हाती असलेल्या मुद्रणसामग्रीचा अशा पद्धतीने वापर करून पूर्वग्रहदूषित मनाच्या संपादकाने आपल्या कोत्या मानसिकतेचे दर्शन घडवले एवढेच ह्यावर आता म्हणता येते.

चंद्र सूर्य ग्रह तारे आम्हा शिकविती सारे
एक्या गृही राहण्याचे नको भांडण कोणाचे
....
सारी देवाची लेकरें भेद मी तू ऐसा कां रे
देवा दासी विनविते मोड तोड त्या भेदातें

(ज्ञानोदय २८-१०-१९२०)

लक्ष्मीबाई टिळक असताना आणि नंतरही काही दिवस पंडिता रमाबाईंच्या सहवासात राहिल्या होत्या. पंडिता रमाबाईंच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव लक्ष्मीबाईंवर पडला असावा, असे त्यांच्या

स्त्रीजाणिवेच्या काही कवितांवरून वाटते.

'बहिष्कृत याला आधी करा' ह्या कवितेत समाजाला गदागदा हलवून जागे करण्याची लक्ष्मीबाईंची धडपड दिसते.

...आळस झाडुन फेंका दुरी।
किती युगांची नीज लागली, सरेल केव्हां तरी।
बघता वाट अतां कुठवरी?
ही पशुवृत्तीची पेठ उघडिली दिसे।
ह्या निर्लज्जेला कसें लागलें पिसें।
की अंध जहाली, पुढलें ना तिज दिसे।
थोर पोर वा वृद्ध तरुणही कोणी येता जरी।
तुडवुनी माती त्याची करी।।

कित्येक ललना काळोखाच्या दरीत पडल्या, त्याचा कुणाला ना खेद ना खंत. बाईच्या माथ्यावरचा पदर ढळू न देणारे, तिला कुठल्याही परिस्थितीत दिल्या घरी नांदायाला भाग पाडणारे, आपल्या तथाकथित प्रतिष्ठेचे स्तोम माजवणारे आणि आपल्या शिरावर भरजरी पागोटे हवेच म्हणणारे वडील, भाऊ, मुलगे ह्यांचा लक्ष्मीबाई धिक्कार करतात. वृद्ध बिजवराने पुत्रप्राप्तीसाठी बालविधवेला आधाराची काठी मानावी, ही गोष्टही त्यांना पटत नाही. सुखाची प्रत्येकाची व्याख्या वेगळी असते. 'जगा शिकविता एक, वागता आपण दुसरे परी, रीत ही तुमची तुमच्या परी।।' ह्या परखड शब्दात सुनावून त्वेषाने त्या उद्गारतात–

ही पतिता म्हणुनी हिला दूर लोटिता।
तो पतितपावन पावे अधिकारता।
हा न्याय कोठला, परि तुमची मान्यता।
उघडा डोळे, पुरा ओळखा कोण पतित हा खरा।
बहिष्कृत आधी याला करा।।

समाजातला त्या काळचा महत्त्वाचा आणखी एक भेदभावाचा विषय म्हणजे स्त्री-पुरुष भेद. त्याविषयी लक्ष्मीबाई फार सुंदर रीतीने आपले मत मांडतात–

नरनारीसम जिकडे तिकडे पाही वर बघ खालती।
पहा जगी कोठेही।।
वर सूर्य एकला, नाही! क्षणभर नाही!
ही प्रभा नित्य त्या आलिंगुनिया राही.
हा चंद्र एकला, नाही! हाही नाही!
ह्यासवे चंद्रिका सदैव रमलेली ही।....
नरनारीसंगम हीच संस्कृती बाई!
विश्वात एकले कुठेच नाही काही

पतीपत्नी दिसायला दोन व्यक्ती दिसत असल्या तरी ती एकच होत, एकमेकांना पूरक होत, स्त्रीला पतियोगे पूर्णता लाभते अशी लक्ष्मीबाईंची विचारधारणा होती.

नरा सोडुनी आम्ही राहू स्वतंत्र ज्या म्हणतील
नारी नच त्या, दुसरिच सृष्टी! भलते त्यांचे शील!
तशांत जगतीं जिणें स्त्रियांचे अपूर्णतेची खाण,
जगा पूर्णता शिकवायास्तव करी प्रभू निर्माण!

आजच्या काळात ही विचारधारा कालबाह्य वाटत असली तरी लक्ष्मीबाईंच्या काळात सर्वसाधारणपणे हीच समजूत होती. स्त्रिया आपल्या नात्यातल्या पुरुषांवर बऱ्याच प्रमाणात अवलंबून होत्या. मग तो पुरुष वडीलधारा असो किंवा त्याची जागा घेणारा एखादा अल्पवयीन का असेना.

जग सुखाने नांदावे अशी इच्छा बाळगणाऱ्या लक्ष्मीबाई म्हणतात–

देवा जगवाटिकेत दया ताटवे फुलू दे

ममत्वाची सुमने ती तयांवरी दर्वळू दे
(ज्ञानोदय २७-११-१९३०)

ही कृपा करणारा 'तुझ्याविना कोणता माळी' आहे, असाही प्रश्न त्या देवाला विचारतात.

समाजातील आणि कुटुंबातील वातावरणाचे चिंतन लक्ष्मीबाईंच्या कवितेत उमटल्याशिवाय राहिले नाही. लक्ष्मीबाईंपुढे मानसिक तणावाचा प्रसंग आला की, त्यांची मान डुगूडुगू हलू लागे. त्यांचे पुत्र देवदत्त त्यांना म्हणायचे, 'तू जगाच्या काळज्यांचा डोंगर डोक्यावर घेऊन फिरतेस म्हणून तुझं डोकं हलतं.' त्या संदर्भात चितारूपी नणंद आणि ममतारूपी सासू असा मोठ्या खुबीने उल्लेख करत 'सासुरवासी'ही कविता 'भक्ति ग वेणी'च्या चालीवर त्यांनी लिहिली.

लक्ष्मीबाईंना एक कविता म्हणण्याचा आग्रह नेहमी होत असे.

ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे,
तू उभी लागले कुठे कुठे तव डोळे
...
तू प्रसन्न आता क्षणि खिन्न तू होशी,
मेघात गवसला चंद्रच दुसरा दिसशी
ये हासत आता आलिंगी मज बाळे,
मी तुझी मावशी तुला न्यावया आले
(मनोरंजन दिवाळी, १९१२)

ही कविता लिहिताना लक्ष्मीबाईंसमोर त्यांच्या भिकुताईची घारूमाई असावी. समवयस्क असल्याने घारूमाईशी त्यांची विशेष मैत्री होती. नवऱ्याकडून तिला झालेल्या जाचामुळे आणि त्याच सुमारास ती आजारी असल्यामुळे लक्ष्मीबाईंना तिच्याविषयी विशेष ममत्व वाटत होते.

**प्रासंगिक कविता**

Poetry is the spontaneous overflow of powerful feelings recollected in tranquility. वर्डस्वर्थच्या ह्या उक्तीप्रमाणे लक्ष्मीबाईंना अनेक प्रसंगी कविता स्फुरल्या आहेत. ते ते प्रसंग त्यांना त्या त्या वेळी महत्त्वाचे वाटलेले दिसतात.

'संकटांची माळ घेऊन विक्राळ आला होता काळ दारापुढे' असा प्रसंग १२ जुलै १९३१ रोजी टिळकांच्या घरात घडला. रात्री चुलीवर तापत ठेवलेल्या दुधात पाल शिजून निघाली होती. लक्ष्मीबाई सोडून सगळे दूध पिणारे होते. 'माझ्याखेरीज टिळकघराण्यातील कोणीच १३ तारखेला उरले नसते. माझे उरलेले आयुष्य आणखी दु:खात पडू नये अशी त्या जगन्माऊलीची योजना होती, हे उपकार मी कसे फेडू?' असे 'अमृतविषाचे कुंभ मजपुढे' ह्या कवितेच्या आधी दिलेल्या टिपेत त्या म्हणतात (ज्ञानोदय १६-७-१९३१).

'देव तारी त्याला कोण मारी!' ही कविता प्रासंगिक म्हणता येईल अशी आहे. एकदा रात्री पोटशूळाच्या वेदनेने कासावीस झालेल्या टिळकांनी औषध घेतले. तात्पुरता आराम वाटला पण पुन्हा पोटदुखी सुरू झाली. पुन्हा टिळकांनी तेच औषध घेतले. असे बारा वेळा घडले. औषध अप्रमाण झाल्याने त्याचा परिणाम विपरीत झाला. टिळकांची शुद्ध हरपली. अचानक एक अनोळखी बाई दार ठोठावून नातेवाईकाची ओळख देत घरात आली. ती निघून गेली पण तिने एक मोठे काम केले, ते म्हणजे घरातल्या सगळ्यांना जाग आणली. टिळकांची अवस्था त्यामुळे ध्यानात आली. त्यांच्यावर लगेच उपचार करता आले. टिळकांचे प्राण वाचले. हा प्रसंग लक्ष्मीबाई लिखित स्मृतिचित्रांत आढळत नाही. परंतु 'भरली घागर' मधील 'देव तारी त्याला कोण मारी' ह्या कवितेत त्यांनी तो नमूद केलेला आहे.

भलत्याच रात्री भलतीच बाई, उठवोनी जाई आम्हां सर्वां
खरोखर ही तों देवाची योजना

अशी लक्ष्मीबाईंना खात्री वाटते आणि त्या म्हणतात—

बाप माझा देव साधा माझा भाव ख्रिस्त माझी नाव तारणाची
प्रभूची कृपा ही एक माझी लक्ष्मी, दरिद्र कधी ती नाही नाही।।

(अहमदनगर,२०-१०-१९०२)

वरील दोन्ही कवितांमध्ये लक्ष्मीबाईंनी देवाचे आभार मानले आहेत.

आपली मुलगी तारा ही इंग्लंडला जायला निघाली तेव्हा 'दौलत तुजला देते', म्हणत एक अपेक्षा व्यक्त करतात–

मम आशेला पूर्ण करीतो माझा ईश्वर बाप
वृक्ष लाविला फळें तयाला येती आपोआप
जा जा बाळे इच्छित सारे पूर्ण करोनी येई
टिळक कुळीचा जनसेवेचा भालिं टिळक तूं लेई

कुमारी सीताबाई भागवत ह्यांच्या मृत्यूची बातमी ऐकून –

शोक तरूवरी फुले हारो हारी
त्यांची घे दुहेरी तुज माला
शारदेचा वीणा तूहि त्याची तार
थोर झणत्कार झाला गेला (कुमारी सीता)

अशा शब्दांत आपला शोक लक्ष्मीबाई व्यक्त करतात.

कुणाच्या तरी 'एकुलत्या मुलाचा वाढदिवस' म्हणून त्याला आपल्या कवितेतून –

वाढ वाढ बाळा कान्ते बरोबरी, लक्ष्मी तुझ्या घरी वास करो,
वाढ वाढ बाळा बाळांबरोबर, शारदेचे घर तुझे होवो
वाढ वाढ बाळा बिघ्या खंडि ऐसा, गरीबाला पसा पसा देई
वाढ वाढ बाळा गंगेच्या समान, गावो गावा मिळुन नेई शान्ति

वाढ वाढ बाळा वृक्षाच्या समान, कर शान्त श्रान्त छायेखाली
वाढ वाढ बाळा मेरूच्या सारीखा, ज्ञाती धर्म हेका, लोपो सारा
वाढ वाढ बाळा उदधी परीस, उदार मानस तुझे होवो

असा भरभक्कम आशीर्वाद देतात तर, कधी शरश्चंद्र नामक 'मुलाचें म्लान मुख बघून' लक्ष्मीबाई त्याच्या खिन्नतेचे कारण जाणून घेण्यासाठी

वाऱ्यासंगे धावत सुटले
अवडंबर ते पुढती आले, तुला लपविले?
शीतकराला कोणी पीडिले?
राहू केतु तव कोण जहाले?
सूर्यबिंब का बुडले म्हणुनी?
अंधार पसरला पाहुनी?
दु:ख तुला झाले?

असे काही प्रश्न त्याला आपल्या कवितेतून विचारताना दिसतात. हा शरश्चंद्र दुसरा तिसरा कोणी नसून त्यांचे एकुलते एक चिरंजीव देवदत्त हे होत. देवदत्तांना जन्मल्यापासून जी पाच नावे ठेवण्यात आली होती, त्यापैकी शरश्चंद्र हे एक नाव.

देवदत्तांचे चिरंजीव नारायण. ह्या नातवाविषयी लक्ष्मीबाईंच्या मनात विशेष ओढ असण्याचे कारण तो लक्ष्मीबाईंचा पहिला नातू. शिवाय टिळकांच्या मृत्युनंतर थोड्याच दिवसांनी घरात आलेला हा पहिलाच आनंद. टिळकांच्या अखेरच्या दिवसांत ते दवाखान्यात असताना त्यांच्या दाढीचे दोन केस त्यांच्या सुनेने कापून घेतले होते आणि नारायण जन्मला तेव्हा त्याच्या हनुवटीवर नेमके दोन केस जन्मत:च होते! तेव्हा हिंदुधर्मातली पुनर्जन्माची कल्पना कुठे तरी लक्ष्मीबाईंच्या मनात जागी झाली असण्याची शक्यता आहे. टिळकांचेच नाव त्याला देण्यात आले होते.

पुढ्यातले हे चिमुकले बालक पाहून लक्ष्मीबाईंना आनंदाश्रू आवरेनासे झाले. 'रडविती हसविती जुन्या नव्या आठवणी','एक नयन मम गाळी अश्रू दु:खाचे परि दुजा म्हणे मज सौख्याश्रूंनी भिजा', हा वंशवृक्ष फुलला पण 'सुखदु:खाचा वाटेकरि मम माझ्याजवळी नसे', स्वर्गात तो 'देवाजवळी विनंती करी, ही रिती जहाली जागा, परतुन भरी, जगि सेवा माझी नाही झाली पुरी, म्हणुन धाडिली जोड नवी ही' अशी भावना व्यक्त करत लक्ष्मीबाई परमेश्वराचे आभार मानतात. (चिमुकले बालक माझ्यापुढे) हा नातू नुकताच बोलू लागला तेव्हा लक्ष्मीबाईंनी कौतुकाने 'चिमुकल्या! बोल!' ही कविता लिहिली.

नाशिक येथे मुलाने बांधलेल्या 'शांतिसदन'मध्ये गृहप्रवेश (२९ मे १९३२, ज्ञानोदय २ जून १९३२) केल्यावर हे 'शांतिसदन' नावाप्रमाणे सार्थ ठरो, देवाचा सन्मान इथे कायम होवो, अशुद्धता जळोनि जावो अशी मनोमन प्रार्थना लक्ष्मीबाई ईश्वराकडे करतात.

शान्ति प्रीती मैत्रिणी जोड देई त्यांच्या योगे सासरीं गोडी होई
तेथें सान थोरल्या मान देई भक्ती सारी राहुं देई पतीशीं

असा सासरी जाणाऱ्या कोणाच्याही मुलीला उपयुक्त ठरेल असा 'उपदेश' लक्ष्मीबाई करतात. आणि –

ये घे देतें आशीर्वचना आज तुला बाई
धनधान्यानें पूरित केतन, उणें न तुज कांहीं
विद्येचा तूं हात धरोनी येशिल गे पुढतीं
बाळ गोजिरें घेउन बसशिल तूं अंकावरतीं
पति सौख्याचा लाभ लाडके तुजला होईल
नवे नवे वर परमेशाची कृपाहि वर्षेल

असा 'आशीर्वाद'मनापासून भरभरून देतात.

*कै. गंगाधर रामचंद्र मोगरे या कवीनंतर लक्ष्मीबाईंनीच बऱ्याचशा*

*प्रासंगिक कविता लिहिल्या. प्रासंगिक कवितांत हृदयाची तीव्रतर हांक नसल्यामुळे त्यांत फारसा रस उतरूं शकत नाही असे सामान्यत: म्हणता येईल. परंतु मोगऱ्यांच्या कांहीं कवितांप्रमाणें लक्ष्मीबाईंच्याहि कांहीं कविता यास अपवाद आहेत,* असे मत भ.श्री.पंडितांनी व्यक्त केले आहे. (भरली घागर, पृ.२१)

'तिळगूळ' ही कविता बाळपणीच्या मैत्रिणीला उद्देशून लक्ष्मीबाईंनी लिहिली आहे. त्यात आपण तिळासारख्या चिमुकल्या असतानाच्या आठवणी आता फिक्या झाल्या असल्या तरी मैत्रीचा पाक चढवत राहून लोकांपुढे आदर्श ठेवू या आणि –

गोडी जरि अंतरी वरिवरी कांटा उभा पाहुनी
दुष्टावा करण्या धजो न किमपी तो दुष्ट लाजो मनीं

अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**निसर्गकविता**

पृथ्वीवर नवेपणा उदयाला आणणारा 'वसंत' संपूर्ण विश्वाला हर्षाने डोलायला लावतो, 'सृष्टिमाय बाळाते रमविते, खेळते' तशा लक्ष्मीबाई आपल्या नातवंडांत रमतात, तोच त्यांच्या आयुष्यातला 'वसंत' अशी त्यांची भावना आहे. लक्ष्मीबाईंच्या कवितेत निसर्ग ठळकपणे आणि स्वतंत्रपणे फारसा येत नाही. भावना प्रकट करण्यास पुरेल एवढ्याच प्रमाणात तो डोकावतो. निसर्गाचा नियम मानवालाही लागू होतो हे सांगताना त्या म्हणतात–

मीच एकलीने निराळे का व्हावे? हसावे रडावे नेम तूझा
हासते रडते तुला गाणी गाते
नवल ते कोणते झाले सांग? (ज्ञानोदय १८ मार्च १९२०)

सागरकिनारीचा गालिचा कुणी बनवला, तो कारागीर कुठे बरे गेला? ही सुंदर सृष्टी घडवणारा कलावंत कुठे बरे लपला? सागरकाठच्या वाळूत जलचरांच्या हालचालीमुळे वेगळीच तयार होणारी चित्रकला कुणी नावाजली तर कुणी पायदळी तुडवली पण ती पाहून सागर मात्र खुलला, हसला, नाचला, डुलला, असे सुरेख वर्णन असलेली 'कारागीर' ही एक सुंदर निसर्ग कविता लक्ष्मीबाईंच्या लेखणीतून उतरली आहे.

निरनिराळ्या विषयांचा समावेश असलेल्या 'धुंधुर्मासाची खिचडी' ह्या कवितेत निसर्गाचे दर्शन काही प्रमाणात लक्ष्मीबाई घडवताना दिसतात. त्यात 'रक्तांबर झालेले अंबर', 'काळे डोंगर, काळी रानें, काळी शेतें, अंधाराचे रान माजले', 'अंधाराला मागे सारून डोकावणारी चमचमणारी इवलाली डोकी', 'पिंजाऱ्याने कापुस पिंजुनि ढिग मोठा केला, दो हातांनी ढकलुनि त्याते शशी पुढें आला', वाऱ्याचे इकडून तिकडे वाहत कुणाला बी, कुणाला गंध, कुणाला पराग असे कुणाकुणाला काही ना काही देणे, सृष्टिसतीने अवघ्यांना शेले-शाली मातेच्या ममतेने पांघरणे, 'तृणांकुराचा पदर जरतारीचा वरती तरुराई', 'सागराच्या लाटांच्या वरखाली होणाऱ्या रुपेरी लगडी', 'मोती पोवळी सांडणारा पारिजातक', अशा कितीतरी सुंदर प्रतिमा आढळतात. ग्रहतारे, बारा राशी, फळाफुलांची झाडे, पाकसिद्धी असे विषयही ह्या १७८ ओळींच्या कवितेत येऊन जातात. भोकर, करवंदे, आंबा, रामफळ, पपई, पपनस, मोसंबी ह्या फळांचा खाद्य म्हणून उल्लेख करताना–

खिरणी अवघ्यांमधे ओरडे मीही सुगरण
ख्रिस्ती लोकांजवळीं शिकलें 'कलकल' पक्वान्न

असाही जाता जाता उल्लेख करतात.

**रूपकात्मक**

गुणारूपाने बरा पण रुसलेला विवेक नावाचा नवरा, कल्पना नावाची सतत छळणारी सवत, जिवाची खेळणी करणारी ममता सासू, क्रोध नावाचा सासरा, षड्रिपु दीर, भ्रान्ती नामक नणंद, आशा, मनीषा, तृष्णा ह्या जावा अशी रूपके वापरून लक्ष्मीबाईंनी लिहिलेल्या 'नवरा', 'सवत' आणि 'सासुरवास' अशा तीन कविता 'भरली घागर'मध्ये आहेत.

लक्ष्मीबाई साहित्याच्या अभ्यासक नव्हत्या. मुळात त्यांना अक्षरओळखच फार उशिरा झाली. त्यांचे लेखन हे अशुद्धच असे. जोडाक्षरांनी त्यांना आयुष्यभर छळले. असे असूनही त्यांनी प्रचलित चालींवर आणि शार्दूलविक्रीडित, श्लोक, साकी अशा वृत्तांमध्ये काव्य लिहिले आहे, धिन्ना, धिन्ना धिन्नक अशा तालावर कविता रचल्या आहेत ही बाब जशी नवलाची आहे तशीच काव्यलेखनासाठी साहित्याच्या, व्याकरणाच्या अभ्यासाची नव्हे तर, प्रतिभेची आवश्यकता असते हेदेखील पटवून देणारी आहे. त्याकाळच्या प्रसिद्ध गाण्यांच्या/ पदांच्या चालींवरही काही कविता लक्ष्मीबाईंनी बेतलेल्या आहेत. उदा.: भूपती खरे ते वैभव, आनंदाचा कंद, भक्ति ग वेणी, आज म्या ब्रह्म, किती गोड किती रे गोड, घनश्याम सुंदरा, ला बाई ला, केशवकरणी, बाळा जो जो रे, इत्यादी.

लक्ष्मीबाईंना कविता बहुधा रात्रीच्या निवांत वेळी सुचत. मग अंधारात हाती लागेल त्या खडूने किंवा कोळशाने त्या फरशीवर-जमिनीवर लिहीत. एकदा तर त्यांनी रोज रात्री सुचेल तशी लिहीत दोनशे चौऱ्यात्तर ओळींची [१३]कविता लिहिली! बालकवींनी ती कागदावर उतरून काढण्याचे काम केले! सकाळी बालकवींनी ती कागदावर उतरवली. त्या कवितेचे शीर्षक होते 'पतिपत्नी'.

लक्ष्मीबाई प्रतिभावंत कवयित्री तर होत्याच शिवाय शीघ्रकवित्वही त्यांच्या अंगी होते. कवी अनंततनय ह्यांच्याबरोबर त्यांचा कवितेचा जाबसाल/सालजाब (बोलणे) 'ख्रिस्ती नागरिक'मधून बराच रंगला होता. (स्मृ.परिशिष्ट ५: पृ.१३६)

लक्ष्मीबाईँची कवितासादरीकरणाची शैली उत्तम असावी. भावकविता असो, अभंग असो किंवा 'बहिष्कृत याला आधी करा' किंवा 'बाटली'सारखे सामाजिक प्रश्नावरचे काव्य असो, त्या श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकीत असत.

जळगावला झालेल्या संमेलनात निमंत्रित असूनही अनुपस्थितीत राहिलेल्या लक्ष्मीबाईंच्या केवळ ज्या कवितेच्या हजेरीने त्यांना कवयित्री म्हणून गौरवले गेले त्या कवितेवरून टिळकांचा हात फिरला होता. गंमत म्हणजे त्यातल्या ज्या एका ओळीने रसिकांची मने जिंकली होती त्या ओळीला मात्र टिळकांनी स्पर्श केलेला नव्हता. ती ओळ अशी होती–

कवि तुम्ही, भिकारीण मी हो तुमच्या दारी

जळगावच्या साहित्य संमेलनात आपण गेलो तर 'आपल्या म्हशींच्याकडे कोण बघेल?' ह्या कारणामुळे आणि पोटदुखीचेही एक कारण होतेच–लक्ष्मीबाई जळगावला जाऊ शकल्या नव्हत्या पण त्यांची कविता मात्र पोहचली. कवयित्री म्हणून त्यांना तिथेच पहिली मान्यता त्यांच्या गैरहजेरीत मिळाली आणि साऱ्या महाराष्ट्राला त्या परिचित झाल्या (१९०७).

नाशिकमध्ये १५ डिसेंबर १९३३रोजी माधव ज्युलियन ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनाच्या त्या स्वागताध्यक्ष झाल्या तेव्हा कुठे नाशिककरांना ह्या कवयित्रीचा परिचय झाला. पुढे 'स्मृतिचित्रे'च्या लेखिका म्हणून त्यांचा सत्कार झाला आणि आपल्या

गावची लेखिका म्हणून नाशिककरांची मान कायमची उंचावली.

■

—

१. भरली घागर, पृ.२४-२५

२. भरली घागर, पृ.३०-३१

३. टिळकांनी लिहिलेल्या 'ख्रिस्तायना'च्या लेखनाचा उल्लेख असलेली पाटी २०१३ साली अमेरिकन मिशन द्विशतक महोत्सवानिमित्त डॉ.अनुपमा उजगरे ह्यांनी श्री.रॉबर्ट ह्यांच्या सहकार्याने पुन्हा एकदा तेथे नव्याने लावून घेतली आहे.

४. महाकवयित्री लक्ष्मीबाई टिळक–स.ग.यादव,पृ.५०

५. कवयित्रींची परंपरा, स्त्री, फेब्रुवारी १९३६, पृ.४११.

६. ललित, जुलै,१९६८

७. महाकवयित्री लक्ष्मीबाई टिळक–स.ग.यादव

८. स्मृ.४:८७ कानांचा -थाटमाट जणुं सुंपल्याचा

९. स्मृ.४:८७ किति लांब-नाक जणूं कीं मलखांब

१०. दिसें

११. एकाच्या तो

१२. दहा पहा

१३. पावणे तीनशे: पॉप्युलर प्रका.,१९९० दु.आ.

■■■

## कादंबरीकार लक्ष्मीबाई

लक्ष्मीबाईंनी कविता लिहिण्याबरोबरच कादंबरीसारख्या दीर्घ साहित्यप्रकाराच्या लेखनाला हात घालावा ह्याचे ऐकणाऱ्याला नवल वाटणे साहजिकच आहे. कारण एकदा त्यांना मनुष्य हा शब्द कसा लिहावा हे सुचेना. शब्द नेहमीच्या वापरातला म्हणून तो सहज कुठेही सापडेल असे त्यांना वाटले, त्यामुळे त्यांनी टिळकांच्या पुस्तकांची बरीच उलथापलाथ केली. शेवटी बालकवी तिथे आले, त्यांनी तो तिढा सोडवला.

फारसे चांगले लिहिता-वाचता येत नसताना आणि जोडाक्षरे धड लिहिता येत नसतानाही कादंबरीसारखा दीर्घ साहित्यप्रकार लिहिण्याचा घाट लक्ष्मीबाईंनी घालावा, ह्यात त्यांची लिहिण्याविषयीची, व्यक्त होण्याविषयीची एक आर्त तळमळ दिसून येते. बरे, विषय तरी त्यांनी साधासुधा घेतला होता का, तर नाही. एकदम सामाजिक विषयाची निवड त्यांनी आपल्या कादंबरीलेखनासाठी केली होती.

लक्ष्मीबाईंनी आपली कादंबरी बालकवींना वाचायला दिल्यानंतर बालकवींनी आपल्या खोडकर स्वभावानुसार तिच्यावर अभिप्राय दिला तो कादंबरीचे लेखन लेखिकेने ज्या तऱ्हेने केले होते, तशाच अशुद्ध लेखनात–

*सदर कांदबरी*
*मी संप्रुण वाचली. आशी*
*कांदबरी समंध माराष्ट्र*
*भाशेंत दूस्री दीसणार नाही.*
*त्रिंबंक बापुजीं टोंबरें*

*आहामंद नग्र*

*तारीख.पंदरा.ज्यून येकोणीशच उदा.*

***जाइरात***

*नावे नोदवा  नावे नोदवा  नावे नोदवा*

*अप्रतिम गंथ्र  अप्रतिम गंथ्र  अप्रतिम गंथ्र*

*ही संधीपू न्हायेणा रनाहीं  (१९१४)*

ह्या कादंबरीला लक्ष्मीबाईंनी शीर्षक दिले नव्हते. ते बालकवींनी 'लक्ष्मुम्बाईची कांदबरी' असे दिले.

लक्ष्मीबाईंची ही कादंबरी कधी प्रकाशितच झाली नसल्याने ती कोणता सामाजिक विषय घेऊन लिहिली गेली होती आणि ती पूर्ण झाली होती की नाही हे कळणे आता कठीण आहे. लक्ष्मीबाईंचे तोवरचे लेखन हा सर्वांच्या थट्टेचा विषय होता. त्यानंतर मात्र त्यांचे लेखन बऱ्याच प्रमाणात सुधारले आणि एक वेळ अशी आली की, भल्या भल्या विद्वानांना, अभ्यासकांना त्यांचे लेखन वाचल्याविण पुढे जाणे अशक्य होऊन बसले!

■

# स्मृतिचित्रे'कार लक्ष्मीबाई

## 'स्मृतिचित्रे'चे लेखन

लक्ष्मीबाई टिळक कवयित्री म्हणून गाजल्या. त्यांनी सामाजिक विषयावरची कादंबरी लिहिण्याचा प्रयत्नही केला. त्या गोष्टीवेल्हाळ होत्या पण त्यांनी कधी गोष्ट लिहिल्याची नोंद दिसत नाही. मात्र त्यांनी आपल्या पतीची जीवनकहाणी लिहिता लिहिता स्वत:चीही कहाणी बघता बघता लिहून काढली आणि मराठी वाङ्मयविश्वात आपली ठसठशीत नाममुद्रा उमटवली.

आपल्या वैवाहिक जीवनात लक्ष्मीबाईंनी पाच वर्षे पतिविरह सहन करत पतीच्या आठवणीत काढली होती. टिळकांचा कायमचा वियोग झाल्यानंतर बरोबर पाच वर्षांनी त्यांनी पतीच्या आठवणींत रमून त्याचे चरित्र लिहायला घेतले होते. लक्ष्मीबाई स्वत: कधीतरी सुचेल ते लिहून काढत. त्यांची बोलण्याची आणि लिहिण्याची भाषा ह्यात अजिबात फरक नसे. लक्ष्मीबाईंचे कथन उत्तम असले तरी लिहिताना अशुद्ध लेखनामुळे त्यांचे लिखाण त्यांच्याखेरीज सहसा कुणालाच वाचता येत नसे. आणि गंमत अशी की, आपले लेखन त्या न अडखळता वाचू शकत. त्यांनी सांगितलेल्या आठवणी उतरवून घेण्याचे काम करणाऱ्या तरुण मुलांमध्ये मधुसूदन गोखले ह्यांच्याखेरीज आणखी दोन नावे होती. एक म्हणजे पुढे थोर समीक्षक म्हणून ज्यांचे नाव झाले ते माधव मनोहर आणि दुसऱ्या सेंट मोनिका ट्रेनिंग कॉलेज, अहमदनगर इथे प्राचार्य म्हणून उत्तम कामगिरी बजावणाऱ्या श्रीमती इंदिराबाई त्रिभुवन.

इंदिरा त्रिभुवन सांगतात, 'आईला फार उत्तम लिहिता येत नव्हते. मला तर मुळीच त्यांची अक्षरे लागत नसत. परंतु आम्हाला वाचता न

येणाऱ्या ओव्या त्या स्वत: उत्तम रीतीने अगदी शुद्ध व स्वच्छ वाचून दाखवीत!' (स्मृ.४: पृ.१३०)

'स्मृतिचित्रे'तील आठवणी तीन भागात क्रमाक्रमाने 'संजीवनी'मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. पहिले तीन भाग आणि चवथ्यातील अकरा प्रकरणे लक्ष्मीबाईंनी लिहिलेली आहेत. पत्नीने पतीचे चरित्र लिहिलेल्या दोनच स्त्रिया महाराष्ट्रात त्यावेळी होत्या –एक न्या.महादेव गोविंद रानडे ह्यांच्या पत्नी रमाबाई आणि दुसऱ्या, कविवर्य नारायण वामन टिळक ह्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई. आपण टिळकांच्या विषयीचा एक महत्त्वाचा ग्रंथ लिहीत आहोत, ह्याची लक्ष्मीबाईंना जाणीवही नव्हती. 'माझं चरित्र घडलं तसं लिहा' असे खुद्द टिळकांनीच म्हटल्यावर लक्ष्मीबाईंनी पडत्या फळाची आज्ञा म्हणून तिचा मान राखला आणि टिळकांच्या अनेक गुणदोषांसह त्यांचे शब्दचित्रण अकृत्रिमपणे केले. परंतु ते करत असताना त्यांनी टिळकांना कुठेही कमीपणा येऊ दिला नाही. 'स्मृतिचित्रे'च्या मूळ चार भागांपैकी तीन भाग टिळकांनी व्यापलेले आहेत. टिळकांच्या जीवनातील चढउतार, स्थित्यंतरे, वडिलांकडून त्यांच्या स्वभावात उतरलेला संतापी आणि काहीसा विक्षिप्त स्वभाव, आईकडून आलेली काव्यप्रतिभा, उत्तरोत्तर शांत आणि विरागी होत गेलेले टिळक असा एक आलेख लक्ष्मीबाईंनी सर्व बारकाव्यांनिशी फार सहजसुंदर पद्धतीने रेखाटलेला आहे. टिळक हा केंद्रबिंदू मानून त्या आसाभोवती लक्ष्मीबाईंची 'स्मृतिचित्रे' फिरताना दिसतात. 'पती हाच परमेश्वर' मानण्याच्या काळात त्याच्यातले माणूसपण त्याच्या गुणदोषांसकट मांडताना स्वत:चा होत गेलेला व्यक्तिविकासही त्यांनी नकळत दर्शवलेला आहे. आपण जे काही घडलो, त्याचे श्रेय त्या टिळकांनाच देतात. निवडक प्रसंगांच्या प्रांजळ कथनाची अपेक्षा हे आत्मकथन बऱ्याच प्रमाणात पूर्ण करते. वाचक टिळकांचे चरित्र म्हणून वाचायला घेतो

आणि ते वाचून झाल्यावर टिळकांच्या चरित्राने प्रभावित झालेल्या वाचकाच्या मनात लक्ष्मीबाईंची प्रतिमा कोरली जाते, ती एक पतिपरायण आणि पतीला पावलोपावली साथ देणारी, अशिक्षित पण सुसंस्कारी, चांगल्यापैकी विनोदबुद्धीची देन असलेली, गप्पीष्ट, सपाटून हसणारी, मनापासून भांडणारी, चारचौघींपेक्षा एक वेगळे आयुष्य वाट्याला आलेली एक व्यवहारचतुर, स्वयंनिर्णयशक्ती असलेली स्त्री म्हणून.

टिळकांचे चरित्र आणि लक्ष्मीबाईंचे आत्मकथन अशा दोन्ही भूमिका 'स्मृतिचित्रे' समर्थपणे वठवताना दिसते. सन १९००मध्ये ख्रिस्ताचा स्वीकार, १९०२-३ मध्ये मिरजेस नर्सिंगचे शिक्षण, १९१३-१४च्या सुमारास कीर्तनकला आणि ईश्वरपरिविज्ञानाचे पाठ, १९१९मध्ये टिळकांचे निधन, १९२४ डिसेंबरला टिळकांच्या आठवणी लिहायला प्रारंभ, १९३३मध्ये नागपूर इथे ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, १९३५मध्ये 'स्मृतिचित्रे'चे प्रकाशन ह्या लक्ष्मीबाईंच्या संदर्भातील घटना मोजक्या असल्या, 'स्मृतिचित्रे'च्या एकाच भागात मावण्यासारख्या असल्या तरी त्यांचे टिळककुटुंबातील आणि मराठी वाङ्मयातील स्थान किती महत्त्वाचे आहे हे दर्शवणाऱ्या आहेत. परंपरागत भारतीय संस्कृतीचे कठीण कवच ल्यालेल्या, शालेय शिक्षणाचा गंधदेखील नसलेल्या लक्ष्मीबाईंनी आपल्या नावाची मोहर सुवर्णाक्षरांनी उमटवलेली आहे, म्हणूनच शतकातील मराठी वाङ्मयाची नोंद करताना त्यांच्या 'स्मृतिचित्रे'ची नोंद करणे आवश्यक ठरले आहे.

'कवी म्हणून टिळकांना मिळाले नसेल एवढे यश व कीर्ती लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रे'ने त्यांना मिळवून दिली.'[१] हे विधान आणि टिळकांनी आपल्या मृत्युपत्रात आवडणाऱ्या माणसात 'मला आवडणारे माणूस–माझी बायको'असा केलेला उल्लेख टिळक पती-पत्नींच्या आयुष्यातल्या स्थानाच्या निदर्शकच होत, असे म्हटले तर वावगे ठरू

नये (स्मृ.४:पृ.११८).

''तात्यासाहेब कोल्हटकरांनी लिहायला उत्तेजन दिले आणि 'बिझी-मॅन' बापूराव कोल्हटकरांनी आपले लेखन प्रसिद्ध करून आपल्या स्मृतिचित्रेंना पंख लावले'' असे लक्ष्मीबाई कृतज्ञतापूर्वक म्हणतात तर, 'माणसाच्या हातून एकतरी असामान्य कार्य व्हावे, प्रभाकर श्रीपाद कोल्हटकरांनी स्मृतिचित्रे लिहायला (छापली) भाग पाडले, म्हणून त्यांचे ऋण मानायला हवेत असे दुर्गाबाईंनी एका लेखात म्हटले आहे[२] ते पटते. शब्दचित्रे रंगवण्याची लक्ष्मीबाईंची हातोटी विलक्षण आहे. त्याला जोड मिळते, ती त्यांच्या प्रसंग खुलवून सांगण्याच्या कौशल्याची. त्यामुळे व्यक्ती आणि प्रसंग दोन्ही वाचकांच्या लक्षात राहतात आणि तो प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर घडतो आहे असे वाटून त्याचा आनंद घेतात. त्यामुळे 'स्मृतिचित्रे' मुळातून वाचण्याची लज्जत काही औरच आहे. लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्रे' रेखाटताना जो मोकळेपणा आणि निर्भयता दाखवली आहे, त्याची बरोबरी आचार्य अत्रे ह्यांनी महात्मा गांधींच्या 'सत्याचे प्रयोगा'शी केली आहे. (स्मृ.४:पृ.१२३)

र.धों कर्वे ह्यांनी 'स्मृतिचित्रे'विषयीच्या परीक्षणात म्हटले आहे:

'लक्ष्मीबाईंची स्वत:ची अशी एक खास शैली आहे. ती त्यांनी कुठल्याही अभ्यासाने प्राप्त केलेली नसून अंगभूत अशी आहे. तिच्यावर संस्कार असतीलच तर ते तत्कालीन कौटुंबिक आणि सामाजिक वातावरणाचे. त्यावेळी वापरात असलेल्या म्हणी-वाक्प्रचार ह्यांचा योग्य वापर त्यांनी जागोजागी केल्यामुळे एक मौज आली आहे.'

ह्याची साक्ष स्मृतिचित्रे मधील अनेक वाक्ये देतात:

आईकडून काव्याचा वारसा मिळालेल्या लक्ष्मीबाई म्हणतात, 'ह्या व असल्याच समाधानाच्या गोष्टींचे तिच्या कष्टमय संसाराच्या गाड्याला ओंगण होते.'(स्मृ.१:पृ.११)

आपल्या सासूबाईंच्या संदर्भात त्या म्हणतात, 'मामंजींनी नीतीचे पुस्तक जाळले म्हणून जगातील साऱ्या नीतिपुस्तकांची राखरांगोळी होणार नव्हती किंवा टिळकांनी मामंजींची चुन्याची डबी विहिरीत फेकून दिली म्हणून साऱ्या चुन्याच्या डब्या पटापट विहिरीत जाऊन जीव देणार नव्हत्या.' (स्मृ.१:पृ.१९)

'सासूबाई शिवणकाम करून मामंजींच्या पिठात आपले मीठ घालीत असत.'(स्मृ.१: पृ.२०)

'पहिल्या पावसानंतर जमिनीला जशा भेगा पडतात, तशा माझ्या भाकरींना पडल्या होत्या.' (स्मृ.१: पृ.४१)

भाट्या गुजराथी बायांच्या मध्ये दाटीत एखाद्या उंदराप्रमाणे बसल्या असताना लक्ष्मीबाई त्या बायांच्या दंडाचे वर्णन करतात- 'एकेकीचा दंड तुळईसारखा जाड!' (स्मृ.१: पृ.५३)

टिळक पैशाने गरीब असले तरी 'टिळकांची अलोट मित्रसंपत्ती होती. त्या संपत्तीत लोळण्यात टिळकांनी दोनदा गाडी चुकवली.'(स्मृ.१: पृ.५९)

भातुकलीत बाहुलीच्या लग्नाचा बार दणक्यात उडवून झाल्यावर घरात काय रण माजले त्याचे फारच रंजक वर्णन लक्ष्मीबाई सहजपणे करून जातात–

'बाहेर चौघडा बंद झाल्यावर माझ्या हृदयात चौघडा वाजू लागला. बहिणीने पंचपक्वान्नांचे ताट मजपुढे वाढून ठेवले. त्यात कोणती पक्वान्ने नव्हती? गालगुरोळ्या होत्या, चापटपोळ्या होत्या, धम्मकलाडू होते, मुष्टिमोदक होते, मुरुडकानोले होते.'

राहुरीला रानात घर बांधून तिथे राहायला गेल्यावर टिळक लेखनासाठी आपण हा द्राविडीप्राणायाम केल्याचे साफ विसरून गेले आणि त्यांनी स्वत:ला शेतीतले काहीच ज्ञान नसताना शेती सुरू केली.

लक्ष्मीबाई त्यावर शेरा मारतात–

'मी शेतकऱ्याची मुलगी. मला शेतीची माहिती. पण मला टिळक बसवीत धाब्यावर कल्पनेची पाखरे हाकलायला व स्वत:च शेती करीत.' (स्मृ.२: पृ.१३१)

आपली हलाखीची स्थिती एका वाक्यात त्या सांगतात– 'नाणाजींचा पत्ता नसल्यावर अन्नाजी कसे येणार?' (स्मृ.२: पृ.१३५)

टिळकांच्या सोबत स्थलांतर करताना टिळक काहीच सामान सोबत घेऊ देत नसत. जिथले सामान तिथेच ठेवून जावे लागे तेव्हा कधी कधी आपले सामान लक्ष्मीबाई सीलबंद करून ठेवत. पण त्या सामानाची आणि त्यांची गाठ आयुष्यात कधीच पडली नाही, त्या संदर्भात त्या म्हणतात–'किल्ल्यांची मात्र मी धनीण असे व अशा किल्ल्या टिळकांच्या मृत्युपर्यंत शेर दोन शेर वजनाच्या घरात साचून राहिल्या होत्या. (स्मृ.१:पृ.१७२)

'तळमजल्याच्या घराला पाताळ आणि स्वर्गसुख भोगायला सहा जिने चढून जावे लागणे', अशा कल्पना त्यांना सहज सुचतात.

लक्ष्मीबाईंच्या आत्याबाई पट्टीच्या सुगरण. आपल्या स्वयंपाकाला कोणी नावे ठेवलेली त्यांना खपत नसत. टिळकांच्या वडिलांना आपण स्वत: उत्तम स्वयंपाक करत असल्याचा अभिमान. शिवाय देशावरचा आणि कोकणातला स्वयंपाक समोर असेल तर कोकणी स्वयंपाकाला त्यांचे झुकते माप ठरलेले असे. योगायोगाने दोघेही एकदा टिळकांकडे असताना आत्याबाईंनी केलेला स्वयंपाक मामंजींना वाढण्याचे काम लक्ष्मीबाई करत होत्या. सून वाढायला आली की, सासरेबुवांनी स्वयंपाकाला नावे ठेवावीत. तिकडे आत गेल्यावर आत्याबाईंनी लक्ष्मीबाईंच्या सासऱ्याला नावे ठेवावीत. लक्ष्मीबाई लिहितात–'माझी मात्र मृदुंगाची स्थिती झाली होती. एक थप्पड मामंजींची,

की लगेच दुसऱ्या बाजूने दुसरी थप्पड आत्याबाईंची.' (स्मृ.१:१२२-१२३)

अत्यंत हलाखीची स्थिती असतानाही तिला खंबीरपणे तोंड देणाऱ्या लक्ष्मीबाईंच्या मनात आत्महत्येचा विचार कधीच आला नाही, असे नाही. त्यावेळी त्यांनी विचारपूर्वक माघार घेतली. मुळात त्यांचा स्वभाव कचखाऊ नव्हता. एक रणरागिणी त्यांच्यात सुप्तपणे वास करून होती. प्रसंगानुरूप तिचे दर्शन घडल्याशिवाय राहत नसे. त्याविषयी म्हणतात:

''माझ्या मनाची ठेवणच अशी आहे की सर्व निराशामय अंध:कारातून चाचपडत धडपडत का होईना पण आपला मार्ग आक्रमायचा, मध्येच पडून प्राण सोडायचा नाही. थोडक्यात म्हणजे रबरी चेंडूप्रमाणे आहे माझे.'' (स्मृ.२:पृ.२५).

विनोद आवडणे, विनोद करणे, स्वत:वरही विनोद करणे, दुसऱ्याच्या विनोदाला उत्स्फूर्त दाद देणे हे लक्ष्मीबाईंकडून सहज होत असे. लक्ष्मीबाईंनी आपल्या जीवनात अनेक अघटित, अकल्पित अशा संकट प्रसंगांना तोंड दिले ते त्यांच्यात 'रबरी चेंडूसारखी खिलाडू वृत्ती होती' म्हणूनच.

बावीस मुलांचा सांभाळ करताना काटकसरीचे धडे मुलांना देण्यासाठी त्यांनी सभा भरवली, ह्यात त्यांचा धोरणी स्वभाव आणि त्यांची कार्यपद्धती दिसते.

लक्ष्मीबाईंच्या नाजूक प्रकृतीमुळे डॉ.कर्नल कीर्तिकर टिळकांना लिहिलेल्या पत्रांत लक्ष्मीबाईंचा उल्लेख 'एव्हर डाईंग वाईफ ऑफ युवर्स' असा करीत तर, आपल्या तोळामासा प्रकृतीमुळे आपण नेहमी अंथरूण धरलेले असे, त्याविषयी त्या लिहितात–

'अंथरूण म्हणण्यापेक्षा जमीन म्हटली तर अधिक शोभेल. कारण

माझी लोळणफुगडी जमिनीवरच चाले. मात्र भूमिशय्या असली तरी भुजच तेवढा उशाला पुरत असे.' कारण उशाला त्यांना धान्य मोजायचा आठवा, जात्याचा खुंटा, तपकिरीची डबी असे जे हाताला येईल, ते चालत असे. (स्मृ.३: पृ.२०)

तिऱ्हाईताला कर्ज फेडता यावे म्हणून टिळकांनी आपल्या मालकीचे घर विकून त्याला ती सगळी रक्कम देऊन टाकली तेव्हा लक्ष्मीबाई आपली खंत अशी व्यक्त करतात–

'घर गेले. घर बांधून देणारे (रेव्ह.डॉ.बॅलेंटाईन साहेब) गेले. डोळ्याचे पाणी गेले. आठवणी मात्र पाणीदार अजून आहेत.' (स्मृ.३: पृ.३१)

स्वत:मधल्या 'पाणीदारपणा'ची जाणीव त्यांना होती. टिळकांच्या धर्मांतराच्या काळात आपल्या स्थितीचे वर्णन करताना त्या लिहितात–'पाणीदारपणा काय तो डोळ्यातच उरला होता व त्याचा प्रभाव मधून मधून पदराला कळत होता.' (स्मृ.२: पृ.१५)

हातात आलेल्या पैशाचा हात राखून खर्च कसा करता येईल ह्या विवंचनेत लक्ष्मीबाई असायच्या तर, हातातला पैसा जाईल कसा ह्याची टिळकांना सतत चिंता लागलेली असायची. अशा वेळी हिशेबी आणि व्यवहारी धोरण ठेवणे लक्ष्मीबाईंना आवश्यक वाटले असावे त्यामुळे साम-दाम–दंड-भेद ही नीती त्यांनी अवलंबिली असावी. उदा: रंगूबाई लोहारणीने टिळकांकडून भाऊबिजेची ओवाळणी मागणे आणि टिळकांनी खिशातली पगाराची संपूर्ण रक्कम लगेच काढून देणे. लक्ष्मीबाईंच्या सांगण्यावरूनच हे सर्व रंगूबाईने केले असावे असे प्रत्यक्ष देवदत्तांना वाटल्याचे प्रपूरकात म्हटले आहे.

घारूमाईच्या आजारपणात तिच्याजवळ दोन महिने लक्ष्मीबाई राहिल्या, त्याकाळात 'कागदी घोडेस्वार पुण्याहून नगरास जात, राज्याचा

बंदोबस्त कसा आहे म्हणून चौकशी करीत. दुसरे कागदी घोडेस्वार नगराहून पुण्याला येऊन सांगत, राज्यात आबादीआबाद आहे.' अशा शब्दांत टिळकांशी त्यांचा संपर्क असल्याचे सांगतात.

'दमडी न् दमडीचा हिशोब मी घेतला आणि त्यांनी कवडी न् कवडीचा हिशोब दिला.' (स्मृ.३: पृ.६२) टिळकदाम्पत्याची अशी आर्थिक स्थिती आयुष्यभर राहिली. टिळकांनी म्हटलेच होते, 'हे मी मरेपर्यंत असेच चालणार. मात्र मी मेल्यावर तुम्हाला कोणाचेही कर्ज ठेवून मरणार नाही.' टिळकांचे हे बोल खरे ठरले. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या वर्षात एका पैचेही कर्ज डोक्यावर त्यांच्या डोक्यावर नव्हते. लक्ष्मीबाई लिहितात–'तेथपर्यंत त्यांची वजाबाकी आणि माझी बेरीज ही चाललेली असायची.' (स्मृ.१:८७)

टिळकांच्या वस्तू कधीच जागेवर राहत नसत. त्या जागेवर असल्या तरी त्यांना त्या दिसत नसत. त्यामुळे ते अख्खे घर डोक्यावर घेऊन साऱ्यांना शोधमोहिमेत सक्तीने भाग घ्यायला लावत. आरडाओरडा आणि वस्तूंचा पसारा होई. लक्ष्मीबाई ह्याचे वर्णन मोठ्या खुबीने करतात–टिळकांना हव्या असलेल्या वस्तू त्यांच्याशी 'लपंडाव करीत व त्यांच्याबरोबर आमच्या साऱ्यांच्या फुगड्या सुरू होत....घरातील कपड्यांच्या चुंभळी भरभर त्या ढिगाऱ्यावर येऊन पडू लागल्या. बिछाने, सतरंज्या, ब्लँकिटे झाडून सारी मंडळी त्या ढिगाऱ्यात गोळा झाली.' (स्मृ.३: पृ.३७).

शेवटच्या दुखण्यातही त्यांची विनोदबुद्धी शाबूत होती. आपली दातांची कवळी म्हणजे –'ह्या कुंदकळ्या म्हणजे शोभेचा दागिना आहे. दात नवे असले तरी पोट जुनं आहे ना.' किंवा आपल्या लटलटणाऱ्या मानेचे कारण 'मी मरणाला नाही नाही म्हणतेय.' असे सांगून स्वत:कडेही गमतीशीरपणे पाहणाऱ्या लक्ष्मीबाई आपल्याला दिसतात.

'स्मृतिचित्रे'च्या प्रकाशन समारंभाला रात्रीपर्यंत अत्रे पोहचले नाहीत. कार्यक्रम तर सकाळी साडेआठलाच होता. आता काय करायचे, हा प्रश्न सोडवताना त्या म्हणाल्या, 'ह्या बेंजीलाच उभा करा अन् सांगा हेच अत्रे म्हणून.' बेंजी उंचीने कमी असल्याची शंका कुणी तरी काढली तर, तिचे समर्थन करताना त्या म्हणाल्या, 'थंडीने वाळलाय म्हणून सांगा.' त्यावर तो अत्र्यांसारखा थोडाच बोलू शकणार आहे, असा प्रश्न कुणी उपस्थित केल्यावर त्या उत्तर देतात–'त्याचा घसा बसलाय म्हणून सांगा.'

आर्थिक अडचणीचा प्रसंग असला तरी त्याचे रडगाणे गात न बसता 'घरात डाळ-तांदूळ सापडले तेवढ्यावरच मी आमची नवीन घरातली मेजवानी केली'सारखे वाक्य लिहितात.

'टमरेलभर उपदेश पाजला', पीठभरल्या हातांनी तात्यासाहेब कोल्हटकरांना भेटताना 'हस्तीदंती नमस्कारावाचून बोलण्यास वेळ नसल्याचे' त्या म्हणतात. आपले जेवणे ताट भरून, आपले बोलणे तोंड भरून तसे आपले लिहिणे हे पान भरून (मार्जिन न सोडून) असल्याचे सांगून त्या बहार उडवून देतात.

धर्म बदलून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेल्या लक्ष्मीबाई आपल्या जीवनाचे सिंहावलोकन करताना स्वत:विषयी म्हणतात–

'बाळपणची वहिवाट व टिळकांचे वळण ही काही मला सोडीनात...ख्रिस्ती लोकांत शिरलेले काही काही पाश्चात्त्य रीतिरिवाज मला येतच नाहीत. सलाम करणे, उपकार मानणे, दाराशी उभे राहून दार ठोकणे, या म्हटल्यावर मगच आत जाणे, आपल्या घरी कोणी पाहुणा येणार असेल तर अधिकाऱ्यांस त्याबद्दल परवानगी विचारणे हे माझ्याच्याने कधीच होत नाही—मी एक स्वतंत्रलक्ष्मी आहे.' (स्मृ.४: पृ.२१)

लक्ष्मीबाईंच्या लिहिण्यात अनेक म्हणींचा वापर झालेला दिसतो. त्याकाळी घरोघरी हे भाषाधन समृद्ध होते. त्यासाठी कुठल्याही भाषाज्ञान संपादनाची गरज पडत नसे. परंपरेने चालू राहणारे ते धन होते.

'अगं, अगं, म्हशी, मला का गं नेशी ?', 'माय मरो नि मावशी जगो', 'बुडत्याला काडीचा आधार', 'कर नाही त्याला डर कसली ?', 'आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास', 'तशातली गत', 'जित्याची खोड मेल्यावाचून जात नाही', 'बाबा गेला नि दशम्या गेल्या', 'स्वदेशी चोरी आणि परदेशी भीक', 'बुवाचे तुरे लाल, बाईचे बुरे हाल', 'एक लाल नि पृथ्वीचे मोल', 'येत्याचे घर व जात्याचे दार' 'मन चिंती ते वैरी न चिंती', 'अंथरूण पाहून पाय पसरावेत', 'सोन्याच्या ताटाला कुडाचा आधार', 'जठराग्नीला आहुती देणे', 'घी देखा लेकिन बडगा नहीं देखा', 'वड्याचे तेल वांग्यावर', 'पाचावर धारण बसणे', 'जीव खाली पडणे', 'गाव करी ते राव न करी', 'ताटाबरोबर काठ जाणे', 'वाटाण्याच्या अक्षता', 'गंगेत घोडे न्हाले', 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ', 'राम म्हणणे' अशा म्हणी-वाक्प्रचार जिभेवर खेळत असल्यामुळे त्यांचा सहजपणे आणि चपखलपणे वापर लक्ष्मीबाई करतात, ह्याचे कारण त्यांच्या बोलण्यातली सहज शैली, हेच होय. आज हा भाषेचा दागिना हरपत चाललेला असताना त्यांनी केलेला ह्या अलंकारांचा उपयोग वाचकाला श्रीमंत करून जातो, ह्यात संशय नाही.

'स्मृतिचित्रे' वाचण्यापेक्षा ती प्रत्यक्ष लक्ष्मीबाईंच्या तोंडून ऐकण्यात विशेष गोडी होती. त्या संदर्भात माधव मनोहर म्हणतात:

''आपल्या आठवणीमधले प्रसंग पुन्हा एकवार प्रत्यक्ष घडताहेत अशा अभिनिवेशाने आई आपल्या आठवणी सांगत. ते ते स्मृतिगत् प्रसंग आपल्या शब्दांच्या जादूने पुनश्च एकवार जिवंत करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीमध्ये होते. स्वत:बरोबर आपल्या श्रोत्यांनाही गतकालामध्ये

ओढून नेणारी त्यांची वर्णनशैली केवळ अपूर्व होती.''[३]

कु. मनोरमा खाबडे बी.ए. ह्यांनी 'स्मृतिचित्रे'च्या परीक्षणात (ज्ञानोदय: ५ मार्च १९३६ पृ.७७) असे म्हटले आहे की, लक्ष्मीबाईंना अश्रूंचे कंत्राट दिले होते तरी पतीच्छा म्हणून त्यांनी (पतीच्या) मृत्यूसमयी न रडण्याचा त्यांचा मनोनिग्रह आश्चर्यकारक आहे...

लोकांनी फंड जमा करून त्याच्या व्याजातून प्रत्येक वर्षी 'टिळक प्राईझ' देऊन टिळकांचे वाङ्मयस्मारक अवश्य करावे, अशीही सूचना त्या लेखात खाबडेबाईंनी केली होती.

खाबडेबाईंनी लिहिलेले हे परीक्षण लक्ष्मीबाईंना संपूर्ण वाचून दाखवले गेले होते. त्यावेळी त्यांनी

'ख्रिस्ती समाजातील स्त्रिया किती उत्तम लिहितात रे!'

असे उद्गार काढल्याचे संपादक दे.ना.टिळक ह्यांनी नमूद केले आहे.

**'स्मृतिचित्रे'ची वैशिष्ट्ये**

'स्मृतिचित्रे'च्या चौथ्या खंडाला 'माझी गेली अठरा वर्षे' असे नाव देऊन डिसेंबरपर्यंत प्रसिद्ध करण्याचा देवदत्त टिळकांचा बेत होता. आईच्या मृत्यूनंतर 'लक्ष्मीबाई टिळक' असे नाव देण्याचे व त्याचे स्वरूप बदलण्याचे ठरले होते (ज्ञानोदय १६ एप्रिल १९३६) परंतु तसे झालेले दिसत नाही. तो भाग 'स्मृतिचित्रे'मध्येच समाविष्ट करण्यात आला.

'स्मृतिचित्रे'मध्ये गेल्या शतकातला सामाजिक इतिहास वाचायला मिळतो. चरित्र आणि आत्मचरित्र असे दुहेरी स्वरूप असलेले त्याकाळातील हे एक आणि एकमेव ललित शैलीतील पुस्तक असावे. ह्यातील विनोद अत्यंत हृदयंगम आहे. बोचकपण नावालाही नाही. कोणाचे मन दुखावेल असा विनोद 'स्मृतिचित्रे'त आढळणार नाही. कोणाला लागेल असे काही असेलच तर त्या ठिकाणी नामोल्लेख

सुज्ञपणे टाळला आहे. लक्ष्मीबाई संकटांची डाळ शिजू देत नाहीत. त्यांची (संकटांची) चांगली कणीक तिंबतात, असे जे गमतीने बापूराव कोल्हटकरांनी म्हटले आहे (स्मृ.४: प्रस्तावना पृ.५), ते खरेच होते. कुठलीही गोष्ट त्यांना कठीण वाटत नसे. मग ती अगदी साहित्यातल्या कोणत्याही प्रकारात लेखन करण्याचीही का असेना.

अर्वाच्य, चावट, छछोर, अति धीट असे लेखन ह्यात नाही. बाळंतपणाविषयी 'मला माहेरी जाण्याची वेळ आली' किंवा पाळीच्या दिवसांचा उल्लेख 'मला दर महिन्याला तीन दिवसांचा उपवास घडावयाचा' अशा वाक्यात या गोष्टींचा अप्रत्यक्ष उल्लेख करताना तत्कालीन सामाजिक मर्यादा पाळून तो केलेला आढळतो. हीच ह्या ग्रंथाची अपूर्वता म्हणता येईल अशा आशयाचा अभिप्राय ह.भ.ल.रा.पांगारकर ह्यांनी दिला आहे.

साधी घरगुती भाषा व सूक्ष्म मार्मिक विनोदाची जरतार ह्यामुळे ह्या ग्रंथास अव्याजमनोहर रूप प्राप्त झाल्याचे मत प्रो.जोगळेकर ह्यांनी समारंभाच्या भाषणात व्यक्त करून बाबा पद्मनजींच्या 'अरुणोदया'त व रमाबाई रानडेंच्या 'आमच्या आयुष्यातील आठवणीत'ही घरगुती भाषा असली तरी 'स्मृतिचित्रे'मधील विनोद, चटकदारपणा आणि मोकळेपणा त्यात कमी असल्याने 'स्मृतिचित्रे'चे वाङ्‌मयातील स्थान अनन्यसाधारण असल्याचेही आपले मत त्यांनी नोंदवले होते. आचार्य अत्रे ह्यांनीही 'रमाबाई रानडे यांच्या आठवणी चांगल्या आहेत पण त्याहीपेक्षा लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रे अधिक मोहक असून त्यात भाषेचा साधेपणा, विचारांचा प्रांजलपणा हे दोन अत्युत्कट गुण' असल्याचे प्रकाशनप्रसंगी म्हटले होते.

लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रे'च्या लेखनात दोषदर्शन आले असलेच तर, ते आपल्या माणसांचे आले आहेत. त्याच वेळी त्यांच्या गुणांचेही

कौतुक लक्ष्मीबाई करताना दिसतात. उदा: सासऱ्यांनी केलेल्या छळाविषयी त्या सांगतात, पण 'त्यांनी कधी अपशब्द वापरले नाहीत व कधी अंगाला बोट लावले नाही' अशा शब्दांत त्यांच्याविषयीचा आदरही त्या व्यक्त करतात. शाळेची पायरी न चढलेल्या लक्ष्मीबाई मनाने सुसंस्कृत होत्या ह्याचा प्रत्यय त्यांची शैली देते.

पुस्तकी पांडित्य नसल्याने लक्ष्मीबाईंची भाषा अकृत्रिम, ओघवती आहे. आपले लेखन भविष्यकाळात गाजावे असा विचारही लक्ष्मीबाईंच्या मनाला शिवलेला नव्हता, त्यामुळे हेतुपुरस्सर शब्दयोजना किंवा प्रसंगरचना करण्याची गरज त्यांना भासली नाही. पतीचे चरित्र हा लेखनविषय असला तरी वर्ण्यविषयाकडे संपूर्ण निर्विकार मनाने पाहण्याची दृष्टी लेखिकेकडे होती म्हणूनच टिळकांचे दोष जसे त्यांनी अनेक ठिकाणी दाखवून दिले आहेत, तसेच स्वत:कडेही त्या कधी त्रयस्थपणे तर कधी मिश्कीलपणे पाहताना दिसतात.

आपला पती हा लहरी, संतापी, काही एक न सांगतासवरता घरापासून कैक महिने दूर राहताना काहीसा बेजबाबदारपणे वागणारा असला तरी त्याच्याविषयी कधी अवमानकारक भाषा लक्ष्मीबाई वापरताना दिसत नाहीत. पतीचे विद्वत्व, त्याचे कवित्व अशा त्याच्या गुणांविषयी त्या अभिमानाने वाचकांना सांगतात.

पतीच्या आठवणी हा लेखनाचा विषय जिव्हाळ्याचा असल्याने लेखन उत्स्फूर्तपणे झाले आहे. त्यामुळेच त्यात सहजता आणि सजीवताही आलेली आहे.

लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्रे' अशी खुलवून सांगितली आहेत की, त्यांच्या कथनशैलीचे तर कौतुक वाटतेच शिवाय त्यांची स्मरणशक्ती किती तल्लख होती हे जाणवून त्याविषयीही कौतुक वाटते. कधीतरी कालमानाचा क्रम अथवा व्यक्तींच्या बाबतची माहिती सांगण्यात त्यांचा

गोंधळ उडालेला दिसतो, पण ती बाब संपूर्ण लेखनाच्या संदर्भात फारशी हानिकारक वाटत नाही. अशोक टिळकांनी संशोधन करून अशा त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपल्या आयुष्यातील आठवणी लक्ष्मीबाईंनी किमान दोनशेवेळा तरी वेगवेगळ्या लोकांना प्रथमच सांगत आहोत अशा उत्साहाने सांगितलेल्या आहेत. त्यातल्या अनेक आठवणी तर निखळ आनंद देणाऱ्या आहेत. नातवंडांचे किस्सेही मजेदार आहेत.

'स्मृतिचित्रे'च्या प्रकाशनप्रसंगी आचार्य अत्रे ह्यांनी आपल्या भाषणात दोन महत्त्वाचे मुद्दे मांडले. पहिला मुद्दा ''नाशिकसारख्या सनातन धर्माच्या बालेकिल्ल्यात बाह्यदृष्ट्या तरी परधर्मीय समजल्या जाणाऱ्या एका साहित्यसेविकाचा सत्कार करून साहित्यक्षेत्रात, शारदेच्या मंदिरात, जातिभेद, धर्मभेद, पंथभेद नसल्याचे आज नाशिककरांनी जाहीर केले आहे. धर्मभेदाच्या अस्थि नाशिककरांनी आपल्या प्रेमाच्या गोदावरीच्या डोहात टाकून दिल्या असे या सत्कारसमारंभाने आज सिद्ध केले आहे'' असे म्हटले होते. त्यावर स्थानिक वृत्तपत्रांतून कडाडून टीका झाली होती.[४]

अत्रे ह्यांचा दुसरा मुद्दा साहित्यदृष्ट्या महत्त्वाचा होता: ''महात्मा गांधींनी आपले सत्याचे प्रयोग लिहिताना जो मोकळेपणा व जी निर्भयता प्रकट केली आहे, तो मोकळेपणा व ती निर्भयता लक्ष्मीबाईंच्या लेखनातही प्रकर्षाने आढळते ...वाङ्मयगुण हे व्याकरणाच्या ज्ञानावर अवलंबून नसतात. उत्तम वाङ्मय निर्माण करायला व्याकरण आलेच पाहिजे असे नाही...लौकिक अर्थाने शिक्षण न घेतलेल्या एका अशिक्षित बाईने लिहिलेले हे पुस्तक विश्वविद्यालयामध्ये परीक्षेला लावण्याच्या योग्यतेचे आहे, तसे ते लावले गेल्यास तो लेखिकेचा सत्कार होईल आणि ती एक अपूर्व आणि कौतुकास्पद अशी घटना असेल.''

आचार्य अत्रे ह्यांचे हे वरील उद्गार आज काळाच्या कसोटीवर

तंतोतत खरे ठरले आहे. शालेय आणि विश्वविद्यालयीन स्तरावर ह्या पुस्तकाचा अभ्यास होतो आहे आणि लेखिकेचा हा एकप्रकारे सत्कारही होतो आहे.

प्रकाशनप्रसंगीच आचार्य अत्रे ह्यांनी आपल्या भाषणात लक्ष्मीबाई टिळकांचा 'साहित्यलक्ष्मी' म्हणून गौरव केला होता! यथोचित गौरव करून झाल्यावर अत्रे लक्ष्मीबाईंना म्हणाले होते,

''हे पुस्तक लिहून मराठी साहित्याची इतकी उदंड सेवा केली आहे, की 'आता आणखी काही लिहा' असे तुम्हांला सांगणे म्हणजे आम्ही निर्दय, कठोर आहोत असा त्याचा अर्थ होतो. आता आपण आपल्या उतारवयात पूर्ण विश्रांती घ्यावी.''

'आपण हजार पानांचा ग्रंथ लिहू शकलो!' ह्या विचाराने अचंबित झालेल्या लक्ष्मीबाईंनी आपल्या भाषणात सत्काराला असे उत्तर दिले: ''माझ्या प्रकाशकांना मला सांगायचे आहे, की लक्ष्मीबाईचा फुलस्टॉप अजून झालेला नाही.''

इथे जीवनाकडे पाहण्याची त्यांची आशावादी वृत्ती आणि उमेद ह्या त्यांच्या गुणांचे दर्शन आपल्याला घडते.

–'मी होतो, तसाच लिहा' हा टिळकांचा आदेश लक्ष्मीबाईंनी पाळताना 'होते तशी लिहिले' असाही पवित्रा घेतल्याचे दिसते. त्यामुळेच आपला भांडखोरपणा, आपला खोडकरपणा, आपली विनोदबुद्धी, आपली फजिती, आपला आळशीपणा, आपल्या चुका असे आपल्या स्वभावाचे भले-बुरे कंगोरे त्यांनी संपूर्ण 'स्मृतिचित्रे'भर उजागर केले आहेत.

उत्साही, हसऱ्या, गप्पिष्ट, लहान मुलांची अतोनात आवड असणाऱ्या, मायाळू, खेळकर, खोडकर, सेवाभावी, स्वभावाच्या लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यांच्या एकूण साहित्यातून दिसतात. कधी अंधश्रद्धांना फाटा देणाऱ्या तर, क्वचित प्रसंगी पारंपरिक

समजुतीला बळी पडणाऱ्या लक्ष्मीबाई दिसतात. धर्मांतरापूर्वी कटाक्षाने सोवळे पाळणाऱ्या आणि नंतर सोवळे झुगारून लक्ष्मीबाई दिसतात. ईश्वराने घडवलेल्या माणसांमध्ये, माणसांनीच निर्माण केलेल्या उच्च-नीचतेला नाकारणाऱ्या लक्ष्मीबाईही दिसतात. प्रसंगावधानता राखणाऱ्या, धोरणी, कठोर, खंबीर, वकिली बाण्याच्या, स्पष्टवक्त्या अशीही त्यांची रूपे प्रसंगी लक्षात येतात. एकूणच लक्ष्मीबाईंचे हे घरगुती तरीही अलौकिक व्यक्तिमत्त्व 'स्मृतिचित्रे'च्या वाचनानंतर वाचकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील असेच आहे.

नारायण वामन टिळक हे आधुनिक कविपंचकातील एक महत्त्वाचे कवी असले तरी आज मराठी साहित्यात एखाददुसऱ्या कवितेपलीकडे ते उरले नाहीत, त्याचप्रमाणे लक्ष्मीबाई टिळक ह्या एका धर्मांतरित ख्रिस्ती लेखिकेचा 'स्मृतिचित्रे' हा ग्रंथ उपेक्षित ठरण्याची शक्यता होती. आचार्य अत्रे ह्यांच्यासारख्या साहित्यिकाने 'स्मृतिचित्रे'च्या प्रकाशनावेळी त्यातील लेखनाविषयी आणि लेखिकेविषयी गौरवोद्‌गार काढले म्हणून 'स्मृतिचित्रे' त्याकाळात अधिक लक्षवेधी ठरले आणि कालांतराने शतकातील मराठी वाङ्‌मयातील महत्त्वाचा ग्रंथ म्हणून आज त्याची नोंददेखील झाली.

देवदत्त टिळकांनी संक्षेप करून दिलेल्या 'स्मृतिचित्रे'ची संक्षिप्त आवृत्ती साहित्य अकादमीने काढली. त्यामुळे हिंदी-गुजराती भाषांमध्येही 'स्मृतिचित्रे'ला वाचक मिळाले. मिस जोसेफाइन इन्क्सटर ह्यांनी 'स्मृतिचित्रे'चा इंग्रजीत I Follow After- हे शीर्षक देऊन अनुवाद केला आणि 'स्मृतिचित्रे'चा वाचकवर्ग वाढवला.

'स्मृतिचित्रे'च्या चौथ्या भागाचे प्रकाशन लक्ष्मीबाईंच्या निधनानंतर १५ डिसेंबर १९३६ रोजी झाले. त्यातील ८४ पृष्ठांचे लेखन लक्ष्मीबाईंनी केलेले असून मधला काळ, आई आणि आजी,

सत्कार समारंभ, शेवट, विसावा ह्या पाच प्रकरणांतील लक्ष्मीबाईंविषयीचे ६२ पृष्ठांचे लेखन देवदत्त टिळकांनी केलेले आहे. 'स्मृतिचित्रे'च्या अभिनव आवृत्तीमध्ये अशोक देवदत्त टिळक ह्यांनी अभ्यासपूर्ण अशी १५७ पानांची परिशिष्टे जोडली आहेत.

■

—

१. अशा होत्या लक्ष्मीबाई टिळक-जयंत अनंत पारुंडेकर, मराठा, रवि.पुरवणी, २९-१२-१९६९, स्मृ.४: पृ.११८

२. मने, तुझ्या जीवनाचं सार्थक झालं-दुर्गाबाई भागवत, गुलमोहर दिवाळी अंक, १९८७, पृ.३८

३. ललित, जुलै १९६८

४. स्मृ.परिशिष्ट ५:१२०

## लक्ष्मीबाईंचे वक्तृत्व

### विचारपीठावर पाऊल ठेवण्यापूर्वी

लक्ष्मीबाईंचा स्वभाव मुळात फार बोलघेवडा होता. गाठीशी अनुभवांचा समृद्ध साठा होता. तो पेश करण्यासाठी आणि श्रोत्यांना खिळवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या खुमासदार शैलीचे वरदान त्यांना लाभलेले होते. त्यामुळे प्रसंगी भाषण लिहिलेल्या कागदांकडे त्या ढुंकूनही पाहत नसत. लक्ष्मीबाई ह्या काही वक्त्या म्हणून प्रसिद्ध नव्हत्या. परंतु वेळ आली की, आपल्या अमोघ वक्तृत्वाने श्रोत्यांना प्रभावित करण्याचे कसब त्यांच्या ठायी निश्चित होते. त्यांचे साधे घरगुती बोलणेही ऐकण्यात एक मौज वाटत असे. राजनांदगावला एक वक्तृत्व समारंभ झालेला होता. असा काही समारंभ असतो हे पाहण्याचा त्यांच्या आयुष्यातला तो पहिलाच प्रसंग. पण त्यावेळी लक्ष्मीबाईंना आपला सहभाग म्हणून पैसे देता येत नाहीत तर स्वयंपाकाची आणि वाढप्याची जबाबदारी टिळकांच्या सांगण्यावरून घ्यावी लागली होती. भाषण करण्याची वेळ त्यांच्यावर आली नव्हती.

त्यानंतर नगरमध्ये १९००सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या २३ ते ३० तारखेदरम्यान झालेल्या ख्रिस्ती ऐक्य सभा ह्या ख्रिस्ती समाजाच्या हजारोंच्या सभेपुढे प्रत्येक वक्त्याला दहा मिनिटे बोलायचे होते. त्या वक्त्यांमध्ये टिळकांच्या पत्नीचेही नाव होते. लक्ष्मीबाईंपूर्वी दोनचार भाषणे झाली होती. टिळकांनी लक्ष्मीबाईंना भाषण लिहून दिले होतेच शिवाय रानात नेऊन ते व्यवस्थित त्यांच्याकडून वदवूनही घेतले होते. लक्ष्मीबाईंचा भाषणासाठी नंबर आला तेव्हा नथ-बुगड्या घातलेल्या, कुंकू लावलेल्या, कासोट्याचे लुगडे नेसलेल्या आणि नुकत्याच ख्रिस्ती झालेल्या लक्ष्मीबाईंच्या तोंडून किमान नऊ मिनिटे तरी शब्दच फुटेना.

चित्राप्रमाणे सभा स्तब्ध होऊन ‘टिळकांच्या बायकोचे’ भाषण ऐकण्याच्या उत्सुकतेने प्रतीक्षा करत बसली होती; हिच्या तोंडून शब्द फुटावा म्हणून देवाला विनवत होती. कोणी पाणी आणून दिले. कोणी लवंगा दिल्या. हातात टिळकांनी लिहून दिलेले भाषण होते पण ते पाहण्याची बुद्धी काही लक्ष्मीबाईंना होईना. अजून बरीच भाषणे व्हायची होती. त्यामुळे डॉ.ह्यूम लक्ष्मीबाईंचे आभार मानायला म्हणून उठले आणि जादूची कांडी फिरल्यासारखे झाले. लक्ष्मीबाईंच्या जिभेला बसलेले लोखंडी बंध अचानक सटासट सुटले आणि त्या घडाघडा बोलू लागल्या. कागदावर लिहिलेल्या भाषणापेक्षा काही तरी वेगळेच पण मुद्याचे. ‘काही राहिले असेल ते मिस्टर टिळक सांगतील’ असे सांगून त्या मोकळ्याही झाल्या.

टिळकांनी आपल्या भाषणात सांगण्यासारखे काही शिल्लक राहिले नसल्याचे सांगून लक्ष्मीबाईंच्या भाषणाला कौतुकाची पावतीच दिली. पण त्यावर लक्ष्मीबाई चिडल्या. म्हणाल्या, ‘‘यापुढे मी कुठे बोलावे असे तुम्हाला वाटत असेल तर भाषण पाठ करून चालणार नाही. मला जे वाटेल तेच मी बोलेन. दुसऱ्याच्या लिहून देण्याने माझ्या मनाचा गोंधळ होतो.’’

लक्ष्मीबाईंच्या वक्तृत्वाबद्दल टिळक एका पत्रात लिहितात–Mrs. Tilak has come before the Xn[१] community as a speaker! She certainly does well and in some respects better than myself. In her case it is inspiration only. (2010-1902) [२]

त्यानंतर आपण पुष्कळ सभांमधून भाषणे केली पण ती कधीच लिहून पाठ करून केली नसल्याचे लक्ष्मीबाई सांगतात (स्मृ.२: पृ.८९).

अहमदनगरच्या युनियन ट्रेनिंग कॉलेजमध्ये टिळक शिकवत

असताना एकदा आपला तास घ्यायला म्हणून त्यांनी बायकोलाच पाठवून दिले. नुकतेच लग्न झाले तेव्हाही आपल्या बायकोची चारचौघांत फजिती होऊ नये असे त्यांना मनोमन वाटत होते, म्हणून भांग घातलेली भजी त्यांनी तिला खाऊ दिली नव्हती. आपल्या बायकोची चारचौघांत– विशेषत: आपल्या विद्यार्थ्यांसमोर फजिती व्हावी असे आतादेखील त्यांना नक्कीच वाटले नसेल. त्यामुळे एकप्रकारे त्यांचीच नाचक्की झाली असती. मग लक्ष्मीबाई शिकलेल्या नसताना टिळकांनी त्यांना कोणत्या हेतूने प्रौढ मुले शिकत असलेल्या वर्गावर आपला तास घ्यायला पाठवले असावे?

शाळेची पायरी कधीच न चढलेल्या लक्ष्मीबाईंनी मात्र युनियन ट्रेनिंग कॉलेजची पायरी चढून तिथल्या प्रौढ विद्यार्थ्यांपुढे सराईतपणे तास घेतला! पत्नीवरचा हाच विश्वास टिळकांना पडताळून पाहायचा होता का? 'पाण्यात पडल्यावर पोहणे' येतेच ह्या म्हणीनुसार आपल्या अडाणी बायकोमध्ये 'आपण हेसुद्धा करू शकतो' असा आत्मविश्वास त्यांना निर्माण करायचा होता का? तेव्हा भीती वाटून लक्ष्मीबाईंची गाळण उडून 'त त प प' झालेली दिसत नाही किंवा घाबरून बावरून 'नऊ मिनिटे मौनात' वाया गेल्याचेही दिसत नाही. टिळकांना आपल्या बायकोने कोणी तरी मोठ्ठे व्हावे, लेखन, भाषण ह्यात प्रावीण्य मिळवावे असे वाटत असे. त्या दिशेने त्यांचे नेहमी प्रयत्न चालत असत.

लक्ष्मीबाईंना सुरुवातीपासून रीतसर शिक्षण मिळाले असते तर त्यांचे कर्तृत्व कदाचित आणखी वैशिष्ट्यपूर्ण झाले असते. लक्ष्मीबाईंनी अनेक भाषणे केली असल्याचे त्या स्वत: म्हणत असल्या तरी ती सर्वच्या सर्व उपलब्ध नाहीत. पण महत्त्वाच्या विचारपीठांवरून भाषण करण्याची पाळी त्यांच्यावर तीनच वेळा आली. ती त्यांची भाषणे महत्त्वाचीदेखील ठरली. ती भाषणे उपलब्ध आहेत. त्यावरून

लक्ष्मीबाईंच्या वैचारिक झेपेचा अंदाज बांधता येऊ शकेल.

त्यांपैकी पहिले भाषण होते नाशिकमध्ये कवी माधव ज्यूलियन ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्ष म्हणून केलेले तर, दुसरे नागपूर येथे भरलेल्या चौथ्या ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या पहिल्या स्त्री अध्यक्ष म्हणून केलेले! आणि तिसरे भाषण होते ते 'स्मृतिचित्रे'च्या प्रकाशन समारंभाचे. हे त्यांचे अखेरचे भाषण ठरेल अशी कोणाला कल्पनाही नव्हती. लक्ष्मीबाई शिकलेल्या नव्हत्या परंतु भाषणे करण्याची वेळ त्यांच्यावर जेव्हा जेव्हा आली तेव्हा तेव्हा त्यांनी लिखित भाषण बाजूला ठेवून उत्स्फूर्त फलंदाजी केल्याचे दिसते.

**कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्ष**

१६ सप्टेंबर १९३३ रोजी नाशिकमध्ये कवी माधव ज्यूलियन ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्ष म्हणून लक्ष्मीबाईंनी केलेले भाषण हे लौकिक अर्थाने त्यांचे झालेले पहिले भाषण म्हणता येईल. ह्या भाषणाने त्यांना एकदम प्रसिद्धीच्या झोतात आणले. स्वागताध्यक्ष ह्या नात्याने श्रोतृवृंदाशी यथोचित संवाद साधताना कवयित्री लक्ष्मीबाई टिळक आपल्या कवितेतून म्हणतात-

आपण आलां बरें जहाले, मन्मन पाहुनि धालें
कविरसिकांचे स्वागत करण्या सरसावुनि मी आलें
खरें सांगतें, मला ह्यांतलें ज्ञान मुळीं तें नाहीं;
चुकेन तेथें क्षमाहि करितिल भगिनी माझे भाई

अशी विनम्र भूमिका घेऊन त्यांनी आपले विचार मांडले आहेत.

'जे काव्य मनाला हलवत नाही, ते काव्य नव्हे. विचार, कल्पना, भावना ही परिपक्व होऊन शब्दरूपाने प्रतिबिंबित होतात, ते काव्य.' अशी काव्याची व्याख्या करून काव्य हे अल्पायु आणि चिरायु अशा

दोन प्रकारचे असल्याचे सांगून ज्या काव्यात गायन, वादन, नर्तन ह्या कला ओतप्रोत भरल्या आहेत पण त्यात ओजस्विता नसेल, त्यात प्राण नसेल, तर ते काव्य अल्पायु काव्य आहे, असे आपले मत त्यांनी व्यक्त केले. कवी हा ज्ञाता, दाता आणि नेता असतो हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले. आधुनिक काव्य हे हृदयाला हलवते, पंडिती काव्य मेंदूला शीण आणते आणि अर्वाचीन कवींचे काव्य भावनाप्रधान असते अशीही आपली निरीक्षणे आपल्या ह्या भाषणात लक्ष्मीबाईंनी नोंदली आहेत.

कवींची तीन भागांत वर्गवारी करताना पहिल्या वर्गातला प्रतिभावान कवी हा परिस्थितीचा स्वामी असतो, परिस्थिती त्याची स्वामिनी नसते, दुसऱ्या वर्गातला कवी एखाद्या भांड्याला धक्का बसला की ते आवाज करते, घड्याळाला किल्ली दिली की ते चालू लागते त्याप्रमाणे असतो, म्हणजेच तो वास्तविक कवी नसतो. आणि तिसऱ्या वर्गातला कवी हा स्वयंसेवक ह्या वर्गातला असतो. ह्याचा अर्थ असा की, स्फूर्तिदेवी त्याच्याकडे जात नाही, तर तो तिच्याकडे जातो. अशा होतकरू कवींना कविता लिहिण्याच्या भानगडीत न पडण्याची लक्ष्मीबाईंनी हात जोडून विनंती केली आहे. अशा कवींना उद्देशून त्या म्हणतात:

''विचारसागराला भरती येऊ द्या. मग तुम्ही मोत्यांचे हार गुंफा. असे न झाले तर तुम्ही केवळ यमके बनाल.'' कसे ? तर त्याविषयीची एक कविताही त्या पेश करतात.[३]

पहिल्या वर्गातील कवीची कविता म्हणजे काव्य, दुसऱ्या वर्गातील कवीची कविता म्हणजे कविताच आणि तिसऱ्या वर्गातील कवीची कविता म्हणजे 'कपिता' असा निष्कर्ष त्यांनी नमूद केला आहे.

नाशिकमध्ये झालेल्या ह्या कविसंमेलनात 'गोदातटीचा गुंजारव'

ह्यावर बोलताना त्यांनी नाशिकचे पूर्वीचे नाव 'पद्मपूर' होते ते, शूर्पणखेचे नाक रामाने कापले त्यानंतर 'नाशीक' कसे झाले हे सांगतात.

इथले आद्य कवी वाल्मिकी होत ह्याचा उल्लेख करून तिथल्या प्राचीन आणि तत्कालीन कवींचा नामोल्लेख त्यांनी केला आहे. त्यात कवी कुसुमाग्रजांचा आवर्जून उल्लेख केला आहे.

भाषणाच्या समारोपात लक्ष्मीबाईंनी अध्यक्षांची करून दिलेली ओळख लक्ष्मीबाईंच्या सहजशैलीचा प्रत्यय देते.

भिन्नभार सारें विसरू
परस्परांचा हात धरू
स्फूर्तिदेविला जगिं वितरूं
संमेलन हे पूर्ण करू

आपल्या भाषणाचा समारोप करताना कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्ष म्हणून संमेलन एकोप्याने पार पाडण्याचे आवाहन कवितेतूनच करण्यातही त्यांनी औचित्य दाखवले आहे.

कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्षांच्या भूमिकेतून लक्ष्मीबाईंनी केलेले भाषण ऐकून लोक अचंबित झाले. हातातला कागद एकदाही न उघडता अस्खलितपणे खणखणीत आवाजात त्यांनी भाषण केले होते. एवढेच नव्हे तर, श्रोत्यांनी केलेला गोंधळही त्यांनी आपल्या खणखणीत आवाजात चार शब्द सुनावून थांबवला होता.

कवयित्री म्हणून काही मासिकांतून लक्ष्मीबाईंची प्रसिद्धी जितकी झाली, त्याहून अधिक ह्या स्वागताध्यक्षीय भाषणामुळे एकदम झाल्याचे देवदत्त टिळक सांगतात. (स्मृ.४:९५) 'माझे काम हे बोजा टाकण्याचे आहे, माझ्या भाषणात विसंगती असेल ती श्रोत्यांनी सुसंगत करून घ्यावी' असे आवाहन श्रोत्यांनाच करत माधव ज्यूलियन् ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्षाची भूमिका

लक्ष्मीबाईंनी उत्तम रीतीने पार पाडली. लक्ष्मीबाईंचे स्वागताध्यक्षाचे हे भाषण रा.एकनाथ यादव निफाडकर ह्यांनी 'वाङ्मय' मासिकात छापले आणि नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून ते फुकटही वाटले.

ह्याच कविसंमेलनात लक्ष्मीबाईंनी आणखीही एक भाषण केले होते. संजीवनी मराठे ह्या तरुण आणि उगवत्या कवयित्रीचे कौतुक हार घालून आणि उत्स्फूर्तपणे लक्ष्मीबाईंनी छोटेसे भाषण करून केले होते. स्वागताध्यक्षाने कवींचे असे कौतुक करण्याची प्रथा तोवर सुरू झालेली नव्हती.

एका प्रथितयश दिवंगत कवीच्या अशिक्षित भार्येची साहित्यिक कारकीर्द अशी बहरत गेली, इतकी बहरत गेली की, तिच्या अखेरच्या भाषणापर्यंत तिला 'साहित्यलक्ष्मी' म्हणून गौरवले गेले, ते आजतागायत!

■

### मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण

नागपूर येथे २८डिसेंबर १९३३ रोजी एटीन फॉर्टी (१८४०) चर्चमध्ये भरलेल्या ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या चौथ्या अध्यक्ष म्हणून लक्ष्मीबाईंनी केलेले भाषण हे त्यांचे दुसरे आणि अत्यंत महत्त्वाचे असे भाषण होय. आपल्या ओघवत्या शैलीत सहज, साधी उदाहरणे देत एका अशिक्षित बाईने आपले मुद्दे ज्या कुशलतेने मांडले आहेत, ते अचंबित करायला लावणारे आणि त्यामुळेच प्रशंसनीय आहेत. खरे म्हणजे आता लक्ष्मीबाईंचा 'अशिक्षित' म्हणून उल्लेख करणे महापातक करण्यासारखे होईल.

भाषणाच्या सुरुवातीलाच लक्ष्मीबाईंनी आपण समाजातील ज्ञाते व वक्ते ह्यांच्यापुढे रज:कणाप्रमाणे असल्याचे आणि आपली वाङ्‌मयसेवा ही कूपमंडुकाप्रमाणे अल्प असल्याचे म्हटले आहे.

आधीची ख्रिस्ती साहित्य संमेलने ही 'महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य संमेलन' ह्या नावाने भरली होती. लक्ष्मीबाईंच्या अध्यक्षतेखाली भरलेले संमेलन हे 'मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन' ह्या नावाने भरले होते. ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या त्या चौथ्या अध्यक्ष आणि आणि आतापर्यंतच्या अध्यक्षांमध्ये पहिल्या महिला अध्यक्ष होत.

आपल्या अडतीस पानांच्या अध्यक्षीय भाषणाच्या पुस्तिकेत ख्रिस्ती साहित्य संमेलनाची आवश्यकता का आहे, ख्रिस्ती वाङ्‌मयसेवकाच्या आड येणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत, हिंदू आणि ख्रिस्ती वाङ्‌मय कोणत्या वाङ्‌मयाला म्हणायचे, अशा अठरा मुद्यांवर लक्ष्मीबाईंनी आपले विचार नेहमीच्या पद्धतीने अतिशय सुबोध शैलीत मांडले आहेत. ख्रिस्ती आचार-विचार व विधिशास्त्र ह्यांना मराठी पेहराव नसल्याचे आधीचे अध्यक्ष देवदत्त टिळक ह्यांनी आपल्या भाषणात म्हटले होते, त्याचा लक्ष्मीबाईंनी आपल्या भाषणात सांस्कृतिक व

सामाजिक संदर्भात विस्तार केला.

मराठी ख्रिस्ती माणसाची भाषा बिघडण्याचे कारण कर्मठपणाने त्याने टाळलेले हिंदू वाङ्मयाचे वाचन हे असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आपल्या वाङ्मयाची वाढ करायची असेल तर, अशी कर्मठ वृत्ती ठेवून चालणार नाही असेही त्यांनी बजावले आणि मिशनरींनी अशी वृत्ती ठेवली नसल्याचेही लक्षात आणून दिले.

'ख्रिस्ती साहित्य' म्हणजे नेमके काय, ख्रिस्ती लेखकाने लिहिलेले की, ख्रिस्ती धर्माविषयी असलेले ह्या संदर्भात प्रथमच विचार मांडला गेला तो लक्ष्मीबाईंच्या भाषणात. त्यावर आपल्या खुसखुशीत शैलीत त्यांनी केलेला युक्तिवाद मुळातून वाचण्यासारखा आहे. ख्रिस्ती उपासनापद्धतीचाही विचार त्यांनी आपल्या भाषणात केला.

'परमेश्वराला विग्रह आवडत नाही. आकाशातील ग्रहगोल एकमेकांच्या आकर्षणाने एकमेकांचा तोल सांभाळून आपला संसार थाटून बसले आहेत. तशीच महाराष्ट्रातील सर्व समाजाचे लोक आपल्या ह्या मायभाषेच्या आकर्षणाने आपले संसार थाटून एकमेकांशी गुण्यागोविंदाने नांदोत अशी जगन्नियंत्याकडे प्रार्थना करून' लक्ष्मीबाईंनी आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप केलेला आहे.

लक्ष्मीबाई टिळकांचे हे भाषण म्हणजे काही मुद्यांवर किती सडेतोडपणे, ठामपणे आणि विचारपूर्वक त्या बोलू शकतात, ह्याचा प्रत्यय देणारे आहे, ह्यात शंका नाही.

■

## ‘स्मृतिचित्रे’ प्रकाशन समारंभातील भाषण

लक्ष्मीबाईंनी केलेल्या, उपलब्ध असलेल्या आणि गाजलेल्या भाषणांपैकी आणखी एक म्हणजे त्यांच्या ‘स्मृतिचित्रे’च्या प्रकाशनसमारंभातील भाषण. प्रकाशनसमारंभ लहानसाच, पण शाळेचे तोंडदेखील न पाहिलेल्या तरीही उत्कृष्ट साहित्यनिर्मिती करणाऱ्या एका सामान्य बाईच्या आयुष्यातला म्हणून महत्त्वाचा! भाषण अगदी लहानसेच, पण साहित्यलक्ष्मीने केलेले ते शेवटचे भाषण म्हणूनही अतिशय महत्त्वाचे!

आचार्य अत्रे ह्यांनी ‘स्मृतिचित्रे हे पुस्तक विश्वविद्यालयामध्ये परीक्षेला लावण्याच्या योग्यतेचे आहे, एका निरक्षर बाईने ते लिहिलेले आहे, त्यामुळे ते अभ्यासक्रमात दाखल होण्याची घटना कधीतरी घडून येईल’ असे खात्रीपूर्वक आपल्या भाषणात सांगितले. आचार्य अत्रे ह्यांच्यासारख्या प्रभावी आणि हुकमी टाळ्या घेणाऱ्या भाषणानंतर लक्ष्मीबाईंनी केलेले अवघे तीन वाक्यांचे भाषण अतिशय हृद्य ठरले. ‘इतक्या उत्कृष्ट लेखनानंतर आता आणखी काही न लिहिता पूर्ण विश्रांती घ्यावी’ असे अत्रे लक्ष्मीबाईंना भाषणात म्हणाले होते, तो धागा पकडून त्या म्हणाल्या,

**‘‘ज्या दिवशी मला पूर्णविराम मिळेल त्याच दिवशी माझ्या स्मृतिचित्रांना पूर्णविराम मिळेल. माझे भाऊ, नाती, नातवंडे इत्यादिकांचे हे सारे गोत येथे जमले आहे. त्यांच्या मार्फत मी माझ्या प्रकाशकाला सांगते की, लक्ष्मीबाईचा फुलस्टॉप अजून झालेला नाही!’’**

लक्ष्मीबाईंनी लेखन करणाऱ्यांचे जे तीन वर्ग कल्पिले होते, त्यातल्या प्रतिभावान, उत्स्फूर्त लेखकाच्या पहिल्या वर्गाच्या साहित्यिकाचे हे उद्गार आहेत.

या लक्ष्मीला काय कमी? मी जरी भिकारी अंगे,

शब्द कल्पनासंपत्ती ही सदैव हीच्या संगे! (पतिपत्नी)

ही सार्थ जाणीव असलेल्या पण लौकिक अर्थाने शिक्षणाची कुठलीही पदवी नसलेल्या एका प्रगल्भ साहित्यिकाचे हे उद्गार आहेत.

आचार्य अत्रे ह्यांची भविष्यवाणी खरी ठरली आहे. आज लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रे'चा अभ्यास केल्याशिवाय मराठीच्या अभ्यासकाला पुढे जाताच येत नाही, कारण शतकातील मराठी वाङ्मयसूचीत 'स्मृतिचित्रे' अढळ स्थान मिळवून बसलेले आहे!

■

—

१. Xn -Christian

२. स्मृ. २:८९. हे पत्र टिळकांनी किती तारखेला लिहिले हे सांगितले असले तरी ते कोणाला लिहिले आहे, हे संपादकांनी दिलेले नाही .

३. स्मृ.परिशिष्ट १:पृ.७

## लक्ष्मीबाईंशी भावबंध

लक्ष्मीबाईंचा गोतावळा फार मोठा असला आणि त्यांच्याशी भावबंध असलेली माणसे बहुसंख्य असली तरी स्थलसंकोचाअभावी इथे त्यातल्या त्यात महत्त्वाच्या अशा ज्या मोजक्या व्यक्तींचा उल्लेख स्वतंत्रपणे करणे आवश्यक वाटते, त्यात लक्ष्मीबाईंना पुत्रवत् असणारे त्र्यंबक बापूजी ठोमरे ऊर्फ बालकवी, पंडिता सरस्वती रमाबाई आणि साहित्याचा व विद्वत्तेचा वारसा लाभलेले, टिळकसाहित्यसंशोधनार्थ ज्यांनी आपली हयात सत्कारणी लावली ते लक्ष्मीबाईंचे नातू पंडित अशोक (अप्पा) देवदत्त टिळक हे आहेत.

**बालकवी : मानसपुत्र**

टिळकदाम्पत्याला तीन मुलगे आणि एक मुलगी अशी एकूण चार अपत्ये झाली. त्यातील एकच अपत्य दीर्घायुषी ठरले—देवदत्त. टिळकांच्या निधनानंतर लक्ष्मीबाईंच्या आयुष्यात पुढे अनेक मुला-मुलींचा गोतावळा जमला. त्यातल्या अनुक्रमे रावबहादूर रामचंद्र विठ्ठल बंडेकर, देवदत्त, भा.ल.पाटणकर, सोपानदेव चौधरी आणि दलित नेते भाऊराव गायकवाड ह्या पाचांना ‘पाच पांडव’ म्हटले गेले होते. लक्ष्मीबाई ह्या एकट्या देवदत्तांच्या आई नव्हत्या तर, अनेकांच्या ‘हक्काच्या आई’ झाल्या होत्या. मिस्कील स्वभावाचे भास्करराव उजगरे बायबलमधील संदर्भ घेऊन गमतीने टिळकांना ‘अब्राहाम पापा’ आणि लक्ष्मीबाईंना ‘सारा अम्मा’ म्हणत. आपल्या पत्नीच्या पहिल्या खेपेची काळजी वाटत असलेल्या भास्कररावांनी अलिबागहून पत्र पाठवून ‘साराअम्मा, तुमच्या तिकडेच तिने यावे असे आम्हां दोघांना वाटते’ असे ह्याच हक्काने कळवले होते (स्मृ.४:४६).

टिळकदाम्पत्याने अनेक मुलांचा सांभाळ केला. पण त्यातील एकच त्यांचा मानसपुत्र पुढे नावारूपाला आला, तो म्हणजे त्र्यंबक बापूजी ठोमरे ऊर्फ बालकवी. टिळकांच्या कुटुंबात त्र्यंबक बापूजी ठोमरे ह्या सतरा वर्षांच्या मुलाने प्रवेश केला आणि त्याला लक्ष्मीबाईंच्या चरित्रात ठळक स्थान प्राप्त झाले. त्यामुळे त्याची स्वतंत्रपणे दखल घेणे आवश्यक वाटते. बालकवी टिळकांच्या घरी पहिल्यांदा आले (१९१०च्या सुमारास) तेव्हा टिळक घरी नव्हते. लक्ष्मीबाईंना बरे वाटत नसल्यामुळे त्या जमिनीवरच आडव्या झाल्या होत्या. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर त्या 'लोळणफुगडी' घालत होत्या. पहिल्या वाक्याला लक्ष्मीबाईंनी त्यांना औपचारिकता म्हणून 'अहोजाहो' म्हटले असेल तेवढेच, आपल्या अघळपघळ आणि आतिथ्यशील स्वभावानुसार त्यांनी लगेच बालकवींचे तरुण वय आणि दुपारची भुकेची वेळ लक्षात घेऊन म्हटले, 'बाळ, आमच्याकडचं चालत असेल तर आणि भूक लागली असेल तर कपाटातून दूध-केळी घे.'

त्यावरून बालकवी त्यांना नेहमी म्हणत, 'लक्ष्मीबाई, पंचम जॉर्ज जरी आला तरी त्यालाही तुम्ही बाळ, येताना जरा फाटक लावून ये बरं, म्हणाल.' दुसऱ्या कोणी अरे-जारे केलेले बालकवी खपवून घेत नसत मात्र लक्ष्मीबाईंनी आपल्याला अरे-तुरे करावे, हक्काने त्या म्हणत असलेल्या 'मूर्खा' ह्या लाडक्या नावाने आपल्याला हाक मारावी असा त्यांचा आग्रह असे. 'स्मृतिचित्रे' मध्ये लक्ष्मीबाई बालकवींचा उल्लेख त्यांच्या 'ठोमरे' ह्या आडनावानेच करताना दिसतात.

बालकवी, दत्तू, तारा ह्या मुलांत टिळक पती-पत्नीने कधी फरक केला नाही. बालकवींचे सारे रुसवे-फुगवे त्या दोघांकडे चालत. बालकवींनी लक्ष्मीबाईंकडे ठेवायला दिलेले आपले पैसे आपला भाऊ ज्या पद्धतीने खोटेनाटे सांगून घेऊन गेला, त्या प्रकाराचे वाईट वाटून

बालकवींनी आपले मन मातेसमान असलेल्या लक्ष्मीबाईंकडे मोकळे करणे, लक्ष्मीबाईंना रोज रात्री थोडी थोडी सुचलेली एकूण पावणे तीनशे ओळींची कविता त्यांनी फरशीवर कोळशाने लिहिणे आणि सकाळी बालकवींनी ती कागदावर उतरवून काढणे, लक्ष्मीबाईंची 'मनुष्य' ह्या शब्दातले जोडाक्षर लिहिण्यातली अडचण समजून घेऊन ती बालकवींनी सोडवणे, 'लक्षुंबाईं'नी लिहिलेल्या 'सामाजिक कादंबरी'ला बालकवींनी 'अभिप्राय' लिहिणे, आपली कविता हक्काने सर्वप्रथम लक्ष्मीबाईंनाच ऐकवणे, सतरा वर्षांच्या पण अशक्तपणामुळे लहानखुऱ्या दिसणाऱ्या बालकवींची प्रकृती सुधारावी म्हणून लक्ष्मीबाईंनी कॉडलिव्हर ऑईल सुरू करणे, विषमज्वर झाला असता पोटच्या मुलाची घ्यावी तशी त्यांची काळजी  घेणे, त्यावर बालकवींच्या आईने 'लक्ष्मीबाई, नाना माझा नाही, तुमचा आहे. तुम्ही होतां म्हणून त्याचा पुनर्जन्म झाला' असे अत्यंत कृतज्ञतेचे उद्गार काढणे, ठोमरेला 'चांगला मुलगा म्हणावे' ह्या हेतूने लक्ष्मीबाईंनी शिस्त लावणे आणि बालकवींनीही त्यांचे म्हणणे ऐकून त्याप्रमाणे वागणे, आईच्या मागे लेकराने असावे तसे  टिळकांपेक्षा लक्ष्मीबाईंच्या मागे मागे त्यांचे असणे, 'गोष्ट सांगा' म्हणून हटून बसणे, अशा किती तरी गोष्टी लक्ष्मीबाई आणि बालकवी ह्यांच्यातील ममत्वाचे नाते सांगून जातात.

'ख्रिस्ती झाल्याने आत्मिक उन्नती होते', हा स्वानुभव बालकवींना सांगून 'तू ख्रिस्ती झालास तर मला आनंदच होईल' असे म्हणणाऱ्या लक्ष्मीबाई बालकवींवर आपले व टिळकांचे निखळ नि:स्वार्थी प्रेम असल्याचे त्यांना पटवून देतात.

टिळकपरिवारातीलच एक असावेत अशा नात्याने बालकवी टिळकांच्या घरी राहत होते. टिळकांविरुद्ध त्यांचे कान कोणी भरले की, त्यांनी टिळकांचे घर सोडून जावे, पण पुन्हा  करमेनासे झाले,  किल्मिष

जाऊन मन स्वच्छ झाले की, ते परत हक्काने टिळकांच्या घरी येत. त्यांचे हे नाते लक्षात घेऊन बालकवींचे चरित्र लिहिताना काही नवी आणि मौलिक माहिती लक्ष्मीबाई देतील ह्या आशेने बेळगावचे कृ.बा.मराठे नाशिकला टिळकांच्या घरी गेले होते. परंतु दत्तू येईपर्यंत लक्ष्मीबाई काहीच बोलल्या नाहीत आणि दत्तू आल्यानंतरही 'आपल्याकडे सांगण्यासारखे काहीच नाही' असे त्यांनी सांगितल्यामुळे हात हलवत निराश मनाने मराठे टिळकांच्या घरातून बाहेर पडले.

मराठे यांचे सहकारी असलेल्या विद्याधर भास्कर उजगरे ह्यांनी मराठे ह्यांना आपल्या वडिलांकडची काही टिपणे देवदत्तांनी नेली होती अशी माहिती दिली होती आणि काही आपले मेहुणे मंगेश पाडगावकर यांनी नेली, काही आईकडे असतील, ती सर्व मिळवून देण्याचे कबूल केले होते. मौजच्या श्री.पु.भागवतांनीही पाडगावकरांच्या सासूबाईंकडे जाण्याचे मराठेंना सुचवले होते. त्यानुसार मराठे नंतर विद्याधर उजगरे ह्यांच्या भावाच्या—हरिश्चंद्र उजगरे ह्यांच्या घरी मुंबईत भांडुप येथे सोनूबाई उजगरे ह्यांना भेटण्यासाठी गेले.

१६ मे १९१६ रोजी रेव्ह. भास्करराव उजगरे ह्यांच्या घरी (पुणे) जाऊन बालकवींनी त्यांना आपल्या कवितेचे संपादन करावे अशी मैत्रीखातर गळ घातली होती. बालकवी भास्कररावांना आपला खराखुरा मित्र, हितचिंतक आणि बंधू मानत. त्या भावनिक नात्याला स्मरूनच त्यांच्या काव्यसंग्रहाचे संपादन करण्याच्या हेतूने भास्कररावांनी टिपणे काढलीही होती. परंतु त्यांच्या वाढदिवसाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे टॉन्सिल्सचे ऑपरेशन ठरले होते. ठरलेले डॉक्टर काही कारणाने येऊ शकले नाहीत, त्याऐवजी दुसरे डॉक्टर आले. त्या नवशिक्या डॉक्टरकडून चुकीची शीर कापली गेली आणि टेबलावरच भास्कररावांचे अकाली आणि आकस्मिक निधन झाले. त्यामुळे

बालकवींच्या पुस्तकाचे काम भास्कररावांच्याकडून होऊ शकले नव्हते. भास्कररावांनी काढलेली ती टिपणे[१] त्यांच्या पत्नी सोनूबाई उजगरे ह्यांनी बेळगावच्या कृ.बा.मराठे ह्यांच्याकडे सुपूर्द केली. त्या टिपणांचा आपल्याला खूप उपयोग झाल्याचे मराठे ह्यांनी आपल्या पुस्तकात कृतज्ञतेने नमूद करताना आधी लक्ष्मीबाईंकडे गेलो असताना त्यांनी आपल्या पदरी कशी निराशा टाकली ह्याचाही उल्लेख केला आहे.:

त्यातील हा काही भाग:[२]

...त्या आल्यावर मी त्यांना लवून नमस्कार केला आणि त्यांच्या जवळच खुर्चीवर त्यांनी बसा म्हटल्यावर मी बसलो.

दोनचार मिनिटे आम्ही काहीच बोललो नाही. त्यांनीही विचारपूस केली नाही. मीच त्यांना म्हणालो,

''आपला 'प्रतिभा' पाक्षिकातील बालकविविषयक लेख मी वाचला आहे. मला तो फार आवडला. मीही त्यांच्या चरित्रावर एक लहानसा लेख लिहिला आहे. आपण तो वाचून पाहावा आणि मला काही माहिती द्यावी, माझ्या काही शंका आहेत, त्याही निरसन करून मला आशीर्वाद द्यावा.''

त्यावेळी त्या त्रासलेल्या होत्या की काय कोण जाणे. त्यांनी एकाच वाक्यात मला मोडून काढले.

''मला बालकविविषयी सांगायचे होते ते मी माझ्या आठवणीत लिहिलेच आहे. त्यापेक्षा वेगळे मला काही सांगायचे नाही.''

या वाक्याने लक्ष्मीबाईंविषयीच्या माझ्या अपेक्षांचा मनोरा पार ढासळला. आठवणीतल्या लक्ष्मीबाई वेगळ्या आणि या व्यवहारातल्या लक्ष्मीबाई वेगळ्या, हे जाणवले. पण अवसान आणून मीच पुन्हा म्हटले,

''आपल्याला आठवणी सांगायच्या नसल्या तर मी आपल्याला त्रास देत नाही. पण मी माझा निबंध वाचतो, तो तरी ऐकून घ्या.''

''तुम्हांला जे काही सांगायचे असले ते आत्ता दत्तू येईल, त्याला विचारा आणि तो सांगेल तसं टिपण घ्या.''

आम्ही दोघेही शेजारी आपापल्या खुर्च्यांवर निमूट बसून होतो. माझ्या मनाचा तर पुतळाच होऊन गेला होता. दहा-बारा मिनिटे चूपचाप वातावरण होते. मग लक्ष्मीबाईंचा दत्तू आला तो सरळ आतच गेला. त्यात वावगे काहीच नव्हते. पण मला मात्र वाटले की, हे दत्तोपंत टिळक नसून 'लक्ष्मीबाईंचा दत्तू' आहे. आणि झालेही तसेच. ते दोनतीन मिनिटांतच बाहेर आले. त्यांनी आमच्याकडे पाहिले. माझ्या हाती वही नि पेन्सिल होतीच. त्यावेळी त्यांनाही माझ्या कामाची कल्पना आली असेल. तथापि मी ती बोलून स्पष्ट केली. त्यावर 'मला ठोमऱ्यांविषयी काही विशेष माहिती नाही' अशासारखे एकदोन वाक्यातच तुटक बोलून ते जे गेले होते ते बाहेर आलेच नाहीत. मी आणि लक्ष्मीबाई त्यानंतर तशीच न बोलता पंधरा मिनिटे तरी स्वस्थ बसून होतो. येथे आपली वर्णी लागत नाही अशी खात्री झाल्यावर मी त्यांचा निरोप घेतला आणि त्यांना त्रास दिल्याबद्दल त्यांच्याकडे क्षमा मागितली. (पृ.१८)

...तथापि कै.भास्करराव उजगरे यांच्या म्हणण्याप्रमाणेच मलाही वाटले की, ''आमच्या मते त्र्यंबकरावांच्या चरित्रलेखनाचे कार्य दत्तोपंत टिळकांनी करावयास पाहिजे होते...तथापि त्र्यंबकरावांच्या चरित्रातला बराचसा महत्त्वाचा भाग पुणे येथे गेलेला असल्यामुळे कदाचित ते कार्य करणे त्यांना अडचणीचे वाटल्याचा संभव आहे.'' (पृ.१९)
भास्कररावांच्या ह्या म्हणण्यावर मराठे लिहितात,

देवदत्तांना माहिती मिळवणे शक्य होते. त्यांनी लिहिले असते तर त्याचे अधिक मोल झाले असते, सरस झाले असते.

पुढे मराठे लिहितात—

नाशिकमधील नकार माझ्या मागोमागच येत असावा.

श्री.वि.का.मुळे यांच्या घरी गेलो. मुळे आठवणी सांगत असताना देवदत्त येताच ते दोघेही उठून आत गेले. नंतर बाहेर येऊन 'मला काही विशेष आठवणी आहेत, असे नाही. ज्या होत्या त्या तुम्हांस सांगितल्या आहेत. आता सांगण्यासारखे आणखी काही नाही.' असे म्हणत कामासाठी बाहेर जायचा आविर्भाव करत त्यांनी डोक्यावर टोपी ठेवली. खुंटीवरील कोटाला हात घातला.''

उजगरेंच्या घरून मिळालेल्या भास्कररावांच्या टिपणांविषयी मराठे लिहितात:

'भास्कररावांचे साहित्य नुसते उपयुक्तच नव्हे तर, अत्यंत हृद्य आणि सुंदर प्रसंगांनी नटले होते. माझ्या चित्रमंदिराला जणु कळस शोभेल इतके ते मनोहर होते. श्रीमती (सोनुबाई) उजगरे व श्री.मंगेश पाडगावकर यांचे सहकार्य मिळाले म्हणूनच हा योग आला.'

मराठेंनी लिहिलेला हा अनुभव वाचल्यावर आता प्रश्न असा उभा राहतो की, टिळकदाम्पत्याला ठोमरे हे मुलासारखे होते; दत्तू आणि बालकवी हे भावंडांसारखे एकाच घरात वावरत होते; तर मग लक्ष्मीबाई आणि देवदत्त टिळक हे दोघेही असे का बरे वागले? टिळकांच्या अनुमतीची वाट न पाहता अनेक वेळा स्वयंनिर्णय घेणाऱ्या लक्ष्मीबाई बालकवींबाबत बोलण्यासाठी दत्तूवर का विसंबून राहिल्या? विठ्ठलराव घाटे लक्ष्मीबाईंना भेटायला आले, तेव्हा त्यांनी आपली ओळख सांगितल्यावर इंदूरहून खास आपल्याला भेटायला म्हणून आलेल्या कवी दत्तांच्या ह्या मुलाला लक्ष्मीबाईंनी मायेचे भरते येऊन पोटाशी धरले होते. बालकवींवर तर लक्ष्मीबाई जीव ओवाळून टाकत. मग लक्ष्मीबाई इतक्या रुक्ष का वागल्या असाव्यात?

आपले 'स्मृतिचित्रे' चे लेखन उतरवून घेण्याचे काम करणाऱ्या इंदिरा त्रिभुवन ह्या आईविना तरुण मुलीचीही ती नाशिकला आल्यावर

आईच्या मायेने लक्ष्मीबाई काळजी घेत.

दिवंगत बालकवींच्या आठवणी सांगून झाल्या असल्या आणि आता काही सांगण्यासारखे शिल्लक राहिले नसले तरी बालकवींचे नाव निघाल्यावर लक्ष्मीबाई जराही मनातून हलत नाहीत? थोड्याही हळव्या होत नाहीत? लक्ष्मीबाईंना स्वत:चे असे एकच अपत्य होते. पण मानलेली मुले-सुना, मुली-जावई, भाचरे, नातवंडे असा गोतावळा फार मोठा होता. त्यांच्यासाठी लक्ष्मीबाईंच्या मायेचा, आपुलकीचा झरा कायम वाहता राहिला होता. मग अकाली मृत्यूने गाठलेल्या पुत्रवत् बालकवींविषयी आठवणी लिहिताना 'स्मृतिचित्रे'तला तो सात पानी खळाळता, प्रसन्न झरा असा कसा, कधी आणि कशामुळे आटला असावा नि शब्दांचा तुटवडा पडला असावा?

ह्या प्रश्नाच्या उत्तरादाखल आपापल्यापरीने चिकित्सक अभ्यासक काही अंदाज लावतीलसुद्धा पण अधिकृत उत्तर मिळणे मात्र आज शक्य नाही.

■

---

१. अभ्यासार्थ त्या टिपणांचा शोध घेण्यासाठी भास्कररावांची नातसून अनुपमा निरंजन उजगरे ह्यांनी प्रयत्न केला असता मराठे ह्यांच्या पुढच्या पिढीकडून असले काही साहित्य आता आपल्याकडे नसल्याचे सांगण्यात आले. केवढा हा दैवदुर्विलास!

२. बालकवी-कृ.बा.मराठे, मौज,१९६२

## महाराष्ट्राच्या दोन तेजस्विनी :
## पं.रमाबाई व साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक

लक्ष्मीबाई आणि पंडिता रमाबाई ह्या दोघींनी आपल्या कार्याने महाराष्ट्राला आगळा लौकिक प्राप्त करून दिलेला आहे. त्यामुळे दोघींनाही महाराष्ट्राच्या तेजस्विनी म्हटले तर वावगे ठरू नये.

लक्ष्मीबाईंच्या आयुष्यात ख्रिस्ती आणि अन्य धर्माच्या समाजातील ज्या स्त्रिया आल्या त्यात ख्रिस्ती झालेल्या पंडिता रमाबाई ह्यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध आला. रमाबाईंनी बायबलच्या भाषांतरासाठी हिंदु आणि ख्रिस्ती धर्माचा अभ्यास असलेली तसेच इंग्रजी, संस्कृत आणि मराठी ह्या भाषांवर प्रभुत्व असलेली अगदी योग्य व्यक्ती म्हणून टिळकांना सहकुटुंब आपल्याकडे राहायला बोलावले होते. पण भाषांतराच्या कामात मतभेद झाल्यामुळे आणि बैठक मारून काम करण्याचा रमाबाईंसारखा स्वभाव टिळकांचा नसल्यामुळे टिळकांनी केडगाव सोडले. परंतु त्याबद्दल काहीही मनात न ठेवता रमाबाईंनी टिळकांच्या निधनानंतर लक्ष्मीबाईंना दुखवट्यासाठी आपल्याकडे केडगावला बोलावले होते. त्याप्रमाणे लक्ष्मीबाई येऊन राहिल्याही होत्या. तिथून त्यांना साताऱ्याला जावे लागले तेव्हा रमाबाईंनी चार लुगडी, जॅकेटांसाठी लागणारे फ्लॅनेल आणि वर तीस रुपये देऊन त्यांची रीतसर पाठवणी केली होती. रमाबाईंच्या आश्रमाबद्दल आत्मीयता असल्याने त्यांनी दिलेल्या तीस रुपयांतले पाच रुपये लगेच देऊन लक्ष्मीबाई 'गंगेचे पाणी घेऊन गंगेतच उदक सोडले' म्हणत आपली दानबुद्धी प्रकट केली होती.

साताऱ्यात आता आपल्याला टिळकांच्या निधनानंतर उपऱ्यासारखे राहावे लागेल ह्याची कल्पना असल्यामुळे आणि तिथे उपयोगी पडेल म्हणून लक्ष्मीबाईंनी हक्काने आणि मोकळेपणाने पंडिता

रमाबाईंकडून शिधाही मागून घेतला. इतके त्या दोघींचे संबंध चांगले होते.

आपली मते मांडताना पंडिता रमाबाईंनी कोणाचीही भीड बाळगली नव्हती. त्याचप्रमाणे लक्ष्मीबाईंनीही वेळोवेळी धीटपणे आणि परखडपणे स्वयंप्रज्ञेने आपली मते मांडलेली आपल्याला दिसतात. ह्याचे ठळक उदाहरण म्हणजे हिंदू समाजात एक पत्नी जिवंत असतानाही 'पुरुषांच्या पुनर्विवाहाच्या भयंकर साथीमुळे हिंदु समाजाला अनीतीचे स्वरूप येत आहे तेव्हा ख्रिस्ती लोकांप्रमाणे एकपत्नीत्वाचा कायदा केल्याशिवाय हे लोक शुद्धीवर येणार नाहीत' अशा आशयाचे त्यांनी ज्ञानप्रकाशला लिहिलेले पत्र (मे १९३५).

पंडिता रमाबाई आणि लक्ष्मीबाई टिळक ह्या दोघी समकालीन स्त्रिया असल्या तरी त्यांची इथे तुलना करण्याचे काही प्रयोजन नाही. परंतु दोघींच्या आयुष्यातील काही योगायोग इथे नमूद करावेसे वाटतात–

१. दोघी उच्चकुलीन ब्राह्मणकन्या होत्या.

२. दोघींचा जन्म भरल्या गोकुळात झाला होता.

३. दोघी मराठी भाषक होत्या.

४. दोघींचीही नावे विष्णुपत्नीची नावे होती.

५. दोघींचेही विवाह त्या काळाच्या प्रथेनुसार प्रौढविवाह होते. पंडिता रमाबाईंचा विवाह त्यांच्या वयाच्या २२ व्या वर्षी तर लक्ष्मीबाईंचा ११व्या वर्षी झाला.

६. रमाबाईंनी आपल्या भावाच्या मित्राशी विवाह केला तर लक्ष्मीबाईंचा विवाह आपल्या मैत्रिणीच्या भावाशी झाला.

७. दोघींच्या पतींचे लग्नाआधीपासून आपापल्या पत्नींवर प्रेम होते.

८. दोघींचे पती अति विद्वान, हजरजबाबी, फर्डे वक्ते, कविवृत्तीचे, संगीताची जाण असलेले आणि देखणे होते.

९. रमाबाईंनी आंतरप्रांतीय विवाह केला तर लक्ष्मीबाई देशावरच्या

आणि टिळक कोकणातले म्हणून त्यांचाही विवाह आंतरप्रांतीय म्हणता येईल.

१०. दोघींना एकच अपत्य लाभले. लक्ष्मीबाईंना एकूण चार अपत्ये झाली पण त्यातील एकच जगले.

११. दोघींच्या नशिबी वैधव्य आले.

१२. दोघींच्याही एकूण कारकिर्दीचा आलेख वैधव्यानंतर चढता राहिला.

१३. आपल्या आयुष्याच्या शेवटी रमाबाईंना बायबलचा मूळ भाषांमधून अनुवाद पूर्ण करण्याचा ध्यास लागला होता तर लक्ष्मीबाईंना 'ख्रिस्तायना'ची पूर्तता करण्याचा. दोघींचीही ही तीव्र आंतरिक इच्छा पूर्ण होईपर्यंत आयुष्य लाभले.

१४. स्पष्टवक्तेपणा, स्वयंनिर्णयशक्ती, खंबीरपणा, वक्तृत्व ही दोघींची स्वभाववैशिष्ट्ये होती.

१५. दोघींनी अनाथांचा सांभाळ केला.

१६. दोघींनी स्त्रियांच्या बाजूने कायदे करण्याविषयी जाहीर आग्रह धरला होता.

१७. दोघींनाही आयुर्वेदिक औषधांची माहिती होती.

१८. दोघींनी एकाच धर्माचा स्वीकार केला. त्याबद्दल त्यांना कधीही पश्चात्ताप झाला नाही.

१९. दोघींचे ख्रिस्ती धर्मविषयक लेखन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. धर्मांतराचे सार्थक करणारे ठरले, अशी त्यांची स्वत:ची भावना होती.

२०. दोघींच्याही आयुष्याला नाट्यपूर्ण कलाटणी मिळत गेली.

२१. दोघींनीही मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली.

२२. दोघींच्याही जीवनावर कथा, कादंबरी, नाटक असे साहित्य निर्माण झाले.

२३. दोघींच्याही साहित्यकृतींचे अनुवाद झाले.

२४. आंतरराष्ट्रीय क्षितिजावर दोघींचेही नाव झळकले.

### अशोक देवदत्त टिळक ह्यांचे योगदान

अशोक देवदत्त टिळक हे लक्ष्मीबाई आणि नारायण वामन टिळक ह्यांचे नातू. ते स्वत: कवी, चिकित्सक अभ्यासक आणि संस्कृतचे जाणकार होते. आपल्या आजी आजोबांच्या जीवनचरित्रविषयक साहित्यावर त्यांनी बरेच संशोधन करून लेखन केले. 'स्मृतिचित्रे' मधील अनावधानाने राहिलेले दोष दूर व्हावेत म्हणून त्यांनी आपल्या आयुष्यातील दहा ते पंधरा वर्षे अथक परिश्रम घेतले. साऱ्या महाराष्ट्रात फेरफटका मारून तत्कालीन लोकांच्या मुलाखती घेतल्या, टिळकांची पत्रे नकलून घेतली, लक्ष्मीबाईंच्या मानलेल्या अनेक नातेवाइकांकडून दुर्मीळ माहिती जमवली, टिळकांच्या अर्ध्यामुर्ध्या लिहिलेल्या दोन-चार डायऱ्या, २०००च्या वर कविता ह्या सगळ्याची जमवाजमव करून ती अभ्यासली आणि पडताळून पाहिली, अभिनव आवृत्ती संपादित करत असताना त्यांचा उपयोग केला आणि 'स्मृतिचित्रे'च्या ४०व्या वर्धापनदिनी ती आवृत्ती वाचकांच्या हाती दिली. ही तारीख गाठण्याची जिद्द ठेवली नसती तर उशीर होऊ शकला असता असेही ते कबूल करतात.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची 'स्मृतिचित्रे'ची पहिली आवृत्ती प्रमाण मानून हे संपादनकार्य त्यांनी केले. आतापर्यंत देवदत्तांनी काढलेली, साहित्य अकादमी (संक्षिप्त)ने काढलेली, अशा आवृत्त्या निघाल्या होत्या पण अभ्यासू आणि जिज्ञासू अ.दे.टिळकांचे त्याने समाधान झाले नव्हते. भारंभार निघणाऱ्या आवृत्त्यांमध्ये 'माझे चरित्र लिहायचे झाल्यास जसे घडले तसे लिहा' ह्या टिळकांनी घालून दिलेल्या दंडकाशी प्रामाणिकपणा कमी होऊन ते थोडे थोडे पातळ होऊ लागल्याचे जाणवल्यामुळे पहिल्या आवृत्तीबरहुकूम टिपांसहित नव्या आवृत्तीची

गरज त्यांना भासली.

स्वत:च्या जबाबदारीवर त्यांनी काही प्रपूरकेही जोडली. विस्तारभयास्तव काही प्रकरणे गाळली. 'स्मृतिचित्रे'मध्ये उल्लेख झालेल्या व्यक्तींची शक्यतो पूर्ण नावे देण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. काही त्रुटी त्यांनी तटस्थपणे अभ्यासपूर्वक दाखवून दिल्या आहेत. हेडमास्तर म्हणून पहिले त्र्यंबकशास्त्री खरे ह्यांचा लक्ष्मीबाईंनी केलेला उल्लेख चुकीचा आहे (स्मृ.२:९). किंवा १८ ऑगस्ट १९२० चा बारा जीव समुद्राने गिळल्याचा प्रसंग जूहूवर घडल्याचे लक्ष्मीबाई लिहितात तर, तो प्रसंग माहीमला घडल्याचे 'ज्ञानोदय'मधील वृत्तात म्हटले आहे. (ज्ञानोदय २६-८-१९२०, पृ.४:३६) अशी काही उदाहरणे सांगता येतील.

आपल्या दर वाढदिवशी —२९ मे रोजी एक तरी लहानसे का होईना पुस्तक प्रकाशित करण्याचा वसा अ. दे. टिळकांनी घेतला होता. 'स्मृतिचित्रे'मधून धागे सुटून गेलेले 'शांतिसदन' (१९७५), टिळकांचे चरित्र आणि विकसन ह्यांचा वेध घेणारे 'जरा वेगळा अँगल' (१९७९) अशी पुस्तके आणि 'अभंगांजली', 'ख्रिस्तायन' आणि 'स्मृतिचित्रे' ह्या पुस्तकांच्या आवृत्त्या प्रस्तावना-टिपांसह त्यांनी प्रकाशित केल्या. ना.वा.टिळक ह्यांच्यावर 'चालता बोलता चमत्कार' ह्या शीर्षकाच्या चरित्रात्मक कादंबरीचे लेखनही त्यांनी केले. कवी नारायण वामन टिळकांच्या काही कवितांचा स्वत: केलेला 'स्वर्गस्थ रे.टिलक का भक्तिसंगीत' हा हिंदी अनुवादित संग्रह त्यांनी प्रकाशित केला (१९४२). आपल्या आजोबा-आजीसंबंधी अभ्यासपूर्ण लेखन करून त्यांनी एकप्रकारे त्यांचे पांग फेडले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

■■■

## परिशिष्ट १ : जीवनपट

| | |
|---|---|
| १८६१ डिसेंबर ६ | नारायण वामन टिळक जन्म |
| १८६६ जून १ | मनकर्णिका नारायण गोखले (लक्ष्मीबाई) जन्म[१] |
| (१८६८ (?) | |
| १८७६ फेब्रुवारी १६ | जानकीबाई वामन टिळक निधन |
| १८७६ फेब्रुवारी २९ | टिळकांचे नाशकास पलायन |
| १८७७?) १८८०(?) | मनकर्णिका आणि नारायण टिळक विवाह[२] |
| १८८७ | विद्यानंदचा जन्म व निधन |
| (?) | नर्मदाचा जन्म-मृत्यू |
| १८८८ | लक्ष्मीबाईंचे शिक्षण |
| १८८९ | वामनराव टिळकांचा मृत्यू |
| १८९१ जुलै १६ | देवदत्त टिळक जन्म |
| १८९४ | महादेव/माधवचा जन्म व मृत्यू. |
| १८९४ | लक्ष्मीबाईंची पहिली कविता |
| १८९५फेब्रुवारी १० | टिळकांचे धर्मांतर |
| १८९६-९७ | दत्तूची मुंज |
| १८९९ | पाच वर्षांनंतर पुन्हा वैवाहिक जीवन सुरू |
| १९०० जुलै ८ | लक्ष्मीबाईंचा ख्रिस्तस्वीकार |
| १९०० (?) | तारा/बेबी/हेमांगिनीचे आगमन |
| १९०१-०२ | प्लेगच्या साथीत मुलांचा सांभाळ, |
| १९०२-०३ | लक्ष्मीबाईंचे मिरजेस शिक्षण राहुरीस 'ख्रिस्तसदन', पुनर्जन्म |

| | |
|---|---|
| १९०५ | पं.रमाबाईंच्या केडगावात |
| १९०६ | अहमदनगर |
| १९०७ | जळगाव कविसंमेलन, कवयित्री म्हणून प्रसिद्धी, |
| | बालकवींचा उदय |
| १९१० | बालकवींचे संगोपन |
| १९१३-१४ | कीर्तनकलेचे व ईश्वरविद्येचे शिक्षण, बाईंची कीर्तने, |
| | सामाजिक कादंबरीलेखन |
| १९१६-१७ | सातारा |
| १९१८ एप्रिल ३० | देवदत्त टिळक-रूथ सरोदे विवाह |
| १९१८ मे ५ | बालकवींचे निधन |
| १९१९ मे ९ | नारायण वामन टिळक निधन |
| १९१९ मे ११ | कवितालेखनाला पुन्हा सुरुवात |
| १९१९ ऑगस्ट ५ | पहिला नातू नारायणचा जन्म |
| १९१९-१९२२ | पहिली व शेवटची नोकरी |
| १९२० ऑगस्ट १८ | अकरा मुली व एक मुलगा ह्यांचा अपघाती मृत्यू |
| १९२१ मे २९ | दुसरा नातू अशोकचा जन्म |
| १९२२ सप्टें १० | नात मीराचा जन्म |
| १९२२ डिसेंबर २५ | कराचीत वास्तव्य. |
| ते १९२४ ऑक्टो. | नंतर नगरला भेट |
| १९२४ | नाशिकमध्ये स्थायिक. ‘स्मृतिचित्रे’लेखनास प्रारंभ. |
| १९२५ जुलै ३० | तिसरा नातू ध्रुवचा जन्म. |

| | |
|---|---|
| १९३१ | तारा-हेमचंद्र जोशी विवाह 'ख्रिस्तायन' लेखनास प्रारंभ. |
| १९३२ मे २९ | शांतिसदन |
| १९३३ सप्टेंबर १६ | कविसंमेलन स्वागताध्यक्ष, नाशिक. |
| डिसेंबर २८ | ख्रिस्ती साहित्य संमेलनाध्यक्ष, नागपूर. |
| १९३४ डिसेंबर १५ | स्मृतिचित्रे भाग १. |
| १९३५ डिसेंबर १५ | सत्कारसमारंभ- स्मृतिचित्रे भाग-३. |
| १९३६ फेब्रुवारी २४ | लक्ष्मीबाईंचा 'फुलस्टॉप' |

■

| | |
|---|---|
| १९३६ | ' ख्रिस्तायन' प्रकाशन. |
| १९५१ | 'भरलीघागर'(काव्यसंग्रह) पहिली आवृत्ती |
| १९९० | दुसरी आवृत्ती. |

■

—

१ व २: सदर ग्रंथ संदर्भ : पृ. ६व ७

***

■■■

## परिशिष्ट २ : लक्ष्मीबाई टिळकलिखित ग्रंथ

१. **राष्ट्रीयगीत** (अनुपलब्ध) १९३०-३१

२. **ख्रिस्तायन - ना.वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, देवदत्त टिळक.**
प्रका. देवदत्त नारायण टिळक, शांतिसदन, नाशिक, १९३६, पृ.१९८, किं.दीड रुपया,

३. **स्मृतिचित्रे**

१) प्रथम प्रकाशन: भाग १:१९३४, भाग २:१९३५, भाग ३: १९३६, भाग ४: १९३७, १९५३पर्यंत आवृत्त्या सात.

२) संक्षिप्त आवृत्ती, के.भि.ढवळे, मुंबई १९४०.

३) संक्षिप्त आवृत्ती, साहित्य अकादमी, मुंबई, १९५८, १९६८.

४) अभिनव आवृत्ती, १९७३, संपा.अ.दे.टिळक, संपूर्ण १,२,३ (१९९६),४ भाग, परिशिष्टे व विषयनिर्देशक सूची, टिपा, तळटिपा, प्रपूरके, इ.पुनर्मुद्रण २००२

५) वरदा प्रकाशन, पुणे

६) संपूर्ण स्मृतिचित्रे-लक्ष्मीबाई टिळक, देवदत्त टिळक, अशोक टिळक (संपा.) पॉप्युलर प्रका., मुंबई, आ.१ली १९८९ किं.२२५ रु.

४. **भरली घागर (काव्यसंग्रह) संपा.दे.ना.टिळक**
पॉप्युलर प्रका., मुंबई, आ.१ली, १ जाने.१९५१, आ.२री, १३ ऑगस्ट १९९०,पृ.१६८, किं.४० रु.

■■■

## परिशिष्ट ३ : अनुवाद

**अ. लक्ष्मीबाईंनी केलेला अनुवाद**

Little Robin Red Breast चा 'अरुणहृदया चिमुकल्या पक्षिराया' -बालबोध मासिक.

*

**ब. 'स्मृतिचित्रे'चे अनुवाद**

**१.इंग्रजी-** I Follow After- Josephine Inkster ( Part 1,2,3)- 1950. (Published in India by Geoffrey Cumberledge, Oxford University Press, Madras, pp.353)

**२.गुजराथी-** स्मृतिचित्रे-अनु.जी.डी.पटेल; जी.जी.विद्वांस साहित्य अकादमी, आवृत्ती १ ली १९७०, पृ.४७०, किं.१० रु.

**३.हिंदी-** स्मृति के चित्र-संपा.दे.ना.तिलक, अनु.:रामचंद्र रघुनाथ सरवटे साहित्य अकादमी, १९८४, पृ.४६४, किं.४० रु.

■■■

## परिशिष्ट ४ : संदर्भग्रंथ

**अ : ग्रंथ**

**१.अगदी स्टेप बाय स्टेप-** संपा.अ.दे.टिळक,प्रका.सु.द.करंदीकर,बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, हजारीमल सोमाणी मार्ग, मुंबई ४०००० १., १९६३

**२.Agdi step by step-** संपा.अ.दे.टिळक,प्रका.मायावती टिळक,नाशिक, १९६६.

**३. उपासनासंगीत-** प्रका.बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, २१, वॉर्डबी रोड, मुंबई -१, आवृत्ती विसावी, १९६७

**४.एका ब्राह्मणीचे चित्र-** मिस हॅर्टा ब्रूस (अप्रकाशित), स्मृतिचित्रे, अभिनव आवृत्ती.१९८९.

**५.क्रिस्तपुराण-** फा.थॉमस स्टिफन्स, संपा.कारिदाद दाग्रो, पॉप्युलर प्रका., मुंबई, आ.१ली, १९९६, श्रेयस आव्रृत्ती २००९

**६.ख्रिस्तायन- ना.वा.टिळक, लक्ष्मीबाई टिळक, देवदत्त टिळक.** प्रकाशक देवदत्त नारायण टिळक, शांतिसदन, नाशिक,१९३६, पृ.१९८.

**७.चालता बोलता चमत्कार-** अशोक देव टिळक
नागरिक छापखाना, नाशिक, १९ ६१

**८.जरा वेगळा अँगल-** अशोक देवदत्त टिळक
नागरिक छापखाना, नाशिक, १९७९.

**९.झिम्मा-** विजया मेहता, राजहंस प्रकाशन, पुणे, नोव्हें.२०१२

**१०.टिळकांची कविता-** भाग १
संपा.भास्करराव उजगरे,५१५, नानाची पेठ, पुणे,१९१४, आ.१ली.

**११.टिळकांची कविता-** भाग,२(अभंगांजली)

संपा.भास्करराव उजगरे, प्रका.देवदत्त नारायण टिळक, मेन रोड, नासिक,१९३०,आ.२री.
दिलीपराज प्रकाशन, २५१ क, शनिवार पेठ, पुणे-३०, १५ जून २००३.

**१२.थांब सहेली (काव्यसंग्रह)-** कुसुमाग्रज, पॉप्युलर प्रका.,मुंबई, २००२.

**१३.धर्म ख्रिस्ताचा, विचार साहित्याचा-** सुनील आढाव

**१४.बालकवी (चरित्र)-** कृ.बा.मराठे मौज प्रकाशन, १९६२.

**१५.महाकवयित्री लक्ष्मीबाई टिळक-** डॉ.स.ग.यादव, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.१९८८

**१६.महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृती कोश- संपा.डॉ.अनुपमा उजगरे,डॉ.सुनंदा पाटील, विष्णु मनोहर.**
**प्रका. महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, २०१५.**

**१७.लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतिचित्रे: एक चिंतन-** प्रा.मीर इसहाक शेख, प्रतिमा प्रकाशन, १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्ट., नव्या विष्णुचौकाजवळ, पुणे ४११०३०, द्वितीय आवृत्ती १९९७.

**१८.संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश-** संपा.प्रभा गणोरकर, उषा टाकळकर, वसंत आबाजी डहाके, जया दडकर, सदानंद भटकळ., जी.आर.भटकळ फौंडेशन, मुंबई, २००४

**१९.'स्वर्गस्थ रे.टिलक का भक्तिसंगीत'-** (हिंदी अनुवाद), नागरिक छापखाना, नाशिक, १९४२.

■

**ब. नियतकालिके/साप्ताहिके/ दैनिके**

**१.गुलमोहोर** (दिवाळी अंक) १९८७.

**२.चित्रमय जगत** मार्च १९३६.

**३.दीपावली-** साहित्यलक्ष्मी-अनंत काणेकर आलमगीर, १९६८, पृ१८. लेख

**४.नवशक्ती-** ७-७-१९६८

**५.बालबोधमेवा** मार्च १९४१.

**६.मराठा** रविवार पुरवणी,२९-१२-१९६९

**७.महाराष्ट्र टाईम्स** ७-७-१९६८.

**८.महाराष्ट्र साहित्य पत्रिका** मार्च १९३६.

**९.ललित** जुलै १९६८-'त्या आईचं दर्शन' -माधव मनोहर.

**१०.स्त्री** ऑगस्ट १९३२, सुधा ताम्हाणे-(लेख), फेब्रुवारी १९३६, मे १९३६, ऑगस्ट १९३३

**११.ज्ञानोदय** १८-३-१९२०, १-४-१९२०,२८-१०-१९२०,१-११-१९२०, ११-११-१९२०.१४-८-१९३०, ४-९-१९३०, ३०-१०-१९३०,२७-११-१९३०.२३-४-१९३१, १६-७-१९३११२९ ५-१९३२, २०-१०-१९०२, फेब्रुवारी २०१० मला भेटलेल्या लक्ष्मीबाई-अनुपमा उजगरे

■

**क. प्रबंध:**

कविवर्य नारायण वामन टिळक: एक अध्ययन

-डॉ.अनुपमा उजगरे, एस.एन.डी.टी.विद्यापीठ, मुंबई, २००५.

■■■

# परिशिष्ट :५ जन उवाच

लक्ष्मीबाईंच्या निधनानंतर त्यांना अनेक संस्थांकडून आदरांजली वाहण्यात आली. '**लक्ष्मीबाईंसंबंधी लोक काय म्हणतात**' हे शीर्षक देऊन '२५ फेब्रुवारीपासून १ मार्चपर्यंत' दे.ना.टिळक ह्यांच्या 'पाहण्यात आलेल्या प्रत्येक पत्राने व मासिकाने प.वा.लक्ष्मीबाईंसंबंधी धन्योद्गार काढले असून त्यातील दोन दोन चार चार वाक्ये ख्रिस्ती वाचकांसाठी' त्यांनी ते संपादन करत असलेल्या 'ज्ञानोदय'मध्ये दिली आहेत, ती अशी:

**ज्ञानोदय:**

लक्ष्मीबाईंच्या लहान आतड्याचे ऑपरेशन २१ फेब्रुवारी रोजी नाशिकला तेथील सिव्हिल सर्जन मेजर ग्रे ह्यांच्या हातून झाले. ऑपरेशनसाठी त्या आनंदाने तयार झाल्या होत्या. शेवटच्या चार दिवसांत शांती, समाधानीवृत्ती, सोशिकपणा आणि आचारधैर्य त्यांनी दाखवले होते, त्यामुळे हॉस्पिटलमध्ये सिव्हिल सर्जनपासून तर साधारण नोकरापर्यंत त्या सर्वांना फार प्रिय झाल्या होत्या. ऑपरेशननंतर त्यांना न्यूमोनिया झाला आणि २४ तारखेच्या पहाटे बारा वाजून पन्नास मिनिटांनी त्यांचे निधन झाले. आयुष्याला खडतरपणे सुरुवात करून शेवट इतक्या यशस्वीरीतीने होणे हे भाग्य फारच थोड्या लोकांना लाभते. जी कामे इतर आपल्या तरुणपणात करतात ती त्यांनी एकट्या निश्चयशक्तीवर साठी उलटून गेल्यावर केली. शुद्ध कसे बोलावे हे जरी त्यांना ठाऊक होते तरी शुद्ध कसे लिहावे हे ठाऊक नव्हते. असे असताही ज्यांची वाखाणणी आज सारा महाराष्ट्र एकमुखाने करीत आहे तो स्मृतिचित्रांचा अपूर्व ग्रंथ त्यांनी लिहिला. (ज्ञानोदय २७ फेब्रुवारी १९३६)

**केसरी :**

'स्मृतिचित्रे' रेखाटली व ती प्रसिद्ध होताच त्यातील निसर्गाच्या तोडीच्या सजीव रंगच्छटांनी सारे वाङ्मयचितारी मोहून गेले व त्यांनी आदराचा कारभार त्यांना अर्पण केला.–असल्या आदर्श साध्वीच्या व लेखिकेच्या मृत्युमुळे महाराष्ट्राची व मराठी भाषेची मोठीच हानी झाली आहे.

**चित्रा :**

लिहावयाला व वाचावयाला मुळीच न शिकलेल्या स्त्रीने लिहिलेले एक पुस्तक या दृष्टीने या पुस्तकाला जगाच्यासुद्धा वाङ्मयात तोड आहे किंवा नाही याची शंका वाटते. या भाषाशैलीत मराठी भाषेत दुसरीकडे कुठेही न आढळणारी अकृत्रिमता, जिवंतपणा आणि धडाडी आलेली आहे.

**लोकशक्ति :**

हिंदुस्थानातील राष्ट्रीयत्व हे केवळ हिंदूंचे, मुसलमानांचे किंवा ख्रिस्त्यांचे नसून सर्व धर्मातील ऐक्य ओळखणारांचे ते आहे व त्यात हिंदू-मुसलमान व ख्रिस्ती ह्या सर्व धर्मांच्या अनुयायांना सारखेच मानाचे स्थान आहे ही वृत्ती वाढविण्यास टिळक कुटुंबासारख्या ख्रिस्ती कुटुंबाचे फार मोठे साहाय्य होत असते. याचमुळे कै. लक्ष्मीबाईंच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर जो शोकाचा प्रसंग आला आहे त्यात सर्व महाराष्ट्रीय आपुलकीने सामील होत आहेत.

**लोकसत्ता :**

लक्ष्मीबाईंनी आपल्या अत्यंत कष्टाळू स्वभावाने व परोपकारी वृत्तीने मोठा स्नेहवर्ग आपल्यामागे ठेवला आहे. त्यांच्या अनुभवाचे खडे बोल

ऐकण्यास यापुढे मिळणार नाहीत म्हणून त्या स्नेहीवर्गास अत्यंत हळहळ वाटत आहे.

**महाराष्ट्र:**

असंस्कृत परंतु तूं अतुल रत्न मी जाणिलें
नको नवल मानुं कीं तुज यथेच्छ वाखाणिलें

बाईंचे वर्णन करावयाला या प्रेमळ शब्दांपेक्षा अधिक समर्पक शब्द दुसरे सापडणार नाहीत.

**प्रबोधचंद्रिका:**

त्यांनी रसाळ लेखणीने व भावनेच्या कोमल कुंचलीने रंगवलेली 'स्मृतिचित्रे' त्यांची स्मृति मराठी भाषेच्या अंतापर्यंत नुकत्याच तयार झालेल्या चित्राप्रमाणे सदैव ताजी ठेवतील यात तीलप्राय संशय नाही.

**विहार:**

श्री.लक्ष्मीबाईंची 'स्मृतिचित्रे' वाचल्यावर हिंदुधर्माची आमूलाग्र सुधारणा तरी झाली पाहिजे किंवा ज्या हिंदुंना माणुसकीला मुकावयाचे नसेल त्यांनी धर्मांतर तरी केले पाहिजे, याविषयी मुळीच शंका राहत नाही.

**ज्ञानप्रकाश:**

मराठी भाषेतील प.वा. पंडिता रमाबाई व श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्या आत्मचरित्रपर लेखनाच्या बरोबरीनेच नव्हे, तर काही बाबतीत त्यांच्याहीवर लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांचा दर्जा मराठीतील चरित्रग्रंथांत लागल्याखेरीज राहणार नाही. शिक्षणाचा मुळीच गंध नसताना व कौटुंबिक परिस्थिती कमालीची प्रतिकूल असताना आपला प्रपंच आणि सामाजिक दर्जा इतका वाढवणारी व मराठी साहित्यात चिरस्थान

पटकवणारी महिला महाराष्ट्राच्याच गेल्या शतकाच्या इतिहासातच काय पण हिंदुस्थानात इतरत्रही क्वचितच झालेली आढळून येईल. नाना तऱ्हेची संकटे स्वत:वर, स्वत:च्या पतीवर, स्वत:च्या मुलाबाळांवर ओढवलेली असताही त्या आपत्तींना तोंड देऊन ज्या स्त्रीची विनोदबुद्धी कायम राहिली, जिचे औदार्य रत्तीभरही कमी  झाले नाही, जिच्या पतिनिष्ठेला अल्पही ओहोटी लागण्याचा प्रसंग उद्भवला नाही, –ती महाराष्ट्र महिला लोकोत्तर म्हटली  पाहिजे.

**शेतकरी :**

शाळा-कॉलेजातल्या शिक्षणाचा संस्कार झाला नसताही, अनेक चिकित्सिक टीकाकारांनाही माना डोलवावयास लावणारे साहित्य निर्माण करणे, ही सामान्य गोष्ट नव्हे. आपल्या विनोदी वाङ्मयाबद्दल प्रसिद्ध असलेल्या प्रि.अत्र्यांनीदेखील 'श्रीमती लक्ष्मीबाईंच्या वाङ्मयात प्रकर्षाने असतो तसा हृद्य विनोद आजवर मराठीत कोणीही केला नाही', असे उद्गार काढले, त्यावरून त्यांच्या वाङ्मयाच्या उच्च दर्जाची कल्पना येऊ शकते.

**सकाळ :**

श्रीमती लक्ष्मीबाई यांची स्मृतिचित्रे वाङ्मयीक गुणांनी भरली असल्यामुळे वाङ्मयात तर त्यांना चिरकालिक स्थान तर मिळेल यात शंकाच नाही. पण महाराष्ट्रातील गेल्या ५०वर्षांचा सामाजिक इतिहास त्यात साठविलेला आहे.

**प्रतिभा :**

'करंजातील मोदक' ही सुंदर व 'गोड' कविता प्रसिद्ध करून कवींची

पत्नी याशिवाय काव्याचे आणि लक्ष्मीबाईंचे स्वतंत्र असे नाते निर्माण झाले. काव्याबरोबरच गद्यलेखनातही लक्ष्मीबाई यांचा हातखंडा आहे हे 'स्मृतिचित्रे' हा अपूर्व ग्रंथ वाचण्यापूर्वी कोणालाही ठाऊक नव्हते.

**महाराष्ट्र शारदा :**

लक्ष्मीबाईंसारखी मराठी लेखिका झाली नाही—त्यांच्या स्मृतिचित्रांच्या तोलाचे पुस्तक मराठीत नाही–हे त्यांचे कायमचे स्मारक होय.

**विविधवृत्त :**

लक्ष्मीबाईंचे चरित्र अशा रीतीने अलौकिकत्वाच्या अनेक प्रकाशपुंजांनी उजळलेले आहे. स्त्रीधर्मातील त्यांचे पत्नीत्व व मातृत्व हीं दोन्ही आदर्शवत् झाली असूनही त्यापेक्षाही त्यांचे व्यक्तित्व अधिक प्रभावी व मार्गदर्शक झाले आहे. आयुष्याची लढाई हसतखेळत निर्भयपणे खेळून 'सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथे असे जाहला' अशा ठिकाणी कृतकार्य होऊन निर्वाण करणाऱ्या या साध्वीला आम्ही भक्तिभावाने वंदन करतो.

**संजीवनी (साप्ता.) :**

दुसऱ्यांच्या दु:खाने काकूंच्या आतड्यांना आजवर पडलेला पीळ, कर्नल ग्रे यांनी कुशल शस्त्रक्रिया करून काढल्यावर काकू या दुखण्यातून तगल्या असे प्रत्येकाला वाटले– विनोदावर त्यांच्या आयुष्याची उभारणी झाली असल्याने हयातीत आलेल्या सर्व संकटांना त्यांनी हसतमुखाने कसे तोंड दिले याचा उलगडा होतो. ऑपरेशन टेबलवर त्यांच्या तोंडावर पांढरी स्वच्छ चादर घालीत असता, 'अरे, पांघरुण भित्र्या माणसांसाठी असते–मी तर खंबीर मनाची आहे 'असे हसऱ्या चेहऱ्याने बोलून त्या वेळचे काळजीचे वातावरण सुसह्य करण्याचा काकूंचा प्रयत्न पाहून

त्यांच्या धीराची कल्पना होते.

**निर्भिड:**

मुखपृष्ठावर लक्ष्मीबाईंचे पानभर चित्र देऊन वर 'माता दिसली काव्यीं विहरत, नेत सकल कविजाति यशासी' अशी ओळ दिली आहे.

**चित्रमयजगत्:**

मराठी वाङ्मयाला समृद्ध करणाऱ्या ज्या काही थोड्या ग्रंथांची भर मराठी वाङ्मयात अलीकडे पडली आहे त्यात 'स्मृतिचित्रे' या लक्ष्मीबाई यांच्या ग्रंथाचा प्रामुख्याने निर्देश केला पाहिजे. किंबहुना अशा धर्तीचा वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ मराठीत एकमेव आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कादंबरीपेक्षाही चित्तवेधक वर्णनशैली, संसारातील चित्र हळुवार हाताने रंगविण्याचे असामान्य कसब, भाषेचा काव्यमय घरगुतीपणा व सूक्ष्म विनोदाची आल्हाददायक पखरण इत्यादी या 'स्मृतिचित्रे'चे विशेष इतके उठून दिसणारे आहेत की, प्रतिभावान ग्रंथकारांच्या कृतीतही त्यांचा इतका मनोहर मिलाफ सापडेल की नाही शंका आहे. मराठी भाषेचे सहजसौंदर्य ज्यांस पाहावयाचे असेल त्याने 'स्मृतिचित्रे'वरून आपली एक नजर एकवार फिरवावीच.

**ज्ञानोदय २१ नोव्हेंबर १९३५:**

साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाईंचे स्मारक असावे, त्यासाठी अंदाजे पाच हजार रुपये लागतील असे कमलाताई ओक ह्यांनी लोकमान्यमध्ये म्हटल्यावर अनेक हिंदू स्त्रियांनी सहभाग देण्याची इच्छा दर्शवली होती. त्यावर ख्रिस्ती समाजाने किमान तीन हजार तरी जमवावेत असा विचार भुसावळच्या डॉ. पद्मा शिंदे ह्यांनी ज्ञानोदयातून मांडला होता.(ज्ञानोदय

४ जून १९३६) डॉ. शिंदे त्यात असेही म्हणतात की, 'आजी म्हणजे रेव्ह. टिळक नव्हत. त्या एक स्वतंत्र लेखिका होऊन गेल्या. त्यांचे वाङ्मयातील उज्ज्वल स्थान निराळेच आहे. कविपत्नी म्हणून त्यांच्याच आसनावर दाटीमुटीने बसण्याऐवजी स्वत:च त्यांनी एक स्वतंत्र स्थान मिळवले. ते अढळ आहे. प्रभात रा.भागवत ह्यांनी म्हटले होते–रिअल एन.व्ही.टिळक त्यांनी जगापुढे मांडले...त्यांच्या स्मृतिचित्रांनी टिळकांविषयीचे गैरसमज दूर केले.'पश्चिम महाराष्ट्राचे टागोर' म्हटल्याने किंवा त्यांचा गौरव ख्रिस्ती पत्रांतून करीत बसल्याने त्यांच्या मृत्युनंतरच्या १८वर्षांत जे कार्य झाले नाही ते कार्य एका 'स्मृतिचित्रे'ने केले व तेही चिरस्थायी केले.'

**महाराष्ट्र साहित्य पत्रिका:**

स्मृतिचित्रे हा अनुपम ग्रंथ लिहून ज्यांनी मराठी वाङ्मयात आपले नाव नुकतेच अजरामर केले त्या लक्ष्मीबाई टिळक हा लोक इतक्या लवकर सोडून जातील अशी कोणाचीच कल्पना नव्हती...ज्यांना धड चार ओळीही टाकाने नीट लिहिता येत नव्हत्या अशा एका स्त्रीच्या अंगात वाङ्मयाची खरी चित्कला किती जागती होती याचे लक्ष्मीबाई हे एक ठसठशीत उदाहरण होय. करी प्रतिभा ही बनविता येत नाही. ती अंगचीच असावी लागते, हेच खरे. (मार्च१८३६, पृ.७९६)

**चित्रमयजगत:**

शिक्षणाचा यत्किंचित गंधही नसता त्यांनी स्वत:च्या परिश्रमाने केवढी सामुग्री केली ते ध्यानात ठेवण्यासारखे आहे.आदर्श गृहिणी व लोकोत्तर महाराष्ट्र महिला या नात्यांनी लक्ष्मीबाईंचे चरित्र महाराष्ट्रीय स्त्रीवर्गाला आदर्शभूत झाले आहे, यात शंका नाही. जिव्हाळा , कथनकौशल्य,

तादात्म्यवृत्ती, भाषासौंदर्य इत्यादी गुणांच्या दृष्टीने स्मृतिचित्रे ह्या पुस्तकाची भाषा इतकी सहजसुंदर व परिणामकारक आहे, वर्णनपद्धती इतकी हृदयवेधक व मार्मिक आहे की त्यापुढे नामांकित कादंबरीकारांनी हात टेकावेत. ही स्मृतिचित्रे केवळ अपूर्व आहेत. त्यांचा रसास्वाद कितीही घेतला तरीती नित्य नूतनच राहतील. टिळक हे नाव अलौकिकतेबद्दल प्रसिद्ध आहे. लोकमान्य टिळक, रे.टिळक यांच्या मागोमाग लक्ष्मीबाई टिळक यांनीही आपले नाव महाराष्ट्रात अजरामर करून ठेवले आहे. (मार्च १९३६, पृ. १५५-१५६)

*

कवि कुसुमाग्रजांनी लक्ष्मीबाईंच्या निधनानंतर लिहिलेली ‘कसली खंती’ ही कविता देवदत्त टिळकांनी ‘टिळकांची कविता भाग ४’मध्ये ‘आई आम्हाला सोडून गेल्यानंतर येथील कवी कुसुमाग्रज यांनी तिच्यासंबंधी अगदी यथार्थ कविता लिहून पाठवली.’ अशा टिपेसह प्रकाशित केली (पृ.१५०-१५१). हीच कविता पुढे कुसुमाग्रजांच्या ‘थांब सहेली’ ह्या कवितासंग्रहात घेतली गेली (पृ.६४)–

**कसली खंती**

फुले पारवा कडेकडेला या जीवितमार्गी
प्रवासी मजसंगे कोण?
सहकारी जो करील अधिकच रथ हा सुखदायी
हसोनी आणिक हसवून
फुलांमध्ये फुलपाखरू होईल कोकिल वा
अशा उत्फुल्ल रसतात
हास्याच्या लहरी उठवोनी भरवि रागदारी
जीवनी हर्षगीत गात

आणिक सरुनी वसंत, होता फुटे वाळवंट
तरीही येईल मजसंगे
दिव्य दृष्टिला दिसतिल ज्याच्या क्षितिजावर तारा
ढगाच्या आवरणामागे
थकलेल्या जीवास जपोनी हळू चालवील
दाटता अंधारात दिशा
ओजस्वी वाणीने आणिल जीव निर्जिवाला
फुलविल पलिकडल्या आशा
वसंत असु द्या असो हिवाळा असो पावसाळा
लाभता असला सहकारी
कसली खंती? निरोपानंतर–भेट पुन्हा आणी
व्हायची देवाच्या दारी.

■■■

## परिशिष्ट: ६ शोकसभा

**कोल्हापूर**

एस्तेर पॅटन गर्ल्स हायस्कूलच्या प्रिन्सि.मिस सी.जी.डीन ह्यांच्या अध्यक्षतेखाली २ मार्च रोजी झालेल्या शोकसभेत कविवर्य माधव ज्यूलियन हे प्रमुख वक्ते होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, आज मराठी वाङ्मयात जी अत्यंत प्रसिद्ध चार-पाच पुस्तके आहेत त्यात 'स्मृतिचित्रे'ची गणना प्रामुख्याने करावी लागणार आहे.

दुखवट्याचा ठराव मांडताना नानीबाई चोपडे म्हणाल्या, 'स्मृतिचित्रे'च्या लेखमालेतून मराठी भाषेत एक नवीन लेखनप्रथा निर्माण केली.

**नाशिक**

नाशिक तालुका लोकल बोर्डाने आपली ठरलेली सभा तहकूब करून एका महार सभासदाने मांडलेला दुखवट्याचा ठराव स्वीकारला.

**अहमदनगर**

वाङ्मय मंडळ सभा रायबहादूर देशमुख यांच्या दिवाणखान्यात झाली. त्यात सरदार मिरीकर वगैरेंची भाषणे झाली.

**कराची**

येथील श्रीशिवाजी हायस्कूल सन्मानार्थ बंद ठेवण्यात आले.

**ह्याखेरीज पुढील ठिकाणी शोकसभा झाल्या —**

**अहमदनगर :** स्त्रियांची सभा, कलामंडळ.

**उमरावती**: मराठी वाङ्मय मंडळ, किंग एडवर्ड कॉलेज.

**कल्याण**: सरस्वती मंडळ.

**जळगाव**: भगिनीमंडळ.

**बडोदे**: महाराष्ट्र शारदा मंडळ.

**नागपूर**: हिंदी ख्रिस्ती सेवा संघ.

**नाशिक**: म्युनिसिपालिटीची सभा, जिल्हा लोकल बोर्ड, युनियन ऑफ ख्रिश्चन मेंबर्स, वाङ्मयविहार मंडळ, महाराष्ट्र वाङ्मय मंडळ, जिज्ञासा मंडळ, तत्त्वज्ञान मंडळ, शारदोपासक मंडळ, विद्यार्थीमंडळ.

**निपाणी**: रॉबर्ट ह्यूम मेमोरियल चर्च.

**पुणे**: स्त्रीमंडळ, नाशिक, नाना पेठ चर्च स्त्रियांची सभा , अभिनव शारदोपासक मंडळ,
शारदामंदिर.

**मुंबई**: मराठी वाङ्मय मंडळ नॅशनल मेडिकल कॉलेज, विल्सन हायस्कूल शिक्षकवर्ग, मेथडिस्ट मिशन परळ.

—

**संदर्भ**: ज्ञानोदय १९ मार्च १९३६

■■■

## परिशिष्ट ७ : लक्ष्मीबाई नारायण टिळक : एक की दोन ?

एकाच संपूर्ण नावाची दोनतीन माणसे असल्याचे मतदारयादीमध्ये आढळल्याचे आपण ऐकून असतो. तसाच प्रकार दोन साहित्यिकांमध्येही झालेला दिसतो आहे. ते दोन साहित्यिक दोन स्त्रिया आहेत. एकाच नावाच्या आहेत, एवढेच नाही तर, दोघींच्या नवऱ्यांचीही संपूर्ण नावे सारखीच आहेत. दोघींचे सासरे 'चिखलीकर' आहेत. दोघी एकाच काळातल्या आहेत आणि दोघींच्याही नावावर आत्मचरित्र ग्रंथ आहे! ते नाव आहे –'लक्ष्मीबाई नारायण टिळक.'

त्यातल्या एका लक्ष्मीबाई नारायण टिळक ह्यांच्या नावावर 'ऊन पाऊस' हे शीर्षक असलेले आत्मचरित्र आहे परंतु ह्या 'साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई नारायण टिळक' म्हणजेच कविवर्य रेव्ह. टिळकांच्या पत्नी नव्हत. ह्या लक्ष्मीबाईंचे पूर्वीश्रमीचे नाव अवंतिका शंकरराव परांजपे. लग्नानंतरचे त्यांचे नाव लक्ष्मी कमला नारायण टिळक आणि त्यांच्या आजेसासऱ्यांचे नाव विठ्ठल वामन टिळक 'चिखलीकर'.

लक्ष्मीबाई टिळकांचे अशुद्धलेखन शुद्ध करून वाचू शकणाऱ्या माधव मनोहरांना एकदा लक्ष्मीबाईंच्या लिखाणात 'पिसाबवेस' असा शब्द आढळला. प्रथमत: त्यांना वाटले, नगरमध्ये लक्ष्मीबाई बराच काळ राहिल्या होत्या, तिथल्या एखाद्या वेशीचे 'पिसाबवेस' हे नाव असावे. पण पुढे पुढे पिसाबवेस आला-गेला असे येऊ लागले तेव्हा त्याचा अर्थबोध त्यांना होईना. पण माधवराव चाणाक्ष होते. हा काय प्रकार असावा हे त्यांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. लक्ष्मीबाईंना लिहायचे होते 'प्रिन्स ऑफ वेल्स' पण जोडाक्षरे लिहिणे न जमल्याने त्या लिहून गेल्या–'पिसाबवेस'

माधवराव एके ठिकाणी लिहितात–

‘प्रिन्स ऑफ वेल्स हा शब्द शुद्ध लिहिणारे लाखो असतील पण ‘स्मृतिचित्रे’ लिहिण्याचे सामर्थ्य किती जणांत असेल?’*

साहित्य समीक्षक माधव मनोहरांनी अवघ्या एका वाक्यात केलेली लक्ष्मीबाईंच्या ‘स्मृतिचित्रे’ची ही रास्त समीक्षाच फक्त नाही तर, लक्ष्मीबाई नारायण टिळक ह्या नावाच्या कितीही स्त्रिया ‘लिहिणाऱ्या’ निघाल्या तरी ‘स्मृतिचित्रे’ लिहिणाऱ्या लक्ष्मीबाईं नारायण टिळक ह्या एकमेव असतील, हेच खरे!

■■■

—

* ललित, जुलै १९६८

## परिशिष्ट:८ लक्ष्मीबाईंचे ऋण स्मरताना...

लक्ष्मीबाई टिळकांच्या मानसकन्या इंदिरा त्रिभुवन ह्यांनी केशव सयाजी ठोकळ ह्यांच्यासह एक 'बोबडे बोल' नामक कवितांचा संग्रह प्रकाशित केला होता. (नागरिक छापखाना, नाशिक, १९३९, पृ.४०) प्रारंभी लक्ष्मीबाईंचे छायाचित्र असून ही पुस्तिका त्यांनाच अर्पण करण्यात आलेली आहे. ह्या संग्रहास दे.ना.टिळकांची प्रस्तावना आहे. केशव सयाजी ठोकळ, शांतवन सयाजी ठोकळ, सुहासचंद्र साळवी, स.ना.सूर्यवंशी, मेघश्याम पिराजी जाधव, ज.आ. थोरात, खुशालभाऊ घोरपडे, डी.एल.साळवी, इंदिरा त्रिभुवन ह्यांच्या कवितांचा समावेश असलेल्या ह्या पुस्तकातील विषय त्या काळानुरूप सर्वसामान्य असे असून काळानुसार रचना व वृत्तांचा उपयोग केलेला आहे.

**स्मृतिचित्रे**

**टेलिफिल्म**

विजया मेहता ह्यांनी दूरदर्शनसाठी 'स्मृतिचित्रे' हा चित्रपट दिग्दर्शित केला होता (१९८२). त्यात त्या स्वत:, सुधीर जोशी, सुहास जोशी, रवींद्र मंकणी, मंगेश कुलकर्णी, विश्वास मेहंदळे, हरिश्चंद्र उजगरे ह्यांनी कामे केली होती. निर्माता होते विनायक चासकर. टिळकांचे एक कीर्तन रवींद्र साठे ह्यांनी गायिले होते तर लक्ष्मीबाईंच्या निवडक प्रसिद्ध पाचसहा कवितांना संगीत दिले होते संगीतकार भास्कर चंदावरकर ह्यांनी. कार्लोव्हीमध्ये दिग्दर्शनासाठी विजया मेहता ह्यांना गौरवण्यात आले. 'स्मृतिचित्रे' ह्या चित्रपटाला अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आणि बऱ्याच आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात व अमेरिकन विद्यापीठांतून बरीच वर्षे 'स्मृतिचित्रे' दाखवला गेला.

(झिम्मा-विजया मेहता, पृ.३७५-३७६)

**एकपात्री प्रयोग**

**कुसुम ठेंगडी**

मूळ नागपूरच्या असलेल्या कुसुम (माहेरचे आडनाव देशपांडे) वसंत ठेंगडी यांनी एकपात्री प्रयोग केले. त्यांची अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

**सुहास जोशी**

अभिनेत्री सुहास जोशी ह्यांनी मुंबई, पुणे, बडोदा, अमेरिका असे देशापरदेशात पन्नासच्या जवळपास प्रयोग केले. त्यांच्या प्रयोगाची संहिता पुस्तकरूपाने पुरुषोत्तम प्रकाशन, पी.के. अण्णा पाटील, पूर्णा, वरळी, मुंबई-१८ ह्यांनी १९९३साली प्रकाशित केली.

**अनुपमा उजगरे**

अनुपमा उजगरे ह्यांनी प्रयोगासाठी स्वतंत्र संहिता तयार करून एकपात्री प्रयोग पुढील ठिकाणी सादर केले–

१ व २. सेंट कोलंबा गर्ल्स स्कूल, ग्रँट रोड, मुंबई १२ ऑक्टोबर २००५ रोजी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनदिनी एकाच दिवशी **दोन** प्रयोग लागोपाठ.

३.वॉर्नर मेमोरियल मेथडिस्ट मराठी चर्च, कुर्ला.२००५

४.ज्येष्ठ नागरिकांसाठी, औरंगाबाद जानेवारी २००६

५.दादर सार्वजनिक वाचनालय, मुंबई २३ डिसेंबर २००७

६.सुवार्ता अलायन्स चर्च, नंदुरबार २७ एप्रिल २००९

७. टीम (पूर्वीचे अमेरिकन ) मिशन, नवापूर, २८ एप्रिल २००९

८.वास्को वनिता मंडळ, (सुवर्ण महोत्सव) वास्को, १४ फेब्रुवारी २०१०

९.बहुभाषी ख्रिस्ती महिला मेळावा, नाशिक (हिंदीमध्ये) २०१०
१०.इंडिया फ्री मेथडिस्ट फेलोशिप चर्च, यवतमाळ ९ मे २०१५

**सावनी रिचर्ड रंगारे**
तारीख: ३० ऑक्टोबर २०१४
स्थळ: बॅलेंटाईन मेमोरियल चर्च, राहुरी चर्चच्या १००व्या वर्धापनदिनी डॉ.अनुपमा उजगरे ह्यांच्या एकपात्री संहितेतील 'स्मृतिचित्रे'चा काही अंश सावनी रिचर्ड रंगारे (वय वर्षे १३) हिने सादर केला.

**बोलके पुस्तक:**
**स्मृतिचित्रे** : विद्या हर्डिकर सप्रे, १७ जुलै २०१२
ध्वनिमुद्रण रामचंद्र चितळकर (सी.रामचंद्र) ह्यांनी संगीतबद्ध केलेली ही भरली घागर ही कविता 'चूल आणि मूल' चित्रपटासाठी ध्वनिमुद्रित करण्यात आली होती (१९४७).

**स्मृतिचित्रे अभिवाचन : संहिता :** डॉ.अनुपमा उजगरे
तारीख: १५ फेब्रुवारी २०१५
स्थळ: संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालय, वसई.
मुंबई साहित्य संघाचे महानगर साहित्य संमेलन.
सादरीकरण: डॉ.अनुपमा उजगरे, मकरंद जोशी.
संवादिनीसाथ: संगीतकार श्री.अशोक भुवनेश कीर्तने.

**'भरली घागर'**
आधुनिक कवयित्रींचा कालखंड लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई ह्यांच्यापासून मानला जातो. लक्ष्मीबाईंचा संग्रह बहिणाबाईंच्या आधी

आला. आधुनिक कवयित्रींच्या कवितांच्या कार्यक्रमाची संकल्पना आणि लेखन डॉ. अनुपमा उजगरे ह्यांचे असून ह्या कार्यक्रमाला लक्ष्मीबाई टिळकांच्या 'भरली घागर' ह्या संग्रहाचे उचित असे शीर्षक त्यांनी दिलेले आहे.

**ख्रिस्ती कथालेखिकांचा प्रातिनिधिक संग्रह**

डॉ.अनुपमा उजगरे ह्यांनी संपादित केलेला ख्रिस्ती कथालेखिकांचा प्रातिनिधिक संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर असून तो साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळकांना अर्पण केलेला आहे.

■■■



## डॉ. अनुपमा निरंजन उजगरे
*एम.ए. बी.एड. पीएच. डी.*

**प्रकाशित ग्रंथ : १९९८-२०१६**

• जाण (कथासंग्रह) • तुम्हांला काय वाटतं ? (वैचारिक लेखसंग्रह) • निबंधलेखन • मराठी ख्रिस्ती प्रोटेस्टंट समाज - १८१३-२००० • सांगी (काव्य) • परकीय ख्रिस्ती मिशनरींचे मराठी भाषाविषयक कार्य १५४२-१९६० • चांदणचुरा (ललित) • पश्चात् (काव्य) • विष्णुशास्त्री चिपळूणकर (चरित्र) • पंडिता रमाबाई (चरित्र) • उगवतीच्या क्षितिजाकडे (एकांकिका) • सप्तक (वधस्तंभावरील येशू ख्रिस्ताच्या सात वाक्यांवर चिंतन) • खाद्यसंस्कृतिविषयक म्हणी व वाक्प्रचार • हिरकणी • (संगीतिका, आकाशवाणी पुरस्कार)

**अनुवाद : २०१०-२०१६**

• सागर (अनु.कादंबरीः प्रतिभा जोहरी) • कहन (अनु. काव्यः अनुपमा उजगरे) • मौनदेखील बोलतं (अनु. काव्यः अरुणा गोपि) • सीमेवरून (अनु. काव्यः मनोहर बाथम), सुरजीत पातर ह्यांची कविता (पंजाबी)

**आगामी :** खातेवहीची पाने (आत्मचरित्र, सिंधी पत्रकार लक्ष्मण भाटीया) खंड २ व ३

**संपादन :** महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतिकोश, २०१५

**विशेष :**

• आदर्श शिक्षिका पुरस्कार : रोटरी क्लब, मुलुंड, मुंबई. • उत्तम शिक्षिका पुरस्कार : लायन्स क्लब, मुलुंड, मुंबई. • कुसुमाग्रज पुरस्कार, पुणे • विशाखा पुरस्कार, नाशिक • आरती प्रभू पुरस्कार, रत्नागिरी • कृ. ब. निकुंब पुरस्कार, बेळगाव • अध्यक्ष, विसावे ख्रिस्ती साहित्य संमेलन, मुंबई • चैत्रगौरी पुरस्कार, ठाणे • सन्मित्र पुरस्कार, ठाणे • यु. आर. एल. फौंडशन पुरस्कार, मुंबई • स्वातंत्र्यदिनानिमित्त बहुभाषी कविसंमेलन, पंजाब साहित्य अकादमी, लुधियाना • काव्यसंधि, गंगटोक • प्रजासत्ताकदिनानिमित्त सर्वभाषा राष्ट्रीय आकाशवाणी कविसंमेलन, कोलकाता • इयत्ता नववी मराठी (उच्चस्तर) पाठ्यपुस्तकात कविता समाविष्ट • बहुभाषा काव्योत्सव, हिंदी साहित्य अकादमी दिल्ली • ल. स. वैद्य मुद्रितशोधन पुरस्कार, औरंगाबाद • कांताबाई जैन साहित्य पुरस्कार, जळगाव • स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य पुरस्कार, ठाणे